साने गुरूजी यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान (इ.स. १८९९ – १९५०)

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

तात्विक व सामाजिक विद्याशाखांतर्गत

'इतिहास' विषयातील विद्यावाचस्वती (पीएच.डी.)

पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध

संशोधक

मच्छिंद्रनाथ दगडू सकपाळ

नोंदणी क्र. ०२११४००७२३३

मार्गदर्शक

डॉ. बबन भिवसेन जाधव,

इतिहास विभाग

डिसेंबर २०१८

प्रमाणपत्र

मी प्रतिज्ञापूर्वक नमुद करतो की, प्रस्तुत शोधप्रबंध मच्छिंद्रनाथ दगडू सकपाळ यांचे स्वतःचे लिखाण असून ते माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे. या लिखाणासाठी वापरण्यात आलेल्या साधनांचा योग्य तो श्रेयनिर्देश शोधप्रबंधात केलेला आहे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे तात्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती पीएच.डी (इतिहास) पदवीकरीता प्रस्तुत प्रबंध विद्यापीठास सादर करण्यात येत आहे.

स्थळ :

दिनांक :

डॉ. बबन भिवसेन जाधव

इतिहास विभाग प्रमुख

प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे तात्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती पीएच.डी पदवीसाठी सादर केलेला साने गुरुजी यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान (इ.स. १८९९–१९५०) हा शोधप्रबंध मी प्रा. डॉ. बबन भिवसेन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली लिहिला असून तो इतर कोणत्याही विद्यापीठास अथवा अन्य कोणत्याही पदवी किंवा पदवीकेसाठी सादर केलेला नाही.

स्थळ :

दिनांक :

संशोधक

मच्छिंद्रनाथ दगडू सकपाळ

ऋणनिर्देश

साने गुरूजी यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान हा विषय अभ्यासताना साने गुरूजींच्या राष्ट्रीय व सामाजिक कार्याविषयीचे दुर्लक्षित विविध पैलू मला आकर्षित वाटले म्हणून प्रस्तुत विषय शोधनिबंधासाठी निश्चित करण्याचा निर्णय घेतला.

'साने गुरूजी यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान (इ.स.१८९९–१९५०)' असा शोधप्रबंध मी सादर करीत आहे. या शोधप्रबंधाच्या अभ्यासाठी अनेक लोकांचे बहुमोल सहकार्य व सहाय्य मला लाभले. म्हणूनच हे काम समाधानकारक रीतीने पूर्ण करू शकलो.

प्रथमतः माझे गुरूवर्य आदरणीय डॉ. बबन भिवसेन जाधव यांनी मला सदर संशोधनासाठी वेळोवेळी मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले. अनेकदा चर्चेमधुन स्थूल मानाने या शोधप्रबंधाची रूपरेषा निश्चित करण्यास मला त्यांनी बहुमोल सहाय्य केले. साने गुरूजींचे बहुरंगी अनेक पैलू असणारे व्यक्तीमत्व त्यांचे विविध पैलू समजावून, उलगडून सांगून हा शोधप्रबंध माझ्याकडून पूर्ण करून घेतला. संशोधक विद्यार्थ्याला आवश्यक असणारे स्वातंत्र्य मला देऊन त्यांनी हा शोधप्रबंध पूर्ण करण्यासाठी बहुमोल मार्गदर्शन व सहकार्य केले. त्यांच्या व्यासंगामुळे व संशोधनासाठी अत्यावश्यक मार्गदर्शनामुळे मला हे संशोधन शक्य झाले. याबद्दल त्यांचा सदैव मी ऋणी राहीन.

मी ज्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथुन सदर संशोधन विषय पूर्ण केला. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे तात्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखेचे आधिष्ठाता डॉ. बी.डी. कुलकर्णी तसेच त्या विद्यापीठातील इतिहास प्राध्यापक डॉ. नंदिनी वाघमारे मॅडम, डॉ. स्वराली कुलकर्णी मॅडम यांनी मला पीएच.डी साठी नोंदणीस मान्यता देऊन वेळोवेळी सर्वतोपरी सहकार्य केले. याबद्दल त्यांचाही मी अत्यंत ऋणी आहे. त्याचप्रमाणे त्या विद्यापीठातील संबंधीत प्राध्यापक वर्ग व कर्मचारी वर्ग यांनी केलेल्या सहकार्य व प्रोत्साहनामुळे मी त्यांचा ऋणी आहे.

मी बाल संस्कार विद्यामंदिर, कोकरे, महाड – रायगड (प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक) सेमी इंग्लिश माध्यम येथे काम करीत असताना संशोधन पूर्ण व्हावे म्हणून मला शक्य त्या सवलती देणारे सुसंस्कार शैक्षणिक चॅरिटेबल ट्रस्ट, महाड या संस्थेचे संस्थापक व माझे वडील बंधू मा.श्री. अनिल दगडू सकपाळ यांनीही मला वेळोवेळी सहकार्य व प्रोत्साहन दिले. त्याचप्रमाणे

बालसंस्कार विद्यामंदिर, कोकरेच्या सर्व शिक्षक वर्ग, कर्मचारी वग, सर्व मित्र व हितचिंतक, विद्यार्थी यांच्या सहकार्य व प्रोत्साहनाने हे संशोधन पूर्ण करणे शक्य झाल्याने त्यांचा मी आभारी आहे.

शेतकरी कुटुंबातील असलेले मात्र शिक्षणाचे महत्व जाणणारे व मला शिकण्यासाठी प्रेरित करणारे माझे वडील श्री. दगडू मल्हारी सकपाळ व माझी आई सौ.सुनंदा दगडू सकपाळ त्याचप्रमाणे माझे बंधू श्री महेंद्र दगडू सकपाळ यांच्या प्रोत्साहनामुळे हे संशोधन मी पूर्ण करू शकलो. माझी पत्नी सौ. अल्पना, मुलगा मकरंद, मुलगी श्रध्दा यांनी मला सदैव या कामी उत्साही ठेवून प्रेरित केले. कुटुंबातील इतर घटकांनी सदैव आपआपल्या परीने सहकार्य केले त्यामुळे मला हे संशोधन पूर्ण करणे शक्य झाले.

हे संशोधन पूर्ण होण्यासाठी महाराष्ट्र शासन मुंबई पुराभिलेखागार, भारत इतिहास संशोधन मंडळ पुणे, साने गुरूजी राष्ट्रीय स्मारक माणगांव, जळगाव, धुळे कारागृह, येरवडा कारागृह, प्रताप हायस्कूल अमळनेर, एस.पी कॉलेज पुणे, राष्ट्र सेवादल पुणे, साधना प्रकाशन, केसरी वाडा पुणे, नवाकाळ कार्यालय मुंबई, नवशक्ती कार्यालय मुंबई, साने गुरूजी यांचे जन्मभूमी पालगड–दापोली, साने गुरूजी विद्यालय लोहारमाळ, पोलादपूर , करवा सार्वजनिक वाचनालय महाड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज वाचनालय महाड, संस्कार वाचनालय महाड, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे ग्रंथालय येथील कर्मचारी व अधिकारी यांनी दुर्मिळ पुस्तके वर्तमान पत्र तसेच विविध प्रकारची आवश्यक माहिती उपलब्ध करून दिली. त्यामुळे मी तेथील सर्व कर्मचारी व अधिकारी वर्गाचा ऋणी आहे.

संशोधन काळात अनेक अभ्यासकांचे, मान्यवरांचे मार्गदर्शन मी घेतले. त्यांच्या बरोबर झालेल्या चर्चेमधून मला उपयुक्त माहिती शोध प्रबंधात समाविष्ट करता आली. यात प्रामुख्याने श्री गुलाबराव पाटील (अमळनेर), सुरेश गोपाळराव पाटील या सर्वांचा मी त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल आभारी आहे. खानदेशातील स्वातंत्र्य सैनिकांनी व क्षेत्रिय सर्वेक्षणासाठी जेष्ठ नागरीकांनी प्रश्नावली व अनुसूचीद्वारे माहिती उपलब्ध करून दिली. याशिवाय मी अनेंक मराठी, हिंदी ग्रंथ, मासिके, साप्ताहिके दैनिके अभ्यासली त्यांचे लेखक, संपादक या सर्वांचा मी ऋणी आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रीय इतिहास परिषदांच्यावेळी अनेक प्राध्यापक, इतिहासकार यांच्याशी विषयाच्या अनुषंगाने व संशोधन पध्दतीबाबत केलेली चर्चा उपयुक्त ठरली या सर्वांचा मी आभारी आहे.

शोधप्रबंधाचे काम संगणकावर टायपिंग करणारे श्री. अनिल रमेश इनामदार व त्यास पूर्णत्व येण्यासाठी वेळोवेळी सुचना व माहिती देत सुमारे दोन वर्षाचा काळ सतत सहकार्य देणारे माझे सहकारी श्री. जितेंद्र बाळकृष्ण धोत्रे व पाटील सर यांचाही मी ऋणी आहे. या शोधप्रबंधात साने गुरूजींचे फोटोंची योग्य मांडणी करणारे श्री. वैभव सर, प्रविण सर यांचाही मी ऋणी आहे.

अशाप्रकारे सदर शोधप्रबंध पूर्ण करण्यासाठी मला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य करणारे व माझ्या हितचिंतकांचा मी सदैव ऋणी आहे.

मच्छिंद्रनाथ दगडू सकपाळ

.

अनुक्रमणिका

प्रकरण	प्रकरणाचे नाव	पृष्ठ क्र.
	प्रमाणपत्र	I
	प्रतिज्ञापत्र	II
	ऋणनिर्देश	III-V
	अनुक्रमाणिका	VI
प्रकरण पहिले	प्रास्ताविक	१–१६
प्रकरण दुसरे	साने गुरूजींची जडणघडण व म. गांधीजीच्या विचारांचा प्रभाव	१७–४१
प्रकरण तिसरे	साने गुरूजी व राजकीय स्वातंत्र्याचा लढा	४२–९६
प्रकरण चौथे	साने गुरूजी व सामाजिक समतेचा लढा	९७–१५३
प्रकरण पाचवे	साने गुरूजीचे साहित्य व स्वातंत्र्याचा लढा	१५४–१९९
प्रकरण सहावे	उपसंहार	२००–२११
	संदर्भ – सूची	२१२–२१८
	परिशिष्टे	२१९–२४४
	छायाचित्रे	२४५–२५७

प्रकरण पहिले

प्रास्ताविक

प्रस्तावना

१.१. संशोधन विषय निवडीचा उद्देश

१.२. संशोधनाचे महत्व

१.३. संशोधन पध्दती

१.३.१. ऐतिहासिक संशोधन पध्दती

१.४. संशोधनासाठी मुळ संदर्भ साधनांची उपलब्धता

१.५. संशोधन समस्या

१.६. संशोधनाची उद्दीष्टे

१.७. संशोधनाची गृहीतके

१.८. संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

१.९. संशोधनाची सैध्दांतिक संकल्पना

प्रस्तावना

इ.स. १७ व्या शतकात इंग्रज भारतात व्यापारासाठी आले. त्याकाळी भारतामध्ये अज्ञान, अंधश्रध्दा व मागासलेपणा होता. त्यामुळे भारतीयांच्यात राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा अभाव होता. तसेच अंतर्गत दुही व फंदफितुरी होती. याचा लाभ घेऊन इंग्रजांनी आपले वर्चस्व प्रस्थापित करून भारतभर सम्राजवाद निर्माण केला.

मात्र इंग्रजांच्या सहवासामुळे भारतीयांना पाश्चिमात्य शिक्षणे, संस्कृती, राष्ट्रवाद, स्वयंशासन, लोकशाही, मानवतावाद, समता आणि सामाजिक न्याय या आधुनिक उदारमतवादी विचारसरणीची जाणीव झाली. आपल्या अर्थिक दुरावस्थेला व हलाखीच्या परिस्थितीला इंग्रज सत्ताच जबाबदार असल्याची जाणीव भारतीयांना झाली. पुढे १८५७ च्या बंडात झालेल्या पराभव काळात ब्रिटिशांनी दिलेली मानहानीकारक वागणूक यातून भारतीयाच्यांत निर्माण झालेली ऐक्याची, राष्ट्रवादाची भावना, तसेच धार्मिक व सामाजिक चळवळीद्वारे झालेली जागृती, या सर्वांमुळे भारतीयांच्यांत राष्ट्रवादी भावनेचा उदय झाला. युवक वर्गाने देशभर लोकजागृतीचे व राष्ट्रीय भावनेचे वातावरण निर्माण केले. प्रत्येकाच्या कामाचे स्वरूप जरी वेगवेगळे असले तरी त्यातून वाहणारा राष्ट्रीयतेचा प्रवाह एकच होता. तो म्हणजे 'स्वराज्य' येथूनच स्वातंत्र्य लढ्याची सुरूवात झाली. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात अनेक ज्ञात – अज्ञात क्रांतीवीराने आपले सर्वस्व समर्पण केले. त्यापैकीच एक 'साने गुरूजी' होत. साने गुरूजींचा अज्ञात व दुर्लक्षित झालेल्या कार्याचा व लढ्याचा परिचय व प्रसार व्हावा हाच संशोधनामागील उद्देश आहे.

प्रस्तुत शोध प्रबंध 'साने गुरूजी यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान (इ.स. १८९९–१९५०)' या विषयाशी संबंधीत आहे. सदर विषयावर सखोल अभ्यास करून साने गुरूजींचे ज्ञात–अज्ञात राजकीय लढे व सामाजिक लढे अभ्यासकांसमोर मांडण्याचा प्रयत्न सदर शोध प्रंबधात करीत आहे.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात अनेक राष्ट्रभक्तांचे ब्रिटिशा विरूध्द लढे दिले. मात्र साने गुरूजीनी देश स्वातंत्र्य होण्यासाठी परकीयांविरूध्द राष्ट्रीय लढे दिले त्याचबरोबर देशातील पददलित, शेतकरी व कामगारांना आपले मूलभूत हक्क मिळविण्यासाठी स्वकियांविरूध्द

सामाजिक लढे दिले. अशाप्रकारे महात्मा गांधीनंतर एकाचवेळी राष्ट्रीय लढे व सामाजिक लढे देणारे एकमेव नेते म्हणून साने गुरूजींना ओळखता येते. साने गुरूजींचे हे कार्य इतरांच्या लढ्यापेक्षा भिन्न असल्यामुळे त्यांच्या लढ्यांवर संशोधन व्हावे, साने गुरूजींचे राष्ट्रीय कार्य व सामाजिक कार्य प्रकाशात आणून ते भारतीय समाजापर्यंत पोहचवावे, त्याचप्रमाणे साने गुरूजींचे समाजाला प्रेरणा व जगण्याची कला शिकविणारे साहित्यांचा परिचय व्हावा. ज्या भाषणाने कवितांने व लेखाने त्याकाळी तरूणांच्या मनात देशप्रेम निर्माण केलेले गुरूजींचे विचार व संदेश आजही पुरोगामी समाजाला आणि विशेषतः तरूणांना प्रेरणादायी ठरेल व त्यांच्या मनात देशप्रेम व देशनिष्ठा निर्माण व्हावी हाच उद्देश ठेवून संशोधन विषय निश्चित केला.

साने गुरूजींनी त्यांचे सारे जीवन समाजासाठी विशेषतः दलित, शेतकरी, कामकरी व देशासाठी वाहिलेले होते साने गुरूजीनी (१८९९–१९५०) ह्या कालखंडातील सहा वर्षे सात महिने काळ तुरूंगवास, ७ वेळा उपोषणे, १३५ पुस्तकांचे लिखाण त्यापैकी ७५ पुस्तके प्रकाशित व उरलेला काळ हा सभा, भाषणे, मोर्चे यातून समाजकार्य व राष्ट्रकार्यासाठी व्यथित केला. यावरून असे दिसते की, साने गुरूजींची कार्याची व्याप्ती जास्त होती. त्यांचे सारे जीवनच देशासाठी व समाजासाठी अर्पित केले आयुष्यभर तळमळीने आणि निष्ठेने देशसेवा व समाजसेवा करणाऱ्या एका संत कोटीतल्या महात्मांची ही एक राष्ट्रीय शोकांतिका आहे. आजची तरूण पिढी, विकृत स्वरूपाच्या राष्ट्रप्रेमाकडे जात आहे. समाजातील अबाल वृध्दांची मने सुस्कारित स्वातंत्र्य लढ्यातील योगदानाच्या विचारांची गरज आहे. साने गुरूजींना अभिप्रेत असणारा राष्ट्रवाद हा कोटीतला होता. लोकशाही राष्ट्रवादाने रक्तपात न होता अहिंसक आणि शांततामय मार्गाने या देशात क्रांती घडवून या देशातील किसान व मजूर यांच्या हाती सत्ता द्यावी हा सर्वप्रथम गुरूजीनी विचार मांडला.

साने गुरूजींच्या जीवन चरित्र आणि साहित्याने अनेकांना प्रेरणा दिली. त्यांच्या कार्याचा अभ्यास करताना त्यांच्या विचारांची आजही समाजाला गरज आहे असे वाटते.

साने गुरूजींनी परकीय सत्तेतून देश स्वातंत्र्यसाठी राजकीय लढे दिले, भारतीय समाजामध्ये अस्पृश्यता नष्ट करून समता प्रस्थापित करण्यासाठी व श्रमिकांना आपले मुलभूत हक्क मिळावे यासाठी सामाजिक लढे दिले.

साने गुरूजींच्या राजकीय स्वातंत्र्य, सामाजिक स्वातंत्र्य व व्यक्ती स्वातंत्र्य विचार यासाठी केलेले सत्याग्रह, उपोषणे, भाषणे, सभा, परकियांवर व स्वकियांवर केलेले परखड लिखाण इत्यादी कार्याचे बहुविध पैलू आहेत. गुरूजींच्या काही ठळक वैशिष्ट्यांवर विचारांवर व उपलब्ध साधनांवर प्रस्तुत शोधप्रबंधात अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. व इतिहास अभ्यासकांसमोर मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

गुरूजी सांगतात – "स्वातंत्र्य म्हणजे सर्वांच्या विकासाला संधी, स्वातंत्र्य म्हणजे समाजात समता, स्वातंत्र्य म्हणजे शेतकरी, कामकरी व वंचिताना मुलभूत हक्क देणे." पुढे २० व्या शतकातील वैचारीक प्रबोधनाला सुरूवात झाल्याने साने गुरूजींचे बुध्दीनिष्ठ व सखोल विचारमंथन सुरू झाले. अशाप्रकारे गुरूजींच्या विचारांनी समता प्रस्थापित होऊन राष्ट्रप्रेम वाढीस लागेल. राष्ट्रवाद वाढण्यास व संस्कृती जोपासण्यास या संशोधनाची मदत होईल असे वाटते.

१.१ संशोधन विषय निवडीचा उद्देश

प्रस्तुत शोधप्रबंध 'साने गुरूजी यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान (इ.स.१८९९–१९५०)' हा आहे. सदर विषयावर सखोल अभ्यास करून साने गुरूजींचे ज्ञात–अज्ञात राजकीय लढे व सामाजिक लढे मांडण्याचा प्रयत्न सदर शोध प्रबंधात केलेला आहे.

साने गुरूजींचा स्वातंत्र्य लढा हा केवळ इंग्रजाशी नसून भारतातील प्रस्थापित समाजव्यस्थेविरोधातही होता. त्यामुळे भारतीय संस्कृतीमधील ईश्वराविषयी किंवा परमेश्वराविषयी असणारे विचार व त्याचा प्रत्यक्ष अनुभव समाजातील दलित–पद्दलित जन सामान्यामध्ये गुरूजींनी पाहिला. त्यामुळे साने गुरूजींनी परकीया विरूध्द दिलेल्या राजकीय लढ्यासोबत स्वकीयाविरूध्द उभारलेल्या सामाजिक लढ्यांचाही अभ्यास महत्वाचा वाटतो. ब्रिटिशाविरोधी संघर्षाबरोबर भारतीय समाजातील अभिजात वर्गाबरोबर झालेल्या संघर्षाचा अभ्यास या शोधप्रबंधात केलेला आहे.

साने गुरूजींचे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील योगदान परकीयाप्रमाणेच स्वकीयांविरूध्द् असल्यामुळे ते विशेष उल्लेखनीय आहे. भारतीय आधुनिक इतिहासातील साने गुरूजी यांनी

परकीयांसोबत दिलेल्या लढ्याबरोबर जनसमान्यांसाठी स्वकीयांशी लढे दिले व संघर्ष केला हे साने गुरूजींच्या विचार प्रवाहामधून व प्रत्यक्ष चळवळीतून निदर्शनात येते.

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात अनेक ज्ञात–अज्ञात क्रांतीवीरांनी आपले सर्वस्व समर्पण केले व देश स्वातंत्र्य होण्यासाठी अनेक क्रांतीवीरांनी ब्रिटिश सत्तेविरूध्द लढे दिले. मात्र साने गुरूजींनी परकीय सत्तेपासून देश व देशातील जनता स्वातंत्र्य व्हावी यासाठी लढे दिले. त्याप्रमाणे स्वकीय सावकार, मालक व कर्मठ समाज व्यवस्थेतून सर्वसामान्य जनता, पददलित, शेतकरी, कामगार, स्त्री स्वातंत्र्य व्हावी यासाठी निर्धास्तपणे स्वकियांविरूध्द्ही सामाजिक लढे दिले व हे लढे इतरांच्या लढ्यापेक्षा भिन्न असल्यामुळे त्यांच्या राजकीय व सामाजिक लढे यावर संशोधन व्हावे म्हणून संशोधनासाठी हा विषय निवडला आहे.

साने गुरूजींच्या सामाजिक व राजकीय कार्यावर उपलब्ध प्राथमिक व दुय्यम साधनांचे परीक्षण व अभ्यास करून साने गुरूजींचे राष्ट्रीय कार्य व सामाजिक कार्य प्रकाशात आणणे यासाठी हा प्रस्तुत विषय संशोधनासाठी घेतलेला आहे. साने गुरूजींचे साहित्य, लेख, भाषणे इत्यादी द्वारे त्यांचे कार्य समाजापर्यंत पोहचलेले आहे. परंतु गुरूजींचे राष्ट्रीय लढे व सामाजिक लढ्यातील योगदान लोकांना फारसे परिचीत नाही. साने गुरूजींच्या या लढ्यांवर चिकित्सक संशोधन व्हावे या उद्देशाने विषय निश्चिती केली आहे.

काळाच्या ओघात अनेक वेळा संशोधक, इतिहासकार एकाच घटनेकडे भिन्न भिन्न दृष्टीकोनातून पाहत असतो. त्या घटनेचे स्पष्टीकरण देत असताना वैचारिक धारणा, श्रध्दा, जीवनमूल्ये बदलत असतात अशा काही कारणांचा विचार करता उपलब्ध नवीन प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करून इतिहासाचे पुर्नलेखन आवश्यक ठरते.

साने गुरूजींचा जन्मकाळ इ.स.१८९९ ते इ.स.१९५० असा असून त्यांच्या राजकीय व सामाजिक कार्याला इ.स.१९३० पासून सुरूवात झाली. मात्र त्यांच्या कार्यावर बालपणाच्या संस्काराचा प्रभाव पडलेला दिसून येतो. त्यामुळे संशोधन अभ्यासाचा कालखंड इ.स.१८९९ ते इ.स.१९५० असा निवडला आहे. संशोधकाने नावीन्यपूर्ण संशोधन केलेले आहे.

भारत देश स्वातंत्र्य होण्यासाठी अनेक क्रांतीवीरांनी आपले सर्वस्व समर्पण केले,

त्यापैकीच एक साने गुरूजी होत. साने गुरूजींनी इ.स. १९३० साली भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सामील झाले. गुरूजींच्या साहित्याचा विशेषतः कविता, प्रभातगीते, भाषणांचा जनमाणसांत स्वातंत्र्याची आकांक्षा चेतावण्यासाठी विलक्षण परिणाम झाला. या सर्व प्रयत्नांतून लोकजागृतीचे व राष्ट्रीय भावनेचे वातावरण निर्माण केले त्यामुळे त्या काळातील फार मोठा युवक वर्ग या कार्याकडे आकर्षित झाला. अक्षरशः अनेक युवकांनी स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होण्यास प्रेरित होऊन या कार्याची धुरा आपल्या खांद्यावर घेतली प्रत्येकाच्या चळवळीचे स्वरूप वेगवेगळे असेल तरी त्यांचे सर्वांचे उद्दीष्ट हे एकच होते ते म्हणजे " देश स्वातंत्र्य करणे" होय.

साने गुरूजीनी आपल्या साहित्यातून, परिपत्रकेतून, भाषणांतून व गोड वाणीतून तरूणांच्या मनात देशप्रेम निर्माण केले. गुरूजीनी जनतेला व तरूणांना दिलेला संदेश तसेच राष्ट्रनिष्ठा जागृत करण्यासाठी केलेले प्रयत्न हे पुरोगामी समाजाला आणि विशेषतः तरूणांना प्रेरणादायी ठरेल व त्यांच्या मनात देशप्रेम व देशनिष्ठा निर्माण व्हावी हाच विषय निवडीचा उद्देश. साने गुरूजींच्या वेगवेगळ्या कार्याचा परिचय व प्रचार व्हावा या उद्देशाने सदर विषय संशोधनासाठी निवडलेला आहे. साने गुरूजींचा अज्ञात व दुर्लक्षित झालेल्या कार्य व लढ्यांचा परिचय व्हावा हा उद्देश या संशोधनाने साध्य होतो.

साने गुरूजी हे 'श्यामची आई' या साहित्यापुरतेच मर्यादित व्यक्तिमत्व नव्हते तर त्यांच्या समाजाला प्रेरणा व जगण्याची कला शिकविणारे इतरही साहित्यांचा परिचय या प्रबंधातून पहायला मिळतो.

लो. टिळक, महात्मा गांधी, विनोबा भावे इ सारख्यांच्या विचारांचा प्रभाव साने गुरूजीना संस्कारीत करण्यासाठी दिसून येतो याची ओळख व जाणिव सदर प्रबंधातून मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१.२ संशोधनाचे महत्त्व

साने गुरूजींच्या जीवन चरित्र आणि साहित्याने अनेकांना प्रेरणा दिली. गुरूजींच्या कार्याचा अभ्यास करताना त्यांच्या विचारांची आजही देशाला व समाजाला गरज आहे असे वाटते.

साने गुरूजीनी त्यांचे सारे जीवन समाजासाठी विशेषतः दलित, शेतकरी, कामकरी व देशासाठी वाहिलेले होते. गुरूजींनी परकीय सत्तेतून देश स्वातंत्र्य करणे, समाजामध्ये समता निर्माण करणे व शेतकरी कामगारांना आपले मूलभूत हक्क मिळविण्यासाठी सारे जीवन समर्पित केले. आयुष्यभर तळमळीने आणि निष्ठेने देशसेवा व समाजसेवा करणाऱ्या एका संत कोटीतल्या महात्म्याची ही एक राष्ट्रीय शोकांतिका आहे.

आजची तरूण पिढी, विकृत स्वरूपाच्या राष्ट्रप्रेमाकडे जात आहे. समाजातील अबाल वृध्दांची मने, सुसंस्कारित भावसमृध्द आणि विशाल बनविण्यासाठी साने गुरूजींच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानांच्या विचारांची गरज आहे. साने गुरूजीना अभिप्रेत असणारा राष्ट्रवाद हा कोटीतला एक होता. लोकशाही राष्ट्रवादाने रक्तपात न होता अहिंसक आणि शांततामय मार्गाने या देशात क्रांती घडवून या देशातील किसान आणि मजूर यांच्या हाती सत्ता द्यावी हा गुरूजींनी विचार मांडला.

स्वातंत्र्य म्हणजे सर्वांच्या विकासाला संधी, स्वातंत्र्य म्हणजे समाजात समता, स्वातंत्र्य म्हणजे शेतकरी, कामगार व वंचिताना मूलभूत हक्क देणे, स्वातंत्र्य लढ्या अगोदर सुरू झालेले हे परिवर्तन आणि नंतरच्या काळातील स्थित्यंतरे यामुळे २० व्या शतकातील भारतातील जीवन ढवळून निघाले. अशा दोलायमान परिस्थितीमुळे राष्ट्रीय प्रश्न प्रकट झाले. तसेच वैचारीक प्रबोधनाला सुरूवात झाल्याने याबाबत साने गुरूजींचे बुध्दिनिष्ठ व सखोल विचारमंथन सुरू झाले. शैक्षणिक व भौतिक सुधारणांमुळे ज्ञानांची क्षितिजे रूंदावण्यास मदत झाली. विशेषतः सुशिक्षित तरूणांनी आपल्या देशाकडे चिकित्सक दृष्टीने पाहण्यास सुरूवात केली. साने गुरूजींच्या विचारांनी समता प्रस्थापित होऊन राष्ट्रप्रेम वाढीस लागेल तसेच राष्ट्रवाद वाढण्यास व संस्कृतीची जोपासना होण्यास या संशोधनामुळे मदत होईल.

१.३ संशोधन पध्दती

इतिहास संशोधनाच्या प्रकारात निवेदनात्मक, ऐतिहासिक, चिकित्सक विश्लेषनात्मक व मुलगामी संशोधन असे विविध प्रकार आहेत. सदर निवडलेला संशोधनाचा विषय ऐतिहासिक संशोधन प्रकारात मोडणार आहे.

१.३.१ ऐतिहासिक संशोधन पध्दती

सदर विषय ऐतिहासिक संशोधन पध्दती प्रकारामध्ये येतो. याविषयीच्या संशोधनाचे स्वरूप थोडक्यात पुढील प्रमाणे आहे. सदर संशोधनासाठी मुळ संदर्भ साधने उपलब्ध व्हावीत यासाठी (इ.स.१८९९ ते इ.स.१९५०) या अभ्यासकाळातील कागदपत्रांचा, वर्तमानपत्रांचा शोध घेतला. त्यामध्ये साने गुरूजी लिखित वृत्तपत्रे, साप्ताहिके, साहित्य लेख, त्यांची भाषणे व त्यांचा प्रकाशित – अप्रकाशित पत्रव्यवहार इ. साहित्याचा अभ्यास केला. गुरूजींच्या समकालीन लोकांनी, मान्यवरांनी व स्वातंत्र्यसैनिकांनी सांगितलेल्या त्यांच्या आठवणी यांचा वापर केलेला आहे. त्याची सत्यता पडताळण्यासाठी सदर संशोधन कालखंडातील इतिहासाचे अभ्यासक, साहित्यिक, गुरूजीच्या चरित्राचे अभ्यासकांच्या साहित्याचा आधार घेऊन आवश्यक ते संदर्भ वापरण्यात आलेले आहेत.

१.४ संशोधनासाठी मुळ संदर्भ साधनांची उपलब्धता

साने गुरूजी राष्ट्रीय स्मारक, माणगांव (रायगड) ग्रंथालय, साधना साप्ताहिक कार्यालय, (पुणे) टिळक महाराष्ट्र विद्यापीठांचे ग्रंथालय, डॉ. आंबेडकर कॉलेज महाड (मुंबई विद्यापीठ) ग्रंथालय, भारत इतिहास संशोधन मंडळ (पुणे), जळगाव, धुळे, गॅझेटियर व शासकीय दप्तरे ही अधिकाअधिक उपयुक्त ठरली असून त्याचा अधिकाधिक वापर केला आहे.

संशोधनासाठी आवश्यक असणारी अधिक माहिती उपलब्धेतेसाठी प्राथमिक साधनांसोबत दुय्यम साधनांचा वापर केलेला आहे. यामध्ये साने गुरूजीच्या विचार व कार्यावर निर्माण झालेले साहित्य, वृत्तपत्रे यांचा वापर केलेला आहे. त्याचबरोबर संशोधन अभ्यासकाळातील भारतीय इतिहासासंदर्भात काही साहित्य, लेख यांचा दुय्यम साधने म्हणून वापर

केलेला आहे. इतिहास संशोधनात दृकश्राव्य माध्यमांचा सदर शोधप्रबंधासाठी वापर करण्याचा प्रयत्न केला. यासाठी मुंबई दुरदर्शनवर प्रसारित झालेली गुरूजींवरची भाषणे, पुणे आकाशवाणीवर प्रसारित व्याख्याने, प्र.के अत्रे प्रदर्शित चित्रपट इ. चा वापर करण्याचा प्रयत्न केला. अभ्यासकाळातील साने गुरूजींचे फोटो, सहकाऱ्यांचे फोटो इ.चा वापर करण्याचा प्रयत्न केला.

साने गुरूजींचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदानाविषयी अभ्यास करताना त्यांची कार्यभूमी खानदेशातील गुरूजींचा स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग व सुरूवात यांचा अभ्यास करण्यासाठी प्रत्यक्ष भेटी दिल्या व संबंधित व्यक्ती ठिकाणांचा अभ्यास केला. संबंधित स्वातंत्र्यसैनिक , मान्यवरांच्या, नातेवाईकांच्या मुलाखतीद्वारे संदर्भ याची मदत घेऊन संशोधन कार्य पूर्ण करण्यात आले.

१.५ संशोधन समस्या :

अभ्यास कालखंडातील अनेक घटनेकडे पाहताना अनेक वेळा संशोधक, इतिहासकार आपआपल्या दृष्टीकोनात त्याकडे पाहून त्यावर स्पष्टीकरण देतील कारण काळाच्या ओघात मनुष्यांच्या मानसिकतेत बदल होत असतो. वैचारिक भावना, श्रध्दा बदलत असतात अशा विविध कारणे व मानसिकतेतील बदल याचा विचार करता उपलब्ध नवीन साधनांचा वापर करून इतिहासाचे पुर्नलेखन करणे आवश्यक ठरते. या सर्व बाबींचा विचार करताना काही समस्यांना सामोरे जावे लागते व त्या त्या काळातील विचार स्विकारावे लागतात.

सदर संशोधनाचा अभ्यास करताना शैक्षणिक, राजकीय, सामाजिक आणि धार्मिक कार्यात त्यांच्या कालखंडात काम करणारे साने गुरूजी आणि त्यांचे जीवनध्येय, निस्वार्थी भावना आणि स्थानिक प्रश्न, समस्यांची माहिती उपलब्ध करावी लागते.

साने गुरूजींचा राजकीय, सामाजिक लढा, राष्ट्रसेवा दल, आंतरभारती संघटना, साधना साप्ताहिक, कामगार व शेतकरी लढे, पंढरपूर चळवळ या सर्वांचा भारतीय स्वातंत्र्य लढ्यावर होणारा परिणाम याचा अभ्यास करताना त्यांच्या कार्याच्या विकासाची गरज तसेच भारतीय संस्कृती व परिस्थिती अभ्यासावी लागते.

आजच्या काळात भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे आकलन करण्यासाठी मागील पारतंत्र्यकाळातील विचारांचा आढावा घेऊन भारतीय स्वातंत्र्य लढयातील ज्ञान उलगडले पाहिजे असे अनेक पैलू संशोधनाचा गाभा आहे.

१.६ संशोधनाची उद्दीष्टे

१. साने गुरूजीचे स्वातंत्र्य लढ्यात असलेले योगदान व विचारांचा उद्देश जाणून घेणे.

२. साने गुरूजीनी स्थापित केलेल्या राष्ट्रसेवादल संघटना, आंतरभारती संकल्पना, साधना साप्ताहिक , काँग्रेस साप्ताहिक, साहित्य, कामगार व शेतकरी लढे, पंढरपूर चळवळ, स्त्री विषयक विचार, भारतीय संस्कृती विचार याच बरोबर व्यक्ती स्वातंत्र्याची व सामाजिक समतेची मुल्य रूजविण्यात केलेल्या कार्याचा आढावा घेणे.

३. सामाजिक समतेच्या दृष्टीने साने गुरूजींना अभिप्रेत असणारा समाज अभ्यासणे.

४. आजच्या वैज्ञानिक युगात साने गुरूजींना अभिप्रेत असणारी राष्ट्रीयता, राष्ट्रवाद, समाजवाद, लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि विज्ञाननिष्ठा ही मुल्ये अभ्यासणे.

५. देशाचे आदर्श नागरिक बनविण्यासाठी विद्यार्थी तरूणांमध्ये साने गुरूजींनी रूजवलेल्या विचारांचा व मुल्यांचा अभ्यास करणे.

६. भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यात अहिंसा व निःशस्त्र प्रतिकार या तत्वांचा अर्थ व कार्य जनसामान्यांपर्यत साने गुरूजींनी कसे पोहचविले याचा अभ्यास करणे.

या सर्वाचा अभ्यास करताना संशोधनासाठी खूप फायदा झाला. साने गुरूजींना अभिप्रेत असलेला लढा, राजकीय लढा व सामाजिक लढा एकसोबत लढला पाहिजे याचा अभ्यास महत्वाचा वाटतो.

१.७ संशोधनाची गृहीतके

सदर शोधप्रबंध करताना प्राथमिक व दुय्यम उपलब्ध साधनांचा वापर करून समोर काही गृहीतके ठेवली होती.

१. स्वातंत्र्याच्या लढ्याला साने गुरूजींच्या योगदानामुळे गतीमानता, व्यापकता व बळकटी आली.

२. साने गुरूजींच्या योगदानामुळे समाजामध्ये व्यक्ती स्वातंत्र्याची भावना वाढीस लागली व आपल्या मुलभूत हक्काची जाणीव निर्माण झाली. त्यासाठी प्रतिकार करण्याची क्षमता निर्माण झाली.

३. साने गुरूजींच्या जीवन कार्यावर म. गांधीच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो. त्यामुळे गुरूजीच्या विचार कार्यामुळे व महात्मा गांधीजींच्या विचार कार्यामुळे लोकांना सद्‌गुणांची जोपासना व म. गांधीजीचे अंहिसात्मक विचार सर्व सामान्यांपर्यंत पोहचविण्यास मदत झाली.

४. साने गुरूजींच्या स्वातंत्र्य लढ्यातील सहभागामुळे राष्ट्रीय ऐक्य प्रस्थापित होण्यास मदत झाली. गुरूजींच्या भाषणांनी प्रभावित होऊन कष्टकरी वर्ग ही स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होण्यास प्रवृत्त झाला.

५. साने गुरूजींच्या राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीमुळे तरूणांमध्ये नवचैतन्य व देशप्रेम वाढीस लागले व त्यामुळे मोठ्या प्रमाणात युवकवर्ग स्वातंत्र्य लढ्यात सहभाग होऊ लागला.

६. साने गुरूजींच्या साहित्यामुळे भारतीय समाजात प्रबोधन व सामाजिक जाणिव व आदर्श निर्माण झाला. गुरूजींच्या साहित्यामुळे सर्व स्तरातून प्रबोधन झाल्याकारणे शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, समता व मुलभूत हक्कांची जाणीव होऊन त्याची मुळे रूजली.

७. साने गुरूजींचे साहित्य विशेषतः भाषणे, प्रचारगीते यामुळे अशिक्षित समाजात चैतन्य निर्माण झाले व सामाजिक धार्मिक गोष्टीची जाणिव निर्माण झाली. समाजामध्ये समता नांदावी याची जाणीव निर्माण होऊन आपण एका ईश्वराचे लेकरे आहोत याची जाणीव निर्माण झाली.

१.८ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

"साने गुरूजी यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान (इ.स. १८९९–१९५०)" या विषयावर संशोधन करताना साने गुरूजीनी दिलेले सामाजिक लढे व राजकीय लढे यांचाही अभ्यास करावा लागतो. गुरूजींनी केवळ इंग्रजांविरूध्द लढे दिले नाहीत तर सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी दिलेले लढे श्रमजीवी समाजाला न्याय हक्क मिळविण्यासाठी दिलेले लढे, धार्मिक

कर्मठ चालीरीती विरूध्द दिलेले लढे, संसारातील स्त्री पुरूष समतेसाठी दिलेले लढे याचाही अभ्यास होणे अनिवार्य आहे यावरून संशोधनाची व्याप्ती ही विषयापुरती मर्यादित दिसून येत नाही.

सदर संशोधनाचा अभ्यास करताना विषयाच्या कक्षा रूंदावताना दिसून येतात कारण साने गुरूजीनी (इ.स. १८९९–१९५०) ह्या कालखंडातील सहा वर्ष व सात महिने एवढा काळ तुरूंगवासात घालविला व उरलेला काळ हा समाजकार्य व राष्ट्रकार्यासाठी व्यथित केला. यावरून असे दिसून येते की, साने गुरूजीनी आपले जीवनच देशासाठी व समाजासाठी समर्पित केले. त्यांचे कार्य महाराष्ट्रातील विविध भागात झाले म्हणून विषयाची व्याप्ती वाढतच गेलेली दिसून येते.

सदर संशोधन विषयाची व्याप्ती जरी अमर्यादित असली तरी त्याला इ.स. १८९९ ते १९५० या कालखंडातील घटनांचा अभ्यास केला आहे. साने गुरूजींचे सामाजिक कार्य व राष्ट्रीय कार्याचा इतर राष्ट्रीय नेत्यासारखा कोणी समोर आणण्याचा प्रयत्न केलेला दिसून येत नाही. जगाला ज्यांनी जगायला शिकविले, जगावर प्रेम करायला शिकविले त्या व्यक्तीला समाजाने दुर्लक्षित करू नये म्हणून जास्तीत जास्त साधनांचा वापर करून गुरूजीचे विचार समाजासमोर आणण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सदर संशोधन विषय भारतीय स्वातंत्र्य लढयापुरता पाहिला तर तो मर्यादित होऊ शकतो. पण तो राष्ट्रीय लढ्यासोबत, सामाजिक लढ्यांपर्यत पाहिला तर गुरूजीचे जीवनकार्य हे शेवटच्या श्वासापर्यंत लढाऊ होते हे दिसून येते व विषयाची व्याप्ती वाढते.

म. गांधीजीच्या विचारांचा व तत्वज्ञानाचा पगडा साने गुरूजीच्या जीवनात पदोपदी दिसून येतो. म. गांधीनी अहिंसा, सत्याग्रह चळवळीतून इंग्रजाविरूध्द स्वातंत्र्य लढे दिले व तसे समाजालाही प्रवृत्त केले. म. गांधीना राष्ट्रीय लढे व सामाजिक लढे सोबतच लढले पाहिजे हे अपेक्षित होते हे गांधी तत्वज्ञान गुरूजीना मनोमन उमगले होते.त्याच्याच पुढे वापर करून गुरूजींनाही राष्ट्रीय लढ्यासोबत सामाजिक लढे एकसोबत दिलेले दिसून येतात.

१.९ संशोधनाची सैंध्दातिक संकल्पना

अध्यापन कार्य, समाजसेवा, स्वातंत्र्ययुध्द अशा बहुविध क्षेत्रामध्ये आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणारे आदर्श व्यक्तिमत्व म्हणजे साने गुरूजी. साने गुरूजींचे जीवन चरित्र, सामाजिक व

राष्ट्रीय कार्य व साहित्याने अनेकांना प्रेरणा दिली. त्यांच्या कार्याचा अभ्यास करताना त्यांच्या विचारांची आजही देशाला व समाजाला गरज आहे असे वाटते.

भारत भूमी इंग्रज सत्तेतून मुक्त करून स्वतंत्र करण्यासाठी लढा व चळवळीची आवश्यकता होती. त्यासाठी राष्ट्रप्रेम जागृत करून इंग्रजांविरूध्द लढा देणे गरजेचे होते. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी आपण हिंसक मार्गाने मिळवू शकत नाही कारण इंग्रजांकडे हत्यारे,बंदुका सैन्य होते. त्यांना सामोरे जाता येणार नाही. यासाठी सत्याग्रह, उपोषण, कायदेभंग, चळवळ, लेख, विशेष सभा–भाषणे इ. महात्मा गांधीजींच्या अहिंसक मार्ग अवलंबून स्वातंत्र्य मिळणे शक्य होते. यासाठी गुरूजीनी तसा खानदेशातील गावोगाव फिरून प्रचार व प्रसार केला व त्यांच्या भाषणाने व विचारांने अनेक तरूण प्रेरित होऊन स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झाले.

गुरूजी आपल्या भाषणातून राष्ट्रीय एकात्मतेची शिकवण देऊन सामाजिक न्याय, सामाजिक समता, सामाजिक बंधुभाव व राष्ट्रप्रेम या गोष्टी कशा आवश्यक आहेत, हे पटवून सांगत. साने गुरूजी आपल्या जीवनात निःस्वार्थ भावनेने सेवा करीत, असताना सभोवतालच्या समाजात घडत असलेल्या घडामोडी पासून स्वतःला वेगळे न ठेवता सामाजिक कार्यात भाग घेऊन जनतेला सहकार्य करून दिलासा देत असत. समाजातील दोष दाखवून तटस्थ न राहता त्यासाठी प्रत्यक्षपणे पुढाकार घेऊन चळवळ उभी करण्यासाठी साने गुरूजीनी नेहमीच तयारी ठेवली. साने गुरूजी स्वातंत्र्य लढ्यात कार्य करीत असताना सामाजिक समतेची भुमिका त्यांनी आपल्या व्याख्यानातून आणि आचार विचारांतून पटवून दिली. आपल्या जीवनात झालेला विरोध, टिका, शिक्षा, उपहास, तुरूंगवास, आर्थिक चणचण अशा अनेक गोष्टीचा सामना करीत असताना गुरूजीनी आपली सुधारणावादी भूमिका आणि त्यासाठीची धडपड सोडली नाही.

साने गुरूजीनी इंग्रज सत्तेतून देश स्वतंत्र करणे, सामाजिक समता प्रस्थापित करणे व श्रमिकांना आपले मुलभूत हक्क मिळविण्यासाठी सारे जीवन समर्पित केले. म. गांधीना राष्ट्रीय लढे व सामाजिक लढे सोबतच लढले पाहिजे हे अपेक्षित होते. हेच गांधी–तत्वज्ञान गुरूजींनी अंगीकारले.

साने गुरूजीनी इ.स. १९३० मध्ये पहिल्या सविनय कायदेभंग चळवळीत सहभाग घेतला.

इ.स. १९३२ मध्ये दुसऱ्या सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेतला. इ.स. १९३४च्या वैयक्तिक सत्याग्रहात भाग घेतला. इ.स. १९३७ ते १९३९ या काळात गुरूजींना शेतकरी कामगारांचे लढे, परिषदा, मोर्चे, उपोषणे, फैजपूर काँग्रेस अधिवेशनात महत्वाचा भाग घेतला. पुढे १९४२च्या ऑगस्ट क्रांती लढ्यात गुरूजींनी भूमिगत कार्य केले. सामाजिक समता प्रस्थापित व अस्पृश्यता निवारण कार्यासाठी इ.स. १९४७ मध्ये प्राणांतिक उपोषणे करून पंढरपूर मंदिर अस्पृश्यांना खुले करून दिली. गुरूजींचे लेखन, कविता, मासिके, लेख इ. माध्यमातून तरूणांमध्ये राष्ट्रप्रेम जागृत ठेवून स्वातंत्र्य लढ्यात सहभाग होण्यास प्रवृत्त केले.

साने गुरूजींचे राष्ट्रप्रेम त्यांच्या साहित्यातून दिसून येते. त्यांनी केलेल्या कार्याची ओळख पुरोगामी समाजाला व्हावी व त्यांचा आदर्श समाजात निर्माण व्हावा. या अनुषंगाने संशोधन कार्य सुरू केले. संशोधनाचा विषय जरी स्वातंत्र्यपूर्व काळातील असला तरी वर्तमान स्थितीत त्या विचारांचा प्रभाव संभवनीय उपयुक्त आहे. यामध्ये साने गुरूजींचे केलेले भारतमातेसाठीचे लढे, व्यक्ती स्वातंत्र्य लढे, चळवळी व आंदोलने व त्यांचे साहित्य या अनेक सिध्दांताचा समावेश संशोधन विषयात केलेला आहे.

१९ व्या शतकात ब्रिटिशांनी भारतात सत्ता स्थापन केल्यामुळे राजकीय दृष्ट्या हिंदुस्थान एक झाला. ब्रिटिशांनी सुरू केलेल्या इंग्रजी शाळा, दळणवळण सेवा, तारयंत्रण, औद्योगिककरण या सर्वांमुळे भारतीयांच्या ज्ञानकक्षा विस्तारू लागल्या व आपणच आपल्या अवनतीस कारणीभूत असल्याची भावना नवशिक्षितांना होऊ लागली. आपण पाश्चात्य लोकांपेक्षा अनेक पटीने मागे आहोत याची जाणिव भारतीयांना होऊ लागली. या आत्मपरिक्षणाच्या प्रक्रियेमुळे समाजात नवचैतन्य निर्माण होण्यास मदत होऊ लागली. यातूनच धार्मिक आणि सामाजिक सुधारणेच्या पर्वाला हिंदूस्थानात सुरूवात झाली.

या सर्वाचा परिणामामुळे भारतीय नेत्यांना हिंदूस्थानी लोकांत राष्ट्रीय भावना निर्माण करावी व ऐक्य निर्माण करावे अशी जाणीव निर्माण झाली. ब्रिटिशांनी सुरू केलेल्या कायदा, न्याय, महसूल, शिक्षण या सर्वांमुळे हिंदूस्थानी समाजात ऐक्य भाव निर्माण होण्याची प्रक्रिया सुरू झाली व राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण झाली आपल्यावरील अन्यायाची मनात जाणिव निर्माण झाली. यातूनच स्वातंत्र्य लढ्याची रणशिंगे फुंकली गेली.

या सर्व परिस्थितीचा विचार करता भारतीय समाजात राष्ट्रीयत्वाची भावना रूजविणे, ऐक्यभाव निर्माण करणे, लोकसंघटन करून लढे देणे यासाठी देशाला, समाजाला नेतृत्वाची गरज होती व हे नेतृत्व लो. टिळकांनी केले. पुढे गांधीजीनी असहकार चळवळ, स्वदेशी चळवळ, सत्याग्रह या मार्गाचा अवलंब करून टिळकांचे कार्य जोमाने पुढे नेले. याच कार्याचा व विचारांचा प्रभाव साने गुरूजींवर होऊन गुरूजीनी १९३० साली स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतला व देश स्वातंत्र्य करण्यास मदत केली. गुरूजीच्या काळात अनेक नेते समाजात होते तथापी साने गुरूजीनी आपल्या अंगातील त्याग, परोपकार, लोककल्याण, धैर्य, दुसऱ्यासाठी कष्ट व त्रास सहन करण्याची वृत्ती, समाजात समता नांदावी यासाठीचे कार्य इ. कार्यानी देश स्वातंत्र्य करण्यास सहकार्य केले.

साने गुरूजी स्वतः जगावर प्रेम करणारे व जगाला प्रेम करायला शिकविणारे व्यक्तीमत्व होते. ईश्वर माणसांत आहे. प्राणीमात्राचे कल्याण साधणे हेच धर्मशास्त्र आहे. या भारतीय तत्वज्ञानाप्रमाणे व सिध्दांताप्रमाणे जीवन ध्येय समोर ठेवून आधुनिक भारताच्या जडणघडणीत अत्यंत महत्वाचे व मोलाचे योगदान साने गुरूजीनी दिले आहे.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील गांधीयुगाचा प्रारंभ साने गुरूजीच्या राजकीय विचारांच्या संदर्भात महत्वाचा ठरतो. इ.स.१९२० पासून गांधीयुगाचा कालखंड गुरूजींच्या महाविद्यालयीन विद्यार्थी दशेचा होता हा कालखंड संस्कारांचा म्हणता येईल. गुरूजीचा प्रत्यक्ष राजकारणातील सहभाग १९३०च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीपासून होतो. १९३० पासून १९५० मधील २० वर्षाचा कालखंड हा गुरूजी राजकीय विचार आकारला येण्याचा व व्यक्त होण्याचा काळ होय. राजकीय दृष्टीकोनातून हा अंत्यत संवेदनाक्षम कालखंड आहे हे उघडच आहे.

साने गुरूजींच्या राजकीय विचारांचे केंद्र सर्वसामान्य श्रमिक माणूस होता. त्याच्यावर होणारा अन्याय दूर होईल, त्याला प्रतिष्ठेने जगता येईल अशी व्यवस्था करणे हे गुरूजींचे ध्येय होते. शेतकरी व कामगार ही काँग्रेसची दोन फुप्फुसे आहेत असे गुरूजीनी म्हटले असले तरी शेतकरी व कामगारांची हेळसांड काँग्रेस पक्षाकडून होते आहे याची जाणिवही गुरूजींना होती. यासाठी साने गुरूजी कॉग्रेसमध्ये राहूनही काँग्रेसविरूध्द बोलायला घाबरले नाही. त्यांनी आपल्या वृत्तपत्रातून काँग्रेसवर टिका केली. स्वकीयांनी केलेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी गुरूजीनी स्वकीयांवर टिका केली.

इ.स १९३७ मध्ये या काळात साने गुरूजींचा शेतकऱ्यांचे लढे, परिषदा, गिरणी कामगारांचे प्रश्न, संप, मोर्चे यामध्ये महत्वाचा सहभाग होता. १९४२ च्या नंतरच्या कालखंडात गुरूजींचा भांडवलशाहीला विरोध, जमीनदारीला विरोध, समतेचे अधिष्ठान या सर्व गोष्टीवर भर कायम राहिला. आर्थिक विषमता आपण कायद्याने दूर करू शकू, पण इतर प्रकारची विषमता जनतेच्या उत्कट प्रयत्नांतून नाहीशी होईल असे गुरूजींचे म्हणणे आहे. राजकीय यंत्रणेतील सुधारणेपेक्षाही समाजमनाला नैतिक अधिष्ठान असण्याची आवश्यकता गुरूजींच्या विचारातून दिसून येते.

साने गुरूजी एका बाजूला राजकीय यंत्रणेच्या योग्य उपयोगातून जमीनदारी रद्द करण्याची अपेक्षा गुरूजी करतात व त्यातून श्रमिकाच्या उद्याची शक्यताही ते पाहतात आणि त्याचबरोबर सर्वांना विकासाची समान संधी देणारा समाज, व्यापक सहानुभूती, बंधूभाव सर्वांची प्रतिष्ठा संभाळणारा समाज, प्रत्यक्षात आलेल्या समाजाचीही स्वप्नही पाहतात.

* * * *

प्रकरण दुसरे

साने गुरूजीची जडण घडण व म. गांधीच्या विचाराचा प्रभाव

प्रस्तावना

२.१. साने गुरुजींचा जन्म व बालपण

२.२. आईचे संस्कार

२.३. वडीलांचे संस्कार

२.४. शिक्षणासाठी खडतर प्रवास

२.५. मातृवियोग

२.६. पितृवियोग

२.७. म. गांधीजींच्या विचारांचा प्रभाव

समारोप

प्रस्तावनाः

ब्रिटिशाने आगगाडी, तारायंत्र, टपालयंत्रणा आणि दळणवळणासाठी पक्या रस्त्यांचे जाळे निर्माण केले होते. शैक्षणिक सुधारणा होऊन गावो–गावी शाळा स्थापन झाल्या होत्या. इंग्रजी शिक्षणाचा प्रसार झपाट्याने होऊ लागला होता. समाजात शिक्षणाची गोडी निर्माण झाली होती. मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली. अनेक तरूण पदवीधर होऊ लागले होते. त्यावेळच्या पदवीधर तरूणांत व सुशिक्षितांमध्ये प्रगत विचारांची लाट निर्माण झाली होती.

जरी हिंदूस्थानात ब्रिटिश सत्ता स्थापन झाली तरी ब्रिटिश राज्यकर्त्यांनी देशाच्या धार्मिक व सामाजिक व्यवस्थेला हात लावला नाही. त्यामुळे हजारो वर्षे चालत आलेली वर्णव्यवस्था तशीच पुढे चालू राहिली होती. स्पृश्य–अस्पृश्य जाती व्यवस्था तशीच चालू राहिली होती.

ब्रिटिश राजवटीत सावकारी धंदा गुजर – मारवाडी लोकांच्या हाती गेला. भांडवलशाही व सावकारीला जोर आला होता. त्यामुळे शेतकरी–कामगारांची पिळवणूक होत राहिली. ब्रिटिश सरकारच्या कायद्यामुळे शेतीतील खोताचे अधिकार घटत चालले होते. औद्योगिक क्रांतीमुळे मुंबई, अहमदाबाद, यासारख्या शहरात कारखाने उभे राहिले. त्यामुळे खेड्यातील लोक शहराकडे स्थलांतर होऊ लागले शहरी लोकसंख्या वाढू लागली. अशा एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस साने गुरूजींचा जन्म झाला.

२.१ साने गुरुजींचा जन्म व बालपण

साने गुरूजींचे मुळ गाव रत्नागिरी जिल्ह्यातील देवरूख. देवरूखात साने यांची घरे पुष्कळ होती. साने घराण्यातील दापदेव सानेना तीन भाऊ होते. त्यापैकी एक देवरूखलाच राहिला. दुसरा भाऊ नाशिकला गेला, तिसरा भाऊ असाच अन्यत्र कुठे गेला व दापदेव साने दापोली तालुक्यातील पालगड गावी येऊन स्थायिक झाले. दापदेवापासून पुढे कृष्णराव, नारायणराव, सदाशिवराव आणि पुनः नारायणराव अशा पाच पिढ्या पालगड येथे झाल्या. नारायणरावांना सदाशिव, विष्णू व रामकृष्ण असे तीन मुले व सात मुली होत्या [१]. सदाशिवराव (साने गुरूजींचे वडील) यांना भाऊराव असेही म्हणत असत. सदाशिवराव (भाऊराव) वडवली गावचे खोत होते.

---

१. राजा मंगळवेढेकर, साने गुरूजींची जीवनगाथा, साधना प्रकाशनः शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०, द्वितीयवृत्ती, ११ जून १९९२, पृष्ठ क्र –१,२.

खोत म्हणजे गावचा ठरीव शेतसारा वसुल करून सरकारकडे पाठविणारा गृहस्थ या कामी त्याला शेतसाऱ्यातील चौथा हिस्सा मिळत असे. स्वातंत्र्यानंतर खोती पध्दती नष्ट करण्यात आली.देशावर शेतसारा वसूल करण्याचे काम पाटील व कुलकर्णी करत तसेच कोकणात हे काम खोत करीत असत. सोळाव्या शतकाच्या सुरूवातीस रत्नागिरीचा काही भाग विजापूरच्या आदिलशाहीकडे असताना त्या सरकारने जमीन महसूल गोळा करण्याकरीता वतनदार खोताची नेमणूक केली[२].

रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील पालगड हे गाव. पालगड गावचे मुळ नाव 'पाळील' होय [३]. गावाजवळच्या डोंगरावरील पालीसारख्या आकाराच्या गडावरून हे नाव पडले असावे. पालगड गाव दापोली पासून बारा–तेरा मैलावर तर हर्णे बंदरापासून वीस–एकवीस मैलावर वसलेले गाव. हर्णेचे पूर्वीचे नाव सुवर्णदुर्ग, हर्णेच्या किल्ल्याच्या ओव्या बायकांत रूढ आहेत.

"हर्णेच्या किल्यावरी। तोफा मारल्या दुहेरी । चंद्र काढिला बाहेरी । इंग्रजांनी.

चंद्रसेन राजाला इंग्रजांनी बाहेर काढला असे ही ओवी सांगते [४]."

त्यावेळी गावची लोकसंख्या तीन–चार हजाराच्या आसपास होती. गावाभोवती अठरा कोंडाची लोकवस्ती होती. त्यात ब्राम्हण, वाणी, कुणबी, महार, मांग इ. जातीचे लोक राहत होते तसेच गावाच्या मध्यवर्ती ब्राम्हणवस्ती होती.

गावात सीमेजवळ सोमेश्वराचे देऊळ सोमेश्वराच्या देवळाजवळ झोलाई देवीचे देऊळ असून ती देवी पालगडची ग्रामदेवता म्हणून ओळखली जाते. या देवीसाठी साने घराण्यातील मागील पिढीतील एकाने शेत दिले होते. त्याला देवशेत असे म्हणत. ह्या शेतातील पिकणारे धान्य देवीला पुजणारा पुजारी घेत असे गावात प्रसिध्द गणपती मंदिर होते. साने गुरूजी श्यामची आई पुस्तकात याविषयी आठवणी सांगतात . आमच्या गावात माघी चतुर्थीला गणपती उत्सव होता. हा नवसाचा उत्सव होता. गणपतीचा सार्वजनिक उत्सव भाद्रपदातच होत असे. महाडच्या धारपानी हा नवस केला होता. त्या वेळेस अभ्यंकर हे प्रसिध्द राष्ट्रीय किर्तनकार आमच्या गावी आले होते [५].

सदाशिवरावाचे लग्न पालगड गावातीलच नारायण बल्लाळ पुरचुरे यांच्या मुलीशी झाले. तिला माहेरी आवडी (बयो) म्हणून हाक मारत. मात्र सासरी यशोधा नाव ठेवले अशा या

---

२. गॅझेटिअर ऑफ द बॉम्बे प्रेसिडेन्सी – कुलाबा डिस्ट्रिक्ट, १८८३ गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, मुंबई १९८९, पृष्ठ क्र. १७२.

३. राजा मंगळवेढेकर, साने गुरूजींची जीवनगाथा, पूर्वोक्त पृष्ठ क्र – २.

४. साने गुरूजी, श्यामची आई, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे, चौथी आवृत्ती, २२ मे २००८, पृष्ठ क्र. १३.

५. कित्ता, पृष्ठ क्र. ५०.

सदाशिवराव व यशोधा बाईच्या पोटी शके १८२१ मार्गशीर्ष महिन्यातील रविवारी वद्य सप्तमीला म्हणजेच दि. २४ डिसेंबर १८९९ रोजी साने गुरूजींचा जन्म झाला. गुरूजी हे कोकणस्थ ऋग्वेदी ब्राम्हण, गोत्र कपी, प्रवर तीन असून सूत्र आश्वलायन होते.

गुरुजींचे पाळण्यातील नाव पंढरी होते. पुढे कागदोपत्री पंढरीनाथ सदाशिव साने अशी नोंद दिसून येते. त्यांना एकूण सहा भांवडे होती. त्यात दोन बहिणी व चार भाऊ होते. त्या भावडांत पहिल्या दोन बहिणी, एक मोठा भाऊ, त्यानंतर गुरुजी व त्यांच्या पाठीवर तीन भाऊ होते.

गुरुजींचा जन्म खोताच्या घराण्यातला असला तरी खोताची सुबता व अधिकार गुरुजींना बालपणी अनुभवता आली नाही. घरच्या भाऊबंधाच्या वादात घराची वाटणी झाली. त्याविषयी गुरूजी आठवणी सांगतात. "शेवटी माझ्या वडीलांना त्यांच्या भावानी घराबाहेर हुसकून दिले. भाऊबंदकी । या भारत वर्षात भाऊबंदकी फार । कौरवपांडवांच्या वेळेपासून आहे. ती अजून आहे. भावाभावांत जेथे प्रेम नाही. तेथे स्वातंत्र्यता कशी नांदेल. मोक्ष कसा राहील. ज्या घरात माझे वडील लहानाचे मोठे झाले, ज्या घरात तीन वर्ष बरा वाईट सर्वांचा संसार त्यांनी चालविला. ज्या घरात त्यांनी इतर सर्वांना दही–दूध दिले... त्या घरातून त्यांना बाहेर जाण्यास सांगण्यात आले!" [६]

त्यामुळे गुरुर्जींच्या वाट्याला आई–वडीलांची आर्थिक ओढताण, दारिद्र्य आले होते. गुरुजींचे बालपण दारिद्र्येत गेले. ना शाळेची फी भरायला पैसे, ना अंगावर चांगले कपडे, नातेवाईकांचा ना पुरेसा आधार, शिक्षणासाठी दारोदार भटकंती व शिक्षणासाठी आईपासून दूर राहणे ह्या सर्वांमुळे साने गुरूजी असुरक्षितेला सामोरे जात–जात लहानाचे मोठे झाले. अशा प्रकारे गुरूजींना बालपणात बरीच फरफट सहन करावी लागली.

गुरूजींना घरात व गावात पंढरी नावाने हाक मारत लहान भांवडे अण्णा म्हणायचे. पंढरी हा सुरवातीपासून भिडस्त व एकलकोंड्या स्वभावाचा. सदैव स्वतःच्याच विचारात गढलेला आणि बऱ्याच वेळा उदासपणे कुठेतरी एकांतात बसून राहणारा. शालेय जीवनात राम नावाचा मित्र मिळाला व आनंद झाला. राम जोशी गुरूजींचे शालेय मित्र होते. (उंबर गावचे डॉ. रामभाऊ जोशी) शाळेत येता–जाता सोबतीमुळे एकमेकांना फार मोठा आधार वाटायचा.

रामच्या गुरूजींविषयी आठवणी "श्यामचे माझ्यावर प्रेम आहे. आम्ही दोन मित्र आहोत.

६. कित्ता, पृष्ठ क्र. ५०.

परलोक आहे की नाही? श्यामचा व माझा काय संबंध? श्याम नेहमी म्हणतो की पूर्वजन्मीचे आपले ऋणानुबंध आहेत. खरे असेल का हे? मी आधी मेलो तर परलोक आहे की नाही ते तुला येऊन सांगेन. तू आधी मेलास तर मला येऊन सांग. परंतू श्याम तयार होणार नाही. तो म्हणेल, आपण एकदमच मरू, असे मागे पुढे नको, आपला हातात काय आहे" ? [७]

अशाप्रकारे पंढरीला राम भेटल्यामुळे गुरूजींनी स्वतः आपल्या वाङःमय सृष्टीत स्वतःला श्याम बनवले. पंढरी म्हणजे श्याम. श्याम म्हणजे मोठेपणीचे साने गुरूजी.

साने गुरूजी बारा वर्षाचे होईपर्यंत जन्मगावच्या मातृभूमीशी, परंपरेशी व निसर्गाशी एकरूप झाले होते. याविषयी गुरूजीनी आपल्या 'सुंदर पत्रे' या पुस्तकात सुधाला लिहिलेल्या पत्रात कोकणातील निसर्गाचे व सणासुदीचे वर्णन दिलेले आहे.

"शेजारी बारकूदादांकडे कण्हेरी खुप फुलल्या आहेत... कण्हेरीवर बहुदा नेहमी फुले असतात. आपल्या पायरे शेतात विहिरी जवळ पारिजातक होता. त्याला बारा महिने फुले येत... आंबे मोहरलेले आहेत... मधमाशा आसपास असतील तर नारळाच्या झाडाला दीडपट नारळ लागतील. नारळीचा मोहर मधमाशांना फार आवडतो..." [८]

त्यांचा जीवन विकास आईच्या प्रेमळ संस्कारातून झाला जीवनाच्या पुढच्या वाटचालीसाठी गुरूजीना जन्मगाव सोडावे लागले.

साने गुरूजींना आपल्या जन्मभूमी पालगडविषयी मनोमनी प्रेम वाटे. खानदेशातील अमळनेरला राहत असताना देखील कोकणच्या – पालगडच्या निसर्गरम्य आठवणींनी त्यांचे मन उचंबळून येई. गुरूजीनी अमळनेरच्या शाळेत शिक्षक असताना ते 'छात्रालय' लिखित दैनिक काढत असत. त्यात गुरूजीनी 'माझ्या कोकणची आठवण' ह्या नावाचा लेख इ.स. १९२९ साली लिहिला होता.

---

७. साने गुरूजी, श्यामचा जीवन विकास, संपूर्ण साने गुरूजीः खंड दोन, वरदा प्रकाशन प्रा.लि. सेनापती बापट मार्ग, पुणे. ४११०१६, पहिली आवृत्ती जाने. २०११, पृष्ठ क्र. ७८.

८. साने गुरूजी, सुंदरपत्रे, साधना प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे. ४११०३०, बारावी आवृत्ती, २४ डिसेंबर, २०००, पृश्ठ क्र. १६०.

२.२ आईचे संस्कार

लहान मुलांचे मन ओल्या माती सारखे असते. जसा आकार द्यावा तसा त्याला मिळतो. हाच आकार त्याला आपले मोठेपणीचे स्वप्न साकारायला मदत करतो व त्यातूनच त्याला मोठेपणा प्राप्त होतो. हा मनुष्यांचा मोठेपणा त्याच्या आई–वडीलांनी लहानपणी केलेल्या संस्कारावर अवलंबून असतो. तसेच नातेवाईक व सभोवतालच्या समाज सृष्टीवर अवलंबून असतो. लहानपणी मुलांचे मन फारच संस्कारमय असते म्हणूनच मुलांबरोबर फार जपून वागावे व बोलावे. कारण त्यांचे मन रिकामे असते जे–जे आजुबाजुला असेल त्याची निवडा – निवड न करता भराभर संग्रह करीत राहते. म्हणूनच मानवी जीवनात संस्काराला जास्त महत्व आहे.

गुरूजींच्या बालपणाच्या काळात औद्योगिकीकरण, पाश्चिमात्य शिक्षण पध्दत व इंग्रजी शिक्षण यामुळे भारतीय सामाजात झपाट्याने बदल होत होता याच बदलत्या काळात गुरूजींचे आई–वडील आपल्या मुलांवर सनातन मानवी मुल्यांचे संस्कार करण्यासाठी धडपडत होते.

गुरूजींच्या जीवनात आकार देण्यात त्यांच्या आईचे फार मोठे योगदान दिसून येते. हा श्याम कसा घडला, कसा वाढला याची सर्व हकीगत स्वतः गुरूजींनी "श्यामची आई" आणि "श्याम खंड १ ते ३" ह्या पुस्तकात शब्दबध्द करून ग्रंथीत केलेली आहे.

"श्यामची आई" या पुस्तकाच्या अगदी सुरवातीस गुरूजी लिहितात– "पुष्कळ वेळा मनुष्याचा मोठेपणा त्यांच्या आईबापावर अवलंबून असतो. त्यांचे पुढचे बरे–वाईट जीवन त्याच्या आई–बापावर अवलंबून असते. त्याच्या बऱ्या व वाईटाचा पाया लहानपणीच भरला जात असतो. पाळण्यात असतानाच आईच्या अंगाखांद्यावर खेळत असताना पुढील जीवनाच्या विकासाचे बीज पेरले जात असते. मोठेपणाचा अर्थ जगाला माहित असणे, असा मी करीत नाही. मी निर्दोष होत आहे. हळूहळू उन्नत होत आहे ही ज्याला जाणीव आहे, तो मोठा होत आहे. मोठा होत जाण्याची ही प्रवृत्ती व्यक्तीच्या ठिकाणी आईबापच उत्पन्न करतात. आईबापाकडून मिळालेली ही ईश्वरी देणगी होय. मायबापच कळत वा न कळत मुलाला लहान किंवा मोठा करीत असतात"[९]. यावरून

९. साने गुरूजी, श्यामची आई, पूर्वोक्त प्रारंभ पृष्ठ क्र. २०.

आपल्याला आकलन होते की गुरूजींच्या मनात आई वडीलांविषयी नितांत श्रध्दा, विश्वास व प्रेम होते.

लहानपणापासून गुरूजीचे आपल्या आईवर अतोनात प्रेम होते. त्यांच्या बालमनावर जे विविध संस्कार केले. त्यातूनच गुरूजींचा जीवनविकास झाला सर्वाभुती प्रेम करण्याचा धडा साने गुरूजींना त्यांच्या आईनेच दिला. साने गुरूजींचे मन अत्यंत भावना प्रधान व संस्कारक्षम होते. म्हणूनच आईने पेरलेल्या भावनांची वाढ त्यांच्या ठिकाणी लवकर झाली.

वडीलांची शिस्त व आईची कोमलता गुरूजींच्या जीवनात पदोपदी दिसून येते. मात्र गुरूजींच्या जडणघडणीत आईचाच वाटा मोठा दिसून येतो. गुरूजीच्या जीवनात सरळता, कोमलता, सेवावृत्ती, निरहंकरिता कशी आली ? आपल्या जीवनात हा सुगंध कोणी मिसळला ? याविषयी सांगताना गुरूजी लिहितात. "माझ्या आईचे हे देणं, गड्यानो । माझ्यात जे काही चांगले आहे ते माझ्या आईचे आहे. आई माझी गुरू, आई माझी कल्पतरू, तिने मला काय काय काय तरी दिले । तिने मला काय दिले नाही ? सारे काही दिले । प्रेमळ बघावयास तिनेच मला शिकविले. मनुष्यांवर नव्हे, तर गाई–गुरांवर, फुलपाखरांवर, झाडा–माडांवर प्रेम करावयास तिनेच मला शिकविले.... अत्यंत कष्ट होत असतानाही तोंडातून ब्र शब्द न काढता शक्यतो आपले काम उत्कृष्टपणे करीत राहणे. हे मला तिनेच शिकविले. कोंड्याचा मांडा करून कसा खावा व दारिद्र्यातही स्वत्व व सत्व न गमविता कसे राहावे, हे तिनेच मला शिकविले.माझ्या आईनेच जीवनात अत्तर ओतले."[१०]

साने गुरूजींच्या जीवनात आचाराचे व विचारांचे सौंदर्य त्यांच्या आईनेच निर्माण केले. त्यामुळे गुरूजींच्या हृदयात हळूवार विचारांचे काव्य निर्माण झाले. निसर्गावर प्रेम करणे, देवाची भक्ती करणे, लोकांची सेवा करणे, एकत्वेची भावना निर्माण होणे, समतावादी गुण व अनेक कर्तृत्वाची बीजे तसेच विद्यार्थी सेवेचे व आत्मसर्मपणाचे धडे आईनेच दिले. मानवाचे जीवन क्षणभंगूर असून आज ह्या जगात प्रेमाची खुप कमी दिसते. तेच संस्कार गुरूजींच्या आईने त्यांना शब्दात शिकविले.

प्रेम म्हणजे जीवन–जीवन म्हणजे प्रेम–प्रेम म्हणजे देव–देव म्हणजे प्रेम प्रत्येक मानवात देव आहे. तो शोधला तर सापडेल. माणसांवर प्रेम करा म्हणजेच देवावर प्रेम करा. मानवसेवा हाच

१०. कित्ता, पृष्ठ क्र. २४.

धर्म आहे. एकमेकांशी प्रेमाने वागावे हाच खरा धर्म आहे ही शिकवण गुरूजींना बालपणीच आईने दिली. ह्या बालपणीच्या संस्कारातून गुरूजींना कविता स्फुरली – "खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे" [११]

स्पृश्य–अस्पृश्य हा वर्णभेद मानवाने आपल्या स्वार्थासाठी मांडला आहे तो चुकीचा असून आपण सारे एकाच देवाची लेकरे आहोत. साने गुरूजींच्या बालपणी त्यांच्या मनातून स्पृश्य–अस्पृश्यतेचे विषारी तण लहानपणापासून उपटून काढण्याचे काम त्यांच्या आईने केले. ह्या अशा शिकवणीतूनच गुरूजींच्या मनात दलितांविषयी प्रखर कैवार निर्माण झाला होता. गुरूजींनी आपल्या अशा शिकवणीची आठवण श्यामची आई ह्या पुस्तकात दिली आहे.

आईच्या शिकवणीतूनच गुरूजींना स्त्री गुणाचे महत्व, प्रेम, दया व सेवा या स्त्रीगुणांची ओळख झाली. त्यातून मोठेपणी गुरूजींच्या अंगी हे गुण दिसून येतात.

साने गुरूजींच्या आईचे माहेर फार श्रीमंत नव्हते. मात्र खाऊन पिऊन सुखी होते. माहेरचे नाव बयो उर्फ आवडी. सासरी आल्यानंतर यशोधा झाली. यशोधा सासरी आली तेव्हा तिच्या अंगावर सोन्या – मोत्याचे दागिने, पोत, पेट्या, गोठ, तोडे, सरी यासारखे दागिने होते. पण पुढे दिवस पालटले. भाऊबंदकीमुळे सदाशिवरावांना आपले घर सोडावे लागले. डोक्यावर सावकारी कर्जाचा बोजा होता. अशा प्रतिकूल परिस्थितीत गुरूजी लहानाचे मोठे झाले. पण प्रतिकूल परिस्थितीत सुध्दा आनंदाने आणि स्वाभिमानाने कसे जगावे. हे गुरूजींना त्यांच्या आईने लहानपणीच शिकविले.

गुरूजींची आई – ही स्वाभिमानी माता होती. जेव्हा स्वतःचे घर भावकीच्या वादात सोडावे लागल्याने यशोधामाता आपल्या माहेरी न जाता स्वतःच्या हातातील सोन्याच्या पाटल्या विकून गावात छोटेसे घर बांधले व त्यामध्ये राहू लागले हाच स्वाभिमानी गुण गुरूजींच्यात दिसून येतो. गुरूजी सांगतात मी सर्वात खोटे बोललो असेन तर जेवणावरून. गुरूजी उपाशी राहिले मात्र कुणापुढे मुद्दामहून हात पसरला नाही.

साने गुरूजी आपल्या लहानपणीच्या आठवणी 'श्यामच्या आई' पुस्तकात सांगतात. एकदा साने गुरूजींना त्यांच्या लहानपणी वडील केस कापण्यावरून ओरडले गुरूजी रडू लागले. आई

११. साने गुरूजी, पत्री, मंजुल प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे, ४११०३०, आवृत्ती १ मार्च २००६, पृष्ठ क्र. १८३.

म्हणाली "ते बोलले म्हणून त्यांच्यावर रागावू नकोस त्यांच्या धर्मभावना दुखावल्या यावर गुरूजी म्हणाले केसात ग कसला आहे धर्म । त्यावर आई म्हणाली केस तु का ठेवतोस ? मोह म्हणूनच ना ? मग मोह सोडणे म्हणजे धर्म ।"

'श्यामच्या आई' प्रस्तावनेत प्र.के. अत्रे म्हणतात "धर्माची एवढी सुंदर सोपी व्याख्या एखाद्या संस्थापकाला तरी सुचणे शक्य आहे का ?"[१२] अशा प्रकारे गुरूजींची आई फारशी शिकलेली नव्हती पण या प्रसंगातून धर्म म्हणजे काय ? हे तिने सहजपणे गुरूजींना समजून सांगितले.

साने गुरूजींची आई थोर माऊली होती. जणू अद्वैताचा साक्षात्कार झालेली, वात्सल्याची, क्षमाशीलतेची प्रतिमूर्तीच होती. तिला आपल्या दारिद्र्याची कधी खंत वाटली नाही. तिनेच गुरूजींना घडवले.

अशाप्रकारे साने गुरूजींच्या मनाची खरी घडण त्यांच्या आईन केली. आई त्यांची खरी देवता त्यांच्या मनाची मूर्तीकार तीच व त्यांच्या शिलाची शिल्पकार ही तीच. येता जाता, बसता–उठता, सहज बोलता आई गुरूजींना धर्माचे, नीतीचे, सेवेचे पाठ देई. म्हणूनच गुरूजी आपल्या आईला गुरू मानतात.

२.३ वडीलांचे संस्कार

कोकणात त्या काळी खोताला मोठा मान, दरारा असे गुरूजींचे आजोबा नारायणराव साने वृध्द झाल्याकारणे त्यांनी आपल्याकडे खोताचे अधिकार गुरूजीचे वडील सदाशिव राव साने यांच्याकडे सोपविले. त्यावेळी सदाशिवराव सतरा–अठरा वर्षाचे होते व या वयातच प्रपंचाची सर्व जबाबदारी त्यांच्या अंगावर पडली होती. अशा प्रकारे सदाशिवराव वडवली गावचे खोत बनले.

त्यावेळी सदाशिवरायांच्या मोठ–मोठ्या बागा होत्या. त्यात आंब्या फणसाची झाडे, भातशेती, भुईमूग शेती, शेतात राबणारे मजूर वेगळे, घरात कामाला बाया, घर सोने – दागिने, धन धान्यांनी भरलेले सारे वैभव पायाशी लोळण घेत होते. कारण खोत म्हणजे गावचा राजाच. गुरूजींच्या थोरल्या भावडांना हे वैभव उपभोगता आले मात्र गुरूजींना ही सुबता मिळाली नाही. कारण गुरूजींच्या जन्माच्या काळात हे वैभव गेलेले होते.

---

१२. साने गुरूजी, श्यामची आई, पूर्वोक्त, प्र.क्रे. अत्रे प्रस्तावना(मातृप्रेमाचे महामंगल स्त्रोत्र) पृष्ठ क्र. १७.

सत्ता, अधिकार माणसाला बिघडवितो याचा प्रत्यक्ष अनुभव सदाशिवरावांच्या बाबतीत काही प्रमाणात खरा होता. 'श्यामची आई' ह्या पुस्तकात गुरूजी सांगतात "माझे वडील स्वभावाने दृष्ट होते. अशातला भाग नाही. परंतु पूर्वजांची प्रथा त्यांनी चालू ठेवली. खोताच्या अवास्तव अधिकाराचा त्यांना अभिमान वाटे कोणी ऐकले नाही की, त्यांना वाटे, हे कुणबट माजले । कुणब्याला कुणबट म्हणायचे व महाराला म्हारडा म्हणायचे अशी ही पध्दत ठरलेली । असे म्हणताना आपण माजलो आहोत, सतान्ध झालो आहोत हे त्यांच्या लक्षातही येत नव्हते. वडीलांच्या हातात नवीनच कारभार आलेला तथापी त्यांना फारसा अनुभव आला नव्हता. खोतपणाच्या तोऱ्यात एखादे वेळेस वाटेल ते बोलून जात व अनेकांची मने दुखावली जात. पाप किंवा पुण्य मरत नाही जगात काही फुकट जात नाही. जे पेराल ते पिकेल, जे लावाल ते फोफावेल, फळेल." [१३]

शेवटी तसेच झाले भाऊ बंदकीच्या वादात घर गेले. दिवसांदिवस सावकारी कर्ज वाढले व घरची आर्थिक परिस्थिती खालावत गेली. खोताचे अधिकारही गेले. सदाशिवराव नावाने फक्त खोत राहिले. अशा प्रकारे त्यांच्या घरात दारिद्र्य वास करू लागले. सदाशिवराव खोताच्या वैभव संपन्न घरात वाढलेले होते. त्यामुळे आता दारिद्र्य आले तरी खोतीचा चढलेपणा त्यांच्या अंगी तसाच होता. कुळांशी करडेपणाने वागणारे भाऊरावांना आपल्या मुलांचे हाल पाहवत नसल्या कारणाने मनात कष्टी असत. मुलांवर त्यांचे प्रेम होते ते गरीब असले तरी भावनाशील होते आपल्या मुलांनी शिकावे, मोठे व्हावे व नाव कमवावे यासाठी आपल्या मुलांना काही कमी पडू नये यासाठी सदाशिवरावांनी अनेक काबाड कष्ट केले.

सदाशिवरावांनी आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी आटोकाट प्रयत्न केले. गावात शिक्षणाची सोय नव्हती. त्यासाठी सदाशिवरावांनी आपल्या मुलांच्या पुढील शिक्षणासाठी परगावी सोय उपलब्ध करून दिली. प्राथमिक शाळेत असताना गुरूजींना शाळेत फी भरायला पैसे नव्हते वडीलांनी गावात जाऊन पैसे आणले व त्यांची फी भरली. मात्र मुलाच्या शिक्षणात खंड पडू दिला नाही. आपल्या मुलांचे वाचन सुधारावे, पाठांतराची सवय लागावी यासाठी सदाशिवरावांनी बालपणापासूनच सुभाषिते, भुपाळी, श्लोकाचे वाचन करून पाठांतर करून घेत. अशा प्रकारे गुरूजींना वाचनाची आवड व पाठांतराची सवय बालपणापासून लागली व ती मोठेपणी कामी आली. साने गुरूजीचे वडील सकाळी लवकर उठत व मुलांनाही उठवत. मुलांना भुपाळी, श्लोक बोलायला

१३. कित्ता, पृष्ठ क्र. ०४.

लावत हा त्यांचा दिनक्रम ठरलेला होता व संध्याकाळी आई मुलांना श्लोक बोलायला लावी. त्यानंतरच जेवण, असा साने गुरूजींच्या घरात नित्यनियम ठरलेला होता.

जेव्हा सदाशिवराव आपल्या मूलांकडून भुपाळ्या, आर्या, श्लोक म्हणून घेत तेव्हा एकेका शब्दाचा अर्थ मुलांना सांगत व त्या शब्दांचा समानार्थी शब्द सुध्दा सांगत व ते मुलांकडून पाठांतर करून घेत. भक्ती विजय, हरिविजय या पोथ्याचे वाचन वडीलांनी गुरूजींकडून लहानपणीच करून घेतले. त्यामुळे साने गुरूजींना भक्ती, साहित्य, वाचन व पाठांतराची आवड वडीलांकडून निर्माण झाली.

याविषयी गुरूजी 'श्यामची आई' या पुस्तकात वडीलांविषयी आठवणी सांगतात, "आमच्या घरी एक अशी पध्दत होती की, रोज दुपारच्या मुख्य जेवणाच्या वेळी प्रत्येकाने श्लोक म्हणावयाचा. जेवताना श्लोक म्हटला नाही तर वडील रागे भरत. वडील आम्हाला श्लोकही सुंदर सुंदर शिकवीत असत. मोरोपंत, वामन पंडीत यांचे सुंदर श्लोक व कविता ते शिकवीत असत. तशीच इतर स्त्रोत्रे, भूपाळ्या श्लोक वगैरे शिकवीत... वडील नुसते तोंडपाठ नसत घेत करून, तर अर्थही सांगायचे... वडीलांच्या या पध्दतीमुळे शेकडो संस्कृत शब्दांचा अर्थ आम्हाला समजू लागला होता" [१४].

अत्यंत निटनिटकेपणा आणि टापटिप हे सदाशिवरावांचे गुणवैशिष्ट्ये होती. पत्रावळ लावणे असो वा ग्रंथ लावणे, शेण लावणे असो वा शेला विणणे, जे काम करायचे ते उत्कृष्ट करायचे हे सर्व गुण गुरूजींमध्ये वडीलांकडून आले.

गुरूजींच्या वडीलांवर सावकारी कर्ज होते त्यामुळे ते कर्ज फेडता – फेडता दिवसांदिवस घरची परिस्थिती ढासळत चालली होती. शेवटी राहते घर ही जप्तीत द्यावे लागले. त्याकाळी सावकार लोक कर्जावर अवाढाव्य व्याज आकारत याविषयी ग.दि. फडके आपल्या पुस्तकात लिहितात....

"इंग्रजी राज्याची स्थिरता पक्की झाल्यावर या सावकारी धंद्यात ती जागा गुजर – मारवाडी लोकांनी घेतली. शिवकालापासून व्यापाऱ्याच्या निमित्ताने मराठी मुलखात स्थायिक झालेल्या या बनिया व वाण्यांनी आपली सावकारी पकड ग्रामीण तसेच शहरी भागात चांगलीच बसविली. त्यांचे व्याजाचे दर जबरदस्त असल्यामुळे शेती, घरदारसारख्या खाजगी

१४. कित्ता पृष्ठ क्र. ३९.

मालमत्तासावकाराकडे एकदा गहाण पडल्या की पुन्हा त्या परत मिळणे अतिशय दुरापास्त समजले जाई."[१५]

अशा प्रतिकूल परिस्थितीत जगत असताना ह्या सर्वांचा मानसिक परिणाम आपल्या मुलांवर होऊ नये यासाठी प्रयत्न केले. गरिबीत स्वावलंबनात जगण्याचे शिक्षण सदाशिवरावांनी आपल्या मुलांना दिले. साने गुरूजींचे वडील हे स्वभावाने तापट होते. त्यामुळे त्यांच्या कामात वक्तशीरपणा व शिस्त होती हाती घेतलेले काम वेळेत पूर्ण व्हावे यासाठी ते आग्रही असत. वक्तशीरपणा गुण वडीलांकडून गुरूजींना मिळाला होता.

गुरूजींचे वडील सदाशिवरावांना स्वराज्याचा अभिमान होता. त्याकाळी टिळक युग चालू होते. देशभर स्वातंत्र्याचे वारे वाहत होते. लो. टिळकांच्या जहाल विचाराने देश पेटून उठला होता. स्वदेशी माल वापरा व परदेशी मालांवर बहिष्कार टाका या टिळकांच्या विचाराने देशातील तरूण पेटून उठला होता. जिकडे–तिकडे परदेशी मालाची जाळपोळ चालू होती या स्वदेशी चळवळीत सदाशिवरावांनी भाग घेतला व परदेशी मालावर बहिष्कार टाकून जाळपोळ केली. त्यामुळे त्यांना ब्रिटिश सरकारने १९११ मध्ये सदाशिवरावांना पकडून चार महिन्याची सजा ठोठावली व १५० रू दंड आकारला.

याविषयी केसरी वर्तमानपत्रात आलेले वृत्त – "दापोली तालुक्यातील पालगड येथील एका वाण्याजवळून परदेशी साखर विकल्या बद्दल दंड म्हणून सक्तीने २५ रू. घेतले, अशा आरोपावर पालगडचे रहिवासी रा. सदाशिव साने, रा. सीताराम गणेश ओक, रा. बाळकृष्ण नारायण जोशी व रा. दत्तात्रय बळवंत परचुरे यांजवर खटला झाला आहे. "[१६]

अशा प्रकारे सदाशिवरावांवर थोर पुरूष लो. टिळकांचे विचार, देशभक्ती खोलवर रूजली होती हीच देशभक्ती, विचार गुरूजींच्या अंगी लहानपणीच उतरली होती. स्वातंत्र्यलढ्याचा मंत्र गुरूजींना लहानपणीच वडीलांकडून मिळाला होता.

अशा प्रकारे जरी गुरूजींच्या आई–वडीलांनी लहानपणी गुरूजींवर सुसंस्कार केले असले तरी गुरूजींना लहानपणी आई – वडीलांची झालेली ओढाताण, दारिद्र्य, समाजातील लोकांकडून मिळालेली वागणूक, शाळेतील शिक्षकांचे वर्तन, नातेवाईकांच्या साशंक नजरा, शिक्षणासाठी

१५. य.दि. फडके, विसाव्या शतकातील महाराष्ट्र, (खंड पहिला १९०१–१९१४) के. सागर पब्लिकेशन, पुणे, २००५ द्वितीयावृत्ती, पृष्ठ क्र. ६.
१६. नरसिंह चिंतामण केळकर (संपा) केसरी, वर्तमानसार या सदरात, मुंबई इलाखा वृत्त पुणे, मंगळवार ६ जून इ.स. १९११, पृष्ठ क्र. ६.

वणवण, आई – वडीलांचे अपेक्षेचे ओझे, ना खायला धड अन्न, ना अंगावर चांगले कपडे – या सर्वांमुळेच गुरूजीच्या लहानपणी असुरक्षितता निर्माण झाली होती. याचा परिणाम मोठेपणी गुरूजींच्या जीवनात दिसून येतो. स्वतः जगावर प्रेम करणारे व इतरांना जगावर प्रेम करायला लावणारे – साने गुरूजी मात्र स्वतःला कमी लेखत त्यातूनच त्यांचा स्वभाव संकोची व भिडस्त बनत गेला. हे सर्व साने गुरूजींच्या ६ ऑक्टोबर १९४४ रोजी मधू लिमये यांना पाठविलेल्या पत्रावरून समजते. साने गुरूजी पत्रात लिहितात. "गोष्टीरूप गांधीजी म्हणून माझे एक पुस्तक बाबुरावांनी २ ऑक्टोबरला प्रसिध्द केले. त्या पुस्तकाची प्रत येथे आली. परंतू कोणास दाखवावी असे मनात येईना, मी ती लपवून ठेवली. सारे हसतील, नावे ठेवतील असे वाटले. रद्दी पुस्तक ! मला नाही रे नीट लिहिता येत । ना बुध्दी, ना विचार, ना नवीन जीवनमूल्ये ना नवा दृष्टीकोन काही नाही.... माझे सारे लिखाण जाळावे असे मनात वाटते."[१७]

साने गुरूजींनी एवढे चांगले साहित्य लिहिलेले असताना स्वतःविषयी मात्र ते असमाधानी दिसतात. स्वतःला कमी लेखतात. स्वतःला अपूर्ण व अशुध्द समजतात याचे कारण त्यांच्या बालमनावर झालेले असुरक्षितेचा परिणाम व तणावग्रस्त बालपण होय.

साने गुरूजींच्या बालपणी अनेक अंतर्मुख करणारे प्रसंग आले . या प्रसंगाचा त्यांच्या आई वडीलांनी कौशल्यांनी उपयोग करून घेतला गुरूजींना भाग्याने असे आई – वडील लाभले त्यांच्या प्रेमळ सहवासात प्रतिकूल परिस्थितीतून माग काढत गुरूजी लहानचे मोठे झाले.

साने गुरूजींना आई – वडीलांच्या संस्कारांनी जगावर प्रेम करायला शिकविले मात्र तणावग्रस्त बालपणानं आत्मसन्मानासाठी लागणारे भावनिक बळ काही पुरवले नाही. जीवनात मान–अपमान सहन करण्याचे मनोबळ मिळाले नाही. त्यामुळे गुरूजींच्या मनात स्वतःविषयी अपुर्णतता व अशुध्दतेची भावना निर्माण झाली या भावनांना दूर करण्यासाठी गुरूजींनी स्वतःचा संकोच करून इतरांसाठी जगण्याचा मार्ग पत्करला त्यामुळे त्यांच्या आयुष्यात त्याग, सोशिकता व सेवाभाव ह्या गुणांना महत्व दिसून येते व याच गुणांना जीवन मूल्य समजून गुरूजीने ते जास्तीत जास्त आत्मसात करण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारे साने गुरूजी घडले.

---

१७. नारकर–वैद्य, ज्योती व लिमये, (संपा), साने गुरूजी अप्रकाशित पत्रे, सदाशिव बागाईतदार स्मृतिमाला, पुणे, १९९४, पृष्ठ क्र. ३१.

२.४ शिक्षणासाठी खडतर प्रवास

साने गुरूजींना प्राथमिक शिक्षण घरीच मिळाले. त्यांचे शालेय प्राथमिक शिक्षण वयाच्या सहा वर्षापासून पालगडच्या मराठी शाळेत चालू झाले. शाळेच्या रजिस्टर बुकात पांडूरंग सदाशिव साने यांचे नाव दाखल केल्याची नोंद दि. ११ फेब्रुवारी १९०५ अशी आहे. पहिलीमध्ये असताना पालगड मधील शाळेतून १ आणा फी आली नाही म्हणून साने गुरूजींचे नाव नोंदवही बुकातून ११ जून १९०६ रोजी 'फी आली नाही सबब नाव कमी' असा नावापुढे शेरा देण्यात आला.[१८] त्यानंतर पुन्हा ६ महिन्यांनी ६ डिसेंबर १९०६ रोजी फी जमा झाल्याने दुसऱ्या इयत्तेत नाव घातल्याची नोंद आहे.

अशा प्रकारे गुरूजी पहिली ते चौथी पर्यंत पालगडच्या शाळेत शिकले. शाळेत असताना गुरूजी हुशार विद्यार्थी होते. पालगडला फक्त चौथीपर्यंत शाळा होती. सदाशिवरावांनी आपल्या मुलांच्या पुढील शिक्षणासाठी मामाकडे पुण्याला पाठविले. मात्र पुण्यातील मामाकडे राहताना त्यांचीही फी भरण्याची क्षमता नसल्याने इतर समवयस्क मुलांना शाळेत जाता येताना बघत गुरूजींना घरीच रहावे लागत होते. पुण्यात मामा कधी नाव घालतील याची वाट बघत आलेल्या रिकामपणाला कंटाळून गुरूजींनी (पंढरीने) देवाच्या दक्षिणेतील दीड रूपया चोरला आणि मुंबईला पळून दुसऱ्या मामाच्या घरी गेले मुंबईच्या मामाने समजावून पुन्हा पुण्याला आणले.

जगण्याला वैतागून पळून जाणे व तेथे काहीच पर्याय न सापडल्याने पुन्हा तेथेच परतावे लागणे ह्यात ११–१२ वर्षाच्या गुरूजीची घुसमट झाली होती. शेवटी पालगडला परतावे लागले. मात्र पालगडला इंग्रजी शिक्षण नसल्याकारणाने वडीलांनी गुरूजीचे नाव दापोली येथील मिशनरी शाळेत नाव टाकले. तिथेच राहून पुढील शिक्षण साने गुरूजींनी चालू ठेवले. या काळात शिकत असताना घरच्या आर्थिक ओढाताणीमुळे गुरूजींचे जेवणाचे हाल होत होते. या मधल्या काळात मित्राच्या सांगण्यावरून औंध संस्थानात गरीब विद्यार्थ्यांना मोफत अन्न मिळते म्हणून औंधला जाऊन गुरूजी औंध संस्थानात राहून शिकू लागले. गुरूजींची औंधच्या श्रीयभाई श्रीनिवास विद्यालय या शाळेत दि. ३ जूलै १९१६ रोजी नाव दाखल केले.[१९] केवळ मोफत जेवण मिळते म्हणून गुरूजी औंधला गेले. परंतू तेथील व्यवस्थापकाने बाहेरच्या मुलांचे जेवण बंद केले. त्यामुळे

१८. राजा मंगळवेढेकर, साने गुरूजींची जीवनगाथा, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. ८.
१९. कित्ता, पृष्ठ क्र. ४२, ४३.

गुरूजींची मोठी पंचायत झाली. मात्र तेथे सखाराम नावाचा मित्र मदतीला आला. सखारामाने गुरूजींना आपल्या खोलीत राहायला जागा दिली व त्याच्या वाटणीतील येणारे जेवण दोघे एकत्र खाऊ लागले. सखारामच्या खोलीत राहत असताना त्या खोलीतील इतर मुले गुरूजींची चेष्टा करायची शेवटी कंटाळून ती खोली सोडली.

नंतर गुरूजीनी गावाच्या एका टोकाला भाड्याची खोली घेऊन राहू लागले. गावात दारोदारी फिरून माधुकरी मागू लागले. काही लोक माधुकरी देत तर काही लोक टाकून बोलत देशावरची तिखट भाजी गुरूजींना पचवणे कठीण जाऊ लागले. त्यातच तब्येत अशक्त होत गेली. अशा प्रकारे शिक्षण घेत असताना गुरूजीना अनेक हाल अपेष्टा सहन कराव्या लागल्या पण गुरूजीनी ज्ञानोपासना सोडली नाही. त्यात औंधला प्लेगची साथ आली. शेवटी अर्धवट शिक्षण सोडून पालगडला यावे लागले.

गुरूजींचे बालपणीचे मित्र राम जोशी पुण्याला नुतन मराठी विद्यालयात शिकत होते. गुरूजीनी त्यांना पत्र पाठवून विचारणा केली. त्यानंतर सदाशिवरावांनी गुरूजीचे नाव नुतन मराठी विद्यालयात टाकले. तेथेच १९१८ मध्ये गुरूजी मॅट्रिक झाले. शाळेत हुशार विद्यार्थी म्हणून नाव चमकले. शिष्यवृत्ती मिळाली.

पुढे महाविद्यालयीन शिक्षणासाठी गुरूजींनी न्यु पुना कॉलेजात (एस.पी.कॉलेज, पुणे) आर्टस प्रवेश घेतला. त्याविषयी गुरूजी सांगतात "मी व राम न्यू पूना कॉलेजमध्ये पहिल्या वर्षाला होतो."[२०] महाविद्यालयाातील धारपुरे, द.के. केळकर, रा.कृ. लागू, विनायकराव आपटे इ. मान्यवर प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली साने गुरूजींचा अभ्यास चालू होता. पण गुरूजींवर महाविद्यालयात असताना सर्वात जास्त प्रभाव महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांच्या व्यक्तीमत्वाचा पडला.

महाविद्यालयात शिक्षण चालू असताना गुरूजींनी काही सामाजिक कार्यातही भाग घेतला. त्यावेळचे सुप्रसिध्द लेखक व पुणे म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष हरी नारायण आपटे यांच्या मार्गदर्शनाखाली साक्षरता अभियानात भाग घेतला. महाविद्यालयात असताना गुरूजी कॉलेजच्या अंकात लेखन केले. १९२२ मध्ये मराठी व संस्कृत विषय घेऊन दुसऱ्या वर्गात बी.ए झाले. त्याच कॉलेजची फिलॉसोपी मिळाली. गुरूजीनी बी.ए नंतर एम.ए करायचे ठरविले. एवढ्यात अमळनेरच्या

---

२०. साने गुरूजी, श्यामचा जीवन विकास,(संपूर्ण साने गुरूजी : खंड दोन), पूर्वोक्त पृष्ठ क्र. २३.

तत्वज्ञान मंदिराची (प्रताप तत्वज्ञान केंद्र, अमळनेर) जाहीरात वाचून गुरूजी १९२३ च्या जुलै महिन्यात अमळनेरला जाऊन प्रवेश घेतला. मात्र ज्या अपेक्षेने गुरूजीनी तत्वज्ञान मंदिरात प्रवेश घेतला होता. तेथे अपेक्षा भंग झाला. कारण संस्थचे व मालकाचे आध्यात्म फार वेगळे होते. शारिरीक व आर्थिक दृष्ट्या तत्वज्ञान मंदिर सोयीस्कर होते. मात्र आत्म्याची असहाय्य कुंचबणा तेथे होत होती. पुढे सहा महिन्यात गुरूजीनी तत्वज्ञान मंदिराला रामराम दिला. पुढे १९२४ साली मुंबई विद्यापीठामधून तत्वज्ञान व मराठी विषय घेऊन एम.ए पदवी मिळवली.

अशाप्रकारे गुरूजीना शिक्षणासाठी वणवण करावी लागली व आपल्या आई–वडीलांपासून दूर राहून आपले शिक्षण पूर्ण केले.

२.५ मातृवियोग

गुरूजी नूतन मराठी विद्यालय, पुणे, येथे १९१७ ला इयत्ता नववी मध्ये शिकत होते. आता बऱ्यापैकी चालले होते. गुरूजी वाराने जेवत . शिक्षणासोबत जेवणाचीही सोय झाली होती. मात्र इकडे गावाला घरची परिस्थिती दिवसांदिवस बिकट होत चालली होती. सावकारी कर्जाचा डोंगर वाढू लागला होता. कर्ज फेडता येईना म्हणून सर्व मालमत्ता राहते घर जप्त केले गेले. सावकाराने घरातून काढले. या सर्वांचा गुरूजीच्या आईने खुप मोठा धसका घेतला. त्यामुळे आई फार उन्मळून पडली व शेवटी अंथरूण धरले ते शेवटी कायमचेच. दि.२ नोव्हेंबर १९१७ रोजी गुरूजींची आई देवाज्ञा झाली. याविषयी 'श्यामची आई' पुस्तकात गुरूजी आठवणी सांगतात.

साने गुरूजींच्या स्वप्नात आई आली. आईला भेटायला मन आतूर झाले. मात्र पैसे नव्हते. मित्राने गुरूजीना पैसे दिले. गुरूजी आईला भेटायला निघाले . पालगडला जायला निघाले . हर्णे बंदरावर त्यांना मावशी मिळाली गुरूजी आईविषयी मावशीकडे विचारपूस करत असताना मावशीने त्यांना ती दुःखद बातमी सांगितली व म्हणाली "श्याम तुझी आई देवाघरी गेली."[२१] हे ऐकून गुरूजीना सारे आकाशच फाटल्यासारखे झाले. ते हमसून हमसून रडले. साऱ्या स्वप्नांचा चक्काचुर झाला असे गुरूजींना वाटू लागले. आई देवा घरी गेली. गुरूजींना आईचे अंतिम दर्शन झाले नाही. त्यांचे मन वेडावले. हताश झाले. सर्व आशा संपल्यासारखे वाटू लागले, सर्वस्व गमावल्यासारखे वाटू लागले. गुरूजींना आई कडून जगण्याचा स्वाभिमान व कष्ट करण्याची प्रेरणा मिळाली होती.

---

२१. साने गुरूजी, श्यामची आई, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. २४१.

शिक्षण घेण्याची प्रेरणा आईनेच दिली होती म्हणून गुरूजींना लहानपणा पासूनच वाटे आपल्या काबाड कष्ट करणाऱ्या गरीब आईला सुखी ठेवण्यासाठी शिकायला पाहिजे. मात्र आई गेल्यावर वाटू लागले, शिकाव कोणासाठी ? शिकून काय करू ? त्याचा उपयोग काय करू ? पण आईचा अंतिम संदेश आठवला. "भावासाठी वडीलांसाठी शिक, भारत मातेसाठी, जगासाठी शिक, आईला जे देणार होतास ते प्रेम जगाला दे" [२२]

प्र.के. अत्रे 'श्यामची आई' पुस्तकाच्या प्रस्तावनेत लिहितात, "आईच्या मृत्यूचा प्रसंग वर्णन करताना तर गुरूजीनी भवभूतीवरही ताण केली आहे. दगडाला देखील पाझर फुटतील एवढे कारूण्य गुरूजींनी त्या वर्णनात ओतले आहे. स्मशानात आईच्या पिंडाला जेव्हा कावळा शिवेना तेव्हा गुरूजी सद्‌गदित कंठाने म्हणाले– आई तुझी इच्छा असेल, तर मी लग्न देखील करीन। कारूण्यातला हा विनोद अक्षरशः हृदय पिळवटून टाकणारा आहे. पण मातेच्या शोकातले हे कारूण्य नुसते रडविणारे किंवा आगतिक करणारे नाही. नवीन चैतन्य आणि नवीन सामर्थ्य निर्माण करण्याची शक्ती त्या कारूण्यात आहे. "[२३]

'श्यामची आई' पुस्तकात गुरूजी सांगतात – "मित्रांनो । अशी माझी आई होती. जगाच्या बाजारात अशी आई मोठ्या भाग्याने मिळते. माझ्या आईनेच मला सारे दिले. माझ्यात जे चांगले आहे, जे पवित्र आहे, ते सारे ती आहे. माझी आई गेली, परंतू भारत मातेच्या सेवेसाठी मला तयार करून गेली. एका जपानी मातेने स्वतःच्या हृदयात खंजीर भोसकून घेतला व मुलाला एक चिठ्ठी लिहून ठेवली, माझ्यामुळे तू लढाईला जात नाहीस. माझ्या मोहात तू सापडला आहेस. तुझ्या मार्गातील मोह मी दूर करते. माझ्या आईच्या दिव्य दृष्टीला असेच दिसले असेल । हा श्याम माझ्या मोहात गुरफटेल. फक्त माझीच या साडेतीन हात देहाचीच पूजा करीत बसेल, असे तिला वाटले असेल, इतर बंधुभगिनींची सेवा करण्यात तो जाणार नाही. स्वातंत्र्य युध्दात तो मातृमोहाने पडणार नाही, म्हणून आईने स्वतःला दूर केले. सर्व भारतातील माता माझ्या श्यामच्या होऊ देत, एकच नव्हे तर अनेक आया श्यामला मिळू देत, यासाठी माझी आई निघून गेली असेल, ह्या अनंत आया पाहण्याची दिव्य दृष्टी देऊन आई गेली.... एक दिवस मातेची सेवा करता करता या विराट व विशाल मातेची माझ्या अल्प शक्तीप्रमाणे, माझ्या गुणधर्माप्रमाणे सेवा करता करता आमच्या

---

२२. कित्ता, पृष्ठ क्र. २४२.

२३. कित्ता प्रस्तावना प्र.के अत्र (मातृप्रेमाचे महामंगल स्त्रोत्रे), पृष्ठ क्र. १८.

मथीमाऊप्रमाणे माझेही सोने होवो. माझ्या आईचे सोने झाले, तिच्या श्यामचेही होवो." (मथी मांजरीचे नाव).[२४]

आईच्या जाण्याने गुरूजी पार कोलमडले. त्यांना ह्या धक्यातून सावरायला बराच वेळ गेला. आई गेली त्यावेळी गुरूजीचे वय सतरा होते. मॅट्रिकची परीक्षा जवळ आलेली होती. मात्र दुःख मनातल्या मनात दाबून गुरूजी अभ्यासाला लागले व अभ्यासात मन रमवले. आईच्या विरहाचे दुःख गिळून केलेल्या अभ्यासात गुरूजींना यश आले. गुरूजी १९१८ मध्ये ५०% मिळवून मॅट्रिक झाले.

२.६ पितृवियोग

गुरूजीची आई देवाघरी गेल्यास वडील पार खचून गेले. त्यांचा मानसिक आधार निखळला होता. त्यातच दिवसांदिवस कर्ज वाढत चालले होते. गुरूजीचे वडील कर्जाने बेजार झाले चार हजार रूपये कर्ज फेडता येईना म्हणून राहते घर लिलावाने विकावे लागले होते. या सर्वांचा परिणाम गुरूजींच्या वडीलांवर झाला होता.

आपल्या वडीलांना, भावडांना सुखी ठेवण्यासाठी आपण शिकले पाहिजे हे ध्येय उराशी बाळगून गुरूजीनी आपल्या शिक्षणात खंड पडू दिला नाही. गुरूजींच्या वडीलांची तब्येत दिवसेंदिवस खचत चाललेली होती व शेवटी दि. १५ नोव्हेंबर १९२४ ला गुरूजींच्या वडीलांचे निधन झाले.

२.७ महात्मा गांधीजीच्या विचारांचा प्रभाव

१ ऑगस्ट १९२० मध्ये टिळक युगाचा अंत होऊन गांधी युगास सुरूवात झाली. महात्मा गांधीने असहकार चळवळीत भाग घेण्यासाठी वकील, डॉक्टर, शिक्षक, विद्यार्थी इत्यादीना आवाहन केले. प्रत्येकजण ह्या विचाराने आवाहनाने प्रेरित होऊन आपले व्यवसाय सोडून म. गांधीजीच्या विचार प्रवाहात सामील झाले. स्वातंत्र्याची नांदी झाली. त्यामुळे नवचैतन्याचे वारे वाहू लागले होते.

म. गांधीने ओळखले की, ब्रिटिश सरकारशी हिंसेने वागून उपयोग नाही. अहिंसेच्या मार्गाने असहकार चळवळी मार्फत आपण सरकारला वेठीस धरू शकतो. देश स्वतंत्र करायचा असेल तर जहाल विचारांनी ते साध्य न करता, मवाळ विचारांनी साध्य होईल. यासाठी म. गांधीनी सत्याग्रह,

२४. कित्ता पृष्ठ क्र. २४८.

उपोषणे, धरणे, बहिष्कार यांचा अवलंब करून देशातील तरूणांना तसे प्रवृत्त केले. देशभर गांधीविचार पसरू लागले. भारतीयाचे राजकीय नेतृत्व महात्मा गांधीनी स्विकारले.

म. गांधीजीनी असहकार चळवळ, कायदेभंग चळवळ अशा चळवळी तसेच सभा, लेख मार्फत ब्रिटिशांविरूध्द स्वातंत्र्यासाठी लढे दिले. तसेच देशात सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी व अस्पृश्य निवारण्यासाठी स्वकियांशी धरणे व उपोषणा मार्फत लढे दिले. या सर्वांचा परिणाम साने गुरूजींवर झाला.

साने गुरूजींना महाविद्यालयात शिकत असतानाच म. गांधीजीच्या विचारांचा परिचय झाला. महात्माजींच्या राजकीय आंदोलनाचा परिणाम गुरूजींच्यावर १९२१ पासून होत होता. १९२१ साली त्यांनी खादी वापरण्यास सुरूवात केली.[२५]

गुरूजी महाविद्यालयाच्या पहिल्या वर्षाला असताना परिक्षा काळात तापाने आजारी पडले. त्या कारणास्तव त्यांना एक पेपर देता आला नाही. याचे त्यांना दु:ख झाले. परीक्षा संपल्या आणि विश्रांतीसाठी गुरूजी मोठे बंधू गजाननकडे मुंबईला (गिरगावला) गेले. थोडे दिवस आराम केला. एके दिवशी चौपाटीवर गेले असता तेथे त्यांना म. गांधीजीच्या सभेचा लाभ घेता आला तेव्हा स्वामी श्रध्दानंदाचा खून झाला होता. त्यानिमित्ताने मुंबईत मोठा हरताळ पाळला होता. व याच दिवसात मं. गांधीजीची सभा चौपाटीवर आयोजित केली होती. सभा चालू होती. त्या सभेला लाखो लोक जमले होते. त्या सभेत गुरूजीही सामील झाले. गुरूजी म्हणतात "त्या वेळेस मी महात्मा गांधीना प्रथमच पाहिले. भारताचा आत्मा पाहिला. भारताची पुंजी भूत पुण्याई पाहिली. भारताचे तप पाहिले, वैराग्य पाहिले, चालती–बोलती गीता पाहिली, सत्य, प्रेमाचा नवा अवतार पाहिला माझे डोळे भरून आले होते. मी सद्‌गदित झालो होतो. एकप्रकारे हृदय उचंबळून आले होते."[२६]

याच सभेत प्रथम गुरूजींवर महात्मा गांधीजीचा पहिला प्रभाव व छाप पडली. गुरूजींच्या जीवनावर म. गांधीजीचा हा पहिला संस्कार होता. हाच संस्कार पुढे–पुढे वाढत जाऊन गुरूजी गांधीभक्त झाले. अशा प्रकारे गुरूजी महाविद्यालयात शिकत असतानाच महात्मा गांधीजीच्या विचारांचा परिचय झाला. पुढे गुरूजीनी म. गांधीजीचे लेख, साहित्याची वाचन सुरू केले. मात्र खरे गंभीर वाचन अमळनेरला प्रताप हायस्कुलमध्ये शिक्षक असताना केले. गुरूजी अमळनेरला

---

२५. यदुनाथ थत्ते, साने गुरूजी जीवन परिचय, प्रकाशक सुशिल धसकटे, हर्मिस प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती २६ जाने. २०१२, पृष्ठ क्र. ९.
२६. साने गुरूजी, श्यामचा जीवन विकास (संपूर्ण साने गुरूजी, खंड २), पूर्वोक्त, पृष्ठ क्र. ६७.

छात्रालयात असताना म. गांधीजीचा यंग इंडियाचा अंक येत असत. त्यावेळी गुरूजीने हे अंक बारकाईने वाचन करत व त्यामध्ये महत्वाच्या विषयांवर खुणा करून ठेवत. जेणेकरून विद्यार्थ्यांचे त्यावर लक्ष केंद्रित होऊन त्यांच्याकडून वाचन व्हावे.

'यंग इंडिया' ह्या अंकातून म. गांधीजी त्या काळातील विचार प्रवाहाने उद्‌भवलेल्या वादांना उत्तरे देत असत तसेच परकियांविरूध्द पुकारलेले स्वतंत्र लढे, चळवळी, सत्याग्रह, आंदोलने व स्वकियाविरूध्द पुकारलेले समतेचे लढे, उपोषण आग्रह यांचा वृत्तांत व त्यात सहभाग होण्यासाठी आवाहन करीत असत. अशा प्रकारे राष्ट्रीय स्वातंत्र्यासोबत सामाजिक स्वातंत्र्य सुध्दा हवे यासाठी म. गांधीजी आग्रही होते. याचे अनेक दाखले गुरूजींनी लिहिलेल्या गांधी चरित्रात वाचायला मिळतात.

अशाप्रकारे साने गुरूजींना म. गांधीजीच्या साहित्यातून सामाजिक समता व राष्ट्रीय स्वातंत्र्य यासाठी लढे एकाच वेळी लढले पाहिजेत. ही गांधीजींची भुमिका गुरूजीना पटली. त्यामुळे म. गांधीजीनी चालवलेल्या लढ्याकडे गुरूजी स्वातंत्र्य आणि समतेसाठीचा संघर्ष म्हणून पाहू लागले.

देशातील अन्याय, गुलामगिरी संपवायची असेल तर परकीयांशी लढा द्यावा लागेल. तसेच शेतकरी, कामगारांवरील अन्याय, दु:खे संपवायची असेल तर भांडवलशाही सावकारा विरूध्द लढा द्यावा लागेल व समाजामधील विषमता संपवून समता प्रस्थापित करण्यासाठी सनातन विचारांशी लढा द्यावा लागेल. हे गुरूजींना म. गांधीजींच्या विचारातूनच उमगले. त्यासाठी गुरूजीनी लेख, सभा, भाषणे, उपोषण, धरणे, संप, सत्याग्रह व आंदोलने मार्फत देशातील जनतेला अन्याया विरूध्द लढण्यास प्रवृत्त केले व सामाजिक समतेसाठी, अस्पृश्यता निवारण्यासाठी जनमत तयार करून समतेचे लढे दिले.

म. गांधीना सुरवातीपासून स्पृश्य–अस्पृश्य असा भेदभाव मान्य नव्हता. अस्पृश्यता नष्ट व्हावी व सामाजिक समता प्रस्थापित व्हावी हे जसे म. गांधीना वाटत होते. तसेच गुरूजींनाही वाटे. १९३२ साली अस्पृश्यता निवारण्यासाठी म. गांधीजीनी उपोषण केले.

१९३२ मध्ये महात्माजींनी उपवास केला. स्पृश्य हिंदू समाजापासून अस्पृश्य समाजास

कायमचे पारखे करण्याचा इंग्रजी डाव होता. महात्माजींना वेदना झाल्या. ते म्हणाले हिंदू धर्मावर हा कायमचा कलंक राहील. हिंदू धर्माने आपल्या अनुदारपणामुळे आपल्या कोट्यवधी बंधूना एका क्षणात दूर केले असे इतिहास सदैव सांगत राहील. आम्ही अस्पृश्यता लवकर घालवू. तुम्ही अस्पृश्य बंधु कायमचे दूर करू नका नाहीतर मी उपवास करीन. ब्रिटिश ऐकेनात, महात्माजींचे अग्निदिव्य सुरू झाले .[२७]

आज उद्या ती नष्ट होईल व जातीय ऐक्य होईल अशी आशा म. गांधीना होती. म. गांधीचे हे स्वप्न साने गुरूजीनी १९४७ आमरण उपोषण करून पंढरपूरच्या मंदिरात हरीजनांना प्रवेश मिळवून दिला. त्यांना आपला सामाजिक हक्क मिळवून दिला व म. गांधीचे कार्य गुरूजींनी पूर्ण केले.

इ.स. १९२९ च्या काँग्रेस स्वातंत्र्य ठरावानंतर देशभर नवचैतन्य पसरलेले होते. देशात गांधी विचारांचे वारे वाहू लागले होते. त्या विचाराने प्रेरित होऊन साने गुरूजी कॉग्रेसच्या स्वातंत्र्य ठरावाचा प्रचार गावोगावी जाऊन करू लागले. जर स्वातंत्र्य हवे असेल तर देशाला कॉग्रेसशिवाय पर्याय नाही. या प्रचार व प्रसारासाठी गुरूजींनी 'काँग्रेस दैनिक' काढून म. गांधीचा विचार गावोगावी फिरून पसरू लागले व अनेक तरूणांना लढ्यात सहभागी व्हायला प्रेरित केले. इ.स.१९३० पासून गांधीजीच्या असहकार चळवळीत साने गुरूजी एक निष्ठावंत सैनिक म्हणून सामील झाले. म. गांधीजीच्या विधायक कार्याचा त्याने प्रचार केला. परदेशी मालावर बहिष्कार टाकून स्वदेशी माल वापरण्याचा प्रचार केला. यासाठी गुरूजी स्वतः खांद्यावर खादीचे गठ्ठे घेऊन पूर्ण खानदेशभर फिरले. स्वतः खादीचे कपडे वापरले व दुसऱ्यांनाही वापरायला लावले. अशा प्रकारे परदेशी कापडांवर बहिष्कार टाकला व स्वातंत्र्य लढ्यात उडी घेतली. हा सर्व गांधीजीच्या विचारांचा प्रभाव होय.

साने गुरूजी म. गांधीना आपला आदर्श मानत. गांधीजींचे साधी राहणी व उच्च विचार हे साने गुरूजीना भावले होते. ते त्यांनी आत्मसात केले व तसे वर्तनही करत. साने गुरूजींनी गोखले सरांच्या घरचे श्रीमंत थाटातले जेवण नाकारले व वस्तीगृहात राहून वरण–भातच खाल्ला, साधी राहणी उच्च विचार हा म. गांधीजीच्या मंत्राचा परिणाम म्हणावा लागेल.

---

२७. साने गुरूजी, मंदिर प्रवेशाची भाषणे व इतर, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर, आवृत्ती १५ ऑगस्ट २०११, पृष्ठ ११.

म. गांधीना जातीयता, प्रांतीयता नको हवी होती कारण जेथे संकोचितता होती. तेथे गांधीजीचा आत्मा कधीच रमला नाही. याच विचारांचा परिणाम गुरूजींवर दिसून येतो. साने गुरूजींना जातीभेद नको हवा होता. गांधीजीचे स्वप्न त्यांनी पूर्ण केले. त्यांना प्रांतभेद नको हवा होता. भारतीय आत्म्याची एकरूपता अनुभवण्याची, विविधेत एकता पाहण्याची तळमळ गुरूजींना होती. त्याच तळमळीतून गुरूजींनी आंतरभारती स्थापनेचे ठरविले.

म. गांधीजी हत्या झाली हे ऐकून गुरूजी हळहळले त्यांनी ठरविले आता रडून काही उपयोग नाही. महात्मा गांधीने दाखविलेल्या मार्गाने जाऊन त्यांचे पुण्यस्मरण करण्यासाठी कर्तव्य नावाचे दैनिक काढून त्यामधून लहान लहान गोष्टीतून म. गांधीजीचे जीवन दर्शन देशभर घडविले. गुरूजीच्या साहित्यामध्येही सर्वत्र गांधी विचारांचे दर्शन होते.

साने गुरूजींनी मृत्यूला कवटाळले याचा संबंध महात्मा गांधीजीच्या निर्वाणाशी लावल्यावाचून राहवत नाही खादीच्या शुभ्र वस्त्रात त्यांनी आपला देह ठेवला होता. आपल्या देहाला गांधीजीनी देहाला संपविली त्याच वेळेस संपवावे अशा कयासाने त्यांनी चिरानिद्रेची तयारी केली असावी. साने गुरूजी आणि म. गांधीजी दोघेही भावनेच्या चाऱ्यावर जगत होते. दोघांच्या जीवनात ईश्वराला आणि उपवासाला फार मोठे स्थान होते.

साने गुरूजींना त्यांच्या आईने घडविले. आई गुरूजीचा पहिला गुरू तर महात्मा गांधीच्या विचाराने गुरूजीना मातृभूतीच्या सेवेसाठी, स्वातंत्र्य लढ्यासाठी प्रेरित केले. म्हणून म. गांधीजीना त्यांचे दुसरे गुरू बोलले तर वावगे ठरणार नाही. पंढरी ते साने गुरूजी या प्रवासाला दिशा देण्यात महात्मा गांधी यांच्या विचाराने अत्यंत मूलभूत भूमिका बजावली. साने गुरूजी म. गांधीजींना आपला गुरू मानत होते. गुरूजींना म. गांधीविषयी आदरभाव होता हा आदर गुरूजी आपल्या 'खरा हुतात्मा' या कवितेत दाखवितात.

"गांधी धर्मय, मूर्त सत्य गमती, धमार्थ तज्जीवन
गांधी प्रेमय मूर्त, निर्मख सदा प्रेमार्द्र त्यांचे मन
गीता चालति बोलती मज गमे, गीतार्थ त्यांची कृती
ऐशी थोर विभूती लाभत आम्हां भाग्यास नाही मिती" [२८]

२८. साने गुरूजी, पत्री, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. ३१८.

पुढे हाच आदर गुरूजींच्या पत्री काव्यसंग्रहातील 'महात्माजीस' या कवितेतून व्यक्त झालेला आहे.

"तुम्ही दीपच भारता अविचल, प्रक्षुब्ध या सागरी
श्रध्दा निर्मितसा तुम्हीच अमुच्या निर्जिव या अंतरी
तुम्ही जीवन देतसा नव तसा उत्साह आम्हां मृता
राष्ट्रा जागाविले तुम्ही प्रभु खरे पाजुनिया अमृता ।।
तुम्ही दृष्टी दिली, तुम्ही पथ दिला, आशाहि तुम्ही दिली
राष्ट्र तेजकळा तुम्ही चढविली मार्गी प्रजा लाविली
त्या मार्गे जरी राष्ट्र सतत उभे सश्रध्द हे जाइल
भाग्याला मिळवील, भव्य विमल स्वातंत्र्य संपादिल।। " [२९]

'खरे सनातनी' या कवितेतली साने गुरूजी म. गांधीना आपली प्रेरणा व आदर्श मानतात. या कवितेत गुरूजी उद्‌गारतात–

"ह्या भारतभूमाजी आजही संत
आहेत करू नका खंत
हे संत खरे गांधी पावनचरित
दीनास्तव सतत झिजत
तो धर्म खरा त्यांना कळे सत्य
जे गीता आचरतात" [३०]

महात्मा गांधी हे साने गुरूजींच्या मते गुरू आहेत. ऋषी आहेत, संत आहेत तसेच ते सहजप्रवृत्ती आणि स्वात्मरूपाची ओळ यातल्या संघर्षातून सोडवणारे मार्गदर्शक आहेत अशी गुरूजींची श्रध्दा आहे.

'पत्री' मधील सत्याग्रही काव्यखंडात साने गुरूजी महात्मा गांधीविषयी श्रध्दा दिसून येते. या काव्यात गांधीच्या शांती आणि अंहिसा या तत्वाविषयीचा आदर दिसून येतो. युध्द मार्गाने भारताला स्वातंत्र्य मिळणे शक्य नाही, ऐक्याने, एकजुटीने निःशस्त्र असा प्रतिकार केला पाहिजे.

---

२९. कित्ता, पृष्ठ क्र. ३६५.
३०. कित्ता, पृष्ठ क्र. ३६९.

गांधी यांच्या सत्यनिष्ठ मार्गानेच स्वातंत्र्य मिळू शकते. हे या काव्यातून व्यक्त झालेला विचार पाहता साने गुरूजी यांच्यावर गांधी तत्वज्ञानाचा खोल ठसा उमटलेला होता असे म्हणावे लागेल.

'पत्री' काव्य संग्रहातील 'खरा हुतात्मा' या कवितेत साने गुरूजी म. गांधीविषयी आदर व्यक्त करतात.

"गांधी धर्मच, मूर्त सत्य गमती, धर्मार्थ तज्जीवन
गांधी प्रेमच मूर्त, निर्मख सदा प्रेमार्द त्यांचे मन
गीता चालती बोलती मज गमे, गीतार्थ त्यांची कृती
ऐशी थोर विभूती लाभत आम्हा भाग्यास नाही मिती"[३१]

तसेच 'महात्माजीस' या कवितेतून ही गांधीविषयीचा हाच परम आदर व्यक्त झालेला आहे त्यात म्हटले आहे.

"तुम्ही दीपच भारता अविचल, प्रक्षुब्ध या सागरी
श्रध्दा निर्मितसा तुम्हीच अमुच्या निर्जिव या अंतरी
तुम्ही जीवन देतसा नव तसा उत्साह आम्हा मृता
राष्ट्र जागविसे तुम्ही प्रभू खरे पाजुनिया अमृता"[३२]

'खरे सनातनी' या कवितेतही साने गुरूजीनी म्हटले आहे.

"ह्या भारतभूमाजी आजही संत
आहेत करू नका खंत
हे संत खरे गांधी पावनचरीत
दीनास्तव सतत झिजत
तो धर्म खरा त्यानांच कळे सत्य
जे गीता आचरतात"[३३]

असे साने गुरूजी उद्‌गारतात सगळे राष्ट्र गांधीच्या रूपाने आपल्या स्वातंत्र्याच्या मागणीच्या उच्चार करीत होते. याचे प्रत्यंतर या कवितेतून येते .

आपल्या साहित्यातून महात्मा गांधीचे दर्शन साने गुरूजींना भारतमातेपासून अलग करून

३१. कित्ता, पृष्ठ क्र.– ३१८.
३२. कित्ता, पृष्ठ क्र.– ३१८.
३३. कित्ता, पृष्ठ क्र.– ३६९.

घेणे शक्य वाटत नाही. आत्मा, पुण्याई, तण, वैराग्य, गीता, अवतार या शब्द योजनेतून गुरूजींना अभिप्रेत असलेले महात्मा गांधी व भारतीय संस्कृतीमधील एकरूपता सहज समजते. गांधीजी सारख्याच साध्या, सोप्या, छोट्या–छोट्या वाक्यरचनेतून ती व्यक्त होते. गुरूजींचे अवघे जीवनच भारतीय संस्कृतीत पूर्ण मुरलेले होते. गुरूजींना रामकृष्ण परमहंसाची भक्ती, म. गांधीजीची सेवावृत्ती आणि रविंद्रनाथ टागोराची काव्य यांचा समन्वय साधण्याची त्यांची सतत धडपड होती.

अशा प्रकारे साने गुरूजींच्या आचारातून, कार्यातून व साहित्यातून महात्मा गांधीजींच्या विचारांचा प्रभाव पडला.

समारोप

साने गुरूजींचा जन्म खोताच्या घराण्यातला असला तरी खोताची सुबता बालपणी अनुभवता आली नाही. गुरूजींचे बालपण दारिद्रेत गेले. ना शाळेची फी भरायला पैसे, ना अंगावर चांगले कपडे, नातेवाईकांचा ना पुरेसा आधार, शिक्षणासाठी दारोदारी भटकंती व आई–वडीलांपासून दूर राहणे या सर्वामुळे साने गुरूजी असुरक्षितेला सामोरे जात–जात लहानाचे मोठे झाले.

साने गुरूजींच्या आई–वडीलांनी त्यांच्यावर बालपनापासूनच विविध संस्कार केले. त्यामुळे वडीलांची शिस्त व आईची कोमलता गुरूजींच्या जीवनात पदोपदी दिसून येते. पुढे साने गुरूजी मोठेपणी म. गांधीजी, विनोबा भावे व इतर सहकाऱ्यांच्या विचारात वाढले. गुरूजीनी म. गांधीजीचे सत्य, अहिंसा व सत्याग्रह हि तत्वज्ञान अंगिकारून तसे वागण्याचा व समाजापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला. साने गुरूजीना राजकीय स्वातंत्र्य लढा व सामाजिक स्वातंत्र्य लढ्यात सहभाग होण्यास त्यांच्या आई–वडीलांचे संस्कार व म. गांधीजींच्या विचारांचा पुढे उपयोग झाला.

* * * *

प्रकरण तिसरे

साने गुरूजी व राजकीय स्वातंत्र्य लढा

प्रस्तावना

३.१. स्वातंत्र्य लढ्याची प्रेरणा

३.२. स्वातंत्र्य लढ्यात सहभाग घेण्याचा प्रयत्न

३.३. साने गुरूजी स्वातंत्र्य लढ्यात सहभागी

३.४. पहिल्या सविनय कायदेभंग चळवळीत सहभाग (इ.स. १९३०)

३.५. दुसऱ्या सविनय कायदेभंग चळवळीत सहभाग (इ.स. १९३२)

३.६. वैयक्तिक सत्याग्रह सहभाग (इ.स. १९३३)

३.७. कायदेमंडळ निवडणूक प्रचारात सहभाग (इ.स. १९३४)

३.८. अज्ञातवासतील लेखन

३.९. फैजपूर काँग्रेसः साने गुरूजी (इ.स. १९३६)

३.९.१. गुरूजींचे प्रचारकार्य

३.९.२. ब्रिटिश सरकारचा कारवाया

३.९.३. काँग्रेस अधिवेशनाची सज्जता

३.९.४. फैजपूर काँग्रेसची फलश्रुती

३.१०. प्रांतिक निवडणुका (इ.स. १९३०)

३.१०.१. साने गुरूजींचा सहभाग

३.११. श्रमिकांचे लढे (इ.स. १९३८ ते १९४०)

३.११.१. शेतकऱ्यांचा लढा

३.११.२. गिरणी कामगारांचे लढे

३.१२. स्वकीयांवर केलेली टिकास्त्र

३.१३. छोडो भारत : ऑगस्ट क्रांती लढ्यात सहभाग (इ.स. १९४२)

३.१३.१. साने गुरूजींचे भूमिगत कार्य

३.१३.२. गुरूजींचे भूमिगत कार्य आणि मधुलिमये

३.१३.३. हुतात्मा शिरीष कुमार : खानदेश सुपुत्र

३.१३.४. मुंबईतील भूमिगत केंद्र

३.१३.५. गुरूजींचा खानदेश दौरा

३.१३.६. खानदेशातील घातपात चळवळ

३.१३.७. गुरूजी मुंबईत

३.१३.८. ऑगस्ट क्रांती लढ्यातील आठवणी

समारोप

प्रस्तावना:

इ.स. १७ व्या शतकात इंग्रज व्यापारासाठी आले व आपले साम्राज्य स्थापले. त्याकाळी भारतामध्ये अज्ञान, अंधश्रध्दा व मागासलेपणा होता. त्यामुळे त्यांच्यामध्ये राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा अभाव होता. तसेच अंतर्गत दुही व फंदाफितुरी होती. याचा लाभ घेऊन इंग्रजांनी आपले वर्चस्व प्रस्थापित करून भारतभर साम्राज्यवाद निर्माण केला. परंतु इंग्रजांच्या सहवासामुळे भारतीयांना पाश्चिमात्य शिक्षणे, संस्कृती, राष्ट्रवाद, स्वयंशासन, लोकशाही, मानवतावाद, समता आणि सामाजिक न्याय या आधुनिक विचारसरणीची जाणीव झाली व आपल्या आर्थिक दुरावस्थेला व हलाखीच्या परिस्थितीला इंग्रज सत्ताच जबाबदार असल्याची जाणीव भारतीयांना झाली. त्यातूनच भारतीयांच्यात राष्ट्रवादी भावनेचा उदय झाला. देशभर लोकजागृतीचे व राष्ट्रीय भावनेचे वातावरण निर्माण झाले. या कामात फार मोठा युवकवर्ग या कार्यात सहभागी झाला. अनेक युवकांनी या कार्याची धुरा आपल्या खांद्यावर घेतली प्रत्येकांच्या कामाचे स्वरूप वेगवेगळे असले तरी त्यातून वाहणारा राष्ट्रीयतेचा प्रवाह एकच होता व तो म्हणजे स्वराज्य व येथूनच स्वातंत्र्याच्या लढ्याची सुरूवात झाली.

इ.स. १८८५ ते इ.स. १९०५ या मवाळ कालखंडात राष्ट्रसभेची (काँग्रेसची) स्थापना झाली. या कालखंडात नेत्यांनी राष्ट्रसभेचे (काँग्रेसचे) मवाळ नेते ब्रिटिशांच्या न्यायी बुध्दीवर विश्वास ठेवून ब्रिटिश शासनाकडे सुधारणांसाठी अर्ज, विनंत्या केल्या मात्र शासनाकडून त्यांना आश्वासनाखेरीज काहीही मिळाले नाही. मवाळांच्या अपयशाने चळवळ जहाल नेत्यांकडे आली. इ.स. १९०५ ते इ.स. १९२० हा कालखंड जहालांचा कालखंड म्हणून ओळखला जातो. ब्रिटिश शासनाच्या काळात भारतातील पाश्चिमात्य शिक्षण प्रसाराने भारतीय तरूणांच्या मनात राष्ट्रवादी विचार वाढीस लागले. त्यामुळे तरूण वर्ग आपोआप जहालवांदाकडे आकर्षित होऊ लागला. जहालवादी नेत्यांनी स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चतुःसूत्रीच्या माध्यमातून राजकीय जनजागृती घडवून आणली. लाल–बाल–पाल या त्रिमुर्तीने भारतीय राजकारणास व्यापक लोकचळवळीचा जनाधार दिला व राजकीय संघर्ष तीव्र करणारी एक लाटच निर्माण केली. भारतीय जनता ब्रिटिशांविरूध्द लढ्याची अंतिम पर्वासाठी सिध्द झाली होती आणि स्वराज्यासाठी झगडणार असे वातावरण तयार झालेले असतानाच दि. १ ऑगस्ट १९२० रोजी लो. टिळकांचे निधन झाले व

टिळकयुगाचा अंत झाला लो. टिळकांच्या नेतृत्वाखाली प्रारंभ झालेल्या स्वातंत्र्यासाठीच्या जनआंदोलनाला व्यापक स्वरूप देण्याचे कार्य म. गांधीजीनी केले. इ.स. १९२० मध्ये म. गांधीनी राष्ट्रसभेचे (काँग्रेसचे) नेतृत्व स्विकारले. टिळक युगाचा अंत झाला व गांधी युगाला सुरूवात झाली. इ.स. १९२० ते १९४७ हा काळ भारतीय स्वातंत्र्य लढा इतिहासातील एक महत्वपूर्ण व निर्णायक काळ ओळखला जातो. याच कालावधीमध्ये म. गांधीजीच्या राजकीय व सामाजिक विचारांचा उदय झाला. म. गांधीजीनी इ.स. १९२१ मध्ये असहकार चळवळीचे रणशिंग फुकले त्या असहकार चळवळीतील कार्यक्रमात शाळा कॉलेजवर बहिष्कार घालण्यासाठी विद्यार्थी व शिक्षकांना प्रोत्साहित करण्यात आले. न्यायालयावर बहिष्कार, स्वदेशी मालाचा आग्रह आणि परदेशी मालाची होळी इत्यादी कार्यक्रमाने म. गांधीजीनी लोकजागृती करण्याचा प्रयत्न केला. नंतर हाती घेतलेल्या कार्यक्रमात खादीप्रसार, ग्रामोद्योग, ग्रामसफाई आणि अस्पृश्यता निवारण इत्यादी कार्यक्रमांना प्राधान्य देण्यात आले. अशाप्रकारे म. गांधीनी राष्ट्रीय सभेच्या व्यासपीठावरून ब्रिटिशांच्या विरोधात असहकार चळवळ, सविनय कायदेभंग आणि चलेजाव चळवळीच्या माध्यमांतून सर्वव्यापी लढा उभा करून भारताच्या स्वातंत्र्याचा मार्ग सोपा केला. अशाप्रकारे प्रत्येकांचे कार्याचे व लढ्याचे स्वरूप वेगवेगळे असले तरी त्यांचे ध्येय एकच होते आणि ते म्हणजे 'स्वातंत्र्य' या स्वातंत्र्य लढ्यात अनेक ज्ञात–अज्ञात देशभक्तांनी भाग घेतला मात्र साने गुरूजींचे योगदान 'राष्ट्रीय स्वातंत्र्य' व 'सामाजिक समता स्वातंत्र्य' लढ्यात अत्यंत मोलाचे आहे.

३.१ स्वातंत्र्य लढ्याची प्रेरणा :

साने गुरूजींना बालपणीच राष्ट्रीय स्वातंत्र्य व सामाजिक समतेच्या लढ्याचे बाळकडू आपल्या आई – वडिलांकडून मिळाले होते. गुरूजींची आई यशोधाने लहानपणीच गुरूजींच्या मनातील अस्पृश्यतेचे तण काढून समतेची शिकवण दिली होती. स्पृश्य–अस्पृश्य जातीभेद मनुष्यांनी आपल्या सोयीसाठी, स्वार्थासाठी केलेली समाजरचना असून देवाला मात्र एकसमान सारे प्रिय आहेत. देवाच्या दरबारी स्त्री–पुरूष, स्पृश्य–अस्पृश्य, गरीब–श्रीमंत, कामगार–सावकार असा भेद नाही. देवाला सारी प्रिय आहेत. देव आपल्यावर एकसमान प्रेम करतो आपणही एकमेकांशी प्रेमाने वागले पाहिजे. आईच्या शिकवणीतून गुरूजी लहानाचे मोठे झाले. त्याचाच प्रत्यय म्हणून मोठेपणी गुरूजीनी अस्पृश्यता निवारण्यासाठी मंदिर प्रवेश लढे, शेतकरी–कामगार लढे

दिले, स्त्री–पुरूष समानता पुरस्कृत साहित्य निर्माण केले.

इ.स. १९०५ ते इ.स १९२० जहालांचा कालखंड होता. महाराष्ट्रात लोकमान्य टिळक जहालमतवादी नेत्यामध्ये अग्रेसर होते. त्यांनी स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चतुःसुत्री माध्यमांतून ब्रिटिश सत्तेविरूध्द लढे दिले. गुरूजींचे वडील, सदाशिवराव हे टिळकभक्त होते व चतुःसुत्री चळवळीचे पूरस्कर्ते होते. त्यांनी परदेशी मालांवर बहिष्कार टाकून परदेशी मालांची जाळपोळ केल्यामुळे ब्रिटिश शासनाने त्यांना ४ महिन्यांचा कारावास व १५० रू. दंडाची शिक्षा दिली.[१] या प्रसंगाचा गुरूजींच्या बालमनावर प्रभाव पडून त्यांच्या मनात लहानपणापासून देशप्रेम व परकीय सत्तेची चिड निर्माण झाली होती. लोकमान्यांना अटक झाल्याबद्दल श्यामने हरताळ पुकारला आणि या कारणांसाठी धोंडू मास्तरांनी त्याला बारा छड्या मारल्या. श्यामच्या मनावर देशभक्तीचा संस्कार भाऊरावांमुळे झाला.[२] परिणामी पुढे मोठेपणी गुरूजींनी स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेतला.

अशाप्रकारे गुरूजींना आपल्या आई–वडीलांच्या शिकवणीतून, संस्कारातून सामाजिक समतेचे लढे व राष्ट्रीय स्वातंत्र्याचे लढे याची प्रेरणा मिळाली पुढे म. गांधीजींच्या विचारांतून व साहित्य वाचनातून सामाजिक समतेचे लढे व राष्ट्रीय स्वातंत्र्याचे लढे एकाचवेळी लढण्याची शिकवण मिळाली व या शिकवणीतूनच गुरूजींना स्वातंत्र्य लढ्याची प्रेरणा मिळाली.

३.२ स्वातंत्र्य लढ्यात सहभाग घेण्याचा प्रयत्न :

साने गुरूजी १९१८ साली नुतन मराठी विद्यालय पुणे येथून मॅट्रिक झाले व पुढील शिक्षणासाठी न्यु पुना कॉलेज, पुणे (एस.पी महाविद्यालय, पुणे) येथे प्रवेश घेतला. याच काळात देशातील राजकीय वातावरण तापत चालले होते. लो. टिळक काँग्रेसचे सर्वोच्च नेते होते याच काळात तरूण साने गुरूजीनी पुण्यात असणे म्हणजे त्यांच्या दृष्टीने महाभाग्य होते. इ.स १९१९ सालच्या रौलट ॲक्टविरूध्दचा हरताळ सत्याग्रह व यातून उद्भवलेला जालियनवाला हत्याकांड पुढे त्यातून उद्भवलेला असहकार आंदोलन या सर्वांमुळे देशातील वातावरण चांगलेच भारून गेलेले होते. याच राजकीय वातावरणांचा तरूण गुरूजींवर परिणाम झाला.

---

१. नरसिंह चिंतामण केळकर (संपा),केसरी, वर्तमानसार, मुंबई इलाखावृत्त, दि. ६ जून १९११, पृष्ठ क्र. ६.

२. डॉ. अनिल गोडबोले, साने गुरूजी – जीवन साहित्य आणि विचार– उन्मेष प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, २३ जून २००९, पृष्ठ क्र. १३.

इ.स. १९२० ते १९४७ भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यातील निर्णायक कालखंड म्हणून या कालावधीची नोंद घेतली जाते. अध्यात्म राजकारण व रचनात्मक कार्य यांची सांगड घालणारे गांधीजीचे नेतृत्व व त्यांचे विचार यांनी तत्कालीन राजकारण्यावर प्रभाव टाकला. म. गांधीजीच्या विचारांचा शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांवर, शिक्षकांवर मोठा परिणाम झाला होता. देशभर वातावरण गांधीजीच्या असहकार चळवळीने भारलेले होते. अनेक विद्यार्थी–शिक्षक शाळा महाविद्यालय सोडून स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होत होते तेव्हा साने गुरूजी (एस.पी कॉलेज, पुणे) येथे शिकत होते. तेथील प्रा. घारपुरे, प्रा.ना.सी. फडके यांनी नोकरी सोडून स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झाले होते. त्याकाळी विद्यार्थी दशेतील साने गुरूजींना प्रथमतः महाविद्यालयीन शिक्षण सोडून स्वातंत्र्यलढ्यात सहभागी व्हावे असे वाटू लागले.

इ.स १९१९ सालच्या रौलट ॲक्टविरूध्दचा हरताळ सत्याग्रह व यातून उद्‌भवलेला जालियनावाला हत्याकांड पुढे त्यातून उद्‌भवलेले असहकार आंदोलन या सर्वांमुळे देशातील राजकीय वातावरण चांगलेच भारून गेलेले होते. याच राजकीय वातावरणांचा तरूण गुरूजींवर परिणाम झाला. भारत परकीयांच्या बेडीतून मुक्त करून राजकीय स्वातंत्र्याचे व भारतीय समाजातील भेदाभेदी दूर करून सामाजिक स्वातंत्र्याचे ध्येय सापडले याच ध्येयासाठी गुरूजी अखेरच्या श्वासापर्यंत झटले.

अशाप्रकारे जरी साने गुरूजीनी इ.स. १९३० मध्ये स्वातंत्र्य लढ्यात सहभाग घेतला असला तरी यापूर्वीही विद्यार्थीदशेत स्वातंत्र्य लढ्यात सहभाग घेण्याचा प्रयत्न केला होता.आपला निर्णय वडीलांना कळविला व थोडे दिवस महाविद्यालय सोडून प्रयत्नही केला. मात्र वडीलांनी इ.स. १९११ च्या तुरूंगवासाचा अनुभव असल्याकारणाने त्यास विरोध केला व शिक्षण पूर्ण करण्याचा सल्ला दिला. शेवटी प्राचार्य विनायकराव आपटे यांना विनंती करून गुरूजी पुन्हा महाविद्यालयात जावू लागले.

न्यु पुना कॉलेजचे प्रा. म.म. दत्तो वामन पोतदार ही विद्यार्थ्यांनी राजकारणापासून दुर रहावे, या मताचे होते. त्यांच्या विचारांचा या काळात विद्यार्थी साने गुरूजींवर मोठा प्रभाव पडला व विद्यार्थी साने स्वातंत्र्यलढ्यापासून दूर राहिले. कॉलेजच्या फेब्रुवारी १९२२ च्या न्यु पुना कॉलेज

मासिक अंकात विद्यार्थी सानेनी 'शिक्षण व असहकारिता' या आशयाचा निबंध लिहिला. त्या निबंधाला कॉलेजचे पहिले बक्षिसही मिळाले होते. त्या निबंधात साने गुरूजी लिहितात–... एक वर्षभर शाळा कॉलेज सोडा. एक वर्ष संपले म्हणजे काय करायचे? परत शाळांत किंवा कॉलेजमध्येच जायचे ना? मग एक वर्षभर सोडण्यात मतलब काय?[३].... तुमच्या जवळ तुमचे राष्ट्र तुमच्या आयुष्यातले सहा महिने मागत आहे.... स्वातंत्र्यास्तव प्राण खर्ची घालावे लागतात, गोष्ट पटली परंतु हल्ली तर प्राण देण्यासारखी आपली परिस्थिती नाही व देशसेवेचे कंकण लवकर हाती बांधण्यासाठी तर आम्ही सहा महिनेही फुकट दवडण्यात तयार नाही.[४].... आई–बाबा पेक्षा देशाकडे दृष्टी ठेवणे श्रेयस्कर व उदात्ततर हे तर खरेच,परंतु ते सर्व काळवेळ वर्तमान पाहून केले पाहिजे.[५] विद्याध्ययन पुरे होण्याच्या आधीच अंगात धमक, ज्ञान, अनुभव येण्याच्या आधी जर देशसेवेच्या बाता सांगू लागले तर ते हास्यास्पद होईल.[६] अशाप्रकारे साने गुरूजींनी आपले महाविद्यालयीन शिक्षण स्वातंत्र्यलढ्यापासून थोडे दिवस दूर राहून पूर्ण केले.

मात्र त्या दिवसातले साने गुरूजींचे विचार कायम राहिले नाहीत. शेवटी इ.स. १९३० च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीपासून साने गुरूजीनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सहभाग घेतला.

३.३ साने गुरूजी स्वातंत्र्य लढ्यात सहभागी

साने गुरूजींची कर्मभूमी खानदेश म्हणून ओळखली जाते, इंग्रजांच्या राजवटीत राज्य शासनाने सोईसाठी खानदेशाचे पूर्व खानदेश व पश्चिम खानदेश असे भाग पडले होते. पुढे दि. २१ ऑक्टोबर १९६० साली महाराष्ट्र राज्य सरकारने पूर्व खानदेशाला जळगाव जिल्हा व पश्चिम खानदेशाला धुळे जिल्हा हे नाव दिले आहे.[७] अमळनेर हे धुळे व जळगाव जिल्ह्याच्या सरहद्दीवरील एक तालुक्याचे सात–आठ हजार लोकवस्तीचे त्या वेळचे गाव परंतू संत श्री. सखाराम महाराज यांच्या वास्तव्यामुळे व समाधी स्थळामुळे खानदेशातील एक तीर्थक्षेत्र म्हणून अमळनेरची प्रसिध्दी पूर्वीपासुनच होती.

दि. १७ जुलै १९०८ रोजी स्थापन झालेली खानदेश एज्युकेशन सोसायटी ही त्या काळातील एक नावाजलेली शैक्षणिक संस्था होती. याच शैक्षणिक संस्थेला श्री. महादेव भावे, श्री. वि.वि. चितळे, श्री. ज.गो. गोखले, श्री. ज.ग. गुणे, श्री. ग.गं. जांभेकर, श्री ह.कृ. मोहनी व श्री.

३. साने गुरूजी, साने गुरूजींचे अप्रकाशित साहित्य, (संपूर्ण साने गुरूजीः खंड ४५), वरदा प्रकाशन पुणे, पहिली आवृत्ती जाने. २०११, पृष्ठ क्र. २४३.
४. कित्ता.
५. कित्ता पृष्ठ क्र. २४४.
६. कित्ता.
७. महाराष्ट्र जिल्हे, जळगाव प्रसिध्दी विभाग, महाराष्ट्र सरकार मुंबई,१९६० पृष्ठ क्र. ५.

य.द. नवाथे यांसारखे उच्च विद्याविभूषित, राष्ट्रीय वृत्तीचे सदस्य लाभले. श्री. आपटे गुरूजी इत्यादी पुढे राष्ट्रीय चळवळीत नावाजलेले शिक्षक लाभले.

साने गुरूजी अमळेनर येथील खानदेश एज्युकेशन सोसायटीच्या प्रताप हायस्कुलमध्ये शिक्षक म्हणून साने गुरूजी दि.१७ जून १९२४ रोजी रूजू झाले. गुरूजीनी हायस्कुलला रूजु झाल्यानंतर विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासोबत राष्ट्रप्रेमाची शिकवण देण्याचे हरसंभव प्रयत्न केले. गुरूजी वस्तीगृहाच्या सेवेत असताना विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत राष्ट्रीय एकात्मतेची शिकवण, सामाजिक न्याय, समता, बंधुता, अंधश्रध्देला बळी न पडणे, कोणाला त्रास न देणे व सेवेचे शिक्षण इ. भारतीय संस्कृतीचे तत्व त्यांनी स्वतःच्या वर्तनाने शिकविले. ह्याविषयी छात्रालयातील विद्यार्थी डी.बी. कुलकर्णी आपल्या लेखात गुरूजींविषयी आठवणी सांगतात.[८]

दि. १९ जुलै १९२७ पासून छात्रालय तर दि. ८ नोव्हेंबर १९२८ पासून विद्यार्थी अशी दोन मासिके विद्यार्थ्यांसाठी काढली.[९] 'छात्रालय' व 'विद्यार्थी' मासिकाच्या लेखनासोबत गुरूजी ग्रंथालयात येणाऱ्या 'यंग इंडिया' अंकाच्या महत्वाच्या लेखांवर खूणा करून विद्यार्थ्यांना वाचायला देत. यंग इंडिया अंकातील लेखाच्या वाचनामुळे गुरूजींचे राष्ट्रीय चळवळी विषयीचे ज्ञान समृध्द होत गेले व राष्ट्रीय चळवळीतील ठळक तपशिलांची माहिती मिळाली.

महात्मा गांधीजींचा यंग इंडिया अंक हायस्कुलच्या वाचनालयात येत असे. त्यामधील लेख – स्वराज्य की रक्षा केवल वही हो सकती है, जहॉ देशवासियों की ज्यादा बडी संख्या ऐसे देशभक्तों की हो, जिनके लिए दुसरी सब चीजों से–अपने निजी लाभ से भी–देश की भलाई का ज्यादा महत्व हो।[१०]

म. गांधीजी आपल्या स्वप्नातील स्वराज्याविषयी लिहितात. मेरे...हमारे...सपनों के (रेस) या धर्म के भेदों को कोई स्थान नही हो सकता। उस पर शिक्षितों या धनवानों का एकाधिपत्य नही होगा। वह स्वराज्य सबके लिए–सबके कल्याण के लिए होगा.[११] अशा महत्वाच्या लेखांवर गुरूजी खुणा करीत व ते विद्यार्थ्यांना वाचायला देत.

प्रताप हायस्कुलमध्ये असताना गुरूजींनी गोपाळ कृष्ण गोखले, इतिहासचार्य वि.का

८. केदार मोरेश्वर ब्रम्हो (संपा), स्मरणिका खा. शि. मंडळाचे प्रताप हायस्कूल, अमळनेर, जि. जळगाव, शताब्दी महोत्सव १९०८–२००८ पृष्ठ क्र. ३३१.
९. डॉ. भिमराव नारायण पाटील, खानदेशातील प्रबोधनाची चळवळ, (१९००–१९५०), मिलिंद ऑफसेट, जळगांव प्रथमावृत्ती ११ जून २००५ पु. साने गुरूजी स्मृतीदिन. पृष्ठ क्र ३३३.
१०. मोहनदास करमचंद गांधी, मेरे सपनों का भारत, प्रकाशक–लक्ष्य पब्लिकेशन, लक्ष्मीनगर, दिल्ली ११००९३, प्रथम संस्करण २०१३, यंग इंडीया २८.०७.२१, पृष्ठ क्र. १६.
११. कित्ता २६.०३.३१, पृष्ठ क्र. १६.

राजवाडे, शिशिरकुमार घोष, रविंद्रनाथ टागोर, ईश्वरचंद्र विद्यासागर, संत सखाराम महाराज यांची चरित्रे लिहिली. त्यासाठी गुरूजीनी खूपच व्यापक वाचन केले. केसरीचे जुने अंक, विद्यासेवक व व तिलांजलीतील लेखाचे वाचन केले. अशाप्रकारे मुळात जावून वाचन केल्यामुळे भारतातील राष्ट्रवादी जाणिवांविषयी साने गुरूजींची समज प्रगल्भ होत गेली. म. गांधीजीच्या साहित्याच्या वाचनामुळे आधी राजकीय की आधी सामाजिक या वादात अडकलेल्या समाजाला एकाचवेळी राजकीय आणि सामाजिक स्वातंत्र्याचा मंत्र देणाऱ्या मं. गांधीजीच्या नेतृत्वाचे महत्व स्पष्ट झाले. राष्ट्रीय काँग्रेस चळवळ ही तळागाळातील समाजाचा, गोर गरीबांचा आवाज बनली असल्याची जाणीव गुरूजींना झाली. अशाप्रकारे साने गुरूजींची प्रताप हायस्कुलला रूजु झाल्यापासून ते सोडेपर्यंत (१९२४ ते १९३०) या काळात राष्ट्रीय वृत्तीचे सहकाऱ्यांचा सहवास, व्यापक वाचन व चिंतन यामुळे राष्ट्रीय भावना अधिकच व्यापक बनली.

डिसेंबर १९२९ चा पूर्ण स्वराज्य ठराव, दि. २६ जाने. १९३० चा पहिला स्वातंत्र्यदिन साजरा, दि. १२ मार्च १९३० साबरमती दांडीयात्रा या सर्व वातावरणात स्वस्थपणे नोकरी करणे चुकीचे आहे, असे गुरूजींना तीव्रतेने वाटू लागले. लाहोर काँग्रेस (डिसेंबर १९२९) संपूर्ण स्वराज्य ठराव पास केल्यानंतर त्यांचा उत्साह दुणावला व त्यांनी नोकरीचा त्याग करून इ.स. दि.२९ एप्रिल १९३० मध्ये आंदोलनात उतरले होते.[१२]

३.४ पहिल्या सविनय कायदेभंग चळवळीत सहभाग (इ.स. १९३०)

दि. १४ फेब्रुवारी १९३० रोजी राष्ट्रसभेने म. गांधीजीच्या नेतृत्वाखाली सविनय कायदेभंगाचा जनतेला आदेश दिला. सविनय कायदेभंगाच्या चळवळीची सुरूवात दांडीयात्रेने झाली. दि. १२ मार्च १९३० या पासून म. गांधीनी आपल्या ७८ सहकाऱ्यांसह दांडी यात्रेला निघाले. दांडीयात्रे पाठोपाठ देशभर अनेक ठिकाणी कायदेभंग झाला.

साने गुरूजींनी दि. २९ मे १९३० ला प्रताप हायस्कूल अमळनेरची नोकरी सोडली. सत्याग्रहात सहभागी होण्यासाठी पिंपराळे येथील खादी आश्रमात येऊन दाखल झाले. त्यावेळी या आश्रमाची व्यवस्थापन ॲड. वासुदेव विठ्ठल दास्ताने व त्यांच्या पत्नी वारूताई दास्ताने पाहत होते. येथे तरूणांना आश्रमात खादीचे निर्मितीचे प्रशिक्षण दिले जात असे साने गुरूजी तेथे दाखल

१२. डॉ. के.के चौधरी महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर जळगाव जिल्हा, प्रकाशक कार्यकारी संपादक व सचिव, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृष्ठ क्र. १२५.

झाल्यापासून काही दिवस सुतकताईचे काम करू लागले. तेथे काही प्रशिक्षणार्थी होते. त्यानंतर व्यवस्थापकाने त्यांच्यावर शेजारील गावोगावी जाऊन निधी जमा करणे स्वयंसेवक नोंदणी व स्वयंसेवक मिळविण्याची जबाबदारी सोपवण्यात आली. त्यासाठी गुरूजींनी आश्रमातील तरूण मुलांना हाताशी घेऊन पूर्व खानदेशातील फैजपूर, सावदा, यावल, थोर, गव्हाण इ. गावात सभा घेऊन मोठ्या प्रमाणात स्वयंसेवक नोंदणी व लोकांकडून आर्थिक मदत गोळा केली याच सुमारास साने गुरूजींचे मोठे भाऊ गजानन अर्धांग वायूने झटका आल्याने आजारी पडले व त्यांना पाहण्यासाठी गुरूजींना पिंपराळेहून पालगडला (कोकणात) यावे लागले. पालगडला येऊन गजाननदादांची भेट घेतली.

त्याचवेळी पालगडपासून जवळच असलेल्या शिरोड्यातील मिठागरांवर मोठा सत्याग्रह चालू होता, रत्नागिरी ते शिरोडा अशी अप्पा पटवर्धन व त्यांच्या सहकाऱ्यांनी पदयात्रा काढली.[१३] मिठागरातील मीठ लुटण्याचे काम चालू होते. शिरोडा येथील मिठागरावर हल्ला करण्याचा बेत स्त्रिस्वंयंसेविकांनी केला असून त्यांचे पुढारी पण श्री. सीतारामपंत पटवर्धन यांची भगिनी श्रीमती फडके यांनी घेतले असल्याचे समजते.[१४] गुरूजी पालगडहून शिरोड्याला आले. तेथे महाराष्ट्रातून ठिकठिकाणाहून शेकडो सत्याग्रही आले होते. शिरोड्याला एखाद्या युध्द छावणीचे स्वरूप प्राप्त होऊन तेथील वातावरण स्वातंत्र्यमंत्राने मंतरलेले होते अशा या अभुतपूर्व स्वातंत्र्य लढ्यात मिठागरातील मीठ लुटणे हा कार्यक्रम होता तेथे सरकारने पोलीस दल तैनात केले होते. पोलीस दल सत्याग्रहींना मिठापर्यंत पोचण्यास अडथळा निर्माण करीत होते. कोकणातील शिरोडा सत्याग्रह खूप गाजला कारण त्यात कोकणासह महाराष्ट्रातील वेगवेगळ्या प्रांतातून सत्याग्रही सहभागी झाले होते. शिरोडा सुप्रसिध्द मिठाच्या सत्याग्रहात जळगावकरांनी मोठे योगदान दिले.[१५] तेथे जमलेल्या सत्याग्रहीना मार्गदर्शन करण्यासाठी आचार्य जावडेकर, त्र्य.रं. देवगिरकर, भाऊसाहेब रानडे, विनायकराव भुस्कुटे, धर्मानंद कोसंबी इ. मान्यवर उपस्थित होते. खानदेशातून ५४ पथके खेडा किनाऱ्यावर जमा झाली होती. मा. गोखले यांच्या नेतृत्वाखाली पूर्व खानदेशातील सत्याग्रहीची तुकडी त्या सत्याग्रहात सहभागी झाली होती. त्या तुकडीत सहभागी होण्यासाठी ना.मा. गोखल्यांना साने गुरूजी भेटले मात्र गोखल्यांनी गुरूजींना सहभागी करून न घेता खानदेशात परतण्याचा सल्ला दिला. पिंपराळे आश्रमाचे ना.मा. गोखले यांनी साने गुरूजी व वि.ग कुलकर्णी यांना पैसा

१३. राजा मंगळवेढेकर, कोकणचे गांधी, साधना प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, ५ मे १९७३, पृष्ठ क्र. ४१.
१४. गजानन विश्वनाथ केतकर केसरी (संपा), केसरी, वर्तमानसार, पुणे शनिवार ७ मे १९३०, पृष्ठ क्र. ६.
१५. डॉ. के.के चौधरी महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर जळगांव जिल्हा पूर्वोक्त, पृष्ठ क्र. १२८.

मिळविण्यासाठी खानदेशात परत पाठविले.[१६] अर्थिक निधी जमा करण्यास सांगितले त्याप्रमाणे साने गुरूजी कोकणातून खानदेशात परतले.

साने गुरूजीनी खानदेशात आल्यानंतर धुळे, शिरूड, कुंझर, उत्राण, एरंडोल या ठिकाणी जोरदार प्रचार सभा घेतल्या. त्या सभेमध्ये गुरूजी लोकांना राष्ट्रीय चळवळीसाठी निधी जमा करण्याचे आवाहन करत. साने गुरूजी सविनय कायदेभंग आंदोलनात रसाळ वाणीने व भावना उंचबलून टाकणाऱ्या वाग्धारेने जनतेला प्रोत्साहन देत. पोटतिडकिने प्रचार कार्य करीत.[१७] साने गुरूजींच्या भाषणांने व प्रचारगीतांनी लोकांनी प्रभावीत होऊन अंगावरचे दागिने, पैसा, घड्याळे इ. राष्ट्रीय चळवळीसाठी निधी दान केला. गुरूजीनी स्वदेशी, बहिष्कार, मध्यपान निषेध, स्वयंसेवकांचे संघटन, खेड्यामध्ये जन जागरण प्रभात फेऱ्या, देशीदारूचे लिलाव बंद केले. अमळनेर, जळगाव, भुसावळ, चाळीसगांव, पाचोरा, मडगाव, सावदा, यावल अशा अनेक गावांतील दुकानासमोर ठाण मांडून बसत.[१८] साने गुरूजींच्या प्रचार सभांतील भाषणामुळे ब्रिटिश पोलीसाने अटक वॉरंट काढले यांचा गुरूजींना सुगावा लागल्या कारणाने गुरूजींनी एरंडोलहून धरणगावाला जाणार आहोत अशी घोषण करून पोलीसांना गुंगारा देऊन अमळनेरला आले. रात्री अंमळनेरला सभा चालू असताना पोलीसांनी गुरूजींना अटक केली व रातोरात एरंडोल प्रांत कार्यालयात आणले तेथील प्रांतअधिकारी श्री देसाई यांनी गुरूजींवर देशद्रोहाचा आरोप ठेवून १५ महिने सक्त मजुरी व २०० रू. दंड किंवा २०० रू. न भरल्यास ३ महिने जादा सक्त मजुरी अशा शिक्षा ठोठावली. अशाप्रकारे दि. १७ मे १९३० ला साने गुरूजींना पहिला तुरूंग कारावास झाला. साने गुरूजींचे शिक्षण लक्षात घेऊन त्यांना 'ब' वर्ग देण्यात यावा अशी शिफारस प्रांतअधिकाऱ्यांनी दिली. परंतू गुरूजींनी 'ब' वर्ग नाकारला म्हणून त्यांना 'क' वर्गाच्या तुरूंगात रवानगी केली.

साने गुरूजी धुळे कारागृहात असताना 'पत्री' काव्य संग्रहातील हे खंडकाव्य अस्पृश्योद्धार आणि ग्रामसुधारणा हे निबंध लिहिले. साने गुरूजीनी तुरूंगातील सत्याग्रहींना संघटीत करून आषाढी एकादशी च्या दिवशी सर्वांना फराळ मिळावा यासाठी उपोषणास प्रवृत्त केले. या कारणास्तव गुरूजींची धुळे कारागृहातून त्रिचनापल्लीच्या तुरूंगात रवानगी करण्यात आली.

साने गुरूजीना त्रिचनापल्ली तुरूंगात भारताच्या विविध प्रातांचे दर्शन झाले. तुरूंगात

१६. कित्ता.
१७. कित्ता, पृष्ठ क्र. १२७.
१८. कित्ता.

कन्नड, तमिळ,तेलगू, बंगाली व मराठी बोलणारे कैदी हेते. त्यांच्या भाषा जरी वेगवेगळ्या असल्या तरी त्यातून प्रकट होणारे भाव एकच होते. साने गुरूजींना येथे मराठी भाषासोबत इतरही भाषांच्या साहित्यांचा परिचय झाला व त्यातून अनुवादीत साहित्याची निर्मिती झाली. यात तामिळ कवी तत्वज्ञ, तिरूवल्लूवर यांच्या 'कुरूल' या खंडकाव्याचा साने गुरूजींनी अनुवाद करण्याला विशेष महत्व आहे. तसेच पत्री संग्रहातील अनेक कविता साने गुरूजीनी या तुरूंगात लिहिल्या. स्वतः गुरूजींनी श्यामच्या तोंडून म्हटले आहे आणि इतर व्याप सांभाळून मी कितीतरी आता लिहून ठेवले आहे... ही भाषांतरे करताना सद्विचारांची संगती मिळाल्यामुळे मला आनंद होतच होता. तुरूंगात चांगले पुस्तक मिळाले म्हणजे मला वाटे याचे भाषांतर मराठीत आधी करावे. मी क्षणाची विश्रांती न घेता ते करून ठेवीत असे. रात्र झालेली असावी. आसपास सारे राजकीय कैदी झोपलेले असावेत परंतू श्याम लिहिण्यात तन्मय असे.. आपल्या शक्तीप्रमाणे कार्य करणे एवढे आपल्या हाती. मातृभाषेची सेवा हेही एक पवित्र कर्तव्य आहे.[१९]

साने गुरूजींना त्रिचनापल्लीच्या कारागृहात आचार्य स.ज. भागवत यांच्यासारख्या विद्वान साहित्य समिक्षक देशभक्ताचा सहवास लाभला. आचार्य भागवत हे कायदेभंगाच्या आंदोलनात स्वतःला झोकून देऊन त्रिचनापल्लीच्या तुरूंगात आले होते. तीन महिने ते होते. साने गुरूजींच्या पत्री या काव्यसंग्रहाला आचार्य भागवतांनी प्रदिर्घ प्रस्तावना दिलेली आहे. त्यावरून त्यांचे साहित्य–समिक्षा करण्याचे गाढ ज्ञान अभ्यास समजावून येतो.

गुरूजी कारागृहात असताना बाहेर कायदेभंगाची चळवळ वणव्याप्रमाणे फोफावत होती. हा राष्ट्रीय आंदोलनाचा धामधुळीचा काळ होता. त्या काळात डॉ. सप्रु व बॅ. जयकर हे दोन देशभक्त ब्रिटिश सरकार व काँग्रेस यांच्यात समेट घडवून आणण्यासाठी प्रयत्न करीत होते. ब्रिटनचे पंतप्रधान मॅक डोनाल्ड यांनी नोव्हेंबर १९३० मध्ये पहिली गोलमेज परीषद बोलाविली होती मात्र काँग्रेसने या परिषदेत भाग घेतलेला नव्हता. त्यामुळे त्या परिषदेत कोणताही निर्णय घेता आला नाही. शेवटी परिषदेची सांगता झाली. २६ जानेवारी १९३१ रोजी ब्रिटीश सरकारने गांधीजीची सुटका केली. म. गांधी सुटल्यानंतर एक पत्रक काढले व त्यात म्हटले की स्वातंत्र्याचा लढा असाच पुढे चालू ठेवा. त्यात कोणत्याही प्रकारची शिथिलता आणू नका. असा संदेश गांधीजीनी पत्रकाद्वारे साऱ्या देशाला आवाहन केले. फेब्रुवारीपासून व्हाईस रॉय लॉर्ड आयर्विन आणि गांधीजी यांच्यात

१९. साने गरुजी, श्यामचा जीवन विकास (संपूर्ण साने गुरूजी, खंड २) वरदा प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती जाने. २०११, पृष्ठ क्र. १२६.

वाटाघाटी होऊन शेवटी गांधीजींच्या अटी लॉर्ड आयर्विनने मान्य केल्या व गांधीजीनी दुसऱ्या गोलमेज परिषदेला हजर राहण्याचे मान्य केले. त्याप्रमाणे गांधी – आयर्विन करार झाला या कराराचा भाग म्हणून अहिंसक गुन्ह्यात सहभागी झालेल्या राजकीय कैद्याला मुक्त करण्यात आले.

दि. २३ मार्च १९३१ रोजी साने गुरूजींची त्रिचनापल्लीच्या तुरूंगातून सुटका झाले व ते थेट खानदेशात परतले. त्याच दिवशी रात्री लाहोरच्या तुरूंगात ब्रिटिश सरकारने भगतसिंग, सुखदेव व राजगुरू या तीन क्रांतीकारकांना फाशी दिली. देशभर या घटनेचा निषेध करण्यात आला. साने गुरूजीनी तुरूंगवासांना न घाबरता अमळनेरला या घटनेची निषेध सभा घेतली. तुरूंगातून सुटण्याची घटना ताजी असतानाच त्यांचे स्वातंत्र्यावरील प्रेम तसुभरही कमी झाले नाही उलट वाढले.

इ.स. १९३० च्या कायदेभंग चळवळीत भाग घेतलेल्या सत्याग्रहींचे एक संमेलन खानदेशातील आसोवा (वर्धा) गावी विनोबा भावे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. त्यावेळी विनोबांचे मूलगामी विचार, सडेतोड मांडणी, अध्यात्मिक विचारांचा सत्याग्रहींवर चांगलाच प्रभाव पडला. तेथे झालेल्या सुसंवादावरून गुरूजींची अनन्यसाधारण भक्ती विनोबांजीवर जडली व ती शेवटपर्यंत कायम राहिली.

३.५ दुसऱ्या सविनय कायदेभंग चळवळीत सहभाग (इ.स. १९३२)

दि. ७ सप्टेंबर १९३१चा गोलमेज परिषदेत एकाही प्रश्नांवर एकमत होऊ शकले नाही. गांधी आयर्विन करार दि. २८ डिसेंबर रोजी मोडीत निघाला. त्यामुळे पुन्हा जानेवारी १९३२ पासून दुसऱ्या कायदेभंग चळवळीला सुरूवात झाली. म. गांधीजींना दि. ४ जानेवारी १९३२ ला अटक झाली. साने गुरूजीनी म. गांधीजीच्या अटकेच्या निषेधार्थ अमळनेरला एक सभा घेतली. सभेत स्वातंत्र्य लढ्यासाठी अर्थिक मदतीचे आवाहन केले. पुढे अमळनेरच्या वाळवंटात मोठी सभा घेतली. सभेनंतर परत जाताना साने गुरूजींना १७ जानेवारी १९३२ ला पोलीसांनी अटक करून दोन वर्ष सक्त मजुरीची शिक्षा सुनावली व गुरूजींना धुळ्याच्या कारागृहातून नाशिक कारागृहात रवाना केले.

दि. ७ सप्टेंबर १९३१ रोजी लंडन येथे दुसऱ्या गोलमेज परिषदेला म. गांधी उपस्थित होते.

तेथे गांधीजीनी काँग्रेसची स्वातंत्र्याची मागणी ब्रिटिश सरकारपुढे निर्भयपणे मांडली. मात्र या परिषदेत एकाही प्रश्नांवर एकमत होऊ शकले नाही. दरम्यान गोलमेज परिषद कोणत्याच निष्कर्षावर न पोहचल्याने गांधी–आयर्विन करार मोडीत निघाला होता. शेवटी २८ डिसेंबर रोजी म. गांधीजी भारतात परतून जनतेला लढण्यासाठी सावध इशारा दिला व गांधी–आयर्विन करार संपुष्टात आल्याचे जाहीर केले. त्यामुळे पुन्हा जानेवारी १९३२ पासून सविनय कायदेभंग चळवळीला सुरूवात झाली व म. गांधीजीना दि. ४ जानेवारी १९३२ ला अटक झाली. ब्रिटिश सरकारने चार कलमी जूलमी वटहुकुम जारी करण्यात आला. ६ जानेवारीला आणीबाणीच्या अध्यादेशाखाली बहुतेक पुढारी व गावगावचे कार्यकर्ते यांना कारावासात डांबले. त्यावेळी साने गुरूजी भुमिगत झाले.[२०] ब्रिटिशांनी देशभर सत्याग्रहींची धरपकड चालू केली. म. गांधीजीच्या अटकेनंतर दोन दिवसांतच खानदेशात आलेल्या विनोबांनाही अटक झाली.

आता शक्यतो अटक करून घ्यायची नाही असे गुरूजीनी ठरविले. पोलीसांना गुंगारा देऊन साने गुरूजीनी म. गांधीजींच्या अटकेच्या निषेधार्थ अमळनेरला एक सभा घेतली. सभेत स्वातंत्र्य लढ्यासाठी आर्थिक मदतीचे आवाहन केले व जमा केले. पुढे अमळनेरच्या वाळवंटात मोठी सभा घेतली. पोलीस गुरूजींच्या मागावर होतेच सभेनंतर परत जाताना साने गुरूजीना १७ जानेवारी १९३२ ला पोलीसांनी अटक करून दोन वर्ष सक्त मजूरीची शिक्षा सुनावली व गुरूजींना धुळ्याच्या कारागृहात रवानगी करण्यात आली. तिथे विनोबा भावे, जमनालाल बजाज, मणिलाल कोठारी, अण्णासाहेब दास्ताने, आपटे गुरूजी इत्यादी थोर मंडळी होती. या तुरूंगात विनोबा भावेनी फेब्रुवारी ते १९ जून १९३२ या काळात गीतेच्या अठरा अध्यांयावरील अठरा प्रवचने साने गुरूजीनी शब्दबध्द केली. साने गुरूजीनी त्यास 'गीताई' असे नाव दिले लाखो लोकांनी प्रवचने वाचलीत. याचे श्रेय पुज्य साने गुरूजींना आहे. विनोबांचे गुरूजींवर अतोनात प्रेम व माया होती. याबद्दल विनोबा म्हणतात, "साने गुरूजींचे आणि माझे इतके प्रेमाचे नाते होते की याहून अधिक प्रेमाचे नाते कसे असते. ते मला माहित नाही." त्यांच्या केवळ स्मरणाने देखील माझे डोळे ओले होतात. सहा महिने धुळ्याच्या जेलमध्ये आम्ही एकत्र होतो. गीतेची तेथे जी प्रवचने झाली ती साने गुरूजींनी जशीच्या तशी टिपून घेतली. हिंदूस्थानच्या सर्व भाषांमधून ती गेली आहेत. लाखो लोक ती प्रवचने वाचताहेत, भक्तीमार्ग शिकताहेत हृदय शुध्दीची दीक्षा घेताहेत याचे श्रेय साने गुरूजीना आहे.

२०. डॉ. के.के. चौधरी, महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर जळगांव जिल्हा, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. २५.

महाराष्ट्राच्या वारकरी संप्रदायामध्ये आदिपुरूष म्हणून निवृत्तीनाथ, ज्ञानदेव इत्यादी नावे सगळ्यांच्या परिचयाची आहेत. त्या संप्रदायातला शेवटचा महापुरूष माझ्या दृष्टीने साने गुरूजी होत. त्यांनी दीक्षा घेतली होती की नाही, मला माहित नाही. पण अशा महापुरूषांना दिक्षेची गरज नसते.[२१] या गीताई ग्रंथाने विनोबाजी व साने गुरूजींचे एक चिरंतन संबंध जुळले व ते संस्मरणीय झाले.

तुरूंगात जेलरने चक्की पिसण्याची सक्ती केल्यामुळे तुरूंगात अशांतता निर्माण झाली. शेवटी विनोबांनी मध्यस्थी करून राजबंद्याचे एक चक्की पथक तयार केले. साने गुरूजी त्या चक्की पिसण्याच्या पथकात सामील झाले. गुरूजी स्वतःचे दळण पूर्ण करून इतरांना मदत करीत. आपटे गुरूजींनी साने गुरूजींचा दिनक्रम अगदी जवळून पाहिला होता. आपटे गुरूजी आपल्या साने गुरूजी एक ओझरते दर्शन या पुस्तकात गुरूजींविषयी म्हणतात, "तुरूंगात आल्यावर सान्यांनी विनोबांच्या चक्की पथकात आपले नाव नोंदविले. त्याच्या वाट्याला जे काही २५–३० पौंड धान्य दळण्यास येई ते धान्य अतिशय वेगाने दळून टाकीत या कामात त्यांचे जोडीदार थकून जात. दळण एकदा सुरू झाले की त्यांचा हात गिरणीतील यंत्राप्रमाणे सारखा फिरत राही. हे काम मानवी शक्ती करीत नसून अमानुष शक्तीने हे काम चालले आहे असे पाहणाऱ्यास सहज वाटे. थोडा विचार केला तर अमानुष शक्तीच हे काम करीत होती असे दिसते. येथे अमानुष शक्ती म्हणजे यक्ष, किन्नर, गंधर्व यांची शक्ती नव्हे तर सान्यांची तीव्र राष्ट्रीय भावना हे काम घडवीत होती."[२२] यावरून साने गुरूजींची प्रखर राष्ट्रप्रेम व स्वातंत्र्याची ओढ किती दुर्दम्य होती हे सहज समजून येते.

ऑगस्ट १९३२ मध्ये धुळे तुरूंगात कैद्यांना जागा अपूरी पडते या उद्देशाने साने गुरूजींना काही राजकीय कैद्यांसोबत नाशिकच्या तुरूंगात पाठविले. तुरूंगातील जेलर 'रोज' हा कडक स्वभावाचा होता. तो राजकीय कैद्यांना अपमानास्पद वागणूक देत असे तुरूंगात प्रत्येक संध्याकाळी कैद्याची गिनती करताना प्रत्येकाने पायावर हात ठेवून गुडघ्यात मान घालून उकिडवे बसायला पाहिजे असा त्याचा हुकुम होता. साने गुरूजींनी मात्र याला विरोध केल्यामुळे त्यांना दांडयाने मारून फितूरीचा आरोप ठेवून इतर कैंद्यापासून हातापायांना बेड्या व साखळदंड घालून अलग कोंडण्यात आले. गुरूजीचे मनोधैर्य खचावे म्हणून त्यांना हरप्रकारे त्रास देण्यात आला मात्र साने गुरूजींचे

२१. यदुनाथ थत्ते, साने गुरूजी जीवन परिचय, प्रकाशक सुशील धसकटे, हर्मिस प्रकाशन, पुणे तृतीय आवृत्ती २६ जाने. २०१२, पृष्ठ क्र २५.
२२. आपटे गुरूजी, साने गुरूजी (एक ओझरते दर्शन), सुयोग प्रकाशन, पुणे, आवृत्ती १९९२, पृष्ठ क्र. ३२, ३३.

मनोधैर्य खचले नाही.

साने गुरूजीनी नाशिक तुरूंग वास्तव्यात 'श्यामची आई', 'धडपडणारी मुले' हि पुस्तके लिहिली. तसेच 'आस्तिक' या कांदबरीला आकार दिला. म. गांधीजींच्या काही लेखनाचा मराठी अनुवाद गुरूजीनी याच काळात केला होता. गुरूजींची ऑक्टोबर १९३३ मध्ये नाशिक कारागृहातून सुटका झाली. काही दिवस अमळनेरला राहून नंतर ते पालगडला गेले. गुरूजींचे थोरले बंधू गजाननदादा त्यावेळी पालगडला राहत. त्यांच्याकडे गुरूजी आठ–दहा दिवस राहिले. पुढे गुरूजी पालगडहून विनोबांच्या भेटीसाठी वर्ध्याला गेले. थोड्याच दिवसात गुरूजी परत खानदेशात आले.

३.६ वैयक्तिक सत्याग्रह सहभाग (इ.स. १९३३)

जानेवारीपासून ऑगस्ट १९३२ पर्यंत कायदेभंग चळवळीचा जोर कायम होता. शस्त्रसज्ज सरकार आणि निःशस्त्र भारतीय जनता यांचा हा लढा अपूर्वच होता. चळवळीचा जोर वाढतच राहिला. या कायदेभंग चळवळीला वेगळी दिशा मिळावी म्हणून ब्रिटीश पंतप्रधान रॅम्से मॅकडोनल्ड यांनी १७ ऑगस्ट १९३२ रोजी अस्पृश्यांच्या प्रतिनिधीत्वासंबंधी आपला जातीय निवाडा प्रसिध्द केला. ब्रिटिशांच्या फोडा आणि झोडा या कुटील नीतीचाच हा एक भाग होता. म. गांधीनी या निवाड्याविरूध्द २० सप्टेंबर १९३२ पासून येरवड्याच्या कारागृहातच उपोषण सुरू केले. उपोषण होताच सप्रू, जयकर, राजाजी, डॉ. आंबेडकर मुंबईत आले. डॉ. आंबेडकरांशी वाटाघाटी सुरू झाल्या. शेवटी २४ सप्टेबंर १९३२ ला गांधीजींना मान्य होईल अशी तडजोड झाली. हि तडजोड पुणे करार म्हणून ओळखली जाते. म. गांधीनी २६ सप्टेंबर १९३२ ला आपले उपोषण संपवले. गांधीजी तुरूंगातून बाहेर आल्यानंतर बऱ्याच प्रमुख नेत्यांमध्ये कायदेभंग चळवळ तहकूब करावी असा सूर उमटला. मात्र म. गांधीजीनी सांगितले., "चळवळ चालूच ठेवलीच पाहिजे. मात्र ती कायदेभंगाच्या स्वरूपात न ठेवता वैयक्तिक सत्याग्रहाच्या स्वरूपात चालावी. तरच सत्याग्रहाचा स्फुलिंग जिवंत राहिल आणि तो जिवंत राहिला तरच पुढे फाटा पेटण्याची आशा आहे."[२३] म. गांधीजीचा सल्ला सर्व नेत्यांना पटला. पुढे वैयक्तिक सत्याग्रहाच्या स्वरूपात चळवळ चालू राहिली.

देशभर वैयक्तिक सत्याग्रहाची चळवळ सुरू झाली. साने गुरूजी वैयक्तिक सत्याग्रह

२३. राजा मंगळवेढेकर, साने गुरूजींची जीवनगाथा, साधना प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे द्वितीय आवृत्ती ११ जून १९९२ पृष्ठ क्र. १९४.

चळवळीत भाग घेतल्यामुळे त्यांना २६ जानेवारी १९३४ ला चाळीसगावात पोलीसांनी अटक केली.[२४] व धुळे कारागृहात रवानगी केली. त्यावेळी प्रताप हायस्कूलचे विद्यार्थी हवालदार श्री अंबादास कुलकर्णी म्हणाले, "गुरूजी तुम्ही देशाच्या स्वातंत्र्या करता प्राण अर्पण करायला निघालात आणि आम्ही सरकारी नोकरी करून पोट जाळतो आहोत."[२५] त्यावेळी मॅजिस्ट्रेट देसाईनी तुरूंगात देऊ केलेला ब वर्ग गुरूजीनी नाकारून क वर्ग स्विकारला व तेथील लहान मुलासोबत राहून चक्की पिसली. चार महिन्याची शिक्षा संपल्यानंतर गुरूजी जून महिन्यात खानदेशात आले. या कारागृहाच्या अवधीत साने गुरूजीनी कला म्हणजे काय? हे अनुदानित पुस्तक लिहिले. या पुस्तकाच्या प्रस्तावनेत गुरूजीनी म्हटले आहे., "टॉल स्टॉयने लिहिलेल्या कला म्हणजे काय या थोर ग्रंथाच्या भाषांतरास ता. २१.३.१९३४ या दिवशी मी आरंभ केला. त्या दिवशी बुधवार होता. त्या वेळेस धुळे तुरूंगात मी होतो."[२६] या तुरूंगवासातही गुरूजींनी काव्यलेखन केले. पत्री या काव्यसंग्रहातील कवितांच्या खाली दिलेल्या स्थळ कालावरून दिसून येते.

३.७ कायदेमंडळ निवडणूक प्रचारात सहभाग (इ.स. १९३४)

साने गुरूजी धुळे कारागृहातून सुटल्यावर अमळनेरहून पुण्यात सुमारे तीन महिने होते. त्या पुणे वास्तव्यात श्यामच्या आईचे पुर्नलेखन, ओव्या संकलन व भगिनी निवेदितांचे पुस्तकांचे अनुवादीत पूर्नलेखन केले. २६ ऑक्टोबर १९३४ रोजी मुंबई येथे काँग्रेस ४८ वे अधिवेशन राजेंद्र प्रसाद यांच्या अध्यक्षेतेखाली भरले होते. गुरूजी या अधिवेशनात गेले होते. त्यावेळी खानदेशातील एंरडोल गावचे श्री शंकरभाऊ कावरे गुरूजीना भेटले व म्हणाले, गुरूजी खानदेशला चला निवडणूक आहे., जेधे व गाडगीळ निवडून आले पाहिजेत, प्रचार करायला हवा. देशाची अब्रु संभाळली पाहिजे. खानदेश तुमच्या शब्दाबाहेर जाणार नाही. चला हे ऐकून गुरूजींना हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे असे वाटले. ताबडतोब गुरूजी शंकर भाऊंसोबत खानदेशला निघाले.

साने गुरूजींनी खानदेशात येऊन गावोगावी पायी फिरून जोरदार प्रचारसभा घेतल्या. त्यावेळी गुरूजीनी खानदेशात गावोगावी घराघरातून म. गांधी व काँग्रेसचे नाव नेले होते. नोव्हेंबर १९३४ निवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार श्री. न.वि. उर्फ काकासाहेब गाडगीळ व श्री. केशवराव जेधे

२४. आत्माराम वाळींजकर, साने गुरूजी आणि पंढरपूर मंदिर प्रवेश चळवळीचे अध्यात्म, डिंपल प्रकाशन, कोल्हापूर, आवृत्ती २००२, पृष्ठ क्र. १२८.
२५. राजा मंगळवेढेकर, साने गुरूजींची जीवनगाथा, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. १९५.
२६. साने गुरूजी, कला म्हणजे काय, साधना प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००१, पृष्ठ क्र. ३.

यांनी वालचंदशेठ ह्या विरोधी उमेदवाराला पराभूत करून विजयी झाले.

अशाप्रकारे साने गुरूजीनी वरिष्ठ कायदेमंडळाच्या निवडणूक प्रचारात सहभाग घेऊन काँग्रेस उमेदवार जेधे व गाडगीळांना विजयी केले.

३.८ अज्ञात वासातील लेखन (इ.स. १९३५)

काँग्रेसला जय मिळाला, आपल्या मेहनतीचे चीज झाले याचा गुरूजींना आनंद झाला. पुढे गुरूजी खानदेशच्या सीमेवरील नावरा–नावरी गावातील विनोबा भावेंच्या आश्रमात थोडे दिवस राहून इ.स. १९३५ च्या प्रारंभीस पुण्यात आले. पत्री कविता संग्रहातील खरे सनातनी हा प्रदिर्घ काव्यखंड व माझी पत्री व अखेरची कविता लिहून हा कविता संग्रह अंमळनेरच्या तरूण सेवक संघाने १९३५ मध्ये प्रसिध्द केला. हा कविता संग्रह राष्ट्रभक्तीने ओथंबून भरला आहे. 'पत्री' काव्यसंग्रह प्रसिध्द झाल्यावर परकीय सरकारने त्यावर जप्ती आणली. त्या पुण्याच्या लोकसंग्रह छापखान्याकडून सरकारने २००० रूपयांचा जामीन मागितला होता. गरीब विद्यार्थ्यांच्या हितासाठी साने गुरूजीची झटणाऱ्या अनाथ विद्यार्थी गृह या जीवन संस्थेच्या लोकसंग्रह छापखान्याला आपल्या पुस्तकामुळे सरकारी रोष ओढवून घ्यावा लागल्यामुळे गुरूजींना त्यांचे खूप दुःख झाले. गुरूजीनी हातभार लावण्यासाठी श्यामची आई हे पुस्तक अनाथ विद्यार्थी गृह या संस्थेला ५०० रू. च्या मोबदल्यात कायम हक्काने देऊन टाकले श्यामची आई पुस्तकाचे हक्क दिल्यामुळे साने गुरूजींना अतिशय दुःख झाले व त्यांनी अश्रुपूर्ण डोळ्यांनी आज मी माझ्या आईला विकून आलो असे उद्‌गार काढले.[२७]

साने गुरूजी पुणे येथील सदाशिव पेठेतील पेरूगेटा जवळील मंगल भुवन इमारतीत श्री.पी.जी. कुलकर्णी, राम मोहाडीकर, राजा कुलकर्णी व सदू भालेराव या विद्यार्थ्यांसोबत काही दिवस राहिले. या कालावधीत गुरूजी राजकीय व सामाजिक क्षेत्रातील कार्यापासून दूर राहिले. मात्र लेखन चालू होते या काळात गुरूजींनी लिहिलेले भारतीय संस्कृती हे महान पुस्तक पुढे ऑगस्ट १९३७ मध्ये प्रसिध्द झाले. या पुस्तकाच्या उपसंहारात गुरूजी लिहितात, भारतीय संस्कृती या महान विषयावर थोड्याफार गोष्टी मांडल्या आहेत. भारतीय संस्कृतीवर अपरंपार प्रेम मी करीत आलो आहे. भारतीय संस्कृतीवर ज्ञानाने लिहिण्याचा मला अधिकार नाही, परंतू प्रेमाने लिहिण्याचा

२७. राजा मंगळवेढेकर, साने गुरूजींची जीवनगाथा, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. २०७.

मला अधिकार आहे. भारतीय संस्कृतीवर प्रेम करण्यात मी कोणासही हार जाणार नाही. या प्रमाणेच मला वेडेवाकडे लिहावयास लावले आहे. भक्तीमुळेच मी बोललो आहे. अशाप्रकारे साने गुरूजींचे भारतीय संस्कृतीवर प्रेम होते. गुरूजी पुढे लिहितात, "भारतीय संस्कृती म्हणजे सर्वांगीण विकास, सर्वांचा विकास, भारतीय संस्कृतीचा आत्मा स्पृश्याअस्पृश्यता मानीत नाही. हिंदू–मूसलमान जाणत नाही. प्रेमाने व विश्वासाने सर्वांना मिठी मारून, ज्ञानमय व भक्तीमय कर्माचा अखंड सूर घेऊन मांगल्यसागराकडे खऱ्या मोक्षसिंधूकडे जाणारी ही संस्कृती आहे."[२८] गुरूजीचे हृदय भारतीय संस्कृतीच्या प्रेमाने व भक्तीने ओंथबलेले असल्यामुळे फारच थोड्या अवधीत गुरूजीनी हे पुस्तक लिहून पूर्ण केले.

३.९ फैजपूर काँग्रेस : साने गुरूजी (इ.स. १९३६)

इ.स. ऑक्टोबर १९३४ मध्ये मुंबईत काँग्रेसचे ४८ वे अधिवेशन भरले. त्यात अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ, म. गांधी नेतृत्वाखाली काढण्याचा ठराव झाला. त्यानंतर काँग्रेसचे ५० वे सुवर्ण महोत्सवी अधिवेशन खानदेशातील खिरोद्याजवळील फैजपूर या गावी घ्यायचे ठरले. साने गुरूजी यावेळी पुण्यात होते. काँग्रेस महासभेचे अधिवेशन खेड्यात फैजपुरात होणार आहे ही बातमी समजताच गुरूजी पुण्यात अस्वस्थ झाले. काँग्रेस खानदेशात येत असता मी का इथे राहू? असे त्यांना वाटू लागले. गुरूजी पुण्याहून निघाले आणि खानदेशातील फैजपुरला येऊन दाखल झाले.

काँग्रेस अधिवेशनाच्या वातावरणाने कार्यकर्त्यांत एक वेगळाच रंग भरला होता. त्या अधिवेशनाच्या प्रचारासाठी साने गुरूजीनी खानदेश व महाराष्ट्र पिंजून काढला.[२९] खानदेशातील अण्णासाहेब दास्ताने, देवकीनंदन नारायण, शंकरभाऊ काबरे, सीतारामभाऊ चौधरी, सुकाभाऊ चौधरी, रामभाऊ भोगे, केरान्ने वकील, राजमल लखीचंद शेठ, पुनमचंद ओंकारदास इत्यादी लहानमोठे कार्यकर्ते फैजपूरला तळ ठोकून होते. महाराष्ट्रातील इतर भागातून शंकरराव देव, अच्युतराव पटवर्धन, रावसाहेब पटवर्धन, अण्णासाहेब पटवर्धन, एस.एम. जोशी, काकासाहेब गाडगीळ, केशवराव जेधे, वीर नरीमन असे अनेक नेते फैजपूर येथे जमा झाले होते. विनोबांचा मुक्कामही तेथेच होता. जळगाव येथे अखिल भारतीय स्वदेशी प्रदर्शन १४ डिसेंबर १९३० ते २४ डिसेंबर १९३० पर्यंत भरले होते. अशीच किंबहुना त्याहुनही मोठी दुसरी घटना म्हणजे फैजपूर

२८. कित्ता, पृष्ठ क्र. ३०३.

२९. डॉ. के.के. चौधरी, क्रांतीपर्व महाराष्ट्राचे योगदान, वसंत बुक स्टॉल, पुणे, प्रथमावृत्ती २०१३, पृष्ठ क्र. ५१.

काँग्रेस ही होय. [३०]

प. जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली १२ एप्रिल १९३६ साली काँग्रेसचे ४९ वे अधिवेशन लखनौ येथे संपन्न झाले. याच काँग्रेस अधिवेशनाच्यावेळी १४ एप्रिल १९३६ रोजी विषय नियामक समितीची बैठक भरली होती. या बैठकीत काँग्रेसचे पुढील ५० वे सुवर्ण महोत्सवी अधिवेशन महाराष्ट्रात भरवावे असे तत्कालीन महाराष्ट्र कमिटीचे अध्यक्ष श्री. शंकरराव देव यांनी सुचविले होते.[३१] म. गांधीजीनी इ.स. १९३४ साली ग्रामोद्योग संघाची स्थापना केल्यानंतर काँग्रेसची अधिवेशन खेड्यात भरली पाहिजे असे जाहिर केले. म. गांधीजीना अभिप्रेत भारत हा खेड्यात वसलेला आहे. खऱ्याखुऱ्या भारतीय जनतेचे प्रतिनिधीत्व करू इच्छिणाऱ्या काँग्रेसने त्या जनतेपर्यंत खेड्यात पोहचले पाहिजे. म. गांधीजीच्या ह्या इच्छेवरून श्री. शंकरराव देवानी काँग्रेस शहरात भरविण्याऐवजी एखाद्या खेड्यात भरवावी हा विचार २२ मे १९३६ च्या पुणे बैठकीत मांडला बैठकीत झालेल्या मतदाना नुसार काँग्रेस अधिवेशन हे पूर्व खानदेशात भरवण्याचे निश्चित झाले. याच बैठकीत शंकरराव देव यांनी हे अधिवेशन फैजपूर जवळील खेड्यात भरणार असे जाहीर केले.

३.९.१ गुरूजींचे प्रचारकार्य

साने गुरूजी आले आणि काँग्रेस प्रचाराचे प्रचंड काम त्यांनी हाती घेतले. खेड्यात काँग्रेसचे अधिवेशन घ्यावयाचे म्हणजे खेड्यातील जनतेस जागृत करावयाचे. शहरातील व्यापक दृष्टीच्या मंडळींचा आणि खेड्यातील निद्रिस्त असहाय जनतेचा हृदयमेळ करावा. हा खेड्यात काँग्रेस नेण्याचा मूळ हेतू होता. तो हेतू बरोबर हेरून लोकांपर्यंत पोहचविण्याचे कार्य साने गुरूजी व एस. एम. जोशी यांनी उत्तम प्रकारे केले. देश खेड्यात आहे आणि खेड्यातील लोक जोपर्यंत जागृत होत नाही तोपर्यंत आपल्याला जनशक्ती उभी करता येणार नाही आणि परकीय सत्तेला घालवून देता येणार नाही, असे या प्रचाराचे सूत्र होते.

खांद्यावर राष्ट्रीय निशाण, मुखी स्वातंत्र्याची गीते, निष्ठेचे चार स्वयंसेवक बरोबर घेऊन गुरूजी हिंडतच राहिले. गुरूजी सांगत असत, फैजलपूरलाच चला, काँग्रेसची गंगा आपल्या दारात आली आहे, आपल्या देशाचे मोठेमोठे पुढारी येणार आहेत, त्यांना बघायला, त्यांचे विचार ऐकायला या! आपल्या शेतकऱ्यांच्या हितासाठी, हे पुढारी सरकारशी झगडत आहेत, भांडत आहेत.

३०. महाराष्ट्राचे जिल्हे, जळगाव प्रसिध्दी विभाग, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. १०.
३१. राजा मंगळवेढेकर, साने गुरूजींची जीवनगाथा, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. २१८.

फैजपूरला जाऊ नका म्हणून पोलीस पाटील सांगतील, तर ते तुम्ही ऐकू नका. आपला निश्चय पक्का असू द्या ! [३२]

ते पुढे म्हणत, "काँग्रेस अधिवेशनाच्यावेळी दोन दिवस शाळेला सुट्टी द्या." अशी विनंती लोकल बोर्डाला केली होती. मुलामुलींना आपल्या राष्ट्रपुरूषांचे दर्शन झाले असते. पण लोकल बोर्डाने आमची हि विनंती धुडकावून लावलीच, पण शिक्षक आणि विद्यार्थी यांना फैजपूरला जाण्यासही बंदी घातली आहे. असे सदस्य आपण लोकल बोर्डात निवडून दिलेत. पण जर आपण काँग्रेसचे उमेदवार निवडून द्याल तर ते तुमच्या हक्कांसाठी विधानसभेत सरकारशी धैर्याने भांडतील म्हणून येत्या निवडणुकीत काँग्रेसलाच मते द्या ! यापुढे गावोगावी लोकांनी निर्भय होऊन जाहीर करावे की आमची मत काँग्रेसलाच आहेत... [३३]

अशा या प्रचारदौऱ्याच्या भ्रमंतीत कोणत्या वेळी साने गुरूजी खेड्यात जाऊन पोचतील याचा नेम नसे. साने गुरूजींचा लौकिक खानदेशात इतका पसरला होता की ते कोणत्याही वेळी खेड्यात प्रवेश करीत आणि मग त्यांच्या पथकाने गावात प्रवेश करताच महात्मा गांधी की जय, वंदे मातरम् अशा घोषणांची ललकारी दिली की मग संबंध गाव जागृत होई. हां हां म्हणता बायका, मुले, वृध्द, तरूण त्यांच्या अवती भोवती जमत. प्रथम ते सुंदर भावपूर्ण जागृतीचे पद म्हणत असत. त्यातील एक गीत –

भारतमाता, माझी लावण्याची खाण ।
गाईन तिचे गान, मी गाईन तिचे गान ।।

गुरूजी काँग्रेसचा संदेश थोडक्यात सांगताना म्हणत, "आपली माता आपल्या घरी येत आहे. तिचे स्वागत करायला तुम्ही येणार ना ? काँग्रेसला स्वयंसेवकाची गरज आहे. मुलांची आहे, स्त्रियांची आहे, तरूणांची आहे व वृध्दांची आहे." अशा पध्दतीने गुरूजींनी सर्व खानदेश काँग्रेसच्या संदेशाने ढवळून काढला. खानदेशातील अधिवेशन हे शेतकऱ्यांचे अधिवेशन ठरावे या निर्धाराने साने गुरूजी व सहकारी यांनी ४०–५० स्त्री पुरूष घेऊन जिल्ह्यातून पायी दौरा केला या अभिनव पदयात्रेने व प्रचाराने समाजात विलक्षण जागृती झाली. [३४]

गुरूजींच्या प्रेरणेने सरलाबाई ऊर्फ सोनाबाई चौधरी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस

३२. कित्ता, पृष्ठ क्र. २१३.
३३. कित्ता.
३४. डॉ. के.के. चौधरी, महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर जळगाव जिल्हा, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. १३६.

प्रचारासाठी महिलांचे एक पथकही खानदेशात गावोगावी प्रचार करीत होते. दि. २० सप्टेंबर १९३६ रोजी स्वागत समितीच्या निवडीसाठी अच्युतराव पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक झाली. त्यावेळी खानदेशातील तरूणांनी स्वागताध्यक्षपदी साने गुरूजींची निवड व्हावी अशा हालचाली सुरू केल्या. परंतु मित्रांचा प्रयत्न गुरूजींनी मोडून काढला. पुढे शंकराव देवांचे नाव स्वागताध्यक्षपदी सर्वसंमतीने मान्य करण्यात आले.

शंकरराव देवाची स्वागताध्यक्षपदी निवड झाल्यानंतर, स्वागत समितीचे सरचिटणीस म्हणून धनाजीनाना चौधरी आणि सहचिटणीस म्हणून वासुदेव विठ्ठल उर्फ अण्णासाहेब दास्ताने, गो.आ. देशपांडे, गोकुळभाई भट आणि शंकरभाऊ काबरे यांची निवड झाली. यावेळी गुरुजींचा विनोबाशी संबंध आला. गुरूजींनी एक संकल्प केला की पूर्व खानदेशातून काँग्रेसचे १० हजार सभासद नोंदवायचे ! गुरूजींनी फार मोठे परिश्रम घेऊन थोड्याच दिवसात आपला संकल्प सिध्दिस नेला आणि ४५ हजार सभासद खानदेशातून नोंदविले हे विशेष कार्य होय.

३.९.२ ब्रिटिश सरकारच्या कारवाया

फैजपूरचे फजितीपूर होणार अशी उमेद बाळगून काँग्रेसविरोधी पत्रे, विरोधक आणि ब्रिटिश सरकार हे पाण्यात देव ठेवून बसले होते. अशा स्थितीत काँग्रेसने फैजपूरला अधिवेशन भरवून जर आपला फज्जा उडविण्यास काँग्रेस आपण होऊन तयार असेल तर तिला परवानगी देऊन तिची फजिती पाहणे अधिक हिताचे ठरेल या विचाराने ब्रिटिश सरकारने आवश्यक ती परवानगी दिली. फैजपूरला काँग्रेसचे अधिवेशन घेण्याचा हट्ट गांधीजींनी धरला होता, याची सरकारला माहिती होती. इंग्रज सरकारने त्यावेळच्या जी.आय.पी. रेल्वेने फैजपूरला जाणाऱ्या प्रवाशासाठी सवलतीचे दर जाहीर करून तिकीटविक्री केली व आमचे आपल्या कार्यात सहकार्य आहे असे सिध्द करण्याचा प्रयत्न केला. मात्र ब्रिटिश सरकार या काँग्रेस अधिवेशनाचा फज्जा कसा उडतो याची वाट पाहत होते.

फैजपूरला काँग्रेस अधिवेशन भरविण्याचा महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसने निर्णय घेतल्यानंतर गांधीजीनी 'गाँवो की और' या मथळ्याचा एक लेख हरिजन या वृत्तपत्रात लिहिला. "भारत अपने चन्द शहरों मे नही बल्कि सात लाख गाँवो मे बसा हुआ है।" [३५] खेड्यात एका नगराची प्रतिकृती

३५. मोहनदास करमचंद गांधी, मेरे सपनों का भारत, पूर्वोक्त, हरिजन ४.४.३६, पृष्ठ क्र. ९१.

निर्माण न करता संबंध देशाचीच एक छोटीशी प्रतिकृती त्यामधून निर्माण व्हावी आणि अधिवेशनाच्या निमित्ताने आदर्श खेड्याचे चित्र तयार करावे असे गांधीजींचे म्हणणे होते.

धनाजी नाना चौधरीनी आपली ८५ एकर शेतजमीन अधिवेशनाला उपलब्ध करून दिली. शांतिनिकेतनचे महान कलाकार नंदलाल बोस यांच्या देखरेखीखाली करण्यात आली. आवश्यक ती जमीन ताब्यात आल्यावर अधिवेशनासाठी टिळकनगराची रचना होऊ लागली. टिळकनगराच्या मुख्य दरावाजाला शिवाजी महाराज दरवाजा असे नाव देण्यात आले, तर अन्य दरवाज्यांना न्या. रानडे, गोखले, राणी झांसीवाली इत्यादी राष्ट्रवीरांची नावे देण्यात आली. एका बाजूला प्रशस्त झेंडा चौक, सभामंडप, खादी–ग्रामद्योग प्रदर्शन इत्यादी व्यवस्था केली होती. गांधीजींच्या सूचनेप्रमाणे टिळक नगराची उभारणी करण्यात आली आणि खेड्यातील काँग्रेसचे स्वरूप जनताजनार्दनास घडविण्यात आले.

स्वागत समितीने अधिवेशनासाठी दीड लाख रूपयांचा निधी जमविण्याचा निर्धार केला. यावेळचे नेते श्री. माधवराव देशपांडे यांनी स्वागत–समितीला २० हजार रूपयांची देणगी दिल्याचे जाहीर केले.

३.९.३ काँग्रेस अधिवेशनाची सज्जता

काँग्रेस महासभेचे अधिवेशन डिसेंबरच्या दि.२७ आणि २८, डिसेंबर १९३६ला सुरू होणार होते. त्याआधी २३ व २४ डिसेंबर रोजी काँग्रेस कार्यकारिणीची बैठक होती. अधिवेशनाचे नियोजित अध्यक्ष पं. जवाहरलाल नेहरू होते. पं. जवाहरलाल नेहरू यांची सावदा रेल्वे स्थानकापासून मिरवणुकीने वाजत गाजत प्रवासयात्रा काढावयाची अशी स्वागत समितीची योजना होती. सरकारधार्जिण्या विरोध केला. मिरवणूक या भागातून जाऊ नये म्हणून गावातील रस्ता बंद केला. साने गुरूजींना हे कळले तेव्हा ते फार अस्वस्थ झाले. सावदाचे तत्कालीन नगराध्यक्ष प्रेमचंद इच्छाराम पाटील यांच्याकडे स्वतः गुरूजी व सखाभाऊ लोढाभाई इत्यादी कार्यकर्ते मंडळी त्यांच्याकडे गेले व रस्ता मिरवणुकीसाठी बंद करू नका अशी विनंती केली. शेवटी पं. नेहरूंची बैलगाड्यांतून मिरवणूक काढली. पण सरकारधार्जिण्या लोकांनी त्यांची विनंती झिडकारून टाकली.

डिसेंबरचा शेवटचा आठवडा सुरू झाला. महाराष्ट्रातून तसेच साऱ्या देशांतून पाहुणे

प्रतिनिधी फैजपूरला येऊ लागले. मुंबई ते फैजपूर या मार्गाने लोकांनी ज्योतीचे उत्साहाने स्वागत केले. अखेरच्या टप्प्यावर साने गुरूजीनी ज्योती स्विकारली व २७ डिसेंबरला शंकर देवांच्या हाती केली त्यांनतर जवाहरलाल नेहरूनी दीप प्रज्वलित केला.[३६] गुरूजींचा झंझावाती प्रचार दौरा डिसेंबर महिन्याच्या आधीच थांबला होता. स्वयंसेवक दलाचे प्रमुख म्हणून रावसाहेब पटवर्धन यांची नेमणूक झाली, तर सफाई कामाचे प्रमुख म्हणून अप्पासाहेब पटवर्धन यांना नेमण्यात आले. गुरूजींनी अप्पासाहेब पटवर्धनाच्या सफाई पथकात आपले नाव नोंदविले व हातात झाडू घेऊन ते कामाला लागले.

साने गुरूजी आणि इतर कार्यकर्त्यांच्या परिश्रमामुळे खेड्यापाड्यातून फैजपूर अधिवेशनाला सुमारे दीड लाख लोक उपस्थित होते. त्यांचा उत्साह, जोम आणि सर्व प्रकारच्या अडचणी सोसण्याची त्यांची सहनशीलता खरोखरच वाखण्यासारखी होती. साने गुरूजींच्या अंगात तर जणू काय अधिवेशन संचारले. त्यांचा उत्साह ओंसडून वाहू लागला त्यांच्या ओजस्वी लेखणीतून स्फुर्तिदायक गीते पसरली. अंगात संचारल्यासारखे ते प्रचाराला लागले.[३७]

ऐन अधिवेशनाच्या वेळी साने गुरूजी आले. त्यांना मी स्वयंसेवकाच्या तुकड्या करणे व त्यांना काम नेमून देणे इत्यादी व्यवस्थेची कामे दिली. पण तेही नेर चुकवून प्रत्यक्ष सफाई कामाला निघून जात! यावरून स्वच्छताप्रियता ही व्यवस्थापनापेक्षा प्रत्यक्ष कामाला भिडण्याची त्यांची वृत्ती विशेष उल्लेखनीय तर होतीच, त्याचबरोबर वरिष्ठांच्या आज्ञेची वाट न पाहता स्वतः कामाला जुंपून घेणे त्यांना आवडत असे हे त्यांच्या कुठल्याही कामासंबंधीचे वैशिष्ट्ये म्हणता येईल.

सफाई पथकातील स्वयंसेवकांना गुरूजींच्या सहवासाचा फार मोठा आधार वाटे. गुरूजी स्वतःहून सफाई कामला लागत असत. प्रसिध्दी माध्यमांच्या पडद्याआड राहून अधिवेशन यशस्वी करण्यासाठी प्रत्येक प्रकारची कामे त्यांनी केली आणि सर्वांकडून प्रशंसा मिळविली. गुरूजींनी फार मोठे देशकार्य पार पाडले. खिशात चणे–फुटाणे ठेवून खेडोपाडी दिवस–रात्र प्रचार करणाऱ्या साने गुरूजी व एस.एम. जोशी यांच्यासारख्या त्यागी कार्यकर्त्यांच्या झंझावती प्रचाराचे व श्रमसेवेचे हे फळ होते यांत मुळीच शंका नाही.

इ.स. १९३४ मध्ये स्थापन झालेल्या काँग्रेस–समाजवादी पक्षाची युवक मंडळी जुन्या

३६. डॉ. के.के. चौधरी, क्रांतीपर्व महाराष्ट्राचे योगदान, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. ५०.
३७. कित्ता, पृष्ठ क्र. ५१.

विचारधारेच्या काँग्रेस पुढाऱ्यांवर आपल्या विचारधारेचा प्रभाव पाडण्यासाठी झटत होते. काँग्रेस – समाजवादी पक्षाचे मुख्य कार्यकर्ते जयप्रकाश नारायण, डॉ. राममनोहर लोहिया, युसुफ मेहरअल्ली, अशोक मेहता, अच्युतराव पटवर्धन, एस.एम. जोशी, नानासाहेब गोरे, साने गुरूजी, एम.आर.मसानी इत्यादी नेते आपल्या पुरोगामी विचारांचे जोरदार समर्थन करीत होते. विशेषतः कम्युनिस्ट पक्षाचे श्रीपाद अमृत डांगे आणि इ. एम.एस. नंबुद्रिपाद ही स्वागताध्यक्ष श्री. शंकरराव देव यांच्या आग्रहाखातर गांधीजीनी सफाई विभागाला दि.२९ डिसेंबर रोजी भेट दिली. यावेळी गांधीजीनी अप्पासाहेब पटवर्धन आणि साने गुरूजी यांनी केलेल्या सेवेची चांगलीच प्रशंसा केली. तेथील छोट्या भाषणात गांधीजीनी म्हटले, तुम्ही केलेल्या स्वच्छतेच्या कामाला कमी समजू नका. तुम्ही केलेले काम मानवधर्माची प्रतिष्ठा राखणारे आहे. या सेवेच्या बळावर तुम्ही राष्ट्राची उभारणी कराल. माझी खात्री आहे की स्वयंसेवक कार्यकर्ते हा संदेश खेड्यापाड्यांत नेऊन भारताचे स्वातंत्र्य लवकरात लवकर संपादन करण्यात मोलाची कामगिरी बजावतील.

३.९.४ फैजपूर काँग्रेसची फलश्रुती

अखिल भारतीय काँग्रेस महासभेचे खेड्यात भरणारे हे पहिले अधिवेशन होते. फैजपूर काँग्रेस अधिवेशनाचा बोऱ्या वाजणार आणि फैजपूरचे फजितपूर होणार अशी खात्री असलेल्या ब्रिटिश राज्यकर्त्यांनाही खेड्यात भरलेले काँग्रसचे अधिवेशन विलक्षणरीत्या यशस्वी झाल्याचे मान्य करावे लागले. काँग्रेस पक्षाला खेड्यातील जनतेचाही पाठींबा आहे याची दखल राज्यकर्त्यांना घ्यावी लागली. फैजपूर काँग्रेसच्या अधिवेशनात एकूण २१ ठराव संमत करण्यात आले.[३८]

इ.स. १९३५ च्या कायद्यातील फक्त प्रांतिक स्वायत्ततेचा भाग फैजपूर काँग्रेसने स्वीकारून, संघराज्याबाबतच्या असलेल्या तरतुदी काँग्रेसने झिडकारल्या व त्याविरूध्द राष्ट्रव्यापी मोहीम हाती घेण्याचे ठरविले. भारताने आपली राज्यघटना स्वतःच करावयाची असून लोकनियुक्त प्रतिनिधीनी तयार केलेल्या संविधानानुसारच भारतीय जनतेकडे सत्तांतर व्हावयास हवे, त्यात परकीयांचा हस्तक्षेप नको, अशी काँग्रेसने ठाम भूमिका या अधिवेशनात घेतली.

फैजपूर काँग्रेसमुळे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला आम जनतेचे व्यापक अधिष्ठान मिळाले. याचे प्रत्यंतर पूर्व खानदेशातून ४५ हजार नवीन सभासद नोंदले गेले. स्वागताध्यक्ष श्री. शंकरराव

३८. राजा मंगळवेढेकर, साने गुरूजींची जीवनगाथा, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. २३०.

देव यांच्या आग्रहाखातर गांधीजींनी सफाई विभागाला दि.२९ डिसेंबर रोजी भेट दिली. यावेळी गांधीजींनी अप्पासाहेब पटवर्धन आणि साने गुरूजी यांनी केलेल्या सेवेची चांगलीच प्रशंसा केली. सफाई विभागातील काम करणारे गुरूजी आणि त्यांचे सहकारी यांनी अधिवेशनकाळात बजावलेल्या सेवाभावी कार्याबद्दल गांधीजीकडून मिळालेली ही पावती होती, हे विशेष होय.

गांधीजीनी दिलेला संदेश व मार्गदर्शन मोलाचे होते. महात्मा गांधी यांनी काँग्रेस व्यासपीठावरून मोठ्या उच्च स्वराने अखिल भारतीय जनतेला आवर्जुन सांगितले, ही पाहा फैजपूरचे आज फत्तेपूर झाले ! २१ ठरावापैकी ऐतिहासिक महत्वाचा निर्णय संपन्न झाला. साने गुरूजीसारखे अपरिमित सेवेने कार्य करणारे निष्काम कर्मयोगी खानदेशाला लाभले म्हणून फैजपूरचे फत्तेपूर होऊ शकले हे सर्वांनी लक्षात घ्यावे. फैजपूरचे काँग्रेस अधिवेशन साने गुरूजींच्या स्वातंत्र्यलढ्यातील महत्वाचा टप्पा होय.[३९]

३.१० प्रांतिक निवडणुका (इ.स. १९३७)

फैजपूर काँग्रेस अधिवेशन यशस्वी आटोपल्यामुळे सर्व नेत्यांमध्ये स्फुर्ती आली होती. सर्वजण फेब्रुवारी १९३७ च्या प्रांतिक विधिमंडळाच्या निवडणुकीच्या प्रचार कामाला लागले होते. काँग्रेसने ह्या निवडणुकीत भाग घ्यायचे ठरविले. काँग्रेस अध्यक्ष प. नेहरूनी स्वतः देशव्यापी निवडणूक प्रचाराला सुरूवात केली. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात कायदा तोडण्याचा दृष्टीनेच या निवडणुका लढविल्या जात आहेत व म्हणून निवडणुकी जिंकल्यानंतर अधिकार स्विकार करू नये असे स्पष्ट मत मांडून जनतेला आज निवडणूकी फत्ते करणे या कार्यक्रमावर सर्व शक्ती केंद्रित करूया[४०] असेही आवाहन केले त्यामुळे सर्व देशभर निवडणूकमय वातावरण तयार झाले होते. फैजपूर काँग्रेस अधिवेशनाच्या यशाने कार्यकर्त्यांना जोश आला होता त्यामुळे सर्वजण फैजपूर काँग्रेस आटपल्यानंतर लगेचच निवडणूकीच्या कामाला लागले होते.

३.१०.१ साने गुरूजींचा सहभाग

महाराष्ट्रभर निवडणुकीचे वारे वाहत होते. महाराष्ट्राचे राजकीय वातावरणही निवडणूकमय झाले होते. साने गुरूजीच्या वाणीला मंत्राप्रमाणे पूर्व खानदेशात सामर्थ्य प्राप्त झाले होते. कारण फैजपूर काँग्रेस अधिवेशनाच्यावेळी गुरूजीनी संपूर्ण खानदेश पायी पालथा घातला होता.

३९. डॉ. के.के. चौधरी, क्रांतीपर्व महाराष्ट्राचे योगदान, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. ५१.
४०. राजा मंगळवेढेकर, साने गुरूजींची जीवनगाथा, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. २१८.

खानदेशातील प्रत्येक गावात – घरात गुरूजी पोहचले होते. सविनय कायदेभंग चळवळीच्या वेळी गुरूजींच्या प्रेरणेने खानदेशातील गावोगावी तरूण देशसेवेसाठी सज्ज झाले होते. त्यामुळे खानदेशातील जनतेला गुरूजी म्हणजे मार्गदर्शक उपदेशक वाटू लागले होते.

साने गुरूजीनी आपली कर्मभूमी खानदेशमधील काँग्रेस उमेदवार विजयी झालेच पाहिजे अशा निश्चयाने प्रचाराला सुरूवात केली. खानदेशात श्री. धनाजी नाना चौधरी, श्री. र.वा वाडेकर व श्री. राजमल लखमीचंद हे काँग्रेस उमेदवार उभे होते.

साने गुरूजी कधी पायी, कधी मिळेल त्या वाहनाने सोबत तीन–चार तरूण कार्यकर्त्यांना घेऊन गावोगावी प्रचार सभा घेत असत. विखरम येथील एका सभेत गुरूजी म्हणाले. "मी तुमचा उत्साह पाहून पवित्र होण्यासाठी आलो आहे. तुम्ही जागे आहात... सर्वांना जागे केले पाहिजे तुम्ही उठा व दुसऱ्यांना उठवा स्वतः पेटा व दुसऱ्यांना पेटवा स्वयसेवकांच्या हातात झेंडे द्या. आजूबाजूच्या गावातून हिंडा काँग्रेसचा सर्वत्र जयजयकार करा."[४१] गुरूजी अशी भाषणे करून ग्रामस्थांत काँग्रेसविषयी आस्था निर्माण करीत असत. साने गुरूजीच्या त्यावेळच्या सभेचे वृत्त ११ जानेवारी १९३७ च्या भारत या साप्ताहिकात पुढीलप्रमाणे दिले आहे. "दि. १०/०१/१९३७ पर्यंत श्री. माधवराव दिवाण, साने गुरूजी, नवल पाटील, नथुभाऊ यांनी ३०–३५ गावी सभा घेतल्या." [४२] या वृत्तावरून साने गुरूजींचा प्रचार कार्याचा झंझावत दिसून येतो.

साने गुरूजी गावोगावी प्रचारसभेत भाषणांसोबत काही प्रचारगीते केली व ती गीते सभेच्या आधी स्वंयसेवक गात असत. त्या गीतामधील एक लोकप्रिय प्रचारगीत पुढे देत आहे.

मतुार बंधू तुम्ही काँग्रेसला मते सारे द्या रे ।
काँग्रेस सदा मरे, तुमच्यासाठी झुरे
तुमच्यासाठी ती लाठ्याही खाय रे ।।
बाबू गेनू मोटारीखाली चिरडला
लाला लजपतराय बळी पडले ज्याला
आठवा गोळीबार, चुकवा लाठीमार
तुम्ही कर्तव्या न चुका रे ।।

४१. कित्ता, पृष्ठ क्र. २१९.
४२. कित्ता, पृष्ठ क्र. २१८.

वधू पाटील नको, वामन संपत नको
काका राणे नको, इतर कोणी नको
सारे सरकार समोर नाचणारे
हे सरकारला मान तुकवणारे ।।
मतदार बंधू तुम्ही काँग्रेसला मते सारे द्या रे ।। [४३]

असे गीत गाऊन जनतेला काँग्रेसला मते द्यायला विनंती केली या गीतातील नथू पाटील, वामन संपत व काका राणे हे काँग्रेस विरोधी उमेदवार उभे होते. फेब्रुवारी १९३७ च्या दुसऱ्या व तिसऱ्या आठवडा अखेर निवडणूका संपल्या. त्यात ११ पैकी ८ प्रातांत काँग्रेसला बहुमत मिळाले अशाप्रकारे बहुमत मिळालेल्या प्रातांत काँग्रेसने जुलै १९३७ ला मंत्रिमंडळ स्थापन करून दि. १७ जुलै १९३७ रोजी ना. बाळासाहेब खेर हे मंत्रिमंडळ मुंबई प्रातांत अधिकारावर आले. अशाप्रकारे साने गुरूजींच्या प्रचाराला यश आले खानदेशातील धनाजी चौधरी व वाडेकर विजयी झाले. मात्र राजमल लखमीचंद पराभूत झाले. नंतर पोटनिवडणूकीत तेही विजयी झाले. गुरूजींच्या प्रयत्नांना यश आले.

३.११ श्रमिकांचे लढे (इ.स. १९३८ ते १९४०)

कष्टकऱ्यांच्या प्रश्नांविषयी गुरूजींना अतोनात आस्था होती आणि कष्टकऱ्यांना गुरूजींविषयी आत्मीयता होती. भारतातील श्रमिक शोषित वर्गाच्या हक्कांच्या प्रतिष्ठापनेला साने गुरूजींच्या दुष्टीने स्वातंत्र्य लढ्यात मूलभूत महत्व होते. शेतकऱ्यांच्या राज्यासाठी, कामकऱ्यांच्या राज्यासाठी लावू पणाला प्राण या आवेशानेच साने गुरूजी राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्यात उतरले होते. न पटणाऱ्या बाबी बदलण्यासाठी संघर्षाला सिध्द होण्याच्या वृत्तीपर्यंत साने गुरूजींचा प्रवास झाला आणि त्यातूनच ते खानदेशातील 'कामगार आणि शेतकऱ्यांच्या' विविध लढ्यांशी जोडले गेले. इ.स. १९३८ ते १९४० या कालखंडातील साने गुरूजींचा प्रवास हा त्यांना तळागाळातील समाजाशी जोडणारा होता. या कालखंडातील साने गुरूजींचे कार्य हे जरी खानदेशापुरते मर्यादित राहिले असले तरी त्याचे परिणाम दूरगामी होते. धुळे–अमळनेर–चाळीसगाव येथील कापडगिरण्यातील कामगारांचे वेतनवाढी संबंधीचे प्रश्न, अमळनेर म्युन्सिपालिटीचे टोल टॅक्स

४३. कित्ता, पृष्ठ क्र. २१९.

प्रकरण, मुंबई प्रांतिक सरकारने आणलेला कुळ कायदा आणि मालक–मजूर तंटा निवारण कायदा यांसारख्या बाबींच्या संदर्भात साने गुरूजींचे श्रमिकांच्या प्रश्नांशी नाते जोडले होते.

३.११.१ शेतकऱ्यांचा लढा

खानदेश अतीवृष्टीने गांजला होता. त्यामुळे शेतकऱ्यांच्या ठिकठिकाणी परिषदा भरत होत्या. या परिषदांच्या निमित्ताने ऑगस्ट १९३७ पासून साने गुरूजींनी खानदेशचे दौरे सुरू केले. खानदेशच्या ग्रामीण भागातील काँग्रेसचे बहुसंख्य पदाधिकारी हे शेतकरी होते. हा शेतकरी वर्ग या काळात 'डिस्ट्रिक्ट ॲग्रीकल्चरल असोसिएशनच्या' माध्यमातून संघटित होत होता. डिसेंबर १९३६ मध्ये फैजपूर काँग्रेसला समांतर अखिल भारतीय शेतकरी काँग्रेसचे अधिवेशन झाले होते. या अधिवेशनानंतर ठिकठिकाणी शेतकरी परिषदा होऊ लागल्या. ऑक्टोबर १९३६ च्या चाळीसगावातील शेतकरी परिषदेच्या अध्यक्षस्थानी साने गुरूजी होते.

अमळनेर म्युन्सिपालटीने इ.स. १९३७–३८ या आर्थिक वर्षापासून अमळनेरच्या हद्दीत शेतीमाल घेऊन येणाऱ्या बैलगाड्यांवर टोल आकारणी करायला सुरूवात केली होती. ही टोल आकारणी अत्यंत विषम आणि अन्यायकारक स्वरूपाची होती. कारण स्वयंचलित मोटारी आणि रबरी टायर असलेल्या बैलगाड्यांवर या टोल आकारणीतून सूट देण्यात आली होती आणि लाकडी चाके असलेल्या बैलगाड्यांवर मात्र हा टोल आकारला जात होता. असे असूनही अमळनेर म्युन्सिपालिटी तूट भरून काढण्याचे कारण देत बैलगाड्यांवर टोल आकारणी करत होती. पूर्व खानदेशातील शेतकरी त्यामुळे नाराज होते. मात्र त्यांची नाराजीची दखल गांभीर्याने घेतली जात नव्हती. 'काँग्रेस' वर्तमानपत्राच्या अगदी सुरूवातीच्या अंकापासून साने गुरूजींनी टोल टॅक्स आकारणीविरूध्द आवाज उठवायला सुरूवात केली. डिस्ट्रिक्ट ॲग्रीकल्चरल असोसिएशन ही या प्रश्नी सक्रिय झाली होती. ठिकठिकाणी शेतकरी परिषदा घेऊन शेतकऱ्यांना संघटित करण्याचे काम जोरात सुरू होते. त्यात साने गुरूजीही उत्साहाने सहभागी होते. त्यांच्याबरोबर त्यांचे अनेक विद्यार्थीही होते.

टोल टॅक्सला विरोध करण्यासाठी अमळनेर म्युन्सिपालिटीशी असहकार पुकारण्याचा निर्णय घेण्यात आला आणि १६ मे १९३८ रोजी अमळनेर शहरातील आठ नाक्यांपैकी तीन

नाक्यांबाहेर बैलगाड्या अडवण्यात आल्या. २००–३०० बैलगाड्या अमळनेर शहराच्या हद्दीबाहेर उभ्या राहिल्या. साने गुरूजी त्याविषयी लिहितात, म्युन्सिपालिटीचा हा टॅक्स अन्याय आहे. या टॅक्सविरूध्द चळवळ करणाऱ्यास कोणी प्रतिष्ठीत प्रश्न विचारतात, उद्या तुम्ही तहसील देऊ नका म्हणूनही सांगाल या शहाण्यांना आमचे सांगणे आहे की, आमच्याजवळ थोडा सारासार विवेक आहे. तहसिलाची फाजील वाढ झाली, तर तसे आम्ही सांगूही. सरदार वल्लभाई यांनी नाही का तसे केले ? बार्डोलीतील शेतकरी अन्याय कर वाढ झाली म्हणून झगडले, आम्हीही झगडू.[४४]

सोमवार हा अमळनेरच्या बाजाराचा दिवस असल्याने त्या दिवशी बैलगाड्या अडवण्याची नीती आंदोलकांनी अवलंबली होती. दि. २३ मे १९३८ च्या सोमवारी हे आंदोलन अधिक तीव्र करण्यात आले. अमळनेरच्या आठही नाक्यांवर आंदोलक उभे राहिले व बैलगाड्या अडवू लागले. तालुका काँग्रेसचे सेक्रेटरी मोतीलाल पाटील यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणावर आंदोलक जमले होते. बैलगाड्यांना अमळनेर शहरात आणू नका, अमळनेरवर बहिष्कार टाका, अशी विनंती ते शेतकऱ्यांना करत होते.[४५] टोल टॅक्स प्रकरणी महाराष्ट्र प्रांतिक सरकारच्या मंत्र्यांनाही आंदोलक भेटत होते. उत्तमराव पाटील यांनी या प्रकरणी केशवराव जेधे आणि स्थानिक स्वराज्य मंत्री लक्ष्मणराव पाटील यांची भेट घेतली होती. महाराष्ट्र प्रांतिकच्या बैठकीत आयत्या वेळचा ठराव म्हणून उत्तमराव यांनी तो मांडण्याचा प्रयत्न केला होता. मात्र वेळेअभावी तो घेतला गेला नाही.

गुरूजी लिहितात, अमळनेर म्युन्सिपालिटी शेवटी शेतकऱ्यांची मान कापायला उभी आहे. येथील टोल अन्याय्य आहे. त्याचे कोणत्याही रितीने समर्थन करता येणार नाही. असा हा अन्याय कर अमळनेर म्युन्सिपालिटीने आजच्या स्थितीत बसवावा, हे माणुसकीला सोडून आहे... अमळनेरचे वैभव वाढवणाऱ्या कष्टमूर्ती शेतकऱ्यांच्या बाबतीत ही कृतघ्नता आहे. ती उघड्या डोळ्याने मी कशी बघू?... अमळनेर म्युन्सिपालटिने हा कर बसवू नये, म्हणून येत्या आषाढी एकादशीपासून मी उपवास करण्याचे निश्चित केले आहे. मला माहित आहे, या गोष्टीची काही जण टर उडवतील, काही जण टिंगल करतील... परंतु मला त्यांच्याशी काही एक कर्तव्य नाही. मला जे शक्य आहे, ते मी केले पाहिजे. उपवास करणे एवढेच मला शक्य आहे. माझ्या मनाचे तेवढेच समाधान आहे. गांधी तत्वज्ञान मला कळत नाही. शास्त्र मला कळत नाही. आपल्या मनाचे शास्त्र एवढेच एक शास्त्र मजजवळ आहे...[४६]

---

४४. साने गुरूजी (संपा), काँग्रेस, अमळनेर, दि. २३.०५.१९३८, पृष्ठ क्र. ५,६.
४५. कित्ता, दि. ३०.०५.१९३८, पृष्ठ क्र. ६,७.
४६. कित्ता, दि. २०.०३.१९३८, पृष्ठ क्र. २.

साने गुरूजींच्या उपवासाच्या घोषणेचा विलक्षण परिणाम खानदेशातील जनतेवर झाला. ठिकठिकाणी साने गुरूजींना पाठींबा देण्यासाठी आणि टोल टॅक्सला विरोध करण्यासाठी सभा होऊ लागल्या. गुरूजींचा उपवास आषाढी एकादशीपासून म्हणजे दि. ८ जुलै १९३८ पासून सुरू होणार होता. अमळनेर म्युन्सिपालिटीने त्यापूर्वीच ४ जुलैला तातडीची बैठक बोलावून टोल टॅक्स निम्म्याने कमी केला.

साने गुरूजींचा शेतकऱ्यांच्या प्रश्नांशी असलेला संबंध केवळ टोल टॅक्स प्रकरणापुरताच मर्यादीत नव्हता. बाजारप्रधान अर्थव्यवस्थेमुळे विपन्नावस्थेकडे चाललेल्या शेती व्यवसायाबद्‌ललची साने गुरूजींची जाण सखोल होती. कपाशी फार पेरू नका... शेंगाही फार पेरू नका. शेंगा व कपाशी यावर सावकारी पाशही पटकन येऊन पडतो. शेतकऱ्याने धान्य भरपूर पेरावे. पूर्वी आपण कपाशी आणि शेंगांचा असा मनस्वी फेरा करत नव्हते. धान्य पेरल्याने काय होते ? खाण्यापुरते घरी ठेवावेच लागते. सावकार सर्वच्या सर्व धान्य उचलू शकत नाही. स्वतःच्या पोटाची व्यवस्था त्यामुळे राहते. कडबा हे कसदार अन्न बैलांना मिळते. असा सर्व बाजूंनी विचार करता धान्य पेरणेच उत्तम...[४७] हा गुरूजींनी शेतकऱ्यांना दिलेला सल्ला त्यांच्या प्रगल्भ जाणिवेचा निदर्शक आहे.

शेतसारा माफी विषयीची गुरूजींची अपेक्षा काही पूर्ण झाली नाही. तहसिलाचा तगादा सुरू झाला. तो न भरल्यास चौथाई दंडाच्या दवंड्या दिल्या गेल्या. पुढे कुळकायदा मंजुर करण्यालाही काँग्रेसने दिरंगाई केली. काँग्रेसला अधिक प्रागतिक, अधिक जहाल करण्यासाठी आणि शेतकरी–कामगारांना त्यांचे न्याय हक्क मिळवून देण्यासाठी धडपडत राहिले. अशाप्रकारे साने गुरूजी शेतकऱ्यांच्या हक्कासाठी झटले व यशस्वी झाले.

३.११.२ गिरणी कामगारांचे लढे

पूर्व पश्चिम खानदेशातील कामगारांना संघटित करण्याचे कार्यही साने गुरूजी या काळात करू लागले. धुळे, अमळनेर, जळगाव, चाळीसगाव येथील गिरणी कामगारांची या दरम्यान संयुक्त खानदेश मजूर फेडरेशन स्थापन झाली. कॉ. नथूभाऊ पारोळेकर हे या फेडरेशनचे अध्यक्ष होते. दि.४ व ५ ऑक्टोबर १९३६ रोजी धुळे येथे फेडरेशनचे पहिले अधिवेशन झाले. अधिवेशनात एकूण

४७. कित्ता, दि. ०३.०६.१९३८, पृष्ठ क्र. १७.

२३ ठराव मांडण्यात आले होते. साने गुरूजीनी मांडलेल्या या ठरावामागे भारतातील कामगारवर्गाच्या राजकारणाचा मोठा इतिहास होता.

दि.१० मार्च १९३८ पासून धुळ्याच्या प्रताप मिलमध्ये सुरू झालेला संप चिघळत चालला होता. साने गुरूजींनी या संपात आपली शक्ती कामगारांच्या बाजूने उभी केली. दि.२५ मार्च १९३८ रोजी धुळ्याच्या कामगार मैदानावर झालेल्या सभेत साने गुरूजींचे भाषण झाले. जरूर पडेल तेव्हा कामगारांनी संप करून आपले हक्क मिळवावेत, असे त्यांनी यावेळी सांगितले.[४८] दि.३० मार्चला काकासाहेब बर्वे, कॉ. नथूभाऊ पारोळेकर आदींनी मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांची भेट घेतली आणि त्यांच्या विनंतीनुसार संप मागे घेण्यात आला. वेतन चौकशी समितीचा अहवाल प्रसिध्द झाल्यानंतर मुंबई गिरणी मालक संघ व अहमदाबाद गिरणी मालक संघाने समितीच्या शिफारशीनुसार वेतनवाढीला मान्यता दिली होती. खानदेश बेरार ॲन्ड बऱ्हाणपूर मिलओनर्स असोसिएशन, चाळीसगाव ही खानदेशातील गिरणी मालकांची संघटना मात्र शिफारशी स्वीकारण्यास तयार नव्हती. खानदेशातील विशिष्ट परिस्थिती चौकशी समितीने ध्यानात घेतली नाही, असे या संघटनेचे म्हणणे होते. खानदेशातील गिरणी मालकांवर दबाव आणण्यासाठी आणि कामगारांना शांत ठेवण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस त्र्यं.र. देवगिरीकर यांनी या दरम्यान खानदेशाचा दौरा केला. धुळे, अमळनेर, जळगाव, चाळीसगाव येथे त्यांच्या जाहीर सभाही झाल्या.[४९]

इकडे कामगार संघटनाही संघर्ष तीव्र करण्याच्या पवित्र्यात होत्या. गिरणीमालकांनी पगारवाढ दिली नाही, तर खानदेशात सर्वात्रिक संप घडवून आणण्याची त्यांची तयारी चालू होती. स्थानिक स्तरावरील शासकीय संस्थांच्या माध्यमातून गिरणीमालकांवर दबाव आणण्याचेही त्यांचे प्रयत्न होते. ४ एप्रिलला कॉ. पारोळेकर यांच्या नेतृत्वाखाली कामगारांचा प्रचंड मोर्चा धुळे म्युन्सिपालिटीवर नेण्यात आला होता. म्युन्सिपालिटीचे उपाध्यक्ष श्री. सापे यांनी कामगारांना पाठींबा देण्याचे आश्वासन दिल्यावर मोर्चा शांततेने परतला.[५०] या पार्श्वभूमीवर साने गुरूजींनी 'काँग्रेस' हे वर्तमान पत्र सुरू केले.

काँग्रेस आणि कामगार दोघांच्याही समर्थनाची भूमिका साने गुरूजींनी घेतली असली तरी

४८. निळकंठ खाडीलकर (संपा), नवाकाळ, मुंबई, दि. ०३.०४.१९३८, पृष्ठ क्र. २.
४९. कित्ता.
५०. कित्ता, पृष्ठ क्र. ४.

काँग्रेसच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांना ती विशेष पसंत नव्हती. वेतन वाढीसाठीच्या वाटाघाटी सुरू असतानाच पूर्व खानदेश जिल्हा काँग्रेस कमिटीने कामगारांनी वेतनवाढीची वाट न पाहता पगार घेऊन टाकावा, असा ठराव परस्पर मंजूर करून टाकला. जिल्हा काँग्रेस कमिटीच्या या भूमिकेने साने गुरूजी प्रचंड नाराज झाले. ७ एप्रिल रोजी अमळनेर येथे झालेल्या कामगार सभेत त्यांनी ही नाराजी जाहीरपणे प्रकट केली. दुसऱ्याच दिवशी म्हणजे ८ एप्रिलला अमळनेर तालुका काँग्रेस अध्यक्ष बाबुराव पुसाळकर यांच्या घरी झालेल्या बैठकीतही गुरूजींनी पूर्व खानदेश जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शंकरभाऊ काबरे यांना २६ मार्चच्या बैठकीत काँग्रेस कमिटी व कामगारांनी एकत्र काम करण्याचा निर्णय घेतलेला असताना काँग्रेस कमिटीने परस्पर कामगारांनी एकत्र काम करण्याचा निर्णय घेतलेला असताना काँग्रेस कमिटीने परस्पर कामगारांनी पगार घ्यावा असा ठराव कसा केला? असा सवाल विचारला. दरम्यानच्या काळात खानदेशच्या गिरणी मालकांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांची भेट घेतली. शिष्टमंडळात प्रताप शेठ, नारायण व्यकंट यांच्या जोडीला पश्चिम खानदेशातील काँग्रेसचे आमदार हरिभाऊ पाटकरही होते. बैठकीला पार्लमेंटरी सेक्रेटरी गुलझारीलाल नंदाही उपस्थित होते. या बैठकीत १ फेब्रुवारीपासून पूर्वलक्षी परिणामाने कामगारांना पगारवाढ देण्यात यावी, असा निर्णय देण्यात आला.[५१] अशा प्रकारे खानदेशातील कामगारांचा वेतनवाढीचा प्रश्न तात्पुरता निकालात निझाला. मात्र साने गुरूजींविषयी काँग्रेसजनांची मने कलुषित होण्यालाही त्यातून सुरूवात झाली. पूर्व खानदेश जिल्हा लोकल बोर्डात काँग्रेसचे ४४ पैकी ३७ निवडून आले. असे असूनही काँग्रेस उमेदवारांच्या विजयातील साने गुरूजींचे योगदान जाहीरपणे नाकारण्यामागे साने गुरूजींचा कामगार-शेतकरी आणि कम्युनिस्टांबरोबर वाढत चाललेला संपर्कच कारणीभूत होता. काँग्रेस उमेदवारांच्या प्रचाराच्या जोडीने साने गुरूजींनी अमळनेर म्युन्सिपालटीच्या टोल टॅक्स विरोधातील आंदोलनाला पाठिंबा आणि सहभाग द्यायला सुरूवात केली होती.

याच दरम्यान साने गुरूजींनी हाती घेतलेले दुसरे प्रकरण हे कामगारांच्या संघटित अधिकारशी निगडीत होते. या लढ्याचा तात्कालिक स्थानिक संदर्भ हा धुळ्यातील न्यू प्रताप मिलमधील कामगार कपात, संप आणि टाळेबंदिचा होता तर व्यापक संदर्भ हा मुंबई प्रांतिक सरकारने आणलेल्या मालक-मजूर तंटा विधेयक (Industrial Disputes Act १९३८) हा

५१. कित्ता.

होता. न्यू प्रतापमिलमध्ये डब्लिगचे ६ साचे बंद केल्यामुळे ३९ स्त्रिया व १२ पुरूष कामगारांना कमी करण्यात आले होते. शिवाय कामगार संघटनांचे काम करणाऱ्या कामगारांची दडपणूक, जॉबरची मनमानी, बदली कामगार नेमतानाचा भ्रष्टाचार यांसारख्या अनेक मुद्द्यांवरून कामगार आणि व्यवस्थापन यांच्यात जुलै, ऑगस्ट १९३८ पासून धुसफूस चालू होती. साने गुरूजी त्याविषयी काँग्रेस मधून लिहीत तर कारखानदारांची निवेदने भारत मधून प्रकाशित होत. खानदेशातील १०००० गिरणी कामगार झगडण्यास सिध्द झाले. साने गुरूजींच्या प्रेरणेने पगारवाढ मिळाल्याशिवाय पगार घेण्याचे नाकारले... साने गुरूजी पुढारी म्हणून आदरास पात्र ठरले.[५२] खानदेशात एकीकडे ही परिस्थिती असताना मुंबई प्रांतिक सरकारने मालक–मजूर तंटा निवारण विधेयक विधानसभेत दाखल केले. या विधेयकामुळे संप करणे जवळपास अशक्य आणि बेकायदेशीर ठरत होते. कारण संप करण्यापूर्वी सुमारे दोन महिन्यांच्या कालावधीत तडजोडीचे औपचारिक प्रयत्न करणे बंधनकारक करण्यात आले होते. १९३८ मध्ये मंजूर करण्यात आले आणि इंडस्ट्रियल डिस्प्यूट्स ॲक्ट १९३८ मध्ये अस्तित्वात आला. या कायद्याच्या निमित्ताने काकासाहेब बर्वे आणि साने गुरूजी यांच्यात कामगार प्रश्नी जाहीर वाद झाला. वादाची सुरवात मात्र धुळ्याच्या न्यू प्रताप मिलमधील टाळेबंदीच्या निमित्ताने झाली. ६ सप्टेंबर १९३८ पासून न्यू प्रताप मिलमध्ये टाळेबंदी लागू झाली होती. सुमारे ३ हजार कामगार बेकार झाले होते. या सर्व प्रकरणात सुरवातीस काँग्रेसच्या मजूर समितीचे लोक कामगारांच्या पाठीशी होते. टाळेबंदीच्या निषेधार्थ एक सभा १४ सप्टेंबर १९३८ ला आयोजित करण्यात आली होती.

त्या विषयीच्या साने गुरूजीनी काढलेल्या पत्रकातून स्थानिक पातळीवरील टाळेबंदी आणि प्रांतिक स्तरावरील मालक–मंजूर तंटा विधेयक दोन्हीचे संदर्भ स्पष्टपणे दिसतात. या पत्रकाचे शीर्षकच अमळनेरकर होश्यार! बुधवार १४ सप्टेंबर १९३८ रोजी हरताळ पाळून मालकशाहीचा हल्ला परतवा. असे आहे. पत्रकाची सुरूवात धुळ्यातील टाळेबंदी करणाऱ्या मिल मालकांचा समाचार घेत होत असली, तरी शेवट मालक–मजूर तंटा बिलाच्या, समीक्षेने झाला आहे. साने गुरूजी लिहितात,... मालक लोकांनी काँग्रेस सरकारवर आपल्या साऱ्या वर्गाचे दडपण आणले आणि त्याजकडून असले बिल आणले आहे. ठिकठिकाणी कामगार चळवळीत कम्युनिझमचा बागुलबोवा उभा करण्यात आला आणि ही मॉस्कोची चळवळ आम्हाला नको,

---

५२. साने गुरूजी (संपा), काँग्रेस, पूर्वोक्त, दि. २५.०८.१९३८, पृष्ठ क्र. २.

मालक–मजुरांचे तंटे प्रेमाने सुटले पाहिजेत म्हणून हे बिल आणण्यात आले आहे असा कांगावा त्यांनी केला. या बिलाची पार्श्वभूमी म्हणून मुंबईला ब्रॅडबरी मिलमध्ये, चाळीसगाव व धुळे मिलमध्येही मालकांनी हल्ला सुरू केला आहे. मुद्दाम खुपसट काढून आपणच कामगारांच्या नावाने ओरड करायची व कामगार उगीचच संप करतात, असा कांगावा करून बिल पास करून घ्यायचे असा हा डाव आहे. मालकशाहीचा हा डाव हाणून पाडण्याकरता ठिकठिकाणचे कामगार प्रचंड चळवळ उभारत आहेत. खानदेशचे कामगार त्यात मागे पडणे शक्य नाही... पत्रकाखाली साने गुरूजींचा अध्यक्ष–गिरणी कामगार युनियन असा उल्लेख आहे.[५३] पत्रकातील आवाहानाला प्रतिसाद देत १४ सप्टेंबरला धुळ्यात हरताळ पाळण्यात आला. व्यापाऱ्यांनी दुकाने बंद ठेवली. पोलीस बंदोबस्तात कामगारांचा मोर्चा गिरणीच्या दारापर्यत गेला आणि ताबडतोब टाळे खोला अशी घोषणा देऊ लागला. कामगार संघटनांना दाद न देता प्रताप मिलच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सच्या मिटींगमध्ये कामगार शिस्तीने कामाच्या बाबतीत अधिकाऱ्यांचे योग्य हुकुम मानून व आज्ञाभंगाची, अडथळ्यांची व अत्याचाराची वृत्ती सोडून काम करण्यास तयार आहेत, अशी मिल अधिकाऱ्यांची खात्री होईपर्यंत मिल चालवणे इष्ट नाही, असा ठराव मंजूर करण्यात आला.

एका बाजूला वाटाघाटीचे प्रयत्न अयशस्वी होत असताना दुसऱ्या बाजूला मालक–मजूर तंटा निवारण बिलाचे राजकारण जोर धरत चालले होते.

एकीकडे मालक–मजूर तंटा निवारण विधेयकावरील विवादाचे लोण खानदेशात अशा प्रकारे पसरत चाललेले असतानाच प्रताप मिलमधील टाळेबंदीही कायम होती. महिना उलटून गेला, तरी टाळेबंदी हटण्याची चिन्हे दिसत नव्हती. कामगारांचे आंदोलन तीव्र करण्याच्या हेतूने १० ऑक्टोबरला धुळ्यात कामगारांची सभा आयोजित करण्यात आली. या सभेतील भाषणात साने गुरूजींनी अचानकपणे १३ ऑक्टोबरपर्यंत सर्वांना मान्य असणारा तोडगा न निघाल्यास तापी नदीत जलसमाधी घेण्याचा निर्णय घोषित करून टाकला. साने गुरूजींच्या घोषणेने तोडगा काढण्याच्या दृष्टीने चक्रे जोरात फिरू लागली. खानदेशातील विविध ठिकाणांहून शेतकरी, कामगार आणि विद्यार्थी धुळ्यात दाखल होऊ लागले. सेनापती बापट यांनी साने गुरूजींना तार करून त्यांचे अभिनंदन केले आणि गुरूजींबरोबर जलसमाधी घेण्यासाठी ते धुळ्यात दाखल झाले. मुख्यमंत्र्यांच्या विनंतीनुसार साने गुरूजींनी जलसमाधीचा बेत दि.१५ ऑक्टोबर १९३८ च्या

---

५३. डॉ. के.के. चौधरी, महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर जळगांव जिल्हा, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. १३९.

दुपारपर्यत स्थगित केला. परंतू उपवास चालू ठेवला. १४ ऑक्टोबरला रात्री काकासाहेब बर्वे व काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी साने गुरूजींची भेट घेऊन तडजोड झाल्यातच जमा आहे, तेव्हा जलसमाधीचा निर्णय रद्द करा अशी विनंती केली. १५ ऑक्टोबरला संध्याकाळी गिरणी मालकांनी टाळेबंदी मागे घेण्याचा निर्णय घोषित केला.[५४] अशाप्रकारे साने गुरूजींच्या जलसमाधीच्या घोषणेने टाळेबंदी त्वरीत उठली खरी, मात्र काँग्रेसबरोबरील त्यांचे मतभेद विकोपाला गेले.

मालक–मंजूर तंटा निवारण विधेयकातील सक्तीच्या लवादाला साने गुरूजींचा काही एकट्याचा विरोध नव्हता. गुरूजींप्रमाणेच कम्युनिस्ट, काँग्रेस सोशॅलिस्ट आणि डॉ. आंबेडकर यांचा स्वतंत्र मजूर पक्ष यांचाही या तरतुदीला विरोध होता. अमळनेरमध्ये साने गुरूजी मात्र संपाचे समर्थन करत राहिले. काँग्रेसमधील जहाल गटाने हा संप पुकारला आहे. खानदेशातील काँग्रेसवाद्यांनीही सोयिस्करपणे साने गुरूजी आता कम्युनिस्ट झाले आहेत, असा समज करून घेतला, काकासाहेब बर्वे यांच्या तात्विक आक्षेपांच्या पाठोपाठ पूर्व खानदेश जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस सीताराम बिर्ला यांनीही जाहीर पत्रातून साने गुरूजींच्या राजकीय भूमिकांचा बोचऱ्या शब्दांत परामर्श घेतला.

दरम्यानच्या काळात संयुक्त खानदेश कामगार परिषदेचे दुसरे अधिवेशन दि.२६ डिसेंबर १९३९ रोजी अमळनेर येथे स्वामी सहजानंद यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. साने गुरूजी या परिषदेचे स्वागताध्यक्ष होते. साने गुरूजींनी त्यांच्या भाषणात औद्योगिक कलह निवारणाच्या अहमदाबाद मजूर महाजन कामगार संघ पध्दतीची परखड समीक्षा केली आणि संघर्षाशिवाय श्रमिकांना त्यांचे न्याय्य हक्क मिळणार नाहीत, अशी स्पष्ट भूमिका घेतली. याच सुमारास शेतसारा माफीसाठी ठिकठिकाणी शेतकरी परिषदा होत होत्या. दि. २६ जानेवारी १९३९ रोजी जळगावच्या कलेक्टरच्या घरावर शेतकरी मोर्चा घेऊन जाण्याचा कार्यक्रम आखण्यात आला. या मोर्चाचे नेतृत्व साने गुरूजी करणार होते. दि.२३ जानेवारी १९३९ ला महात्मा गांधीकडून मोर्चा कलेक्टरच्या घरावर घेऊन जाऊ नये अशा अर्थाची तार आल्याने मोर्चाचा बेत रद्द करण्यात आला. या शेतकरी मोर्चाचा उल्लेख महात्मा गांधीनी हरिजन मधील एका लेखात केला आहे. काँग्रेसजनामधील वाढता भ्रष्टाचार, बेशिस्त, बेजबाबदार हिंसक भाषणे करण्याची प्रवृत्ती आणि नियमांबद्दलची बेपर्वाई ही काँग्रेसच्या अंतर्गत ऱ्हासाची कारणे असल्याचे सांगत या चारही

५४. राजा मंगळवेढेकर, साने गुरूजींची जीवनगाथा, पूर्वोक्त पृष्ठ क्र. २५२.

प्रवृत्तींना आळा घालणे, हे काँग्रेसपुढील सर्वात मोठे आव्हान असल्याचे त्यांनी या लेखात लिहिले आहे.[५५]

महात्मा गांधीच्या तारेमुळे मोर्चा रद्द झाला असला, तरी शेतकऱ्याची सभा मात्र पार पडली. जळगावच्या कॉटन मार्केटमध्ये भरलेल्या या सभेला सुमारे ५० हजार शेतकरी उपस्थित होते.[५६] अतिवृष्टीमुळे पिके बुडाल्याने शेत सारामाफी हा कळीचा मुद्दा होता. साने गुरूजींनी या मोर्चाच्या निमित्ताने "मंत्र्यांचे चरणी" हा अग्रलेख लिहिला. त्यात ते म्हणतात "या वर्षी खानदेशातील शेतकऱ्यास भरपूर सारासूट न मिळाली, तर ती दुःखाची बाब होईल. श्रध्दावान मनुष्याची श्रध्दा एकदा भंगली मग काय राहिले ? जनतेच्या मनात केवळ निराशा निर्माण होणे हे इष्ट नाही. खानदेशी शेतकऱ्याची श्रध्दा रहावी, त्याच्या जीवनात अंधारी अमावस्या येऊ नये, यासाठी सारासुटीची पौर्णिमा नसली, तरी निदान शुध्द अष्टमी तरी येवो, अशी प्रार्थना आहे... ज्या क्षणी केवळ निष्कारण आकडेबाजी दूर ठेवावी लागते, हिशोबी कृपणता दूर राखावी लागते, असा हा क्षण आहे. या क्षणाचे महत्व थोर मंत्री ओळखतील. या क्षणातील सारा अर्थ स्वच्छपणे वाचतील असा श्रध्दाशील मनाला विश्वास वाटत आहे."[५७]

अशाप्रकारे खानदेशरतील अमळनेर, धुळे, जळगाव व चाळीसगाव येथील गिरणी कामगारांच्या पगार वाढीविषयी व कामगारांच्या न्याय हक्कासाठी साने गुरूजीनी भांडवलशाही विरूध्द दिलेला हा पहिला लढा दि. ८ एप्रिल १९३८ ला यशस्वी झाला. त्या आधीच दोन दिवसांपूर्वी दि. ६ एप्रिल १९३८ ला साने गुरूजींच्या काँग्रेस सप्ताहिकाचा जन्म झाला होता. काँग्रेस पत्र दर सोमवारी अमळनेरहून प्रसिध्द होत असे. साने गुरूजी या काँग्रेस साप्ताहिकातून दारूबंदी, साक्षरता, अस्पृश्यता निवारण, सफाई, काँग्रेसचा संदेश, स्थानिक प्रश्न शेतकरी कामगारांच्या प्रश्नांविषयी लिहित असत.

दि. १० मार्च १९३९ रोजी काँग्रेसचे ५२ वे अधिवेशन सुभाषचंद्र बोस यांच्या अध्यक्षतेखाली मध्यप्रदेशातील जबळपूर जवळील त्रिपूरी येथे झाले. त्या अधिवेशनाला साने गुरूजी खानदेशातील आपल्या मित्रांसोबत गेले होते. त्यावेळी तेथे झेड्यांच्या पायथ्याशीच गुरूजीसह आम्ही झोपत असू अशी आठवण अमळनेरचे शंकरशेठ शिंपी यांनी सांगितली. साने

५५. महात्मा गांधी, हरिजन दि. २८.०३.१९३९, CWNG VOL ७४, पृष्ठ क्र. ४३७, ४३८.
५६. साने गुरूजी (संपा), काँग्रेस, पूर्वोक्त, दि. ३०.०१.१९३९, पृष्ठ क्र. ३.
५७. कित्ता.

गुरूजींचा ओढा या त्रिपुरी अधिवेशनात सुभाष चंद्र बोस यांच्याकडे दिसून येतो. गुरूजींची सुभाष बाबूंच्या प्रमाणेच गांधीजींच्याविषयी परम आदराची भावना होती. पण त्रिपूरी प्रकरणात त्यांचा ओढा सुभाष बाबूंकडे होता. त्रिपूरा अधिवेशनाहून परत त्यावर गुरूजी किसान संघटना, गिरणी कामगार संघटना, विद्यार्थी संघटना व काँग्रेस प्रचार कामाला लागले.

खानदेशातील कामगार चळवळीच्या निमित्ताने महाराष्ट्रातील अनेक कामगार नेते अमळनेरला येत असत त्यामुळे अशा या कामगार चळवळीच्या काळात अनेक काँग्रेस सोशोलिस्ट कार्यकर्ते कम्युनिटी पक्षाशी एकनिष्ठ बनत चालले होते. म्हणून खानदेशातील कामगार चळवळ हळूहळू कम्युनिस्टांच्या प्रभावाखाली जाऊन तेथे साम्यवादी कार्यकर्त्यांचे प्रस्थ विस्तारीत गेले.

साने गुरूजी काँग्रेस मंत्रिमंडळाची भीड न बाळगता शेतकरी व गिरणी कामगारांचे प्रश्न स्पष्टपणे मांडत. कम्युनिस्ट नेत्यांना ही गोष्ट आवडत असे म्हणून ते गुरूजींना शेतकऱ्यांचे मोर्चे काँग्रेस मंत्रिमंडळाच्या दाराशी न्यायाला घाट घालत. मात्र यामागील गुरूजींचा उद्देश काँग्रेस मंत्रिमंडळाने शेतकऱ्यांच्या दुःखाकडे पाहून त्यांचे प्रश्न सोडवावे हाच होता. मात्र त्यामुळे काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये गुरूजीविषयी चीड निर्माण झाली. याविषया आपटे गुरूजी आपल्या साने गुरूजी एक ओझरते दर्शन या ग्रंथात लिहितात, "या मोर्चाच्या चळवळीमुळे काँग्रेसचे ठिकठिकाणचे पदाधिकारी सान्यांवर उलट रूष्ट झाले. त्यांना साने हे कळकळीचे, सरळ मुद्द्याचे पण उपद्रवी देशभक्त वाटू लागले. ज्यांनी हातात हात घालून परकीय सत्तेशी लढायचे त्याच देशभक्तांची मते आज ऐकमेकांविषयी क्लुपित झाली होती व ते एकमेकापासून दूर होत गेले. ते इतके की अजूनही पदाधिकाऱ्यांना साने आपलेसे वाटत नाही."[५८]

३.१२ स्वकीयांवर केलेली टिकास्त्र

साने गुरूजींच्या शेतकरी गिरणी कामगारांतील कार्यामुळे आणि भाषण–लेखनामुळे त्यांच्या काँग्रेस पत्रावरही काही काँग्रेसवाल्यांचा रोष ओढावला. काही काँग्रेस नेते तर काँग्रेस पत्र हे कम्युनिस्ट आहे असेही म्हणू लागले. याला साने गुरूजीनी दि. ४ जुलै १९३८ च्या काँग्रेस अंकात पुढील उत्तर दिले. माझ्याकडे सावकारांचा छळ दिसून येतो त्यातील शतांश मी देतो. सारे प्रसिध्द करीन तर मग काय म्हणाल ? आणि कोणा सावकाराने त्याच्यावर शेतकऱ्यांनी केलेला अन्याय

५८. आपटे गुरूजी, साने गुरूजी (एक ओझरते दर्शन), पूर्वोक्त, पृष्ठ क्र. ३३.

लिहून पाठवला तर तोही छापीन. काँग्रेस पत्र शेतकऱ्यांची दुःखे अधिक देते. कारण तोच वर्ग मोठा आहे. परंतू काँग्रेस पत्रात दुसरे तुम्हाला नाही का काही दिसले? साक्षरता–प्रसारावर मी लिहिलेले आहे. खादीवर लिहिले आहे. हरीजनांबद्दल प्रत्येक अंकात काही ना काही आले आहे.

अशाप्रकारे साने गुरूजी काँग्रेसमध्ये राहून सुध्दा काँग्रेसला जाब विचारायला घाबरले नाही. श्रमिक, दीन, दलितांवर होणाऱ्या अत्याचारावर स्वकियांवर टिका करायला गुरूजी मागे पुढे पाहत नव्हते मात्र काँग्रेसच्या आल्यापेक्षा काँग्रेस पक्ष प्रतिष्ठा श्रेष्ठ मानणाऱ्या नेत्यांना साने गुरूजींची मानवतावादी विशाल भूमिका व परखड लिखाण फारशी मानवले नाही.

अशाप्रकारे साने गुरूजी कम्युनिष्टांच्या जाळ्यात अडकले असे वाटत असताना जानेवारी १९४१ मध्ये साने गुरूजीनी युध्दाविरोधी भाषण केल्यामुळे त्यांना धुळ्याच्या तुरूंगात दोन वर्षाची सक्षम कारावासाची शिक्षा फर्मावली. तेथे तुरूंगात साने गुरूजीं बरोबर एस.एम.जोशी, युसुफ मेअर अल्ली, बंडू मोरे, माधम लिमये त्याचबरोबर अनेक कम्युनिस्ट व समाजवादी राजबंदी होते. पुढे मधु लिमयेच्या संपर्कात आल्यानंतर गुरूजींना समाजवाद, स्वातंत्र्य, समता आणि काँग्रेस समाजवादी पक्षाचे धोरण व कार्याबद्दल जवळून चांगलीच ओळख झाली. मधु लिमये याविषयी आठवणी सांगतात. "साने गुरूजी आता आपल्या बरोबर काम करणार आहेत."[५९] यावर नानासाहेबांचा तर विश्वास बसेना. कारण गुरूजी कम्युनिष्टांच्या पत्रके तावडीत सापडले आहेत अशी त्यांची खात्री होती पण मधूच्या अविश्वास कसा दाखवायचा हा त्यांना प्रश्न पडला. ते म्हणाले साने गुरूजींच्या विचारात तुझ्या सहवासाने जर खरोखरच परिवर्तन झाले असेल, तर तू हे फार मोठे कार्य केले आहेस कारण गुरूजी ही प्रचंड शक्ती आहे.[६०] गुरूजींची देशभक्ती ज्वलंत होती. गरीबांविषयी त्यांना अतीव कळवळा होता. देश स्वतंत्र व्हावा यांची त्यांना एकच तहान लागली होती. आपले जीवन मोठ्या ध्येयासाठी कामी यावे, ते कुतार्थ व्हावे असे त्यांना सारखे वाटे पण ते भाग्य आपल्या नशिबी नाही, म्हणून ते हळहळत त्यांच्यात पृथ्वीमोलाचे गुण होते. जनतेला हलविण्याचे असामान्य सामर्थ्य होते. त्या क्षणापासून साने गुरूजी व मधू लिमये यांची जी प्रेममय मैत्री व जिव्हाळा, अतुट नाते व स्नेह जमला तो कायमचाच त्यात कधीही अंतर पडले नाही.

---

५९. राजा मंगळवेढेकर, साने गुरूजींची जीवनगाथा, पूर्वोक्त पृष्ठ क्र. ८८.

६०. कित्ता, पृष्ठ क्र. २८९.

३.१३ छोडो भारत : ऑगस्ट क्रांती लढ्यात सहभाग (इ.स. १९४२)

युरोपमध्ये दुसरे महायुध्द सुरू झाले. त्यावेळी काँग्रेसच्या मंत्रीमंडळ व काँग्रेस नेत्यांना विचारताच हिंदुस्थानाला ब्रिटिश सरकारने युध्दात गोवून टाकले व या युध्दात हिंदूस्थानचे सहकार्य आहे असे जाहीर केले. अशा एकतर्फी घोषणेमुळे हिंदुस्थानात असंतोष निर्माण झाला. त्यामुळे काँग्रेसने सभात्याग करून मंत्री मंडळाचा राजीनामा दिला. म. गांधीजीनी युध्दास असहकार जाहीर करून वैयक्तिक सत्याग्रह सुरू केला.

मं. गांधीजीनी भारताचे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी लढा देण्याला हीच वेळ आहे, अशा आशयाचे लिखाण, हरिजन साप्ताहिकातून सुरू केले. त्यामुळे देशभर चैतन्याचे वारे वाहायला सुरूवात झाली.

काँग्रेस कार्यकारणीची दि. ६ जुलै १९४२ ते १४ जुलै १९४२ वर्धा येथे बैठक झाली व बऱ्याच चर्चेनंतर या बैठकीत म. गांधीजीच्या सल्ल्याने इंग्रज सरकारने हिंदुस्थानातील राज्य सोडून जावे, असा ठराव केला. अंतिम निर्णय दि. ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईत गवालिया टँक मैदानावर भरलेल्या काँग्रेसच्या सभेत ठराव मांडून पास झाला. म. गांधीजीच्याकडे लढ्याचे नेतृत्व सुपूर्त करण्यात आले. त्यावेळी म. गांधीजीनी आपल्या भाषणात म्हटले. मी एक मंत्र देऊन ठेवतो, 'करेंगे या मरेंगे' आपण हिंदुस्थान स्वतंत्र तरी करू किंवा या प्रयत्नात मरण तरी पत्करू,... म्हणून मी आणि कॉग्रेसने प्रतिज्ञा केली आहे की, आम्ही करू किंवा मरू.[६१]

दि. ९ ऑगस्ट १९४२ ला ब्रिटिश सरकारने म. गांधीजीच्यासह प्रमुख नेत्यांना अटक करून अज्ञातस्थळी नेऊन बंदी केले. मैदान पोलीसांनी वेढून झेंडावंदनासाठी जमलेल्या लोकांवर अश्रूधूर सोडला व लाठीहल्ला केला. झेंडावंदनासाठी आलेल्या अरूणा असफअली व इतर नेते कार्यकर्ते भूमिगत झाले. मुंबईत क्रांतीयुध्दाची ठिणगी पडली व बघता बघता देशभर वणवा पसरला. मुंबई, पुणे, नागपूर आदी शहरातून लोक रस्त्यावर येऊन पोस्ट ऑफीस लुटली, जाळली, विजेच्या, टेलिफोन्सच्या, तारायंत्राच्या तारा तोडल्या रेल्वेचे रूळ उखडले. गाड्या पाडण्यात आल्या. लष्करी व पोलीसी वाहतुक बंद पडली. स्टेशनांना आगी लागल्या. गिरणी कारखाने बंद पडली. धरपकड,लाठीहल्ला, गोळ्याचा वर्षाव, अनेक ठिकाणी लोकांनी दगड, गोठ्यांचा मारा

६१. डॉ. के.के. चौधरी, क्रांतीपर्व महाराष्ट्राचे योगदान, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. १४८.

करून पोलीस ठाण्यांवर हल्ला चढविला, प्रतिकार केला खेड्यापाड्यातून शेतकरी उठले. लढ्यात सामील झाले. संतप्त लोक ब्रिटिश सत्तेला क्रोधाने सांगू लागले चले जाव. चले जाव। छोडो भारत ।

ऑगस्ट क्रांतीत सारा देश पेटला. या क्रांतीचे मुख्य आधार, शेतकरी व कामकरी तरूण–स्त्री–पुरूष पुढे सरसावले. प्राणाची बाजी लावून ब्रिटिशांशी लढले. सारेजण करेंगे या मरेंगे! या मंत्राने भारून गेले.

१३.१ साने गुरूजींचे भुमीगत कार्य :

दि.९ ऑगस्ट १९४२ च्या मध्यरात्रीच्या सुमारास साने गुरूजीची धुळे कारागृहातून सुटका झाली तेथून ते गुप्तपणे अमळनेरला येऊन पोहचले. दि. ९ ऑगस्ट १९४२च्या रात्री धुळे कारागृहातून मुक्त झाल्यावर कारागृह अधिकाऱ्यांच्या मदतीने अमळनेरला गुप्तपणे आले व तेथेच भुमिगत झाले. त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने खानदेशाच्या बाहेर त्यांना हलवणे त्यांना आवश्यक असल्याने सौ. लीलाने त्यांना एरंडोल येथून माहिजीच्या स्टेशनवर पोहोचविले. त्यांना गाडीत बसवूनच ती परतली. आमची सर्व जमवाजमव, पत्रके, प्रचार चालूच होता. काय आणि कसे पाऊल टाकावे या विंवचनेत असतानांच गुरूजींचा संदेश आला. सारा देश पेटला आणि उत्तम, माझे अमळनेर शांत कसे? ते तू पेटवले नाहीस तर मी माझी होळी सुभाष चौकात करून घेईन.[६२] तेथे त्यांनी तरूण कार्यकर्त्यांबरोबर चर्चा केली. गुरूजी भुमीगत होताच तरूण कार्यकर्त्यांनी गुप्त सभा घेतली. छोडो भारत क्रांतीमध्ये नेत्रदिपक काम करण्याचा निर्णय घेतला. कार्यकर्ते छोडो भारतचा नारा लावून सर्व परिसर फिरू लागले.

साने गुरूजी अमळनेरला दोन तीन दिवस गुप्तपणे राहिले. कार्यकर्त्यांशी चर्चा करून अमळनेरमध्ये काहीतरी करावे असे प्रयत्न सुरू केले. महाराष्ट्रात ठिकठिकाणी उठाव झाल्याच्या बातम्या सतत कानावर येत होत्या. मात्र अजूनही अमळनेर शांत का? या विचाराने गुरूजी अस्वस्थ झाले. अशाच अवस्थेत गुप्तपणे पुण्याला गेले. मात्र पुण्याला जाताना आपले सहकारी डॉ. उत्तम पाटील यांना एक गुप्त चिठ्ठी पाठविली. गुरूजीनी डॉ. उत्तम पाटलांना पाठविलेल्या चिठ्ठीची वार्ता अमळनेर शहरात वाऱ्यासारखी पसरली. १४ ऑगस्ट रात्री अमळनेर शहरातील वातावरण तंग होऊ लागले. बाहेर पुऱ्या भागात, प्रक्षुब्ध लोकांचा जमाव जमला होता. त्या जमावामुळे गुरूजींची

६२. विनोद वाघ (संपा), राष्ट्रसेवादल पत्रिका, (स्वातंत्र्य लढ्यातील खानदेशचा मोठा वाटा), ऑगस्ट २०१७, पुणे, पृष्ठ क्र. ११.

चिठ्ठी वाचून दाखविण्यात आली. त्या चिठ्ठीत गुरूजीनी उठावाचे आवाहन केले होते. त्यात म्हटले होते. स्वातंत्र्याचा हा आपला तिरंगी झेंडा, घ्या शपथ, अमळनेर तालुक्याची इंग्रज सत्ता उखडायची. सारा देश पेटला. गुरूजींचे अमळनेर थंड का? काय वाटेल त्यांना? गुरूजींची ही कर्मभूमी, धर्मभूमी, यज्ञभूमी. मारू किंवा मरू–देश आजाद कर हे आपले ब्रीद ना? बघा गुरूजी काय म्हणतात? साने गुरूजींची चिठ्ठी तिने वाचली आणि लोकांना उधाण आले.[६३] गुरूजींच्या ह्या निर्वाणीच्या इशाऱ्याने अमळनेरची जनता भडकून उठली. समोर मामलेदार टांग्यात होते. लोक धावले, मामलेदार पळाले. टांग्याची बोहणीची होळी साजरी केली. मोर्चा नजीकच्या पोष्टाकडे वळला. पोष्टाची दुसरी होळी पेटली. तिजोरी घण हातोड्यांनी फुटेना म्हणून नजिकच्या विहिरीत फेकून मोर्चा कोर्टाकडे वळला. कोर्टाची अक्षरशः तीन चिमट्या राख झाली. असे संबंध महाराष्ट्रात कुठेच घडले नाही. (संबंध हिंदुस्थानात अमळनेरलाच जास्त असा दीड लाख रूपयांचा दंड बसला. आताच्या हिशोबाप्रमाणे काही कोटीचा.)[६४]

संतप्त मोर्चा मामलेदार कचेरी जाळण्यासाठी तिकडे वळला. पोलीसांनी प्रसंग ओळखून अमळनेर परिसरातील रस्त्यावरील दिवे फोडून तेथे अंधार केला आणि घोषणा देत चालून येणाऱ्या प्रक्षुब्ध जमावावर पोलीसांनी बेछुटपणे गोळीबाराला सुरूवात केली. अशावेळी सर्वत्र गोंधळ व हाहाकार माजला. या गोळीबारात काही हुतात्मे झाले. काही जखमी झाले. गुरूजींनी दिलेल्या निर्वाणीच्या इशाऱ्याने अमळनेर गाव क्रांतीलढ्याच्या ध्येयवादाने पेटले आणि संबंध खानदेश क्रांतीच्या लाटेने पार उसळून उठला.

साने गुरूजींनी भूमिगत असताना पुणे, मुंबई, खानदेश, सातारा येथे सभा आणि बैठका घेतल्या. श्रीमती सुलभा जोशी (चितळे) गुरूजींविषयी आठवणीने सांगतात... १९४२ च्या भारत छोडो चळवळीत गुरूजींनी भार घेतला. त्यांच्या हाकेला साद देऊन शिवाजीराव पाटील (कै. स्मिता पाटील यांचे वडील), डॉ. उत्तमराव पाटील यांनी शाळा सोडली.[६५] या भुमिगत कालखंडात गुरूजींचे समाजवाद्यांशी जवळचे संबंध निर्माण झाले. याच काळात गुरूजीनी क्रांतीच्या मार्गावर हे पुस्तक लिहिले. यात साने गुरूजी असहकाराचे अकरा मार्ग सांगितले.

१. ब्रिटिश सरकार बेकायदेशीर आहे याला कर देऊ नका.

---

६३. कित्ता, पृष्ठ क्र. १२.

६४. कित्ता.

६५. केदार .मोरेश्वर ब्रम्हो (संपा), स्मरणिका, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. ६९

२. धान्य गावाबाहेर जाऊ देऊ नका.

३. कुळाने मालकास जगण्यापुरता खंड द्यावा. मालक लढ्याला प्रतिकूल असल्यास गट करावेत.

४. नोटा देऊ नये.

५. गावोगावी गावसेना उभारावी. नव्या स्वतंत्र हिंदी राज्यांशी निष्ठा राखणाऱ्यांचे गट करावेत.

६. कोर्ट कचेऱ्यांना संबंध सोडावा. सरकारी अधिकाऱ्याशी संबंध नको.

७. पाटलांना राजीनामे देण्यास सांगावे. स्वतंत्र स्टेटचे व्हा असे सांगावे. तलाठ्यांना दप्तरे फेकावयास लावावे. दप्तरे जाळण्याचा प्रचार करावा.

८. सरकारी भरणे चालले तर ते लुटावे. धान्य बाहेर चालले तर तेही लुटावे.

९. लढ्याच्या गाण्याचा प्रचार करावा. लढ्यातील बलीदानांच्या व सरकारी जुलमाच्या सत्यकथा रंगवून सांगाव्यात.

१०. रेल्वे उखडणे, तारा तोडणे, पोस्टर जाळणे यातील अर्थ समजून घ्या.

११. रेल्वेच्या ज्या डब्यातून मिलिटरी जाते. त्यातून बुलेटिन फेकणे.[६६]

पुण्यात गुरूजी भूमिगत कार्यकर्त्यांशी संधान बांधून होते. एस.एम. जोशी, अच्युतराव पटवर्धन, शिरूभाऊ लिमये इत्यादी पुण्यातील समाजवादी भूमिगत क्रांतिकाराकांबरोबर विचारविनिमय केला. गुरूजी काही दिवस पुण्यात राहिले. तरीही खानदेशातील चळवळीशी त्यांनी संपर्क राखला होता. अमळनेर जळिताच्या प्रकरणात डॉ. उत्तम पाटील यांची पत्नी लीला पाटील या पकडल्या गेल्या आणि उत्तम पाटील फरार झाले. त्यांचा बरेच दिवस पत्ता नव्हता. अनेक क्रांतिकारकांवर सरकारने नंतर खटले भरले व सश्रम कारावासाच्या शिक्षा ठोठावल्या

अमळनेरजवळील मारवाड येथे गुरूजींचे जाणे–येणे होतेच. भूमिगत असताना एकदा गुरूजी आणि मधु लिमये हे दोघे अमळनेरहून टांग्याने मारवडला गेले होते. तेथे शंकर त्रिलोकचंद बिर्ला हे कार्यकर्ते गुरूजींशी चांगले परिचित होते. तेथे त्यांनी गुप्तपणे सभा घेतली व ऑगस्ट क्रांतीचे लोण पसरविले.

अमळनेरप्रमाणे एरंडोल तालुक्यातील आडगाव मोठा जमाव जंगल सत्याग्रह करण्यासाठी एकत्र आला. पोलिसांनी लाठीमार करून जमावाची कशीबशी पांगापांग केली. दुसऱ्या दिवशी मोठ्या अधिक संख्येने लोक एकत्र आले. भगवान भुसारी हा स्थानिक कार्यकर्ता, त्यांचा नेता होता.

---

६६. साने गुरूजी, क्रांतीच्या मार्गावर व इतर, वरदा प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती जाने. २०११, पृष्ठ क्र. ६९.

त्याच्या निग्रहामुळे जमाव काही मागे हटेना व तो अधिकच आक्रमक सुरूवात केली. त्या गोळीबारात भगवान भुसारी व त्याचे दोन साथीदार मारले गेले व हुतात्मे बनले!

९ ऑगस्ट नंतर स्वातंत्र्यलढ्याला उधाण आले. महात्मा गांधी व इतर राष्ट्रीय पुढाऱ्यांची अटक होताच सर्व देशरभर संतापाची लाट उसळली. सारा देश क्रांतीच्या घोषणेने पार ढवळून निघाला. अशा अवस्थेत बऱ्याच गांधीवाद्यांनी शुध्द अहिंसेचा त्याग करून घातपाताला सुरूवात केली. अशावेळी 'हरिजन' या वृत्तपत्रात किशोरीलाल मश्रुवाला यांनी क्रांतिकारकांना गांधीजींच्या तत्वज्ञानाला अनुसरून मार्गदर्शन करण्याच्या दृष्टीने लेखमाला सुरू केली. त्यावेळी त्यांनी आपल्या लेखात म्हटले की, क्रांतिकारांनी प्राणहत्या न करता व शारीरिक इजा न पोचविता, सरकारी यंत्रणा खिळखिळी करून टाकावी. असा सर्वांनी आदेश दिला. तरीही तो आदेश पूर्णपणे पाळला गेला नाही. अशा या संग्रामात देशभक्तीचे एक आगळे वेगळे दर्शन झाले व क्रांतियुध्दाला उधाण आले.

३.१३.२ गुरूजींचे भूमिगत कार्य आणि मधु लिमये:

दि.८ ऑगस्ट १९४२ रोजी स्वातंत्र्याचा लढा सुरू झाला आणि धरपकडीला सुरूवात झाली. काँग्रेसचे बहुतेक कार्यकर्ते भूमिगत होऊन स्वातंत्र्याचा लढा तीव्र करू लागले त्यावेळी साने गुरूजीही भूमिगत झाले. सेवा दलाचे तीन संस्थापक एस.एम.जोशी, नानासाहेब गोरे व शिरूभाऊ लिमये... स्वातंत्र्याच्या वाटाघाटी सुरू झाल्या होत्या... सेवादलातील सैनिकांनी महाराष्ट्रभर विध्वंस पथकांमध्ये काम करण्यासोबतच सायक्लो स्टाईल पत्रकेही वाटली.[६७].... साने गुरूजी त्यावेळी मुंबई राहत होते. तेही भूमिगत झाले. त्यांना मदतीसाठी सेवा दलाचे सैनिक होते.... राष्ट्रसेवा दल हा माझा प्राण आहे असे साने गुरूजी म्हणत.[६८].... दरम्यानच्या काळात साने गुरूजीनी क्रांती सैनिकांना आवाहन असे एक चोपड (पत्रक) प्रसिध्द केले. ते सायक्लो स्टाईल केलेले होते. ते माझ्याकडे ही आले होते. ते सर्वत्र कसे पसरेल हे आम्ही पाहत होतो.[६९] अशावेळी खानदेशात त्यांच्याबरोबर मधु लिमये होते. त्या भूमिगत लढ्याची हकीकत मधु लिमये यांनी आपल्या आत्मकथा या आत्मचरित्रात दिली आहे.

६७. विनोद वाघ (संपा), राष्ट्र सेवा दल पत्रिका (सेवा दलाचे चलेजाव चळवळीतील स्फूर्तिदायक कार्य – भाई वैद्य), पूर्वोक्त, पृष्ठ क्र. ६.
६८. कित्ता, पृष्ठ क्र. ७.
६९. कित्ता, पृष्ठ क्र. ८.

त्यातील काही महत्वाचा भाग असा –

मुंबईच्या एका ट्रिपमध्ये दौराआखणीबाबतचे गुरूजींना दिलेले आश्वासन पुरे करणे हे माझ्यापुढील पहिले काम होते. कार्यकर्त्यांसमोर गुरूजींच्या दौऱ्याची कल्पना मी मांडली. पण काही लोकांचा त्याला विरोध होता. त्यांचे म्हणणे असे होते की, साने गुरूजींना खानदेशातील सर्व लोक ओळखतात. बायकामुलांच्या तोंडी त्यांचे नाव आहे. अशा स्थितीत त्यांना लपून छपून दौरा करणे शक्य होणार नाही. जनसंपर्कासाठी हा दौरा करावयाचा म्हणता, तेव्हा साहजिकच त्यांच्या गुप्त सभांना लोक मोठ्या संख्येने येणार, मग ही गोष्ट गुप्त कशी राहणार? तेव्हा गुरूजी पकडले जाण्याचा फार मोठा धोका आहे. तो आपण पत्करू नये असे त्यांचे म्हणणे होते. या मंडळीचा आक्षेप संयुक्तिक होता. पण गुरूजींच्या दौऱ्यामुळे सरकारी अत्याचारापुढे दबून गेलेल्या लोकांना परत स्फुरण चढेल, या विचाराने या भीतीवर मात केली व त्यांच्या दौऱ्याची योजना शेवटी आखण्यात आली.

गुरूजी ज्या ठिकाणी जातील तेथे त्यांचे निवासस्थान गुप्त ठेवायचे, कुठल्यातरी मोठ्या वाड्यात किंवा जिनिंग अथवा ऑईल मिलमध्ये त्यांची सभा ठेवायची. ऐनवेळी तोंडी आमंत्रणे द्यायची. एकदा सभा सुरू झाल्यावर दरवाजे बंद करून टाकायचे, कोणालाच बाहेर पडू द्यायचे नाही. गुरूजी गेल्यानंतर दहा मिनिटांनी लोकांना बाहेर पडू द्यायचे, इत्यादी सर्व प्रकारची काळजी आम्ही घेतली. या दौऱ्यात मी सुरूवातीपासून अखेरपर्यंत गुरूजींच्याबरोबर होतो. आणि आश्चर्य असे की, एखाद्या घडाळ्याच्या काट्याप्रमाणे सर्व दौरा पूर्वयोजनेनुसार अगदी वेळेवर पार पडला. भूमिगत चळवळीला असलेल्या व्यापक जनसमर्थनाचे हे द्योतक होते. मोठ्या संख्येने लोक गुरूजींच्या सभेला हजर राहू शकले, त्यांचा संदेश स्वतःच्या कानांनी ऐकू शकले आणि पोलिसांनी जंगजंग पछाडले तरी या दौऱ्यात आम्हाला पकडणे शक्य झाले नाही. थोडक्यात, आम्ही भूमिगत होतो, सरकारच्या दृष्टीने, जनतेच्या दृष्टीने नव्हे.

गुरूजींच्या दौऱ्यात एरंडोल, अमळनेर, अमळगाव, मारवड, चोपडे इत्यादी अनेक ठिकाणी आम्ही गेलो. एरंडोलला काब्राजींच्या घरी मोठी सभा झाली. काब्राजी हे एरंडोलचे निष्ठावान गांधीवादी कार्यकर्ते होते. गुरूजींचे संबंध पूर्वी फार चांगले होते, पण गुरूजींनी कम्युनिष्टांबरोबर किसान कामगारांत कार्य करायला सुरूवात केल्यामुळे ते गुरूजींचे विरोधी बनले होते. काब्राजींच्या

घरात सभेला खच्चून गर्दी झाली होती. उभे राहायलाही जागा नव्हती. गुरूजींचे अतिस्फूर्तिदायक भाषण झाले. काब्राजींच्या स्मृतीला वंदन करून त्यांनी आपल्या भाषणात सुरूवात केली होती.[७०]

३.१३.३ हुतात्मा शिरीषकुमारः खानदेश सुपुत्र

दि.९ सप्टेंबर १९४२ दिवस उजाडला. ऑगस्ट क्रांतीच्या घोषणेला एक महिना होऊन गेला. नंदुरबार येथील मुलांनी काढलेल्या मिरवणुकीवर पोलिसांनी गोळीबार केला. या काळाबारात शिरीषकुमार मेहता, धनसुखलाल, धनश्यामदास वाणी, लालदास आणि शशिधर केतकर ही अवघी १६–१७ वर्षाची मुले हुतात्मा झाली. या दिवशी ही मिरवणुक शिरीषकुमारच्या नेतृत्वाखाली निघाली होती. माणिक चौकात झेंडावंदन झाले व ही मिरवणूक विसर्जित होणार होती. तेवढ्यात विद्यार्थी आणि पोलीस यामध्ये काही बाचाबाची झाली. पोलिसांनी आपल्या बंदुका विद्यार्थ्यांवर रोखल्या . त्यात पाच हुतात्मे झाले. सर्वत्र एकच हळहळ व्यक्त होऊ लागली आणि जनमानसात संतापाची लाट उसळली. अत्यंत व्यथित अंतःकरणाने या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी साने गुरूजी आणि अच्युतराव पटवर्धन वेषांतर करून नंदुरबारपासून तीन मैलांवरील नळवे गावी आले. त्यांनी नंदुरबारमधील सामाजिक कार्यकर्ते श्री. द.रा. उपासनी यांना नळवे गावी बोलावून घेतले व त्यांच्याकडून या गोळीबाराच्या प्रकरणाची संपूर्ण माहिती गुरूजींनी मिळविली. त्यानंतर गुरूजी गुप्तपणे मुंबईकडे रवाना झाले.

महाराष्ट्रभर या बलिदानाचे कौतुक झाले. साने गुरूजींच्या प्रतिभेने व साहित्यिक मनाने उचल घेऊन आवाहनात्मक क्रांतीच्या मार्गावर हे पुस्तिका प्रसिध्द झाली. या लिखाणाने अनेक कार्यकर्त्यांना प्रोत्साहित केले.

३.१३.४ मुंबईतील भूमिगत केंद्रे

धरपकड जोरात सुरू होती. मुंबईतील पोलिसांच्या ससेमिरा चुकविण्यासाठी काही वेळा कार्यकर्त्यांना वरचेवर जागा बदलाव्या लागत. मुंबई सेंट्रलजवळच्या एका सदनिकेत भूमिगत चळवळीचे केंद्र होते. बॉम्बे सेंट्रलजवळील या सदनिकेला मुषकमहाल या टोपणनावाने संबोधले जात असे. ताडदेवला (मुंबई) नगरचे गुणे यांनी भूमिगतांना जागा दिली होती. त्याचे नाव या भूमिगत

७०. मधू लिमये, आत्मकथा, अक्षर प्रकाशन, पुणे, आवृत्ती १९९५, पृष्ठ क्र. २११, २१२.

पुढाऱ्यांनी मुषकमहल असे नाव ठेवले होते.[७१] गुरूजी मुंबईला खेतवाडीत राहत असत. त्यांच्या वास्तव्यामुळे त्या जागेचे नाव संतवाडी पडले होते. मुंबईतील आणखी एक भूमिगतांचे केंद्र हडळ हाऊस होते. या हडळ हाऊसमध्ये एस.एम. जोशी इमामसाहेब बनून तेथे राहत असत. ही सदनिका नळबाजारात होती. अशा तऱ्हेने ही नेते मंडळी वेषभूषा करून नावे बदलून आणि सदनिकेला टोपणनाव देऊन भूमिगत चळवळीचे कार्य नेटाने यशस्वीरीत्या पुढे नेत होते.

गुरूजी काही वेळा लॅमिंग्टन रोडवरील प्रतापगड वर रहात असत. मधु लिमये नावाचा सेवा दलाचा एक कार्यकर्ता यावेळी गुरूजीबरोबर होता. भूमिगत असलेल्या कार्यकर्त्यांच्या घरच्या अडीअडचणीसाठी गुरूजी पुस्तके लिहून त्या लिखाणातून मिळालेल्या पैशातून कार्यकर्त्यांच्या प्रापंचिक व इतर अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करीत असत. गोड गोष्टीचे ६ ते १० भाग गुरूजींनी प्रतापगडावरच लिहिले होते. ते सर्व भाग व एक चिठ्ठी गुरूजींनी मधूकडे दिली. मधूने ती चिठ्ठी व वह्या प्रकाशक ढवळे यांना नेऊन दिल्या. ढवळे यांनी चिठ्ठी वाचून रूपये ५००/– काढून मधूजवळ दिले. मधूने ते पैसे गुरूजींना आणून दिले. त्यावेळी खानदेशचे एक कार्यकर्ते तेथे आले होते. गुरूजींनी ते पैसे लगेच खानदेशामधल्या क्रांतिकारी कामासाठी त्यांच्या स्वाधीन केले. गुरूजीनी अशा प्रकारे राष्ट्रासाठी तन–मन–धनाने केलेला त्याग खऱ्या अर्थाने सार्थ करून दाखविला. गुरूजींचे राष्ट्रप्रेम अजोड होते यात शंका नाही. परंतू गुरूजींना त्यांच्या स्वभावाप्रमाणे सदासर्वकाळ मुंबईत राहणे शक्य नव्हते. त्यांचे मन खानदेशकडे सारखे ओढ घेत होते.

३.१३.५ गुरूजींचा खानदेश दौरा

खानदेशातील जनमानसात गुरूजी चांगलेच परिचित होते. गुरूजींच्या दौऱ्यामुळे सभांना गर्दी होऊन सरकारी अत्याचारापुढे दबून राहिलेल्या लोकांना परत स्फुरण चढेल व त्याचा सर्वत्र गवगवा होईल. म्हणून या अडचणीवर मात करण्यासाठी एक योजना मधू लिमये यांनी आखली. गुरूजींनी या दौऱ्यात एरंडोल, अमळनेर, अमलगाव, मारवड, चोपडे इत्यादी अनेक ठिकाणी गुप्तपणे सभा घेतल्या. एरंडोल येथील सभा काब्राजींच्या घरात घेण्यात आली. काब्राजी हे एरंडोल येथील गांधीजींचे निष्ठावंत कार्यकर्ते होते. काब्राजींच्या घरात सभेला खच्चून गर्दी झाली होती. तेथे उभे राहायला जागाही शिल्लक नव्हती. गुरूजींचे तेथे देशभक्तिपर स्फूर्तिदायक भाषण झाले व अनेक

७१. साने गुरूजी, क्रांतीच्या मार्गावर व इतर, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. १०.

कार्यकर्त्यांनी लढ्यात उतरण्याचा निर्धार केला.

अमळनेरहून गुरूजींनी चोपड्याचा कार्यक्रम आखला होता. पोलिसांच्या ससेमिरा मागे लागला होता. अशा स्थितीत आडमार्गाने घोडागाडीचा प्रवास सुरू झाला. दौरा पुढे तसाच चालू राहिला. ही सर्व मंडळी अमलगावला पोहोचली व नामदेवराव पाटील यांच्या घरी उतरली. पोलिसांनी आपला पाठलाग चालूच ठेवला होता. कसेही करून सूर्योदयापूर्वी चोपड्याला त्यांना पोहचायचे होते. त्यांनी नामदेवराव पाटलाकडे थोडी विश्रांती घेतली. गाडीवाल्याने सर्वांना इच्छित स्थळी चोपड्याला आणून सोडले. मगनशेठ हे चोपड्यामधील धनिकशेठ व कार्यकर्ते होते. त्यांचा अमळनेरच्या प्रताप मिलशी संबंध होता. गुरूजींना ते ओळखत होते. त्यांच्या सहाय्याने चोपड्याला एका मिलमध्ये मोठी सभा घेण्यात आली.

३.१३.६ खानदेशमधील घातपाती चळवळ

पूर्व खानदेशात रावेर–यावल–भुसावल तालुके हे १९४२ च्या ऑगस्ट क्रांतीची केंद्रे बनली होती. साने गुरूजी व मधू लिमये खानदेशमधील भागात भूमिगत आंदोलनात कार्यमग्न राहण्याची योजना असल्यामुळे, पूर्व खानदेशातील घातपाती चळवळीचे सूत्रसंचालन रामभाऊ भोगे यांच्याकडे सोपविण्यात आले होते. रामभाऊ भोगे १९३७ सालापासून राष्ट्रीय चळवळीत सक्रीय झाले होते. ते जहालमतप्रणाली प्रवृत्तीचे होते. त्यांनी भुसावळच्या रेल्वे अधिकाऱ्यांशी संगनमत करून सैन्यदलाच्या वाहतूक गाड्यांची माहिती मिळविण्याची तजवीज केली होती. परंतु दुर्देवाने सेनादलाच्या गाडीऐवजी ठरलेल्या वेळी प्रवासी गाडी–मुंबई–पेशावर एक्स्प्रेस आली आणि प्रवासी गाडीला मोठा अपघात झाला. त्यामुळे अनेक कार्यकर्त्यांनी हळहळ व्यक्त केली. मधु लिमये यांनी गांधीजींच्या आदेशाचे पालन करण्यास सांगितले.

जळगाव तालुक्यात खेडोपाडी भूमिगत चळवळीचा शिरकाव झाला होता. कानळदे, नासिराबाद, मुमराबाद, भादली इत्यादी गावे ऑगस्ट क्रांतीच्या आंदोलनात सामील झाली होती या भागातील गुरूजींचे शिष्य नामदेवराव राणे, कानळद्याचे हिरालाल, तसेच भादलीचे डॉ. सुभान पाटील, मुमराबादचे सीताराम भाऊ आणि जळगावचे मुरलीधर गंधे व स्पोर्टवाले जोशीबंधू ही सर्व मंडळी गुरूजींचे भक्त व पूजनीय भाव बाळगणारे होते. जुन्या जळगावात रामदास पाटलांच्या

किल्ल्यासारख्या घरात भूमिगतांचा मोठा अड्डा असे. एकंदरीत खानदेशामधील भूमिगत चळवळ साने गुरूजींच्या अथक प्रयत्नाने, इतरांना स्फूर्ती देत चालू ठेवण्यात आली. त्यामुळे अनेक क्रांतिकारक कार्यकर्ते जोडण्यात आले व त्यांचे योगदान लाभले. पू. साने गुरूजींच्या आदेशावरून खान्देशाची ४२ वी चळवळ डॉ. रामचंद्र (रामभाऊ) धोंडू भोगे यांनी चालविली.[७२]

३.१३.७ गुरूजी मुंबईत :

मुंबईला कधी कधी साने गुरूजी व मधु लिमये लेडी जमशेटजी रोडवरील राजमा इमारतीस स.रा. देशपांडे यांच्या धाकट्या बंधूंच्या घरी अधून मधून उतरत असत. या जागेला क्रांतिकारक राजगड म्हणून संबोधित असत.

दि. ९ ऑगस्टनंतर अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने हळूहळू मूषकमहालात मुक्कामासाठी येजा करू लागले. नानासाहेब गोरे, शिरूभाई लिमये हे त्यावेळी मूषकमहालात उतरले होते. मूषकमहाल भूमिगतांचा अड्डा बनला होता. काही दिवस पोलिसांनी त्या जागेवर पाळत ठेवली. एके दिवशी छापा घातला व त्या छाप्यात नानासाहेब गोरे (भास्कररराव), शिरूभाऊ लिमये(दादा मराठे) साने गुरूजी व मधू देशपांडे इत्यादी मंडळीना या छाप्यात पकडले. गुरूजी या नावाने ख्यातनाम झालेले पांडुरंग सदाशिव साने जसे कवी, तसे अहिंसावादी पण जहाल क्रांतिकारकही होते. खानदेशातील गिरणी कामागरांच्या संपाचे ते नेतेही होते. मानवतावादी असले, तरी गुरूजी १९४२–४३ च्या छोडो भारती क्रांतीमध्ये घातपात करणाऱ्या बॉम्बे प्रॉव्हिंशल डिस्ट्रक्शन सेंटरमध्ये कार्यरत होते. मुंबई शासनाचे लक्ष्य म्हणजे टार्गेट असलेल्या मुंबईतील मूषक महाल या संघटनेच्या केंद्रात गुरूजींना इतर क्रांतिकारकांसह गुप्तचरांनी पकडले.[७३] अशा तऱ्हेने भूमिगतांचा अड्डा असलेल्या मूषकमहालाचे पतन झाले व अनेक क्रांतिकारक मंडळी त्यात अडकली.

दि.१९ एप्रिल १९४३ रोजी गुरूजी येरवड्याच्या कारागृहात आले, ते जून–जुलै १९४४ पर्यंत १५ महिने ते येरवड्याच्या कारागृहात होते. नंतर त्यांची नाशिकच्या कारागृहात रवानगी झाली. नंतर तेथूनच गुरूजी दि.१५ जानेवारी १९४५ रोजी नाशिकच्या कारागृहात मुक्त झाले.

येरवडा कारागृह म्हणजे राजबंद्यांचे एक महाविद्यालयच होते. या महाविद्यालयात आचार्य

---

७२. केदार मोरेश्वर ब्रम्हो (संपा), स्मरणिका, पूर्वोक्त,पृष्ठ क्र. ३१.

७३. डॉ. के.के. चौधरी, क्रांतीपर्व महाराष्ट्राचे योगदान, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. ४५.

जावडेकर, आचार्य भागवत, रावसाहेब पटवर्धन अशी कितीतरी देशभक्त व तत्वचिंतक मंडळी त्या करागृहात होती. कारागृहातून सुटल्यानंतर गुरूजी ठाणे जिल्ह्यातील बोर्डी या गावी आपले धाकटे बंधू–अप्पासाहेब साने यांच्याकडे आले.

३.१३.८ ऑगस्ट क्रांतीलढ्यातील आठवणी

हाजी अब्बासभाई बोहरी हे प्रताप हायस्कूल शताब्दी स्मरणिका २००८ अंकात आठवणी सांगतात. "गुरूजींनी त्या काळात आम्हा विद्यार्थ्यांमध्ये स्वातंत्र्य मिळविण्याची जिद्द व राष्ट्रीय बाणा जो निर्माण केला त्या बदलत्या काळाच्या ओघात अजूनही टिकून आहे."[७४] पुढे स्वामी पुर्णानंद आठवणी सांगतात, "गुरूवर्य केसरी सरांनी पुण्याच्या येरवडा सेंट्रल जेलमधून आलेली पू. सानेगुरूजींची व्यथा व संदेश सांगितला. सन १९४२ चे चले जाव आंदोलन थंडावले होते. गुरूजींनी अपेक्षा कळविली की प्रतापच्या राष्ट्रीय विद्यार्थ्यानी दि. २६ जानेवारी १९४४ रोजी सत्याग्रह व कायदेभंग करून वातावरणात चेतना, ऊब निर्माण करावी. गुरूजींच्या अपेक्षापूर्तीसाठी मी, चिमण भाटे, हैबत, विक्रम, राजधर, नथू , लांडगे व लोहार असा ८–९ विद्यार्थ्याचा बालचमू पाच कंदिलापासून इंग्रज सरकार विरूध्द घोषणा देत मिरवणूकीने निघाला. पोलिसांना खबऱ्याने बातमी दिली. पोलिसांनी पोलिस लाईनसमोर आम्हाला अडवून अटक केली. दुसऱ्याच दिवशी खटला चालून न्यायधिशांनी आम्हाला ६ महिने सक्तमजुरीची शिक्षा देऊन पुण्याच्या येरवडा सेंट्रल जेलमध्ये रवानगी केली. पुण्याच्या येरवडा सेंट्रल जेलमध्ये आम्हाला गुन्हेगार मुलांच्या बराकीत ठेवल्याने आम्ही सत्याग्रह केला. प.पू. गुरूजींनी त्यासाठी उपोषण केले. परिणामी आमची रवानगी राजकीय कैद्यांच्या बराकीत करण्यात आली. उंच उंच भिंतीमुळे पू. गुरूजी प्रत्यक्ष दिसू शकले नाहीत. एका फटीतून त्यांच्या बोटाचा स्पर्श होऊन समाधान मानले."[७५]

सुरेश केसरी पुणे आठवणी लिहितात, "साने गुरूजींचा व माझ्या वडिलांचा खूप स्नेहभाव होता. काही काळ साने गुरूजी आमच्याच घरी राहत होते. प्रताप मिलच्या संपाच्या काळात साने गुरूजी, सेनापती बापट, मधु लिमये आणि माझे वडील दादा केसरी यांची बैठक झाली होती. तिला शाळेच्या आवारातच पकडण्यात आले. कैद झाली. ती सेवादलाचेही कार्य करी."[७६]

---

७४. केदार मोरेश्वर ब्रम्हो (संपा), स्मरणिका, पृष्ठ क्र. ६२.
७५. कित्ता, पृष्ठ क्र. ६५.
७६. कित्ता, पृष्ठ क्र. ६८.

सुरेश दामोदर गुजराती आपल्या आठवणी सांगतात, "साने गुरूजी तेव्हा विद्यार्थ्यांना घेऊन खेड्यापाड्यात जात व जनजागृतीपर भाषणे करीत असत. खादीचा प्रचार करीत. प्रभात फेरी काढीत. त्यात मी व माझे विद्यार्थीमित्र सहभाग घेत असू. देशभक्तीपर गीते, राष्ट्रगीत म्हणणे इ. आम्ही करीत असू. यासाठी मी गुरूजींसमवेत मारवड कळमसर इ. भागात गेलो होतो हे आजही आठवते. १९४२ च्या सुमारास आम्हा सर्वांना मारवड येथे कै. सुरजमलशेठ मुंदडे यांनी जेवण दिल्याचे देखील माझ्या स्मरणात आहे."[७७]

पुढे श्रीमती सुलभा जोशी, आमची शाळा – प्रताप विद्यालय लेखात लिहितात, "१९४२ च्या भारतछोडो चळवळीत गुरूजींनी भाग घेतला ते भूमीगत झाले. ते भूमीगत असतांना सुध्दा शाळेला, अमळनेरला विसरले नाहीत. गावातल्या लोकांना, विद्यार्थ्यांना पत्र पाठवत. भारतात स्वातंत्र्यासाठी काहीतरी करा असं लिहित. "[७८]

पुढे लिहितात "खान्देशमध्ये पहिल्यांदाच फैजपूरला काँग्रेसचं अधिवेशन भरलं होतं. त्यावेळी सानेगुरूजी अमळनेरच्या मुलामुलींचे पथक, स्वयंसेवक म्हणून घेऊन गेले होते. त्या पंधरा दिवसांत सर्वांना खूप काही शिकायला मिळालं. जीवनाला एक नवी दिशा मिळाली."[७९]

या लढ्याला कम्युनिस्टांचा विरोध होता, त्यामुळे गुरूजीनांही विरोध करायला त्यांनी गुरूजी सुटण्याच्या आधीपासूनच प्रारंभ केला होता. गुरूजींना या लढ्यात भाग घेऊ नये, हे युध्द म्हणजे लोकयुध्द कसे आहे, हे त्यांना पटवण्यासाठी काही कम्युनिस्ट मित्रांनी धुळ्याच्या जेलमध्ये गुरूजींची भेट घेतली होती. व तसा प्रयत्नही केला होता. परंतू ज्या हिंदुस्थानात पैचेही नागरीक–स्वातंत्र्य नाही, अपमानाचा व उपहासाचा, दास्याचा व मरणाचा पेला जेथे काठोकाठ भरला आहे तेथे हे लोकयुध्द कसे ?...[८०] असा प्रश्न विचारून गुरूजींनी त्यांच्या राष्ट्रघातकी धोरणाविषयी तीव्र नापसंती व्यक्त केली होती. गुरूजींचे हे निराळे विचार ऐकून त्या कम्युनिस्ट मित्रांना तसेच परत यावे लागले होते.

या दिवसांत गुरूजींचे आणि एस्.एम्. जोशी, अच्युतराव पटवर्धन, शिरूभाऊ लिमये आदी पुण्यातील समाजवादी भूमिगत क्रांतिकारांशी संबंध जुळले. गुरूजी काही दिवस पुण्यात होते. त्यांनी

७७. कित्ता.
७८. कित्ता, पृष्ठ क्र. ६९.
७९. कित्ता, पृष्ठ क्र. ७०.
८०. राजा मंगळवेढेकर, साने गुरूजींची जीवनगाथा, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. २९४.

त्या वेळी, दि. २७ ऑगस्ट १९४२ रोजी श्री मोरेश्वर नारायण जोशी यांना लिहिलेल्या एका पत्रात धुळे–जेलमधून सुटल्यापासूनची हकिगत त्रोटक भाषेत पुढीलप्रमाणे लिहिली आहे.

चि. प्रिय मोरूस सप्रेम आशीर्वाद.

मी १० तारखेस सुटलो. पहाटे ४ वाजता अमळनेरला मोटरीत घालून गूपचूप आणून सोडले. पुसाळकर वगैरे धुळे येथे गेले होते, त्यांना तेथे जेलच्या दरवाजावर गर्दी करून १४४ कलम मोडले म्हणून अटक झाली. त्यांना ९ महिने सजा. त्यांच्याबरोबर हिरालाल शेठ होते त्यांना १ वर्ष रमण होता त्यालाही. अमळनेरहून मी निसटून इकडे आला आहे. अमळनेरचे कम्युनिस्ट विरोधी. परंतू मी कामगारांस संदेश पाठवला. पोस्ट, स्टेशन, कोर्ट सारे जळून भस्म. कचेरीवरील चाल. ज्वारीच्या शेतात छपून शिपायांनी गोळीबार केला. सहा मेले. कचेरी वाचली आहे. पुढे होळी होईल. विद्यार्थ्यांची मिरवणूक, लाठीमार, इंदू केसरी, मधू यांनी मामलेदारास उत्तरे तेजस्वी दिली. तुम्ही कोण विचारणारे? आम्ही स्वतंत्र आहोत, असे ती छोटी मुले म्हणाली. उत्तमच्या पत्नीस १ वर्ष सक्त मजुरी. उत्तमचा शोध करीत आहेत. उत्तमच्या भावास सहा महिने सजा. धाकटा भाऊ शिवाजी प. खानदेशात पेटवायला गेला. बडोद्यास खानदेशची ४५ मूले होती. ३० परत आली. एन.डी. चे पत्र आले आहे. ते खानदेश पेटवायला निघाले आहेत. गुलाबही परत आला आहे. खुशालने कॉलेज सोडले. लक्ष्मण मिस्त्रीस खूप मार पुण्यास बसला. बरा आहे. खानदेशामध्ये एरंडोल तालुक्यात अडगाव येथे दोन हजारांचा जंगल सत्याग्रह. पोलिस हत्यारी आले. पुढारी भगवान भुसारी म्हणाला, आम्ही स्वतंत्र आहोत. कोण अटक करतो पाहू! पोलिस परतले. पुन्हा दुसऱ्या दिवशी आले. भगवान व त्याचे दोघे मित्र यांस तीन तीन गोळ्या घालून ठार केले. भगवानची मूर्ती डोळ्यासमोर आहे. तो धुळे जेलमध्ये सत्याग्रही होता. इतरही गोळीबार. तेथे ६ मेले. जुलमी लोक पाणी मागत होते. पोलीस अधिकार म्हणाले, मरा! स्वतंत्र भारत, स्वतंत्र भारत म्हणत ते मेले. त्या गावच्या जवळील साळवे गाव कुऱ्हाडी, कोयते घेऊन उठले. या पोलिसांनो, खांडोळी करतो म्हणाले. पोलीस चार वेळा सीमेजवळ जाऊन परतले.[८१] गुरूजी पुढे लिहितात.

"दापोलीचे फाटक यांस अटक झाल्याचे कळले. परंतु दापोली तालुक्यात कोणी शिल्लक आहे का? कामाची पुढील दिशा कोणास हवी असेल तर एखाद्याने पुण्यास यावे. पैशांची

८१. कित्ता, पृष्ठ क्र. २९५.

कामासाठी व्यवस्था करू. तालुका कसा उठवावा सांगू. तरी तिकडे दापोली, हर्णे वगैरेकडे कोणी उत्साही जर असेल व पुढचा कार्यक्रम व मदत सारे हवे असेल तर त्याला पुण्यास येऊ दे. लकडी पुलापलीकडे इंटर नॅशनल बुक डेपो येथे दिक्षित यांस भेटावे. ते माझी गाठ घालून देतील."

तुझा मित्र केळकर एकदा मला भेटला होता. वसंता येरवडा जेलमध्ये स्थानबध्द. वसंता म्हणजे माझा पुतण्या. तू तिकडील हकिकत, कोणी असा आहे की नरही वगैरे हकिकतचे पत्र श्री. दीक्षित बुक सेलर, इंटरनॅशनल बुक डेपो, डेक्कन जिमखाना, या पत्यावर पाठव. पत्यावर माझे नाव लिहू नये. मी सध्या अ–प्रकट आहे. धाकटा मोहाडीकर म्हणजे रामच्या पाठचा लक्ष्मण तो खानदेशभर हिंडत आहे. भोगेही हिंडत आहेत. उत्तम पाटील काल भेटून गेले. पश्चिम खानदेशात जात आहेत. असो. माझी प्रकृती बरी आहे. स्वतंत्र होऊ तेव्हा जिवंत असलो तर भेटू. तुझ्या घरी सर्वोस सप्रेम प्रणाम.

तुझे – गुरूजी"[८२]

या पत्रावरून गुरूजी त्या १०–१५ दिवसांतच क्रांतीच्या प्रवाहाशी समरसून गेलेले दिसतात. कर्मभूमी खानदेशशी संपर्क ठेवून असलेले जसे आढळतात तसेच जन्मभूमी दापोली तालुक्यातही काही घडावे अशी मनीषा बाळगून असलेले आढळतात.

भूमिगत अवस्थेत गुरूजींनी पुणे, मुंबई, खानदेश, सातारा आदी ठिकाणी संचार केलेला होता. कार्यकर्त्यांच्या बैठका घेऊन त्यांना मार्गदर्शन केले होते. लढ्यासाठी स्फूर्ती–प्रेरणा दिली होती. गुरूजी शेतकरी, शेठजी, अशी वेषांतरे करून खानदेशात वगैरे जायचे. एका मुंबईत बसमधून चालले होते. खानदेशातील मुले बसमध्ये एका थांब्यावर चढली. गुरूजींना पाहतच गुरूजी म्हणून त्यांनी हाक मारली. पण गुरूजींनी ओळख दाखवली नाही. पुढच्या थांब्यावर चटकन उतरून गेले. गुरूजी भूमिगत आहेत हे त्या मुलांच्या लक्षात आले नाही आणि ती अशीच हाक मारू लागली तर पकडले जाण्याचा धोका होताच.

या काळात कार्यकर्त्यांची नावेही बदललेली असत. गुरूजींनी धुठूजामळू असे एक संक्षिप्तकरणच केले होते. यांतील धू म्हणजे मधू देशपांडे, ठू म्हणजे विठू पटवर्धन, जा म्हणजे राजा सरंजामे म्हणजेच बाळ अभ्यंकर, म म्हणजे रामदास फेणे, अणि ळू म्हणजे निळू लिमये !

८२. कित्ता, पृष्ठ क्र. २९६.

प्रत्येकाच्या नावातील दुसरे अक्षर घेऊन गुरूजींनी ही एक गंमत केली होती. मग ठू आला नाही, धू कुठे गेला ? असेच ते संबोधित असत.[८३] प्रतापगडावर असताना एकदा रात्री डॉक्टराचा वेष घेतलेले जयप्रकाश मुक्कामास आले.

जयप्रकाशांनी पुढे, श्यामची आई चित्रपटाच्या मुहूर्ताच्या प्रसंगी गुरूंजीबद्दल म्हटले होते, "गुरूजींच्या पहिल्याच दर्शनात मला त्यांच्याठायी वसंत असलेले मातृत्वात्सल्य दिसले. वरून ते थंड दिसत असले तरी त्यांच्या अंगी आग पेटलेली असे. त्या आगीने अनेक तरूणांच्या अंतकरणांत त्यांनी देशसेवेची ज्योत पेटवली."[८४] या क्रांतिकाळात गुरूजींनी आणखी एक महत्वाचे काम केले. ते म्हणजे महाराष्ट्रातल्या जनतेला क्रांतीसाठी चेतावणी देण्याचे. अनेक प्रकारची बुलेटिन्स सायक्लोस्टाइल करून गावोगावी जात असत. क्रांतीची ज्योत पाजळीत असत. गुरूजींनी लिहिलेल्या अशाच एका बुलेटिनचा हा थोडा मजकूर

स्वतंत्र महाराष्ट्र बलिदान पत्रिका

"९ ऑगस्ट हिंदी स्वातंत्र्य संग्राम हिंदुस्थानभर सुरू झाला. ब्रिटिश हिंदुस्थान व संस्थानी हिंदुस्थान असा प्रश्न उरला नाही. संस्थानेही उठली. श्रीशिवछत्रपतींशी संबध्द असे कोल्हापूर संस्थानही बंड करून उठले. कोल्हापूर प्रजा–परिषदेने पुढील तेजस्वी जाहीरनामा काढला. इंग्रजांची व इंग्रजी सत्तेच्या तंत्राने चालणाऱ्या संस्थानी सरकारची सत्ता यापुढे आम्ही मानणार नाही. आम्ही स्वतंत्र आहोत!"[८५] याशिवाय गुरूजींनी याच काळात एकदा स्वतःला २४ तास कोंडून घेऊन सुमारे १०० पानांचे क्रांतीच्या मार्गावर नावाचे पुस्तक लिहून काढले. ते सायक्लोस्टाइल करूनच त्या वेळी प्रस्तुत करण्यात आले होते. अशा प्रकारे साने गुरूजींनी भूमिगत राहून ऑगस्ट क्रांती लढ्यात सहभाग घेतला होता.

समारोप :

साने गुरूजींना बालपणी राष्ट्रीय लढ्याचे बाळकडू आपल्या आई–वडीलांकडून मिळाले होते. पुढे म. गांधीजीच्या विचाराने प्रेरीत होऊन इ.स. १९३० ला राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्यात सहभाग घेतला.

---

८३. कित्ता, पृष्ठ क्र. २९९.
८४. कित्ता.
८५. कित्ता, पृष्ठ क्र. ३००.

साने गुरूजीनी इ.स. १९३० ला पहिल्या सविनय कायदेभंग चळवळीत सहभाग घेतला. त्यावेळी त्यांना देशद्रोहाच्या आरोपाखाली अटक झाली. त्यात त्यांना १५ महिने सक्त मजुरी व २०० रू. दंडाची शिक्षा झाली. पुढे इ.स. १९३२ ला दुसऱ्या कायदेभंग चळवळीत सहभाग घेतला.

साने गुरूजींच्या इ.स. १९३३ मधील वैयक्तिक सत्याग्रह सहभाग, कायदेभंग निवडणूक प्रचारातील सहभाग, (इ.स. १९३४), फैजूपर काँग्रेस अधिवेशनातील सहभाग (इ.स. १९३६), प्रांतिक निवडणूक प्रचार (इ.स. १९३७) व इ.स. १९३८ ते १९४० मधील श्रमिकांच्या हक्कासाठी दिलेले लढे या मधून राष्ट्रीय लढ्यात सहभाग होता.

अशा प्रकारे साने गुरूजींनी या राष्ट्रीय लढ्यातून भारतीय समाजात मनात राष्ट्रप्रेम जागृत करून स्वातंत्र्य लढ्यात सहभागी केले.

****

प्रकरण चौथे

साने गुरूजी व सामाजिक समतेचे लढे

प्रस्तावना

४.१. पंढरपूर चळवळ

४.१.१. उपोषणाचा निश्चय

४.१.२. महाराष्ट्राची प्रचारसभा

४.१.३. उपोषणाविषयी मत–मतांतरे

४.१.४. पंढरपूर सत्याग्रहासंबंधी काँग्रेस पुढाऱ्यांचे मत–मतांतरे

४.१.५. उपोषणाची यशस्वी सांगता

४.२. आंतरभारती : साने गुरूजींचे स्वप्न

४.३. राष्ट्रसेवा दलामार्फत विधायक कार्य

४.४. साक्षरतेची चळवळ

४.५. सामाजिक स्वातंत्र्याविषयी विचार

४.६. साने गुरूजींचा स्त्री स्वातंत्र्यविचार : व्यक्ती स्वातंत्र्य लढा

४.७. आदर्श शैक्षणिक विचार

समारोप

प्रस्तावना :

साने गुरूजीनी राष्ट्रीय लढ्यासोबत सामाजिक लढ्यालाही महत्व दिले. सामाजिक स्वातंत्र्याशिवाय राजकीय स्वातंत्र्य असून उपयोगाचे नाही. यासाठी दोन्हीचीही तेवढीच देशाला गरज आहे. हे ओळखूनच गुरूजीनी राजकीय स्वातंत्र्य लढ्यासोबत सामाजिक लढ्यांना महत्व दिलेले दिसून येते. साने गुरूजी आपल्या भाषणात कळकळीने बोलतात. "इंग्रजांकडून स्वराज्य घेऊ... परंतु जे स्वराज्य आपल्या कोट्यावधी बंधुना आपण या क्षणी देऊ शकतो, ते आपण का देत नाही."[१] याच अपेक्षेने साने गुरूजींनी राष्ट्रीय लढ्यासोबत सामाजिक लढे दिलेत. गुरूजी पुढे बोलतात, "स्वातंत्र्य दोन प्रकारचे आहेत. आर्थिक व सामाजिक, आर्थिक स्वातंत्र्य सोळा आणे सत्ता हाती आल्यावर आपण निर्माण करू शकतो. परंतु सामाजिक स्वातंत्र्य या घटकेला आपण सर्वांना देऊ शकतो. ते देण्याच्या आड काही ब्रिटिश येत नाहीत. तुमच्या विहिरींवर हरिजनांनी पाणी भरले तर गोरा कलेक्टर किंवा गव्हर्नर का आड येत आहे? हे सामाजिक स्वातंत्र्य आपणच आडवून ठेवले आहे. मनाचा मोठेपणा असता तर एका क्षणात ते आपण दिले असते."[२] जे परकीयांच्या हाती स्वातंत्र्य आहे ते मिळविण्यासाठी परकीयांविरूध्द लढा देण्याचे व ते स्वकियांच्या हाती स्वातंत्र्य आहे ते मिळविण्यासाठी स्वकियांविरूध्द लढा देण्याचे कार्य साने गुरूजीने केले.

साने गुरूजीनी सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी पंढरपूर मंदिर प्रवेश लढा दिला. देशातील प्रांता प्रांतातील संस्कृती, वेष, भाषा, खाद्यपदार्थ, वाङःमय, ज्ञान इ. यांची देवाण घेवाण होऊन प्रांत भेट नष्ट होऊन देशात समानता नांदावी. यासाठी गुरूजीनी आंतरभारतीचे स्वप्न पाहिले. राजकीय स्वातंत्र्य व सामाजिक स्वातंत्र्य उपभोगुन देश चालविण्यासाठी शिक्षित लोक लागतील यासाठी गुरूजीनी राष्ट्रसेवादलामार्फत साक्षरतेची चळवळ राबविली. राष्ट्रसेवादलामार्फत खेडोपाडी स्वच्छता अभियान, दारूबंदी, स्वयंरोजगार यासारखे समाज उपयोगी योजना राबवली. गुरूजींनी स्त्री स्वातंत्र्य लढे प्रत्यक्ष दिले नसले तरी आपल्या लेखनीतून स्त्री स्वातंत्र्य विचार समाजात पसरून तसा प्रचार केला. त्याचप्रमाणे आदर्श शिक्षण पध्दती राबविण्यासाठी तसे लेखन केले. आणि समाजात आदर्शशिक्षणाविषयी जनजागृती केली. अशाप्रकारे काही सामाजिक लढे साने गुरूजीनी प्रत्यक्ष जरी दिले नसले तरी आपल्या लेखनीतून, भाषणांतून व विचारांतून समाजापर्यंत

१. साने गुरूजी, मंदिर प्रवेशाची भाषणे व इतर, रिया पब्लिकेशन, कोल्हापूर, आवृत्ती १५ ऑगस्ट २०११, पृष्ठ क्र. १०.
२. कित्ता.

पोहचविले व तशी समाजजागृती तयार करून समाजाला सामाजिक समतेच्या लढ्यासाठी प्रवृत्त केले.

साने गुरूजींना स्वराज्य हे सर्वांसाठी अपेक्षित होते. स्वराज्यात ज्याप्रमाणे शेतकरी, कामगारांना आपले मूलभूत हक्क हवे होते. त्याचप्रमाणे अस्पृश्यांनाही आपले मूलभूत हक्क मिळायला हवे असे गुरूजीना अपेक्षित होते. गुरूजी समानता हा धर्माचा आत्मा मानतात. ख्रिस्ती लोक चर्चमध्ये जातात, मुस्लिम मशिदीमध्ये जातात मात्र मंदिरात सर्व हिंदूना (अस्पृश्यांना) जाऊ देत नाही. याचीच गुरूजींना खंत वाटते. बाकी सर्व धर्मात समानता आहे. मात्र हिंदू धर्मात असमानता आहे. याचे दुःख गुरूजींना होते. ही असमानता नष्ट होऊन इतर हिंदू धर्मीय लोकांप्रमाणे अस्पृश्यांनाही आपले मूलभूत हक्क हवेत व समता हवी यासाठी गुरूजीनी पंढरपूर चळवळ करून हिंदू समाजामध्ये सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. साने गुरूजींनी समाजातील अस्पृश्यता नष्ट व्हावी व समाजामध्ये एकता निर्माण होऊन सर्वत्र समाजवादाची स्थापना व्हावी या हेतूने गुरूजींनी तशी जनजागृती केली. दीन दलितांना सामाजिक स्वातंत्र्य मिळावे यासाठी गुरूजीनी आपल्या भाषणांतून लेखनांतून सतत आवाज उठविला. गुरूजी राजकीय स्वातंत्र्यासोबत सामाजिक स्वातंत्र्यासाठी आग्रही होते. राजकीय स्वातंत्र्य मिळणे हे परकीयांच्या हातात होते. मात्र सामाजिक स्वातंत्र्य हे स्वकीयांच्या हातात होते. त्यासाठी साने गुरूजींनी स्वकीयांशी लढा देऊन समाजामध्ये समता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केला.

४.१ पंढरपूर चळवळ

साने गुरूजींनी सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी समाज जीवनाशी समरस होऊन सर्व लोकांना प्रेमाची शिकवण देऊन आपल्यावर होणाऱ्या अन्यायाला प्रतिकार करण्यास शिकविले. आपण सर्वजण एकत्र येऊन एकमताने, एक विचाराने, एकत्वाची भावना निर्माण करून राहिले पाहिजे असा संदेश दिला. गुरूजीनी मानवता हा धर्म असून आपण सारे एका प्रभूची लेकरे आहोत याची जाणीव समाजाला करून दिली.

अस्पृश्यांविषयी साने गुरूजींना सुरवातीपासुन आस्था होती. आई–वडीलांच्या शिकवणीतून व व्यापक मानवता प्रेमातून गुरूजींच्या मनात लहानपणापासुनच दीन –दलितांविषयी

प्रेम होते.

लहानपणीच साने गुरूजींच्या मनातील अस्पृश्यतेचे तण आईने काढले. गुरूजींनी लहानपणी केलेल्या संस्कारातून त्यांना अस्पृश्यांविषयी प्रेम व आस्था निर्माण झाली. गुरूजींच्या बालपणी परंपरेने जगणाऱ्या गावातील समाजांवर आणि वातावरणांवरही सनातनी ब्राम्हण समाजाचा प्रभाव होता. साने गुरूजींची आई बंडखोर नव्हती, पण ती प्रेमळ होती. ती मायाळू होती. महार बाईला मोळी उचलण्यास मदत कर असे तिने पंढरीस (गुरूजींचे घरातील नाव) सांगितले आणि नंतर आपल्याला समाजात राहायचे आहे म्हणून त्याला आंघोळ करावयास लावली. भोवतालच्या समाजाच्या मर्यादा संभाळीत असतानाच तिने लहानपणी गुरूजींवर जे काही संस्कार केले व त्याच संस्कारातून त्याचे मन प्रेमळ झाले. त्यांच्या मनात दलितांविषयी प्रेम निर्माण झाले. गरीबांबद्दल, दीन दुबळ्यांबाबत गुरूजींना सहानुभूती वाटू लागली.

साने गुरूजीनी १९२८ साली अस्पृश्यता निवारणसंबंधी 'अस्पृश्योध्दार' आणि 'ते आपले घर' ही दोन नाटकेही लिहिली. या नाटकांचा विषय सामाजिक समता, स्वातंत्र्य आणि लोकशाही समाजवादाचा होता. अस्पृश्योध्दार या नाटकातील ब्राम्हण मुलगा – नारायण महाराच्या आजारी मुलाची सेवा करतो. हे नारायणाच्या घरच्यांना पटत नाही मात्र पुढे घरच्यांचे मत परीवर्तन होते. व त्या विचारांशी सहमत होतात. यामधील नारायण मार्फत परिवर्तनाचे विचार मांडणारे साने गुरूजीच होत. समाजाजील सर्व लोकांना आपले मूलभूत हक्क मिळावे, स्वातंत्र्य मिळावे व समाजात समता निर्माण व्हावी म्हणून साने गुरूजींनी आपल्या साहित्यातून घरोघरी विचार पोहचविले. इ.स.१९३८ मध्ये काँग्रेस साप्ताहिकेत गुरूजींनी अस्पृश्यतेसंबंधी लिहिले. इ.स. १९४०–१९४१ साली धुळे जेलमध्ये देवचंद सोनवणी या हरिजन सत्याग्रही तरूणास गुरूजी इंग्रजी शिकवत असत. अशाप्रकारे गुरूजीच्या मनात सुरूवातीपासूनच अस्पृश्याविषयी आस्था होती.

ब्रिटिशांच्या जातीय निवाड्याविरूध्द सप्टेंबर इ.स. १९३२ मध्ये म. गांधीजीनी येरवडा कारागृहात उपोषण सुरू केले. त्यामुळे अस्पश्योध्दाराच्या चळवळीने जोम धरला. त्यानंतर इ.स. १९३२ मध्ये म. गांधीजीनी हरिजन साप्ताहिक सुरू केले व त्यातून अस्पृश्योध्दाराचा प्रसार व प्रबोधन सुरू केले. पुढे डिसेंबर इ.स. १९३२ मध्ये म. गांधीजींच्या आज्ञेवरून हरिजन सेवक संघ

स्थापन करण्यात आला. पुढे इ.स. १९३७ मध्ये महाराष्ट्रात हरिजन सेवक संघाची शाखा काढली. या शाखेची जबाबदारी काँग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते श्री. काकासाहेब बर्वे यांच्या शिरावर टाकण्यात आली होती व त्याचे मुख्य केंद्र वर्धा होते. वर्धा येथील पवनार आश्रम हे गांधीवादी विचारसरणीचे केंद्र हा आश्रमातील परिसर म. गांधीजी–विनोबाजींच्या व्यक्तीमत्वाच्या प्रभावाने भारून गेलेला होता. [३] तेथील हरिजन सेवक संघ व अध्यक्ष काकासाहेब बर्वे यांना अस्पृश्यता–निवारण कार्य अधिक जोमाने पुढे रेटणे आवश्यक वाटत होते. वर्धा येथील आश्रमात गांधीजी व विनोबाजी यांच्यात अस्पृश्यता निवारणासंबंधी चर्चा होत असे. अर्थात या घटनेचे वेध जानेवारी इ.स. १९४५ पासून साने गुरूजीच्या सुटकेनंतर सुरू झाले होते. सुटका झाल्यानंतर गुरूजी आपल्या भाषणात इ.स. १९४२ च्या क्रांतीच्या वीरांच्या शौर्य कथा जनतेला ऐकवित व त्याच सभेतून गुरूजी अस्पृश्यता–निवारण्यासंबंधी कळकळीने बोलत असत.

विशेषतः हरिजनांना मंदिरप्रवेश करता यावा म्हणून उपवास करण्यासंबंधीचे विचार गुरूजींच्या मनात मे १९४६ पासून घोळत होते. त्यासंबंधीचे विचार खानदेशातील अंतुर्ली येथील भरलेला राष्ट्रसेवादलाच्या शिबिरात गुरूजींच्या वक्तव्यावरून दिसून येते. त्यावेळी गुरूजी म्हणाले होते मी उपवास करून लवकर निघून जाईन. परंतु त्यावेळी ती गोष्ट कोणी गांभीर्याने घेतली नाही.[४]

साने गुरूजी व विनोबाजी यांच्यात अस्पृश्यता निवारण संबंधात विचार मंथन चालू होते. गांधीनी जर आपल्याला हरिजन सेवेचा हिशेब मागितला तर आपल्याजवळ काय उत्तर आहे?[५] असा प्रश्न विनोबांनी एका सभेत विचारला. विनोबांचे हे उद्‌गार गुरूजींच्या हृदयात घर करून राहिले. विनोबांजीचे अस्पृश्यता–निवारणासंबंधीचे विचाराने साने गुरूजींचे विचार चक्र जोरात सुरू झाले. गुरूजींच्या मनात मंदिर प्रवेशाच्या उपवासासंबंधी सतत विचार घोळत होते. त्यांचे मन अधिक अस्वस्थ झाले.

४.१.१ उपोषणाचा निश्चय

खानदेशातील श्री. सीताराम भाऊ हे पंढरीचे वारकरी व विनोबांच्या विचाराने भारवलेले, पंढरपूर यात्रेचे निमित्त साधून हरिजन मंदिरप्रवेशासाठी तेथे प्रचारासाठी आले होते. तेथे त्यांना गुरूजींची आठवण आली व लगेच त्यांनी गुरूजींना पत्र लिहिले. त्या पत्रात त्यांनी म्हटले की,

३. राजा मंगळवेढेकर, साने गुरुजींची जीवनगाथा, साधना प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे, द्वितीयावृत्ती, ११ जून १९९२, पृष्ठ क्र. १४७.
४. प्र.के. अत्रे (संपा), नवयुग (मंदिर प्रवेश विशेषांक), पुणे, दि. २७.०४.१९४७, पृष्ठ क्र. ५.
५. पी. आर. बेहेरे (संपा), नवशक्ती, मुंबई, दि. ५.११.१९३९, पृष्ठ क्र. ४.

गुरूजी, तुम्ही पंढरपूरला निघून या तुम्ही आलात तर मला बळ येईल. गुरूजीनी हे पत्र वाचून त्यांच्या मनाची तळमळ अधिकच वाढली. त्यांनी म्हटले, हे देवाचे बोलावणे आहे. पण पंढरपूरला जाऊन काय करणार ? कसले आपल्याजवळ बळ आहे...[६] असे अनेक विचार त्यांच्या मनात आले व आपला निश्चय केला.

पंढरपुरचे बडवे मंडळी कर्मठ आहेत. हे गुरूजींना माहित होते त्यांच्याशी शास्त्रार्था बाबत चर्चा करून काही निष्पन होणार नाही, याची गुरूजींना खात्री होती. हे मंदिर जर सर्वांसाठी खुले व्हायचे असेल तर त्यासाठी स्वतःचे प्राण पणाला लावायचा असा गुरूजींनी निर्धार केला. या मंदिरप्रवेशासाठी आपण प्राणांतिक उपोषण कार्तिकी एकादशीपासून करणार असल्याची बातमी त्यांनी सर्व वर्तमानपत्रांकडे पाठविली. दि. ४ नोव्हेंबर १९४६ ला सर्व वृत्तपत्रांतून ही वार्ता गुरूजींच्या पत्रकासह प्रसिध्द झाली व सर्व महाराष्ट्रभर खळबळ उडाली. गुरूजींनी आपल्या पत्रकात म्हटले होते. महात्माजींनी इ.स. १९३२ मध्ये हरीजनांसाठी उपवास केला, त्यावेळेस देशभर एक प्रचंड लाट आली. महात्माजींनी हिंदुस्थानभर दौरा काढला. काही मंदिरे उघडली. कोठे विहिरी मोकळ्या झाल्या. अखिल भारतीय हरिजन सेवक संघ स्थापन झाला. जागो जागी हरिजन छात्रालये सुरू झाली. प्रचारही हरिजन सेवक संघामार्फत सुरू झाले. त्या गोष्टीला आता १४ वर्षे झाली. थोड्या महिन्यापूर्वी प.पू. विनोबाजी भावे यांनी किती मंदिरे उघडली, किती विहिरी मोकळ्या झाल्या, हरिजनानां किती जवळ घेतले, याचा हिशोब द्या असे सांगितले. मी त्यांना त्या वेळेस लिहिले हिशोब काय देणार? आम्ही सांगतो त्याचा कितीसा परिणाम होणार? आमच्यासारख्यांनी बलिदाने दिली पाहिजेत. अमळनेरचे सखाराम महाराज मंदिर किंवा पंढरपूरचे पांडुरंगाचे मंदिर उघडावे म्हणून मला उपवास करायला परवानगी द्या. गुरूजींनी पुढे लिहिले हिंदूधर्म उदार आहे. तो हुतात्मे होऊ देणार नाही. मी शांत राहिलो परंतु मी अशांत होतो. मी त्या सात–आठ महिन्यांत जो जो प्रचार केला त्यात अस्पृश्यतेविषयीच सांगत असे. मुंबई सरकार आता कायदाही करीत आहे. परंतू मनाबुध्दीच जी क्रांती झाली पाहिजे ती अद्याप झाली नाही. आम्ही हरिजनांना जवळ घेणार नाही, जवळ जेवायला बसणार नाही, हृदयाशी धरणार नाही, आमचे डोळे कधी उघडणार, हरी जाणे ! पंढरपूरचे मंदिर हरिजनांना मोकळे व्हावे, पांडुरंगाच्या पायांवर त्यांना डोके ठेवता यावे, यासाठी आज मी एकादशीपासून उपवास करीत आहे. पंढरपूरच्या पांडूरंगाच्या

६. साने गुरूजी, मंदिर प्रवेशाची भाषणे व इतर, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. १३.

मंदिराच्या व्यवस्थापकांना माझी प्रार्थना आहे की, त्यांनी देवाजवळ सर्व लेकरांस येऊ द्यावे. तशी त्यांनी घोषणा करावी तोपर्यंत मी उपवास करीत राहीन.[७]

साने गुरूजी पुढे आपल्या पत्रकात लिहितात महाराष्ट्रातील हजारो गावांतील सर्व बंधु–भगिनींना, तसेच शहरातील बंधु–भगिनींना माझी प्रार्थना की, तुम्ही भराभरा पुढे येऊन ही अस्पृश्यता समूळ नष्ट करा. प्रचंड लाट सर्व महाराष्ट्रभर उसळू दे आणि हे पाप धुवून जाऊ दे. नवशक्ती वर्तमानपत्रातील वृत्त पंढरपूर येथील सुप्रसिध्द विठ्ठल मंदिर हरिजनांना खुले करण्यास्तव देशभक्त साने गुरूजी यानी उद्याच्या कार्तिक एकादशीच्या सुमुहुर्तावर प्राणांतिक उपोषण करण्याचा निश्चय केला आहे.[८] गुरूजींचा निश्चयी स्वभाव साऱ्यानांच माहित होता गुरूजींची प्राणांतिक उपोषणाची घोषणा वाचून सेनापती बापट, अच्युतराव पटवर्धन, एस.एम. जोशी, मधु लिमये, शिरूभाऊ लिमये असे सारेजण साने गुरूजींना जाऊन भेटले व विनंती करून म्हटले की, मंदिरप्रवेशासाठी बडव्यांची तसेच वारकऱ्यांची संमती मिळविण्यासाठी महाराष्ट्रात सहा महिने दौरा करून प्रचार करावा. बडव्यांना पूर्वसूचना देऊनही काही परिणाम झाला नाही तर प्राणांतिक उपोषण निर्वाणाचा उपाय योजावा. सर्व नेते मंडळींनी गुरूजींना उपोषणापासून परावृत्त करण्याचा व निर्णय बदलण्याची विनंती केली. या सर्व नेत्यांशी मंडळीनी एक निवेदनपत्रक प्रसिध्द केले ते पुढीलप्रमाणे.

"साने गुरूजींचा उपवास सुटला याचा अर्थ तो कायमचा सुटला आहे असा नाही. तो फक्त पुढील वर्षाच्या वैशाख शुध्द एकादशीपर्यंत तहकूब ठेवण्यात आला आहे. या सहा महिन्यांत आम्ही खाली सह्या करणारे पूज्य साने गुरूजींच्या मनात असलेली गोष्ट सिध्द करण्याकरीता लोकांची मने अनुकूल व्हावी म्हणून शक्य तो सर्व प्रयत्न करणार आहोत. या मुदतीत आमच्या हातून हे कार्य घडले नाही व पंढरपूर श्रीविठ्ठलमंदिर हरिजनांना खुले झाले नाही तर पूज्य साने गुरूजी प्राणांतिक उपोषण करतील व त्यांच्या त्या उपोषणापासून त्यांना परावृत्त करण्याचा आम्ही कसलाही प्रयत्न करणार नाही.

पंढरपूरचे मंदिर हरिजनांना खुले होण्याचा पुष्कळ संभव आहे, अशी आमची प्रामाणिक समजूत असल्यामुळे आम्ही पूज्य साने गुरूजींजवळ सहा महिने आम्हांला द्या, अशी याचना केली,

---

७. राजा मंगळवेढेकर, साने गुरू जींची जीवनगाथा, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. ३४०.

८. पी.आर. बेहेरे (संपा), नवशक्ती, पूर्वोक्त, ७ मे १९४६, पृष्ठ क्र. ३.

ती त्यांनी नाखुशीने का होईना, पण मान्य केली म्हणून आम्ही त्याचे आभारी आहोत. व आमच्याप्रमाणेच ज्या हजारो तरूणांना त्यांच्याविषयी आपुलकी आहे, ते गुरूजींचे आभारी होतील अशी आमची श्रध्दा आहे."[९] या पत्रकावर सेनापती बापट, अच्युतराव पटवर्धन, एस.एम. जोशी, शिरूभाऊ लिमये यांच्या सह्या आहेत.शेवटी विनंतीला मान देऊन गुरूजींनी आपले उपोषण सहा महिने तहकुब केले. बडव्यांच्या या वक्तव्यावर शंका प्रदर्शित करून गुरूजींनी सडेतोड उत्तर दिले. त्यांनी म्हटले की, या विश्वस्तांना मंदिर खुले करा असे म्हटले तेव्हा आज यांना लोकमताची आठवण झाली. मंदिर उघडायला लोकमत, तर मग मंदिराच्या सर्व उत्पन्नाचा विनियोग कसा करावा यासाठी लोकमताची योजना नको का? आणि लोकमत कोणाचे ? केवळ वारकरी जनतेचे, की सर्व हिंदुस्थानचे ? पांडुरंगाचे मंदिर वारकरी संप्रदाय अस्तित्वात येण्यापूर्वीपासून आहे ते अतिप्राचीन आहे आद्यशंकराचार्यांनी तिथे जाऊन पांडुरंगाष्टक नावाचे स्त्रोत्र केले. म्हणजे ज्ञानेश्वर महाराजांच्या पूर्वी जवळ जवळ पाचशे वर्षे पांडुरंगाचे दर्शन घेण्याची आद्यशंकराचार्यांची इच्छा व्हावी इतके ते मंदिर प्रसिध्द होते. पुढे भक्तिमार्ग आला. वारकरी संप्रदाय निर्माण झाला. तेव्हा मत जनतेचे घ्यायचे व मत घेण्याची दुसरी एखादी पध्दत जोवर नाही तोपर्यंत आज ते असेंम्ब्ली मतदार आहेत. त्यांचे मत घेणे योग्य आहे. त्यांनी शंभर टक्के राष्ट्रीय सभेला निवडून दिले आहे. आणि राष्ट्राचे याबाबतीतील मत मतदारांना माहित आहे. प्रचारात हरिजन उमेदवार आमच्याबरोबर असत. तेव्हा जनतेचे मत यावरून अजमावता येईल. हिंदुमहासभेला मते मिळाली तरी हिंदुमहासभाही मंदिरप्रवेशाला अनुकूलच आहे... तेव्हा पुन्हा लोकमतचा मुद्दा मांडण्यात अर्थ नाही.[१०] पुढे डिसेंबर मध्ये एस.एम. जोशी, सेनापती बापट, अण्णासाहेब सहस्त्रबुध्दे आणि हरिभाऊ फाटक वगैरे नेते मंडळी पंढरपुरात येऊन त्यांनी बडव्यांशी वाटाघाटी सुरू केल्या. शेवटी न्यायमूर्ती जयकर यांना मध्यस्थी घालून पंढरपूरच्या बडव्यांनी स्पष्ट केले की, महाराष्ट्रातील जनमत जर मंदिरप्रवेशास बहुतांशी अनुकूल असेल तर आम्ही पंढरपुरचे विठोबाचे मंदिर हरिजनांना खूले करू असे बडवे आपल्या मतावर ठाम होते.

काही सनातनवादी सुधारक पुराण वेद प्रामाण्य वाद्यांनी गुरूजींच्या मंदिर प्रवेश लढ्याला विरोध केला मात्र साने गुरूजींचे राष्ट्रीय कार्य, राष्ट्रप्रेम, काँग्रेस प्रेम व शेतकरी कामगार वर्गातील पुज्यनीय स्थान या सर्वांमुळे समाजामध्ये व काँग्रेसमध्ये गुरूजी बद्दल आदराची व सन्मानाची

९. कित्ता.

१०. राजा मंगळवेढेकर, साने गुरूजींची जीवनगाथा, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. ३४१, ३४२.

भावना होती. व या भावनेपोटीच गांधीवादी समाजसुधारकांचा गुरूजींच्या मंदिरप्रवेश चळवळीला पाठींबा होता. यामध्ये गांधीवादी देशभक्त आप्पासाहेब पटवर्धनांननी सर्व महाराष्ट्राला पंढरपूर मंदिर हरिजनांना खुले व्हावे यासाठी कळकळीचे निवेदन पत्र प्रसिध्द केले ते पुढीलप्रमाणे ... गुरूजींनी आपल्याला सहा महिन्यांचा अवधी देण्यात योग्य तेच केले आहे, ही एक अशी वेळ आहे. तेव्हा अस्पृश्यता निवारणाबद्दल कळकळ वाटणाऱ्या महाराष्ट्रातील यच्चयावत बंधु–भगिनींनी आपली सुस्ती झाडून व सर्व शक्ती एकवटून हे अस्पृश्यतेचे पिशाच्च कायमचे गाडून टाकले पाहिजे. आता घटकेचीही फुरसद नाही. गेल्या पाऊणशे वर्षांपासून आपण जी अस्पृश्यता नष्ट करण्याचे म्हणत आहोत तरी ती ताबडतोब नष्ट करण्याची निदान त्याचा स्पष्ट दाखला म्हणून पंढरपूरच्या विठोबाला तरी पुरातन्यांच्या बंदिवासातून मुक्त करायचा की साने गुरूजींसारखे धर्मात्म्याच्या बळी घ्यायचा हा आपल्यापुढे प्रश्न आहे. मी साने गुरूजींसारख्याना म्हणतो, या धर्मशुध्दीसाठी एकट्या सान्यांचाच बळी जाईल की नाही! उत्कट धर्मवीरांच्या प्रायोप्रवेशनाची मालिकाच चालू राहील. त्यात किती व कोण्या लहान थोरांच्या आहुती पडतील ते कोणी सांगावे?...[११]

पुढे लिहितात, "हा प्रश्न इतका जिव्हाळ्याचा आणि पवित्र आहे की महाराष्ट्राची सर्व मंदिरप्रवेशाच्या मुद्यावर एकवटण्याच्या मार्गात चालचलाऊ राजकारणातील पक्षभेदाची आडकाठी येऊ नये व मला आशा आहे की येणारही नाही...

साने गुरूजींची पंढरपूर मंदिरावरच आपले लक्ष केंद्रित केले असले तरी हा प्रश्न केवळ पंढरपूर मंदिराशी थांबणार नाही. पंढरपूरचा विठोबा मोकळा झाला म्हणजेच ओघानेच गावोगावची मंदिरेही हरिजनांना मोकळी होणे क्रमप्राप्त आहे. उलटपक्षी गावोगावचे देव मोकळे झाले तर पंढरपूरच्या विठोबाला मोकळा करणे तेथील व्यवस्थापकांना अनिवार्य होईल."[१२]

४.१.२ महाराष्ट्राची प्रचार सभा

गुरूजींच्या महाराष्ट्र प्रचारदौऱ्याचा शुभारंभ मुंबई–दादर येथील पालनजी सोजपाल बिल्डिंगच्या आवारात ७ जानेवारी १९४७ रोजी रात्री ८.३० वाजता जाहीर सभेने झाला. ही सभा राष्ट्र सेवा दल– मुंबई, कॉग्रेस–सोशालिस्ट पार्टी, मातंग सेवा मंडळ, सातारा जिल्हा राष्ट्रीय संघ, कुलाबा जिल्हा राष्ट्रीय संघ आणि जी वॉर्ड कॉग्रेस कमिटी–मुंबई अशा एकूण ३२ संस्थांच्या वतीने

११. पी.आर. बेहेरे (संपा), नवशक्ती, पूर्वोक्त, दि. १५ मे १९४६, पृष्ठ क्र. ४.
१२. कित्ता.

घेण्यात आली होती. या सभेत सुमारे १५ हजारांच्यावर जनसमुदाय हजर होता. त्यात हरिजनबंधू बहुसंख्येने उपस्थित होते.

साने गुरूजी भाषणाला सुरूवात करताना म्हणाले, "स्वराज्याच्या नुसत्या गर्जना व्यर्थ आहेत. स्वराज्याची वाट न पाहता आपणहून हरिजनांकरिता मंदिरे खुली केली पाहिजेत. या गोष्टी कायद्याने होतील ही अशा बाळगणे व्यर्थ आहे. त्याला हृदयाची म्हणजेच नैतिक कायद्याची आवश्यकता आहे. जनतेची मनोरचना बदलणे अवश्य आहे आणि त्यासाठी प्रचारकार्य होणे आवश्यक आहे. या कार्यासाठी काही माणसांनी आपले प्राणही अर्पिले पाहिजेत. नौखालित दंग्याच्या वेळी अस्पृश्यांनी सवर्ण हिंदूंकडे पाहिले नाही. त्याची प्रतिक्रिया कलकत्यात होऊन शास्त्री लोकांनी अस्पृश्यतेविरूध्द पत्रक काढले."[१३]

पंढरपूर मंदिर प्रवेशार्थ दादर येथील भरलेल्या सभेत अंतःकरणपूर्वक ओजस्वी भाषण एकदीड तासपर्यंत चाललेले होते. सर्व जनसमुदाय एकचित्ताने शांतपणे ऐकत होता. त्यानंतर साने गुरूजींची जनजागृतीची दुसरी मोठी सभा 'पुणे नगर काँग्रेस कमिटी' आणि 'पुणे हरिजन सेवक संघ' यांच्यावतीने कॉग्रेस भवनापुढील पटांगणात महर्षी धोंडोपंत कर्वे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या सभेत साने गुरूजी आपल्या भाषणात म्हणाले हरिजन मंदिरप्रवेशाचा प्रश्न आज नव्याने निर्माण झाला आहे असे नाही. इ.स. १८९५ साली सामाजिक सुधारणा बैठक अखिल भारतीय काँग्रेस अधिवेशनाच्या मंडपात भरवावी की नाही यावर बरेच रण माजले. स्वराज्य व स्वातंत्र्य मिळविणे या दोन भिन्न गोष्टी आहेत. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वराज्य कसे उपभोगता येईल हा महत्वाचा प्रश्न आहे. इ.स. १९३२ साली महात्मा गांधीनी उपवास करून देशात प्रचंड लाट निर्माण केली व अस्पृश्यता निवारणाच्या कामाकरीता आध्यात्मिक भांडवल दिले. श्रुती–स्मृतींचा खल करून धर्मात अस्पृश्यतेला स्थान आहे की नाही याचा महापंडितांनी खल करीत बसावे. मी हृदयाचा कायदा ओळखतो. हा माणुसकीचा सवाल आहे.[१४]

मंदिर प्रवेश विशेषांकातील आठवणी दररोज तीन–चार तास सभा होत. गुरूजी प्रत्येक सभेत तीनचार तास सतत बोलत असत. सतत दौरा चालू असल्यामुळे दौऱ्यातील धूळ आणि भाषणाचा ताण यामुळे गुरूजींचा आवाज बसत असे, तशाही परिस्थितीत गुरूजी शरीराची पर्वा न

१३. आत्माराम वाळींजकर, साने गुरूजी आणि पंढरपूर मंदिर प्रवेश चळवळीचे अध्यात्म, डिंपल पब्लिकेशन, पृष्ठ क्र. २१८.
१४. कित्ता, पृष्ठ क्र. २२०.

करता सतत बोलत राहत. शाहीर लीलाधर हेगडे म्हणतात, आम्ही गात असता गुरूजी पाठीमागे उभे राहून आम्हाला साथ करीत, झांज वाजवत, असे भाग्य आमच्याखेरीज कुणाला मिळाले आहे का? गुरूजी तुमचा आवाज बसला आहे. तुम्ही विश्रांती घ्या, असे सांगूनही ते ऐकत नसत. रात्रीचा आमचा कार्यक्रम पूर्ण होईपर्यंत थांबत. मुलांना जागरण घडवून आपण झोपावे ही कल्पना गुरूजींना असह्य होई.[१५]

या दौऱ्यात अनेक ठिकाणी हरिजनांना मंदिरे उघडण्यात आली. विहिरी खुल्या झाल्या, असे काही घडले की गुरूजी आनंदाने प्रसन्न होत असत. जानेवारी ते एप्रिल असे सलग चार महिने हा तुफानी प्रचार दौरा यशस्वी झाला. प्रत्येक जिल्ह्यात त्यांनी आपला ठसा उमटविला.

अशा तऱ्हेने ठाणे, कुलाबा, रत्नागिरी, दक्षिणी संस्थाने, नाशिक, पूर्व पश्चिम खानदेश इत्यादी सर्व जिल्ह्यातून गुरूजीबरोबर हे महाराष्ट्रशाहीर पथक सतत फिरले आणि गुरूजींच्या राष्ट्रीय कार्यात त्यांना साथ देऊन आपल्या कर्तव्याची भूमिका पार पाडली.

या कालखंडात गुरूजींनी महाराष्ट्रात एकूण ४०० पेक्षा अधिक सभा घेतल्या. वारकरी, भजनी, आणि साहित्यिक मंडळीनीही गुरूजींना मनापासून पाठिंबा देऊन सहकार्य केले.

मंदिरप्रवेश चळवळीचा दौरा संपला, तर बडव्यांनी एवढ्या प्रचंड बहुमतास झुगारून देऊन, मंदिराचे दरवाजे उघडलेच नाहीत त्यामुळे गुरूजींनी आपल्या निश्चयानुसार उपवासाला बसणे भाग पडले. आपल्या महाराष्ट्र दौऱ्यातील भाषणांचा गोषवारा गुरूजींनी स्वतः तयार करून नवयुग साप्ताहिकाकडे पाठविला. व तो गोषवारा नवयुग मंदिरप्रवेश विशेषांक दिनांक ४ मे १९४७ च्या अंकात प्रसिध्द झाला त्यातील महत्वाचा भाग पुढीलप्रमाणे –

"आगाखान राजवाड्यात बंदिस्त असताना १९४२ च्या फेब्रुवारी महिन्यात महात्माजींचा उपवास सुरू होता. त्या उपवासातील त्यांचे शब्द तुम्हास माहित आहेत? माझ्या कानांवर आले होते.

महात्माजी म्हणाले, बाहेर लढा थांबवा. लोकांना काही करता येत नसेल तर त्यांनी मरावे. ब्रिटिश सत्तेचा वीट आला असेल तर व्हाइसरॉयच्या बंगल्यासमोर जाऊन डोकी फोडून त्यांनी प्राण

१५. प्र.के अत्रे (संपा), नवयुग, (मंदिर प्रवेश विशेषांक), पूर्वोक्त, पृष्ठ क्र. ६.

द्यावे. परंतू गुलाम होऊ नये. हाराकिरी भ्याडाची नसून शूराची असते हे जपान्यांनी जगास दाखविले आहे. असे ते तळमळीचे उद्‌गार होते. पूज्य विनोबाजींना हे उद्‌गार लिहून मी कळविले की अस्पृश्यतेची गुलामगिरी नष्ट करायला मला परवानगी द्या. आठमहिन्यांपूर्वी मी त्यांना विचारले, त्यांनी धीर धरायला सांगितले. कोठवर धीर धरायचा? कार्तिकी एकादशी जवळ येत होती. दिल्लीला हरिजन पुढारी जोगेन्द्र मंडल म्हणाले, आम्ही हिंदूधर्म सोडून जाऊ लीग पुढारी म्हणाले सारे आमच्या धर्मात या. हिंदूधर्माची ही विटंबना मला सहन होईना. परंतू स्पृश्य हिंदूच्या अनुदारपणामुळे ही विटंबना होत होती. आपण प्राण फेकावे असे मनात आले. इतक्यात खानदेशाचे एक थोर कार्यकर्ते श्री. सीतारामभाऊ चौधरी हिमायलयाची पायी यात्रा करून पंढरपूरचे मंदिर उघडावे म्हणून तेथे खटपटीस गेले होते. त्यांनी मला लिहिले, तुम्ही असाल तर मला हिंमत चढेल. बळ चढेल या. मी मनात म्हटले माझ्याजवळ कोणते बळ ? मी का बडवे मंडळीजवळ शास्त्रार्थ करीत बसू? देवाजवळ सारी लेकरे जाणे ही का चर्चेची वस्तू? आपले प्राण हातात घेऊन उभे रहावे एवढेच आपले बळ. आणि मी उपवास सुरू केला."[१६]

गुरूजी पुढे म्हणतात, "पंढरपूरचे मंदिर हरिजनांना मोकळे व्हावे म्हणून मी मरायला उभा राहिलो. पंढरपूर म्हणजे महाराष्ट्राचे हृदय. महाराष्ट्राच्या जीवनाची ही किल्ली. पंढरपूरची कळ दाबली तर महाराष्ट्रभर प्रकाश पडेल असे मनात आले. पंढरपूर म्हणजे दक्षिणेची काशी. येथील पांडूरंगाचे मंदिर अति प्राचीन. जवळजवळ अडीच हजार वर्षांचे. बडवे मंडळी तेथे येऊनच दोन वर्षे झालीत. बडवे मंडळी कर्नाटकातून आली. पंढरीचे वारकरी तिकडेही आहेत. कानात मकरकुंडले घालण्याची दक्षिणेकडचीच पध्दती. आद्य शंकराचार्य पांडूरंगाच्या दर्शनार्थ आले होते. त्यांनी पांडुरंगाष्टक स्त्रोत्र केले आहे. देवा, कमरेवर हात ठेवून माझ्या भक्तांना संसारसागर कमरेइतकाच खोल आहे असे का तू दाखवीत आहेस. असे त्यांनी त्यात म्हटले आहे. पंढरपूर. अंबरीष राजा बार्शीचाच. अंबरीषासाठी भगवान आला. पुंडलीकासाठी पंढरपूरचे परब्रम्ह आले. असे प्राचीन पवित्र मंदिरच देवाच्या सर्व लेकरांना मोकळे व्हावे म्हणून मी उपवास सुरू केला होता."[१७]

४.१.३ उपोषणाविषयी मत – मत्यांतरे

हरिजनांना मंदिरप्रवेश मिळावा आणि पंढरपूरचे मंदिर सर्वांना खुले व्हावे म्हणून सर्व हिंदू

१६. साने गुरूजी, मंदिर प्रवेशाची भाषणे व इतर, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. १२, १३.
१७. कित्ता, पृष्ठ क्र. १३, १४.

बांधवांना हृदयाची हाक घालण्यासाठी साने गुरूजींनी दि. ७ जानेवारी १९४७ पासून संबंध महाराष्ट्रात दौरा काढला व संपूर्ण महाराष्ट्राभर प्रचार केला.

दैनिक केसरी वर्तमान पत्रातील वृत्त, "महाराष्ट्रातील वारकऱ्यांनी भू वैकुंठ म्हणून समजलेल्या विठोबारायाच्या मंदिरात हिंदू समाजाचेच एक घटक असणाऱ्या अस्पृश्य मानल्या गेलेल्यांना प्रवेश मिळावा अशी श्री. साने गुरूजी यांची विनंती आहे. हिंदुमहासभा व काँग्रेसच्या पुढाऱ्यांनीहि या मंदिर प्रवेशास पांठिबा दिला. असे असूनही हा धार्मिक व सामाजिक अन्याय दूर होत नाही हे जाणून श्री साने गुरूजी यांनी अन्नत्याग करून या कार्याच्या सिध्यर्थ प्राण अर्पण करण्याकरीता वैशाख शुध्द एकादशीपासून पंढरपुरात उपोषण सुरू केले आहे. साने गुरूजीनीच काय पण कोणीही उपोषण करून दुसऱ्यांच्या भावनांवर दडपण आणण्याचा प्रयत्न करणे तत्वदृष्ट्या बरोबर नाही, हे आम्ही पूर्वी अनेक वेळा कारणांसह स्पष्ट केलेले होतेच. पण आज त्या वादांत शिरण्याचे कारण नाही. श्री. साने गुरूजींनी जाहीररीतीने असे स्पष्ट सांगितले आहे की, हिंदूसमाजातील अस्पृश्यांबाबतच्या अन्यायी भावना नष्ट व्हाव्या म्हणून आपल्यास प्राणार्पण करावेसे वाटते व ज्याने त्याने आपला स्वधर्म आचरावा हेच पुण्य. श्री. साने गुरूजी यांना या उपोषणापासून परावृत्त करण्याकरीता सर्व प्रकारचा बुध्दिवाद करण्यात आला. पण तो ध्यानी घेऊनही त्यांना तो पटत नसल्यामुळे त्यांनी आपला निश्चय कायम केला आहे. महाराष्ट्रातील डोळस व सुबुध्द जनता या मंदिर प्रवेशांस अनुकूल आहे. काही जुन्या मतांच्या लोकांना हा मंदिर प्रवेश प्रामाणिकपणे पटत नाही हे पंढरपुरास व इतरत्र चाललेल्या सभांवरून स्पष्ट होते.अशावेळी ज्यांच्या हाती हे दरवाजे उघडण्याचा अधिकार आहे त्यांनी बदलेल्या जनमताची, नव्या राजकीय व सामाजिक युगाची खूण लक्षात घेऊन हा प्रश्न धिटाईने सोडवावा हेच युक्त व इष्ट आहे." [१८]

गुरूजींच्या महाराष्ट्रातील पंढरपूर मंदिरप्रवेशाचा जनजागरण दौरा म्हणजे स्वातंत्र्यलढ्यातील शेवटचे पर्व म्हटल्यास वावगे ठरणार नाही. अर्थात ही गुलामगिरीविरूध्द लढाई स्वकीयाविरूध्द होती, गुरूजींच्या सभा गावोगावी होत होत्या. आजूबाजूच्या खेड्यातील लोक तेथे जमत असत. गुरूजी तेथील सभेत आपले हृदय लोकांसमोर उघडे करून बोलत असत. हरिजनांच्या हीन-दीन परिस्थितीचे वर्णन करून त्यांच्यावर होणारे अन्याय, त्यांची मानहानी व अवमान, त्यांची कुचंबणा व त्यामुळे त्यांचा झालेला अधःपात गुरूजी लोकांना पटवून देत असत.

१८. दामोदर विश्वनाथ गोखले (संपा), केसरी, पुणे, दि. ६ मे १९४७, पृष्ठ क्र. ५.

अशा रितीने सभेत अनुकूल असणाऱ्यांचा हात उंच करून त्यांचा पाठिंबा घेण्यात येई व छापील पत्रकावर जास्तीत जास्त सह्या घेण्यात येत.

साने गुरूजी मंदिरप्रवेशासाठी उपोषण करणार या बातमीमुळे समाजात उलटसुलट प्रतिक्रिया उमटल्या. सनातन्यांनी साने गुरूजींचा हा फार्स म्हणजे निवळ ढोंग आहे असे बोलू लागले. खुद्द कॉंग्रेसमधील काही पुढाऱ्यांनी उपोषण करून साने गुरूजीना नावलौकिक मिळवायचाय असा आरोप केला. केसरीमधील वृत्त श्री साने गुरूजीनी आपल्या प्रतिष्ठित उपोषणास सुरूवात केली असून आपल्या उपोषणाबरोबर अनुशंगिक येणाऱ्या सर्व अपेक्षित घटना कमी जास्त प्रमाणात पंढरपुरात चालू आहेत. उपोषणाच्या तत्वज्ञानाचे उपासक व तज्ञ श्री अप्पासाहेब पटवर्धन, श्री शंकरराव दबे, श्री विनोबाजी भावे, यांनी सुध्दा हे उपोषण त्यांच्या शास्त्रांत बसत नसल्याने व इतर कारणांनीही थांबवावे असे त्यांस सांगितले आहे. या शास्त्राचे एकमेव प्रणेते व अधिकारी गांधीजी यांनीही उपोषण त्यांच्या विचाराच्या चौकटीत बसत नाही अशी तार केली असून त्यांना स्व दस्तुरचे पत्रही लिहिले आहे. या पत्रात बुध्दिवाद केला आहे. आपल्या तारेचा उपयोग होत नाही व श्री साने गुरूजी आपले ऐकत नाही हे जाणुन गांधीजीनी ईश्वराने तुम्हास सन्मति द्यावी असेही लिहिले आहे. आपण कोणाचाही ऐकणार नाही. कारण स्वतःच्या प्रवृत्तीला अनुकरणे हा श्रेयस्कर स्वधर्म, दुसऱ्याच्या सांगण्याने चालणे हा भयावह परधर्म असे गुरूजीचे ठाम मत आहे. मुंबईचे मुख्य प्रधान श्री बाळासाहेब खैर यांनी वरील गोष्ट लक्षात घेतली. कायद्याने आता अस्पृश्यांना मंदिर प्रवेश मिळणार म्हणून तुमचे उपोषण असमर्थनीय आहे असे लिहिले आहे. अशा परिस्थितीत श्री. साने गुरूजी यांनी पुन्हा उपोषणाचा फेरविचार करावा हे युक्त होय. मंदिराच्या विश्वस्तांनी व बडव्यांनी काळ, वेळ व जनमत लक्षात घेऊन कायद्याने जी गोष्ट पुढे मागे होणे अटळ आहे ती आजच करावी व मंदिर पूर्ण करण्याचे श्रेय घ्यावे हे इष्ट होय.[१९] मात्र समाजसुधारकांचा चांगलाच पाठींबा मिळाला संत तुकडोजी महाराजांनी जाहीर केले की, जोपर्यंत हरिजनांना मंदिराचे दरवाजे उघडले जात नाही तोपर्यंत मी ही मंदिरात पाऊल ठेवणार नाही. या संदर्भात त्यांनी चिटणीसांकडून एक पत्र दि. २४ जाने. १९४७ रोजी प्रसिध्द केले त्यातील मजकूर खालीलप्रमाणे

"हरिजनांना मंदिरे मोकळी व्हावीत या दृष्टीने आमच्या गुरूदेव सेवा मंडळाने सर्वांच्या

१९. कित्ता.

अनुमतीने एक वर्षापूर्वीचे कार्य हाती घेतले आहे व त्यानुसार प्रसार चालू आहे. ज्यावेळी हरिजनांना मंदिर खुले होईल. त्यावेळीच मी मंदिरात जाऊन पांडुरंगाचे दर्शन घेईन. गुरूदेव सेवा मंडळांच्या बैठकीत श्री. साने गुरूजीच्या कार्यास पाठींबा देण्याचा ठराव संमत करण्यात आला. आम्ही या प्रयत्नांत मंदिर प्रवेशास अनकूल असलेल्या पाच लाख लोकांच्या सह्या मिळवून देऊ अशी आम्हास उमेद आहे ." [२०]

दि. १८ एप्रिल १९४७ मध्ये साने गुरूजींनी उपोषणाविषयी केलेले निवेदन दि. २७ एप्रिल १९४७ नवयुगमध्ये प्रसिध्द झाले त्यातील मजकूर, "पंढरपूरचे मंदिर हरिजनांना मोकळे व्हावे म्हणून कार्तिक शुध्द ११ ला मी उपवास सुरू केला होता. उपवासाचा विचार मागील वर्षाच्या वैशाखापासून माझ्या मनात घोळत होता. पूर्व खानदेशात अंतुर्ली येथे सेवादलाचे शिबीर मागील वर्षाच्या मे महिन्यात भरले होते. तेथे मी बोललो होतो की अस्पृश्यता जावी म्हणून मी उपवास करून लवकरच निघून जाईन. खानदेशात त्यावेळेस हिंडताना ही गोष्ट अनेक वेळा मी बोललो होतो. चाळीसगावच्या नि वाईच्या कार्यकर्त्यांच्या शिबिरातही उपवास करण्याचे माझ्या मनात सारखे येत आहे, असे मी म्हटले होते. शेवटी एक निमित्त कारण होऊन कार्तिक शुध्द ११ ला मी उपवास जाहीर केला. हे प्रयोजन इतकेच की कोणा समाजवादी लोकांच्या सांगण्यावरून मी उपवास सुरू केला नव्हता. ते तर मला सांगायला आले की करू नका. तरीही मी ऐकत नव्हतो. शेवटी सेनापती जेव्हा म्हणाले की तुम्ही सहा महिने थांबणार नसाल, तर तुमचा उपवास सुटावा म्हणून मी उपवास सुरू करतो. तेव्हा मी थांबलो."[२१]

विठ्ठल मंदिराच्या बडव्यांनी, लोकमतांचा कौल मिळाला, तर आम्ही विठ्ठल मंदिरात हरिजनांना प्रवेश देऊ असे जाहीर केले हा त्यांचा डावपेच होता हे गुरूजींना माहित असूनही मंदिरप्रवेशाच्या बाजूने जनमत संघटीत करायला त्यांनी सुरवात केली. साने गुरूजी व सेनापती बापट यांनी गावोगावी प्रचारसभा घेऊन रान उठविले होते. पुण्यातील लॉ कॉलेजमध्ये महर्षी अण्णासाहेब कर्वे, बॅ. जयकर, सेनापती बापट, अच्युतराव पटवर्धन साने गुरूजी तात्यासाहेब केळकर आणि पंढरपूर मंदिरातील विश्वस्तांसह निमंत्रितांशी सभा घेतली. त्यापुढे लोकमताचा कौल मांडण्यात आला मात्र बडव्यांनी तो मान्य केला नाही व मंदिरप्रवेशाला मान्यता दर्शविली नाही.

---

२०. कित्ता, दि. १० मे १९४७, पृष्ठ क्र. ६.

२१. प्र.के. अत्रे (संपा), नवयुग (मंदिर प्रवेश विशेषांक), पूर्वोक्त, पृष्ठ क्र. ६.

दि. २ मे १९४७ च्या केसरीमधील वृत्त श्री. साने गुरूजींचे प्राण वांचविण्याच्या दृष्टीनेच नव्हे तर हा मंदिरप्रवेशाचा व अस्पृश्यतानिवारणाचा प्रश्न कायद्याच्या अधिकाऱ्याने सोडविण्याची जबाबदारी केव्हाही सरकारवर म्हणजे खेर मंत्रिमंडळावरच आहे. पंढरपूरच्या बडव्यांनाच मंदिर प्रवेशास परवानगी देण्याचा अधिकार कसा आहे हे स्पष्ट नसले तरी त्यांचे म्हणणे असे आहे की, पंढरपूरच्या मंदिराच्या व्यवस्थेबाबत सरकारनेच एक योजना करून दिली आहे व त्यांत अस्पृश्यांना मंदिर प्रवेश करून देण्याची सोय नाही. असे असेल तर सरकारने हा कायदेशीर अडसर वटहुकुमाने दूर करून मार्ग मोकळा करावा, अशा अनेक सूचना कायदेपंडितांनी व इतरांनीही केल्या आहेत. खेर–मंत्रिमंडळाने अस्पृश्यतेचे उच्चाटन व्हावे म्हणून पूर्वी एक कायदा केला आहे. मंदिर–प्रवेशा बाबतही बिल विधिमंडळात मांडलेले आहे. ते गेल्या अधिवेशनात मंजूर झाले असते तर आज हा पेच निर्माणही झाला नसता. म्हणून पुढे तो कायदा हुकुमी बहुमताने मान्य होणारच हे लक्षात घेऊन आज वटहुकुम काढून मंदिरप्रवेश होऊ द्यावा अशी त्यांना अनेकांकडून आग्रहाची विनंती केली जात आहे. लोकमताची साथ त्यांना मिळेलच. घटना–परिषदेच्या चालू बैठकीतही अस्पृश्यता सर्व स्वरूपात नष्ट करण्याचे ठरले आहे. खेर–मंत्रिमंडळ हा प्रश्न कसा सोडविते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. श्री. साने गुरूजी या योगे उपोषणापासून निवृत्त होतीलच असे नाही. कारण त्यांना अस्पृश्यतेच्या भावनेवरच गदा घालावयाची आहे. सध्याच्या गंभीर राजकीय संकटाच्या काळी हा ही एक प्रश्न उभा राहिला ही एक दुर्दैवी घटना होय.[२२]

दरम्यान, मुंबईच्या असेब्लीत हरिजन मंदिरप्रवेशाचे बिल मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांनी मांडले पण कायदा करून अस्पृश्यता दूर करणे हे गुरूजींना पटण्यासारखे नव्हते. मंदिरप्रवेशाच्या निमित्ताने आपल्या हृदयाची कवाडे उघडायला हवीत. समाजातील सर्व भेदाभेद स्वयंस्फुर्तीने दूर व्हावा ही गुरूजींची इच्छा होती. मुंबई येथील प्रचार सभा उद्घाटन समारंभामध्ये गुरूजी म्हणाले की, कायद्याने सार्वजनिक देवालये खुली व्हावीत किंवा काळाच्या ओघात ती आपोआप खुली होतील असे काहीजण म्हणतात. पण कायद्याची मदत घेणे, किंवा काळाची वाट पाहणे मला स्वतःला पसंत नाही. कारण त्यांत सौंदर्य नाही, हृदयाची, मानव्याची जाणीव नाही, माणसाच्या बुध्दीची प्रगल्भता नाही. औदार्य नाही, सहृदयता नाही. स्पृश्य समाजाने आपण होऊन कार्य केल्यास हरिजनांना त्यात आनंद वाटेल. म्हणून मंदिराला मंदीरत्व आणण्यासाठी, मंदिराचे पावित्र्य

२२. दामोदर विश्वनाथ गोखले (संपा), केसरी, पूर्वोक्त, दि. २ मे १९४७, पृष्ठ क्र. ६.

वृध्दिंगत करण्यासाठी आपण ही गोष्ट कायद्याची व काळाची मदत न घेता केली पाहिजे. यातच राष्ट्राचे हित आहे. कोणतीही गोष्ट कायद्याने झाली की त्यात प्रेम व अंतःकरणाची सहानुभूती नसते. म्हणून कायद्यापेक्षा अंतःकरणाच्या ओलाव्याने हा प्रश्न सुटला पाहिजे. धर्माच्या, स्वातंत्र्याच्या, माणुसकीच्या, कुठल्याच तत्वावर या काळात अस्पृश्यता टिकू शकत नाही. हरिजनांना जरी आर्थिक समता आली तरी जोपर्यंत स्पृश्यांच्या मनातील अस्पृश्यता नष्ट झाली नाही, तोपर्यंत हरिजनांना प्रश्न सुटणार नाही. दि. २६ जानेवारी स्वातंत्र्य दिनाच्या मंगल प्रसंगी हजारो देवळे, विहीरी, उपहारगृहे, हरिजनांना मोकळी व्हावीत, अशी जनताजनार्दन परमेश्वराला प्रार्थना! असे सांगून गुरूजींनी आम जनतेला हात जोडून आपले भाषण संपविले.[२३]

वैशाख शुध्द एकादशी म्हणजे दि. १ मे १९४७ हा जाहीर केलेला उपोषणाचा दिवस जवळ येत चालला होता. नियमाप्रमाणे श्री. साने गुरूजी पंढरपुरीतून पुढे महाराजांच्या चारधाम मंडपातील विठ्ठलाच्या पायांशी बसून दि. १ मे पासून उपोषणास सुरूवात केली. उपोषणापूर्वी साने गुरूजींनी बडवे मंडळीच्याकडे एक लेखी प्रश्नपत्रिका पाठविली होती. त्याचे उत्तर बडवेमंडळीकडून समाधानकारक आले नाही. विनोबा भावेनी प्राणांतिक उपोषणाचा बेत रद्द करावा. अशी मागणी केली मात्र गुरूजी आपल्या निश्चयाशी पक्के राहिले. हरिजनांनी पांडुरंगाच्या देवळांत घुसू नये म्हणून देवालयाची दारे बंद करण्यात आली आहेत. व गावांत हत्यारी पोलिसांचा पहारा होता. साने गुरूजींच्या उपोषणांची बातमी म. गांधीपर्यंत पोहचली.

४.१.४ पंढरपूर सत्याग्रहासंबंधी काँग्रेस पुढाऱ्यांची मतमतांतरे

१ मे १९४७ हा उपोषणाचा दिवस जसजसा जवळ येऊ लागला तसतशी साने गुरूजींना उपोषणापासून परावृत्त करण्यासाठी सनातनी व काँग्रेस पुढाऱ्यांची बरीच धावपळ होऊ लागली. महाराष्ट्र हरिजन सेवक संघाचे अध्यक्ष श्री. काकासाहेब बर्वे यांनी गुरूजींना उपोषणापासून परावृत्त करण्यासाठी प्रयत्न करण्याची विनंती तार म. गांधीजींना केली. त्याचप्रमाणे २९ एप्रिल १९४७ ला काँग्रेस नेते शंकरराव देव यांनी ही म. गांधीजींना साने गुरूजींचा पत्ता कळवनू उपोषणापासून परावृत्त करण्यास तारेद्वारे विनंती केली. दि. १ मे १९४७ रोजी म. गांधीजींनी गुरूजींना उपोषण थांबविण्यासाठी तार केली. त्या तारेमधील मजकुर माझ्यापुढे जी वस्तुस्थिती

२३. आत्माराम वाळींजकर, साने गुरूजी आणि पंढरपूर मंदिर प्रवेश चळवळीचे अध्यात्म, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. २२१.

आली आहे ती पाहता तुमचे उपोषण पूर्णतः चुकीचे आहे..... कृपा करून उपोषण थांबवा... त्याचवेळी म. गांधीजीनी श्री. काकासाहेब बर्वेना १ मे १९४७ ला तारेद्वारे कळविले. की, ... उपोषण पूर्णतः असमर्थनीय आहे. याबद्दल माझ्या मनात शंका नाही. कृपया साने गुरूजींना परावृत्त करा आणि तार करा. इ.स. १९३८–१९४० च्या काळात गुरूजीनी श्रमिकांच्या मुलभूत न्याय हक्कांसाठी काँग्रेस मंत्रिमंडळाची भीड न बाळगता शेतकरी व गिरणी कामगारांचे प्रश्न स्पष्टपणे मांडून ते सोडविण्याचा प्रयत्न केला. कम्युनिस्ट नेत्यांना ही गोष्ट आवडत असे म्हणून काँग्रेसवाद्यांनी सोयिस्करपणे साने गुरूजी आता कम्युनिस्ट झाले आहेत, असा समज करून घेतला होता. त्यामुळे साने गुरूजीबरोबरचे काँग्रेस जेष्ठांचे मतभेद वाढतच गेले. त्याचाच परिणाम म्हणून काँग्रेस श्रेष्ठीने गुरूजींचे उपोषण हे निष्क्रिय आहे व गुरूजी त्या उपोषणाने काँग्रेस मंत्रिमंडळ अडचणीत येण्याची शक्यता आहे. म्हणून काँग्रेस श्रेष्ठीने गुरूजींचे उपोषण थांबविण्यासाठी प्रयत्न केले.

श्री. जयप्रकाश नारायणांनी श्रीमती अरूणा असफअली यांना पत्र पाठवून साने गुरूजीची उपोषणाची भुमिका स्प्ष्ट करताना लिहितात.

मुंबई ०६/०५/१९४७

प्रिय अरूणा,

महाराष्ट्र हरिजन सेवक संघाचे अध्यक्ष काकासाहेब बर्वे यांनी गांधीजींना लिहिलेल्या पत्राची प्रत सोबत देत आहे. हे पत्र पंढरपूर येथून पाठविले असल्याने अद्याप गांधीजीपर्यंत पोहचले नसण्याची शक्यता आहे. साने गुरूजींच्या उपोषणातील भूमिका या पत्रात अत्यंत व्यवस्थित व स्पष्ट शब्दांत मांडण्यात आली आहे. गुरूजींची बाजू गांधीजीकडे मांडण्यास या पत्राचा उपयोग होईल तुम्ही हे पत्र यांना दाखवू शकता.

अच्युत सध्या येथे नाही. त्यामुळे मी हे पत्र पाठवत आहे. अण्णांसाहेबांनी (सहस्त्रबुध्दे) मला या पत्राची प्रत दिली.[२४]

तुमचा जयप्रकाश

पुढे श्री जयप्रकाश नारायणांनी साने गुरूजींच्या उपोषणाला समर्थनाचे पत्रक लिहिले.

---

२४. सुधा बोडा (संकलन), प्यारेलाल पेपर्स, साने गुरूजींचा मंदिर प्रवेश लढा, पृष्ठ क्र. ११२.

त्यात लिहितात साने गुरूजी तरूण महाराष्ट्राचे दैवत आहेत. त्यांच्यात उदातता व मानवता यांच्यात श्रेष्ठ यासाठी संघर्ष चाललेला असतो. पंढरपूरचे मंदिर हरिजनांच्यासाठी मुक्त केले जावे म्हणून ते १ मे पासून उपोषणास बसले आहेत. हे उपोषण प्राणांतिक आहे. गुरूजींची प्रकृती उत्तम आहे. असे मला कधीच आढळले नाही. त्यामुळे मला भय वाटते की, आठ दिवसांच्या प्रायोप्रवेशानंतर त्यांची प्रकृती चिंताजनक झाली असेल प्रत्येक भारतवासियाला यामुळे चिंता वाटणे स्वाभाविक आहे. या उदात वृत्तीच्या मानवाचे प्राण कसे वाचवावेत याचा घोर प्रत्येकाला लागणे स्वभाविकच आहे.

गांधीजीनी गुरूजींच्या उपवासाबद्दल नापसंती व्यक्त केली आहे. हे खरे आहे तथापी परिस्थितीचे गांभीर्य त्यामुळे यत्किंचितही कमी होत नाही. भारताच्या या उदात व विनित पुत्राचे प्राण शनैःशनैः अस्तंगत होत आहेत. तेव्हा पसंती नापसंतीचा प्रश्न सोडून संबंध हिंदू समाजाच्या अधःपतनाला कारणीभूत असलेला व हिंदू समाजाचे अस्तित्वच धोक्यात आणणारा हा अन्याय कसा दूर होईल यासाठी सामान्य जनतेची सद्सदविवेक बुध्दी जागृत करण्याची विवंचना सर्वांना वाटणे स्वभाविकच आहे. मुंबई सरकारने व महात्माजींनी गुरूजींना उपवास आपले वैयक्तिक व नैतिक कर्तव्य पूर्ण करण्यासाठी आरंभला आहे. या दोघांनी मंदिराच्या विश्वस्तांना उपदेश करू नये हे आश्चर्यजनक आहे. कारण हे विश्वस्त भंयकर सामाजिक अपराध करत असून एक अमूल्य जिवित धोक्यात आणत आहेत. प्रांतिक सरकारचा कायदा मंदिरप्रवेशाचा प्रश्न सोडवू पाहतो. पण महात्माजींनी व सरकारने विश्वस्तांवर दबाव आणून, दडपण आणून, जे पुढे त्यांना कायद्याच्या प्रावधानामुळे अपरिहार्यपणे करावे लागणार आहे. ते त्यांनी आताच स्वेच्छेने करायला हवे असा आग्रह वस्तुतः करायला हवा होता. मी सर्व संबंधीतांना व विशेषतः महाराष्ट्राच्या जनतेला आवाहन करू इच्छितो की ज्या अन्यायाच्या पोटी गुरूजी आपले प्राण पणाला लावायला सिध्द झाले आहेत. तो अन्याय त्यांनी तत्काळ दूर केला पाहिजे व गुरूजींचे जीवन पूर्ववत देशसेवा करण्यासाठी वाचविण्याचा अथक प्रयत्न केला पाहिजे स्वच्छेने केलेले कोणतेही सत्कृत्य व्यक्तीचीच नव्हे तर समुदायाची उंची वाढवायला कारणीभूत होते. उलट हे कृत्य बाह्य दडपण्यासाठी केले तर त्यामुळे नैतिकतेची पातळी खाली येते. म्हणूनच मला वाटते की आगामी कायद्याची सबब सांगून काही न करणे व गुरूजींच्या वरच उपवास सोडण्यासाठी दबाव आणणे उचित नाही. कारण गुरूजींनी हा मार्ग

खोल व प्रदिर्घ विचारांनी व भक्तीभावाने ओतप्रोत होऊन अंगिकारला आहे.[२५]

मुंबई ९/५/१९४७

साने गुरूजींच्या उपोषणाला यश आले. वर्तमानपत्रातील बातम्या वाचून महात्मा गांधीनी दि. ११.०५.१९४७ च्या तारेत लिहितात

सादेपूर, दि. ११/५/१९४७

आज पहाटेच तुमचे (३ मे १९४७) पत्र वाचले मला ते खूप आवडले. नंतर वृत्तपत्रातील बातम्याही वाचल्या. विश्वस्तांनी केलेल्या कृतीनंतर तुम्ही उपोषण मागे घेतले आहे. तुमची इच्छा पूर्ण झाल्याबद्दल ईश्वराचे आभार[२६]

म. गांधी

श्री दादासाहेब मावळकरांनी साने गुरूजींचे उपोषण यशस्वी संपले व त्यांच्या प्रकृतीची चिंता नको. ते लवकरच पुण्याला परतत आहे. याविषयी महात्मा गांधीना लिहिलेला पत्रातील मजकुर.

पंढरपूर

१०.०५.१९४७

महात्मा गांधी,

ठक्करबाप्पा, आप्पासाहेब पंत व रावसाहेब पटवर्धन यांच्याबरोबर सकाळी येथे पोहोचलो. श्रीविठ्ठलाच्या आशीर्वादामुळे मंदिराच्या विश्वस्तांनी हरिजनवासी ॲक्ट १९३८ प्रमाणे जाहीरनामा (डिक्लेरेशन) शपथपत्र (ॲफिडेव्हिट) केले आहे व श्री. साने गुरूजी यांनी आपले उपोषण संपविले आहे. आज रोजी वर्तमानपत्रांना दिलेले निवेदन वाचावे. सानेंची प्रकृती अशक्त आहे. हृदयावर थोडा परिणाम झाला आहे, परंतू चिंतेचे कारण नाही. पुण्याला सकाळी परतत आहे.[२७]

मावळंकर

शेवटी विनोबा भावेनी साने गुरूजींना अभिनंदन पत्र पाठविले त्यातील मजकूर

२५. पी.आर.बेहेरे (संपा), नवशक्ती, पूर्वोक्त, दि. १० मे १९४७, पृष्ठ क्र. २.
२६. सुधा बोडा (संकलन), प्यारेलाल पेपर्स, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. ११४, ११५..
२७. कित्ता, पृष्ठ क्र. १४०

ता. १३.०५.१९४७

गुरूजी,

तुम्हाला यश मिळाले, ईश्वराचे अनंत उपकार! याहून वेगळ्या परिणामांची मी कल्पनाच केली नव्हती. हिंदूधर्म सत्–पुरूषांना क्रूसावर चढवीत नाही, ही माझी श्रध्दा मी तुम्हाला मागेच कळविली होती. माझी अनुकूलता ह्यावेळी नव्हती. ती वेगळ्या मुद्द्यावर. पण ती गोष्ट आपण सोडून देऊ.

एकदा प्रचीती आल्यानंतर माझी अशी विनंती आहे की ह्यापुढे पुन्हा सहसा देवाला संकटात टाकू नये. संत तुकारामाने एकदा असेच धरणे धरले होते. तेरा दिवसांच्या उपवासानंतर त्याची कामना देवाने पुरविली. त्यांच्या अंभंगाच्या वह्या कोरड्या निघाल्या . तो देवाला म्हणाला, देवा, मी पुन्हा तुम्हाला कष्ट देणार नाही.

उपवासावादी सत्याग्रहांचा मला परिचय असला तरी माझी मनोवृत्ती संत तुकारामाच्या ह्या भावनेशी जुळते. निष्काम सेवा करीत रहावी. ईश्वराची सत्वपरीक्षा निदान एकदा अनुभव आल्यानंतर तरी पाहू नये असे मला वाटते. पाहा, हा विचार पटला तर.

मधूनमधून इकडे येऊन राहण्याचे माझे आमंत्रण विसरले जाऊ नये. यायचे म्हणजे विनाकारण यायचे. वर्तमान आणि वृत्ती मात्र मला नियमित कळवत राहावे, ही माझी मागणी आहेच.

उपवासाच्या काळात ज्यांनी ज्यांनी मेहनत घेतली त्या सर्वांना माझे अभिनंदन ![२८]

केसरी वर्तमान पत्रातील महात्मा गांधीजींच्या तारेविषयी वृत्तांत पंढरपूरचे विठ्ठल मंदिर हरिजनांना खुले होणार आहे. लोक काय म्हणतील हे मनांत न आणतां आपण आपले उपोषण थांबवा व ही वार्ता मला तारेने कळवा. मला आपल्या उपोषणासंबंधीची जी काही हकीगत कळली आहे ती पाहता मला आपले उपोषण योग्य वाटत नाही. अशा अर्थाची तार म. गांधीनी साने गुरूजी यांना पंढरपुरास केली आहे. ही तार त्यांनी श्री. बाळासाहेब खेर व श्री. शंकरराव देव यांच्याशी चर्चा करून केली आहे.[२९]

इ.स.१९४७ साली पंढरपूर येथील विठ्ठल मंदिर अस्पृश्यांसाठी खुले करावे यासाठी साने

---

२८. राजा मंगळवेढेकर, साने गुरूजींची जीवनगाथा, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. ३४६, ३४७.

२९. दामोदर विश्वनाथ गोखले (संपा), केसरी, पूर्वोक्त, दि. ६ मे १९४७, पृष्ठ क्र. ७.

गुरूजीनी उपोषण केले. त्या काळावधीतील काही पत्रव्यवहार

१. महात्मा गांधीजींची साने गुरूजींना तार

दि. १ मे १९४७

माझ्यापुढे जी वस्तुस्थिती आली आहे, ती पाहता तुमचे उपोषण पूर्णतः चुकीचे आहे. पंढरपूरचे मंदिर लवकरच हरिजनांसाठी खुले केले जाईल. टिकाकार कितीही मोठे असले किंवा त्यांची संख्या कितीही असली तरी तुमचे धैर्य व महानता यांच्यापुढे त्यांचे टोमणे निष्प्रभ ठरले पाहिजेत. कृपा करून उपोषण थांबवा आणि तशी उलट तार करा.[३०]

२. साने गुरूजी यांचे महात्मा गांधीना तार

पंढरपूर दि. ३ मे १९४७

आपली तार मिळाली मला माफ करा. माझ्या निश्चयाचे पावित्र्य व सत्यावरील निष्ठा यांची सत्यपरीक्षा आता उपोषणाच्या माध्यमातून होऊ दे. मी स्वतःला आता पूर्णपणे देवाच्या हवाली केले आहे.

साने गुरूजी [३१]

३. महात्मा गांधीजींचे साने गुरूजींना पत्र

तुमची तार मिळाली माझे साधे म्हणणे तुम्हाला समजले नाही याचा मला खेद आहे. प्रारंभी चार पाच लोकांनी केलेल्या टिकेमुळे तुम्ही उपोषण सुरू करायला उद्युक्त झाला होतात व आपण मंदिर हरिजनांना खुले करावे अशी मागणी करित आहात. यात धर्म कोठे येतो. हे मला समजत नाही. काहीही असो, तुम्ही उपोषण सोडावे अशी माझी विनंती आहे.

शंकरराव व बाळासाहेब हे तुमचे मित्र आहेत. शत्रू नव्हेत अशा मित्रांचा सल्ला तुम्ही ऐकला पाहिजे. देव तुम्हाला चांगली बुध्दी देवो.[३२]

तुमचा

३०. सुधा बोडा (संकलन), प्यारेलाल पेपर्स, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. १२३.
३१. कित्ता, पृष्ठ क्र. १२५.
३२. महात्मा गांधी यांचे समग्र वाङःमय, खंड ८७, पृष्ठ क्र. ४०१.

एम. के. गांधी

४. श्री शंकरराव देव यांनी महात्मा गांधीना केलेली तार

नवी दिल्ली, दि. २९ एप्रिल १९४७, महात्मा गांधी

पंढरपूरचे विठोबाचे मंदिर खुले करावे यासाठी श्री साने गुरूजींनी सुरू केलेले उपोषण सोडावे. म्हणून महात्माजींनी त्यांचे मत कळवावे अशी विनंती काकासाहेब बर्वे यांनी तारेद्वारे केली आहे. परिस्थिती बिकट आहे. सनातनी हिंसाचार करतील अशी शक्यता आहे. गुरूजींचा पत्ता – द्वारा डॉ. जोशी उंबरगाव, ठाणे जिल्हा[३३]

शंकरराव देव

५. महात्मा गांधीजींची श्री. वि.न. बर्वे यांना तार

दि. १ मे १९४७

तुमची तार मिळाली, मी बाळासाहेब व शंकरराव यांना भेटलो आहे. उपोषण पुर्वतः असमर्थनीय आहे. याबद्दल माझ्या मनात शंका नाही कृपया साने गुरूजींना परावृत्त करा आणि तार करा.[३४]

१ मे १९४७ रोजी गुरूजींचे उपोषण चालू झाले. गुरूजींच्या उपोषणाची व्यवस्था स्टेशन रोडवरील तनपुरे महाराजांच्या मठात केलेली होती. १ मे १९४७ च्या उपोषणापूर्वी गुरूजींचे शेवटचे भाषण चंद्रभागेच्या वाळवंटात झाले. त्या सभेचे यथार्थ वर्णन राजा मंगळवेढेकर यांनी आपल्या पंढरीस वाजे घंटा या ग्रंथात केले आहे.

"शेवटी दि. १ मे १९४७ वैशाख शुध्द एकादशीचा दिवस उजाडला. गुरूजी व सेनापती मठातून निघाले. चंद्रभागेत स्नान केले. सभेची व्यवस्था वाळवंटातच केलेली होती. प्रचंड जनसमुदाय जमलेला होता. गुरूजींचे भाषण ऐकण्यासाठी उत्सुक होता. साऱ्या महाराष्ट्राचे कानडोळे पंढरपूरकडे लागले होते.

त्या दिवशी गुरूजींचे भाषण म्हणजे तुडविलेल्या समग्र माणुसकीचा कैवार घेणारा

३३. सुधा बोडा (संकलन), प्यारेलाल बदर्स, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. १२३.
३४. कित्ता.

जाहीरनामाच होता! करूणा, कळवळा याचबरोबर चीड, संताप त्यात ओतप्रोत भरलेला होता. कितीतरी पुरावे, दाखले, दृष्टांत, वचने, उदाहरणे – सारे समग्र धर्मग्रंथ, वेदोपनिषद, संत साहित्य गुरूजींच्या जिव्हेवर अवतरल होत! शब्दाशब्दातून तेजस्वी ठिणग्या फुटत होत्या. आणि धर्मांध मुर्दांड मनाला जागवीत होत्या.

प्रचंड जनसमुदाय मंत्रमुग्ध होऊन ऐकत होता. आणि मध्येच व्यत्यय आला, तो असहिष्णु सनातनांचा पं. देवनायकाचार्य, क्षीरे, वेलणकर नामक काही मंडळींनी मध्येच उठून गुरूजींना प्रश्न विचारायला सुरूवात केली. गुरूजी स्तब्ध झाले. भाषणाचा ओघा थांबला. लोक खवळले, चवताळले, सनातान्यांवर चालून गेले. आरडाओरडा होऊन गोंधळ माजला.

सेनापती व्यासपीठावर उभे राहिले. लोकांना शांत राहायला सांगितल. स्वतः व्यासपीठावरून खाली श्रोत्यांत आले. पं. देवनायकाचार्य आदी मंडळींना विनंती केली आणि लोकांनी घेरलेल्या वेढ्यांतून त्यांना हातात धरून व्यासपीठावर नेले व आपले मुद्दे मांडण्यास सांगितले. देवनायकाचार्यांनी भाषण केल. गुरूजींनी नंतर पुन्हा भाषण करून त्यांचे सर्व मुद्दे, आक्षेप, शंका खोडून काढल्या. गुरूजींच्या वाक्यावाक्याला टाळ्यांचा गेर करून जनताजनार्दन पाठींबा देत होता! ती सभा अपूर्व होती! एक सामाजिक क्रांती पंढरीच्या वाळवंटात घडत होती! ती घटना अपूर्व होती! एक सामाजिक क्रांती पंढरीच्या वाळवंटात घडत होती. ती घटना अपूर्व होती! तो क्षण अपूर्व होता! त्या क्षणाला साक्षी राहण्याचं भाग्य मला लाभल. एक विलक्षण नाट्य मी पाहिल. अनुभवल...

.....सेनापतींचे त्या वेळचे वर्तन तर महापुरूषाला शोभणारच होत. खरी ती लोकनिष्ठा ! मतस्वातंत्र्याची खरी बूज! खरीखुरी स्वतंत्र लोकशाही वृत्ती मला त्यांच्या ठायीठायी दिसून आली. आणखीन घडलेल्या घटनेनं तर मी चकितच झालो होतो!" [३५]

केसरी मधील वृत्त पंढरपुरच काय पण सर्वच मंदिरे हरिजनांना खुली करण्याचे सरकारचे प्रयत्न सुरू आहेत., म्हणून साने गुरूजीनी आपले उपोषण सोडावे अशा अर्थाचे पत्रक मुंबई सरकारने काढले आहे. गुरूजीबरोबर सेनापती बापट, हरिभाऊ फाटक, सुमतीबाई गोरे, रावसाहेब पटवर्धन, स्वामी सहजानंद भारती आणि एस.एम. जोशी अशी सुमारे पन्नास मान्यवर

३५. राजा मंगळवेढेकर, पंढरीस वाजे घंटा, साधना प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९२, पृष्ठ क्र. ५६.

स्नेहीमंडळी सोबत होती. आम्हा भोळ्या भाविक भक्तांचे हरिजन मंदिरप्रवेशासारख्या वावटळीपासून संरक्षण व्हावे या हेतूने धुळे येथील श्रीसमर्थ सेवाश्रमाचे श्री सेवक श्री. अनंतराव क्षीरे यांनी वैशाख शु. ११ पासून पंढरपुरी श्रीनारदाश्रम (श्रीरूक्मिनी पटांगणाजवळ) श्रीपांडुरंगाच्या चरणाशी बसून अखंड नाम सप्ताह, अनुष्ठान व उपोषण सुरू केले आहे. या अनुष्ठानांची समाप्ति श्री. साने यांच्या उपवास समाप्तिबरोबरच होईल. सुमारे दिडशे महिलांनीही पांडुरंगाचे देवालय भ्रष्ट होऊ नये म्हणून उपोषण सुरू केले आहे.[३६] चंद्रभागेच्या वाळवंटात एक जाहीर सभा घेण्यात आली. उपोषणाच्या काळात दिवसेंदिवस गुरूजींची प्रकृती खालावत होती. पण बडवे मंडळींना दया येण्याची शक्यता नव्हती.

दि. ६ मे १९४७ च्या केसरी वर्तमानातील वृत्त श्री. शंकरराव देव, श्री. न.वि. गाडगीळ यांनीही श्री. साने गुरूजी यांना उपोषण थांबविण्याची विनंती करणारी तार पाठविली आहे. घटना – समितीने अस्पृश्यता मानणें हा गुन्हा ठरविला असल्यामुळे आपण उपोषण करण्याचे कारण नाही असाहि त्या विद्युतसंदेशात म्हटले आहे. श्री. विश्वासराव डावरे यांनी पंढरपूर येथील फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेट कोर्टात साने गुरूजींच्या वर इ. पीनल कोडच्या ३०९ कलमाखाली फिर्याद दाखल केली आहे.[३७]

साने गुरूजींच्या उपोषणाचा आजचा पाचवा दिवस. त्यांचे वजन तीन पौंढांनी घटले आहे. अशक्तता वाढत आहे. आचार्य जावडेकर, आचार्य भागवत व श्री. अण्णासाहेब सहस्त्रबुध्दे यांचे साने गुरूजींच्या उपोषणास पाठिंबा देणारे पत्र गुरूजींना आले आहे. तनपुरे महाराजांच्या मंडपांतील पटांगणांत नगरचे सहजानंद स्वामी यांचे प्रवचन झाले. त्यांत स्वामीनी साने गुरूजींना अंगिकृत कार्यात खात्रीने यश मिळेल अशी अशा व्यक्त केली व त्यांनी गुरूजींना आशीर्वाद दिला.[३८] साने गुरुजी उपोषणाला बसले हे समजल्यावर आचार्य अत्रे गुरूजींना भेटायला पंढरपूरला आले. तेथील वाळवंटात अत्र्यांची प्रचंड मोठी सभा झाली. सभेत अत्रे अगदी पोटतिकडीने बोलले.

आज पहिल्यांदाच मी पंढरपूरला आलो आहे. देवळातल्या तुमच्या पांडूरंगाच्या दर्शनासाठी मी काही आलो नाही. देवळाबाहेर मरणाच्या दाराशी बसलेल्या आमच्या एका पांडूरंगाच्या भेटीसाठी येथे आलो आहे.... त्यांचे प्राण कसे वाचतील हा तुमच्या–आमच्यापुढे प्रश्न आहे.... या ठिकाणी

३६. दामोदर विश्वनाथ गोखले, पूर्वोक्त, ६ मे १९४७, पृष्ठ क्र. ७.
३७. कित्ता.
३८. कित्ता.

जमलेल्या विद्यार्थ्यांना मला मुद्दाम सांगायचे आहे की, त्यांनी उद्यापासून बडव्यांच्या दाराशी जाऊन धरणं धरावं. उद्या १० मे म्हणजे १८५७ च्या स्वातंत्र्य युध्दाला ९० वर्षे पूर्ण होतात. याच दिवशी विठ्ठल मंदिराची दार खुली होऊन महाराष्ट्रात नवी क्रांती होईल. अशी मला आशा आहे.[३९]

साने गुरूजीच्या उपोषणाने सर्व महाराष्ट्रात खळबळ होती गुरूजींच्या उपोषणाला पाठींबा व्यक्त करण्यासाठी प्रमुख नेत्याने ता. ३ मे ला पत्रकही पंढरपूरहून प्रसिध्द केले होते. माऊली महाराष्ट्र हरिजन सेवक संघाने अध्यक्ष श्री.व्हि. एन. बर्वे यांनी दि. ७ मे हा दिवस विठ्ठल मंदिर दिन म्हणून पाळण्यांत यावा अशी विनंती करणारे पत्रक काढले आहे. पंढरपूरमधील वातावरण तंग होते अशा प्रसंगी मध्यवर्ती कायदे मंडळाचे स्पीकर दादासाहेब मावळकरांनी बडव्यांची चर्चा केली. दादासाहेब मावळकर (स्वतंत्र भारताच्या पहिल्या लोकसभेचे सभापती) आपल्या कुंटुंबासह ५ मे १९४७ ला पंढरपूरला आले. तेथे आल्यावर श्री. बाबुराव जोशी (आमदार) यांनी दादासाहेबांना गुरूजींच्या उपोषणासंबंधी परिस्थितीची सविस्तर माहिती दिली. दादासाहेबांनी याविषयी श्री. काकासाहेब बर्वे यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. त्यावेळी त्यांच्या लक्षात आले की, मुंबई सरकारच्या १९३८ कायद्यात सांगितल्याप्रमाणे अशी व्यवस्था होती की कोणत्याही मंदिराचे विश्वस्त योग्य ठराव करून जिल्ह्याच्या न्यायाधिशांची मंजूरी मिळवून अस्पृश्यांसाठी मंदिर खुले करू शकतील तेव्हा या कायद्याप्रमाणे जर पंढरपूर मंदिराचे विश्वस्त ठराव करतील तर मार्ग निघू शकेल व साने गुरूजींचा उपवास सुटू शकेल.[४०] या निर्णयापर्यंत दादासाहेब आले होते.

इ.स. १९३८ साली काँग्रेस मंत्रिमंडळाने अस्पृश्य हिंदूना मंदिर प्रवेश हक्क मिळाला यासाठी विधीमंडळात हरिजन टेंपल वर्शिप रिमुव्हल ऑफ डिसीबिल्टिींग (हरिजन मंदिर पुजा अपात्रता निवारण) कायदा संमत केला होता. तो कायदा पुढीलप्रमणे

एखाद्या देवळाचा एकटा एक असलेला विश्वस्त अगर अनेक विश्वस्त असल्यास त्यापैकी बहुसंख्य विश्वस्त यांनी स्वतःच्या इच्छेने अथवा मंदिराशी हितसंबंध असलेल्या कोणाही माणसाच्या मागणीनुसार अमुक एका तारखेपासून सदर मंदिरात हरिजनांना अमुक एका शर्तीवर पुजा करण्यास हक्क मिळेल असे जाहीर करण्याचे मनात आणल्यास त्यापूर्वी त्यांच्यावर असलेले एकतेविरूध्द कोणेतेही बंधन हे रद्द समजण्यात येईल. पण ज्या शर्तीवर हरिजनांना परवानगी

३९. सुधा बोडा (संकलन), प्यारेलाल पेपर्स, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. ५६.
४०. कित्ता, पृष्ठ क्र. १०५, १०६.

देण्यात येईल त्या शर्ती सर्व हिंदूना सारख्याच असल्या पाहिजेत... मंदिरासंबंधी काढण्यात येणारा जाहीरनामा विश्वस्तांनी कोर्टामार्फत नोंदवून घेऊन तो सरकारी गॅझेटात प्रसिध्द केला पाहिजे. एकदा तो प्रसिध्द झाल्यावर त्या जाहिरनाम्याचे नष्ट झालेल्या हक्कासंबंधी कोणतीही फिर्याद कोर्टात घेतली जाणार नाही. मात्र जाहिरनामा काढणारा विश्वस्त हा जाहीरनामा काढण्यापूर्वी तीन वर्षेपर्यंत विश्वस्त असला पाहिजे तसा तो नसेल अथवा विश्वस्तांनी बहुसंख्या तशी नसेल तर कोर्टामार्फत सदर जाहीरनामा रद्द करता येईल.[४१]

इ.स. १९३८ हरिजन टेंपल वर्शिप रीमुव्हल ऑफ डिसविलिटीन या कायद्यानुसार विश्वस्तांनी मंदिर प्रवेशाला मान्यता देणारा अर्ज जिल्हा मॅजिस्ट्रेटपुढे ठेवला तर हरिजनांना मंदिर प्रवेश मिळू शकतो. यासाठी तसे दादासाहेबांनी प्रयत्न केले. या निर्णयाप्रत दादासाहेब आले. दादासाहेबांनी म. गांधीना पत्र पाठवून सर्व गोष्टीचा खुलासा केला. म. गांधीनी मंदिराच्या बडव्यांना मंदिर खुले करण्यासंबंधी तार केली.

मात्र अजूनही समाधानकारक तोडगा निघाला नाही. दादासाहेब कस्तुरबा स्मारक समितीच्या उपोषणाच्या मिटिंगला पुण्याला गेले. सहाव्या दिवशी वैद्यकीय तपासणी केली असता गुरूजींची प्रकृती क्षीण झालेली आढळून आली. त्यांची नाडी जलद चालत होती. काल रात्री त्यांना नीटशी झोपही लागली नाही. त्यांचे वजन उपवासाच्या आरंभापासून दहा पौडांनी कमी झालेले आढळून आले.[४२] महाराष्ट्रातील वृत्तपत्रामधून गुरूजींच्या उपोषणाविषयी बातम्या येऊ लागल्या होत्या. ७ मे १९४७ रोजी डॉ. भडकमकरांनी गुरूजींची प्रकृतीविषयी मत व्यक्त केले. आणखी थोडे दिवस उपवास असाच चालू राहीला तर गुरूजींच्या जीवास धोका उत्पन्न होण्याचा संभव आहे.[४३]

पंढरपूरमध्ये गुरूजी उपवास करत असलेल्या ठिकाण तनपुरे महाराजांच्या चारधाम मंडपाला पवित्र यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. गुरूजींचे विद्यार्थी, मित्रमंडळी, हितचिंतक व हजारो स्त्री–पुरूष शेतकरी गुरूजींच्या उपोषणाला पाठींबा देण्यासाठी पंढरपूर ठिकाणी आले होते. गुरूजींचे उपोषणाचे नऊ दिवस चिंताग्रस्त अवस्थेत निघून गेले. मात्र अद्याप समाधानकारक तोडगा दृष्टीपथात आला नाही. त्यामुळे महाराष्ट्रभर चिंतेचे वातावरण पसरलेले होते.

दादासाहेब मावळंकर दि. १० मे १९४७ रोजी पुण्याहून सकाळी ९ वाजता पंढरपूरात

---

४१. राजा मंगळ वेढेकर, पंढरीस वाजे घंटा, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. ४०.
४२. गाडगीळ (संपा), लोकमान्य, पुणे दि. ७ मे १९४७, पृष्ठ क्र. २.
४३. पी.आर. बहेरे (संपा), नवशक्ती, पूर्वोक्त, दि. ८ मे १९४७, पृष्ठ क्र. १३३.

दाखल झाले. त्यांच्यासोबत ठक्कर बाप्पा रावसाहेब पटवर्धन आणि औंदचे अप्पासाहेब पंत आले होते. दादासाहेबांना बडव्यांच्या वकीलांकडून समजले की, मुंबई हायकोर्टाने पाच जणांची बडवे कमिटीची व्यवस्था केलेली आहे. म्हणजे या पाच जणांमध्ये चर्चा करून वाटाघाटी होऊ शकतात. हे समजाताच दादासाहेबांना हायसे वाटले. तसा त्यांनी आपला प्रयत्न चालू केला मात्र बडवे कमिटीत चारच सदस्य असल्याकारणे सभा बोलवता येत नव्हती. यासाठी त्या चार सदस्यांनी अध्यक्षांना संपर्क साधून कळविले की, तुम्ही चारजणांची सभा बोलवायला बेकायदेशीरपणे नाही म्हणत आहात जर तुम्ही सभेची नोटीस काढली नाही, तर आम्ही चार सदस्य एकत्र येवून पाचव्या सदस्याला निवडून बडवे कमिटीची संख्या पूर्ण करू.[४४]

अशाप्रकारे अध्यक्षांना कायद्याच्या कचाट्यात पकडून सभा बोलवून पाचव्या सदस्याची निवड करायला भाग पाडले. पाचवे सदस्य काँग्रसचे कार्यकर्ते व गुरूजींचे स्नेही श्री बाबुराव बडवे यांची निवड झाली. आता विश्वस्त मंडळात चार विरूध्द एक अशी रचना तयार झाली.

दादासाहेबांच्या मध्यस्थीला यश आले. अखेरीस बडवे मंडळीच्या विश्वस्त मंडळाने मंदिर प्रवेशाचा ठराव एकमताने मंजूर केला. विश्वस्त मंडळाने मंदिरप्रवेशाचा जो ठराव सर्वांनुमते संमत केला त्यातील काही महत्वाच्या भाग पुढे दिला आहे.

वरील विषयावर सांगोपांग व सर्व दृष्टीने चर्चा करून परिस्थिती व लोकमत पाहून श्री विठ्ठल मंदिर हरिजनांना वर्शिपसाठी खुले करणे हिंदू समाजाच्या ऐक्याच्या दृष्टीने योग्य न्याय व धर्मआहे. म्हणून मुंबईच्या १९३८ च्या ११ व्या कायद्याप्रमाणे श्री विठ्ठल मंदिर हरिजनांना खुले करण्यासाठी त्या कायद्याप्रमाणे आवश्यक असे निवेदन (डिक्लेरेशन) कमिटीच्या सभासदांनी करावे व त्या कायद्यात म्हटल्याप्रमाणे त्या निवेदनास दृष्टी म्हणून प्रत्येक सभासदांनी ॲफिडेव्हिट करून सदरहू निवेदन त्यासह सोलापूर डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांच्याकडे पाठवावे. [४५]

श्री. बाबुराव प्रल्हाद (बबनराव) बडवे

श्री. शंकर रामचंद्र बडवे

श्री. भरत आनाजी बडवे

श्री. विठ्ठल गहिनीनाथ बडवे

---

४४. आत्माराम वाळींजकर, साने गुरूजी आणि पंढरपूर मंदिर प्रवेश चळवळीचे अध्यात्म, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. १३३.

४५. राजा मंगळवेढेकर, पंढरीस वाजे घंटा, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. ४३, ४४.

श्री. हरि पांडूरंग महाजन बडवे

दि. १० मे १९४७ या दिवशी रात्री ८.३५ ला वहिनींच्या हातून थोडा मोसंबीचा रस घेऊन गुरूजींनी दहा दिवस चाललेले उपोषण सोडले. साने गुरूजींच्या प्रयत्नांना यश आले. उपवास सोडल्यानंतर गुरूजी तीन–चार दिवस पंढरपुरात राहिले आणि नंतर विश्रांतीसाठी बोर्डीला अप्पासाहेब सान्यांकडे निघून गेले. तेथूनच त्यांनी सर्वांचे आभार मानणारे एक पत्रक प्रसिध्द केले.

पंढरपूर वैशाख शु. एकादशीपासून मी उपवास सुरू केला. संत शिरोमणी चोखोबांच्या पुण्यतिथिच्या दिवशी वैशाख वद्य पंचमीला रात्रौ साडेआठ वाजता मी उपवास सोडला.

बडवे बंधूंच्या विश्वस्त समितीने तसेच श्री उत्पात मंडळींनीही एकमताने श्रीपांडुरंगाचे व श्रीरखुमाईचे मंदिर हरिजनांना मोकळे केल्याचे जाहीर केले. ही ऐतिहासिक व क्रांतिकारक घटना आहे. मी बडवे मडळींना कितीही धन्यवाद दिले तरी ते अपुरेच आहे.

ही क्रांतिकारक घटना घडावी म्हणून ज्या लहानथोरांचे अपार प्रयत्न कारणीभूत झाले त्या सर्वांचा मी चिरऋणी आहे. मी एक निमित्त कारण होतो. सारी प्रभूची कृपा.

मी बडवे नि उत्पात बंधूंना एवढेच प्रार्थितो की, हाच मनाचा मोठेपणा वाढवा, मंदिरात अधिकाधिक पावित्र्य येवो. प्रभूजवळ ओढाताण नको. आलेला दर्शनेच्छू मनुष्य जे भक्तिप्रमाणे देईल, देवापुढे ठेवील, ते गोड करून घ्या. मंदिर म्हणजे आत्म्याची पवित्र हवा घेण्याची आरोग्यधामे बनोत.

श्री. बडवे नि उत्पातबंधूस मी भक्तिप्रेमाने प्रार्थना करतो की हा तुमचा थोर वारसा हक्क आहे. तुम्ही पंढरपूर भक्तिप्रेमाचे नि मांगल्याचे माहेरघर करा.

मी आणखी काय लिहू? माझे हृदय कृतज्ञतेने ओथंबले आहे. शेकडो मित्रांनी, संस्थांनी तारा, पत्रे पाठवून सहानुभूती दाखविली. मी सर्वांचा ऋणी आहे.

शेवटी एकच गोष्ट सांगतो की या उपवासास दुसऱ्या कोणीही मला प्रवृत्त केले नव्हते. मी आणि माझ्या देवाशिवाय तिसऱ्या कोणीही मला उपवास कर असे सांगितले नाही. सर्वांनी उपवासापासून परावृत्त करण्याचे प्रयत्न केले.

श्री. काकासाहेब बर्वे यांनी उपवासात मला ढकलले असाही आरोप घेण्यात आला, याहून अधिक असत्य गोष्ट ती कोणती? त्यांनी तर मला उपवास करू नका असे भारत दलित सेवक या पत्रात अग्रलेख लिहून परोपरीने सांगितले. मी माझ्या अनेक निवेदनातून या उपवासाची सत्यकथा सांगितली आहे. तरीही असत्य तर्कटे प्रसिध्दीलेली पाहून विषाद वाटतो.

मी आज शेवटचे सांगतो, सत्य नि प्रामाणिकपणा म्हणून काही असेल तर त्यांना स्मरून सांगतो, ईश्वर म्हणून काही वस्तू असेल, तर त्याचे स्मरण करून सांगतो की, हा उपवास माझ्या मनाच्या वर्ष–दीडवर्षाच्या तळमळीतून जन्मला. त्याचा निर्णय मी एकट्यानेच घेतला, कोणी समाजवादी माझ्यावर उपवास लादीत नव्हते किंवा दुसरे कोणी तसा सल्ला देत नव्हते. या उपवासाची बरवाईट जबाबदारी केवळ माझी. दुसऱ्या कोणावरही त्यासंबंधी अनाठायी शिंतोडे उडवू नका. मला कितीही शिव्याशाप दिले तरी ते मी शांतपणे गिळायला उभा आहे. परंतु माझ्यासाठी दुसऱ्यावर कुटिल आक्षेप काहीही आधार नसताना घेतलेले पाहून मला मरणांतिक दुःख होते.

माझ्या उपवासासाठी श्री. काकासाहेब बर्वे यांच्या सारख्या थोर कार्यकर्त्यांना समाजवादी मित्रांना नाहक निंदा सहन करावी लागत आहे. याबद्दल त्यांनी मला क्षमा करावी.

हा उपवास केवळ माझा होता. मला तो प्राणमय वाटत होता. प्राणप्रिय वस्तूचे वाभाडे निघताना पाहून कोणाला वेदना होणार नाहीत? परंतू महाराष्ट्रातील निर्मल मनोवृत्तीच्या लाखो लहानथोर बंधुभगिनींच्या सहानुभूतीचाही लाभ झाला आहे. त्यामुळे इतर सारे मी आनंदाने सहन करू शकतो.

असो, पुन्हा एकदा सर्वांचे ती अंतःकरणपूर्वक आभार मानतो.

सर्वांचा नम्र

ता. २०.०५.१९४७ साने गुरूजी[४६]

४६. संपा गाडगीळ (संपा), लोकमान्य, पूर्वोक्त, दि. २२ मे १९४७, पृष्ठ क्र. २.

४.१.५ उपोषणाची यशस्वी सांगता

पंढरपुरातील विठोबारायाचे मंदिर हरिजनांना खुले करण्यास आपल्याला परवानगी द्यावी असा अर्ज डिस्ट्रिक्ट कोर्टाकडे करण्याचे पंढरपूरच्या बडव्यांनी ठरविले व हे ऐकून साने गुरूजींनी आपला अन्नत्याग मोसंबीचा रस घेऊन थांबविला. या कामी श्री. मावळणकर यांचा सल्ला बडवे मंडळीनी विशेषतः गुरूजींनी ऐकला हे विशेष होय. एका ब्रम्ह हत्येचे पातक आपल्या डोक्यावर बसू नये, जनतेचा मंदिर–प्रवेशाला अनुकूल कल असल्याने आपल्यावर लोकक्षोभ होऊ नये आणि आपल्या अर्जाचा निकाल होण्यापूर्वी कायदा खास होत आहे, या सर्व व्यवहारी गोष्टी लक्षात घेऊन बडव्यांनी आपली संमती दिली. हीच गोष्ट त्यांनी या उपोषणाच्या पूर्वी करावी असे सर्व विचारवंत म्हणत होते. हे काहीही असले तरी साने गुरूजींनी उपोषण थांबविले हे ठीक झाले. तेथील घडामोडीच्या जाणिवेने असल्या उपोषणाच्या मार्गाचे वैयर्थ्य त्यांना पटले असेलच असे गृहीत धरण्यास हरकत नाही. मंदिरप्रवेशाच्या बाबतीत ती चळवळ एक पाऊल पुढे गेली एवढाच याचा अर्थ आहे.[४७]

अशाप्रकारे साने गुरूजींनी केलेले आमरण उपोषण यशस्वीरीत्या पार पाडले व त्या यशाने अस्पृश्यता निवारण चळवळ शेवटच्या टप्यात येऊन ठेपली. गुरूजींच्या उपोषणाची भूमिका ही गांधी तत्वाच्या सत्याग्रही तत्वाची होती. समाजातील माणसा माणसातील दुंभगलेली मने जोडण्याचे अलौकीक कार्य गुरूजीनी आपल्या भाषणांतून, प्रचारातून व उपोषणातून घडवून आणले. जगात प्रेमधर्म मानणारे साने गुरूजीनी आपले सारे आयुष्य दीन दलितांसाठी वेचले. गुरूजींचा हा मंदिर प्रवेश लढा स्वकियांविरूध्द सनातनी विचारांशी होता. व त्यांनी त्या विचारांचा पराजय करून आपला जय केला. गुरूजीनी उदार, पवित्र, निस्वार्थी व निर्भिड अंतकरणाने दिलेला हा मंदिर प्रवेश लढा भारताच्या इतिहासातील अजरामर लढा ठरला आहे यात मुळीच शंका नाही.

४.२ आंतरभारती : साने गुरूजींचे स्वप्न

साने गुरूजीनी अमळनेरला प्रताप हायस्कूलमध्ये (इ.स.१९२४–इ.स.१९३०) या कालावधीत शिक्षक असताना रवीन्द्रनाथ टागोरांचे चरित्र लिहिले. त्यानिमित्ताने गुरूजीनी रवीन्द्रनाथ टागोरांचा वैचारिक मुद्द्यांचे तपशीलवार वाचन केले. व त्यांच्या राष्ट्रवादाविषयीच्या

४७. दामोदर विश्वनाथ गोखले (संपा), केसरी, पूर्वोक्त, दि. १३ मे १९४७, पृष्ठ क्र. ६.

विचारांनी राष्ट्रवाद हा व्यापक मानवता वादातील अडथळा बनता कामा नये, हे गुरूजींना भान आले अशा प्रकारे साने गुरूजींना समस्त भारतीयांना एकत्र बांधणाऱ्या धाग्यांविषयीच्या विचार मंथनातून स्वातंत्र्य लढ्याविषयी एक प्रगल्भ दृष्टी प्राप्त झाली. त्यातूनच प्रथम साने गुरूजींना रविंद्रनाथ टागोरांच्या विश्वभारती मधूनच आंतरभारती संकल्पना उमगली.

साने गुरूजी १९३० ला त्रिचनापल्लीच्या तुरूंगात असताना तेथे बहुसंख्य कैदी हे कर्नाटक, केरळ, आंध्र, तामिळनाडू, बंगाल, महाराष्ट्र व अन्य प्रांतातील होते. त्यांच्या वेगवेगळ्या भाषा असल्या तरी त्यातून प्रकट होणारे भाव एकच आहेत. हे गुरूजींना दिसून आले येथे गुरूजींना भिन्नतेमधील अभिन्नतेचा जवळून परिचय होण्यास संधी मिळाली. जरी आपण वेगवेगळ्या भाषांमुळे वेगळे आहोत असे भासत असले तरी भारताचा आत्मा एक आहे. जर ह्या वेगवेगळ्या भाषांचा अभ्यास झाला. चालीरीतीचा परिचय झाला, तर या विविधतेतील ऐक्यांचा प्रत्यय लोकांना येईल व भारताचा आत्मा, हृदय एक होईल. मराठी–हिंन्दी, मराठी–कानडी, मराठी–गुजराती हे वाद आपला संकुचितपणा आणि परस्पर परिचयाचा अभाव त्यामुळेच निर्माण होतात. जर भाषांच्या अभ्यासामुळे परस्पर परिचय वाढला तर प्रांतवाद नष्ट होऊ न द्वेष मत्सर ही शमतील. असे गुरूजींना वाटू लागले. अशाप्रकारे साने गुरूजींना त्रिचनापल्लीच्या तुरूगांत आंतरभारतीच्या स्वप्नाला उजाळा मिळाला.

साने गुरूजींना समाजातील दरी, जातीभेदाचा तिटकारा होता तितकाचा प्रांतभेदाचा होता. भारतात वेगवेगळ्या प्रातांत भिन्न भिन्न भाषांचे लोक राहतात. या भाषा भिन्नतेत्यांच्यात पुरेसा परिचय नाही. कॉग्रेसने आश्वासन दिले की, स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भाषावार प्रांतरचना केली जाईल. मात्र तसे काही झाले नाही. तसेच मुंबईमध्ये रशियन, जर्मन, फ्रेंच या भाषा शिकवण्याचे वर्ग होते. मात्र भारतातील निरनिराळ्या भाषा शिकण्याची काही व्यवस्था नव्हती. या सर्वामुळे गुरूजी अत्यंत व्यथित होते. भारतातील प्रांताप्रातांत सलोखा निर्माण व्हावा यासाठी एखादी संस्था असावी, ही कल्पना साने गुरूजींच्या मनात फार वर्षापासून होती व ती कल्पना सत्यात उतरविण्यासाठी संधी शोधत होते. दि. १४ मे १९४९ मध्ये पुण्याला मराठी साहित्य संमेलन भरले होते. संमेलनाचे अध्यक्ष शं.द. जावडेकरांनी गुरूजींना आमंत्रित केले होते. या संमेलनात गुरूजींनी आंतरभारतीचा ठराव मांडला. या ठरावावर गुरूजींचे कळकळीचे भाषण झाले. ते ऐकून सर्व साहित्य

रसिक प्रभावित झाले. आंतरभारती हे साने गुरूजींचे स्वप्न होते. संमेलनाच्या आधी दि. ७ मे १९४९ ला साधनेच्या अंकात प्रांत भारतीचे माझे स्वप्न नावाचा लेख लिहून गुरूजींनी आपले विचार मांडले आहेत. ते म्हणतात. १९३० मध्ये आम्हाला त्रिचनापल्लीच्या तुरूंगात ठेवण्यात आले होते. अमळनेरच्या हायस्कुलातील नोकरी सोडून मी सत्याग्रहात सामील झालो होतो. आमच्या शाळेत एंक बंगाली मित्र होते. त्रिचनापल्लीच्या तुरूंगातील एक मित्र श्री. व्यकंटाचलम् सुटणार होते. ते बी.एससी होते. त्यांना तामीळ, तेलगू, मल्याळम भाषा येत होत्या. मी अंमळनेरच्या मित्रांना लिहिले यांना आपल्या शाळेत घ्या. बंगाली मित्र आहेत. हे दक्षिणेकडील एक मित्र होतील. आपली शाळा भारतीय ऐक्याचे प्रतिक होवो. भारतातील सर्व प्रातांतील तेथे शिक्षक असोत. त्या त्या प्रातांची संस्कृती, वाडःमय सारे कळेल. तेव्हापासून माझ्या मनात स्वप्न होते की केव्हा तरी अशी संस्था काढायची जी भारताचे ऐक्य शिकवील अनुभवील..... म्हणून प्रान्तभारती संस्था स्थापनेचे माझे कधी पासूनचे स्वप्न ...[४८]

साने गुरूजी आंतरभारती संस्था स्थापल्यानंतर ती कशी असेल ? त्यामध्ये काय शिकविले जाईल ? याबद्दल लिहितात– साहित्याबरोबर तेथे चित्रकला, नृत्यकला यांचाही अभ्यास असावा. सहकारी शिक्षण दिले जावे. नवभारताच्या निर्मितीचे ते एक तिर्थक्षेत्र असावे. माझ्या डोळ्यासमोर सुंदर स्वप्न आहे. प्रान्त भारतातील मुले सुट्टीत खेडोपाडी जातील मेळे संवाद करतील. स्वच्छता करतील. प्रान्तभारतीतून सहकारी चळवळ फैलावयाला ध्येयवादी तरूण बाहेर पडतील नाना नाच येथे अभ्यासिले जातील. मौज, आंनद, सेवा, संस्कृती, उदारता, ज्ञान, विज्ञान, कला एक गंभीर अशी प्रवृत्ती प्रांत भारती निर्मू पाहिल. [४९]

पुढे आंतरभारती (प्रांतभारती) चे स्वप्न कसे साकार करायचे याविषयी गुरूजी लिहितात. परंतू हे स्वप्न कृतीत कसे आणायचे ? महाराष्ट्रभर शिक्षा मंडळे तालुक्या–तालुक्यात स्थापावी. आठवड्याला एक दिवस या संस्थेसाठी भिक्षा मागणारे तरूण असावेत. शंभर तालुके धरले तर महिन्यातून चार वेळा म्हणजे ४०० वेळा भिक्षा मागितली जाईल... सरकारही आपले आहे. ते नाही का वार्षिक मदत देणार? सारे सुंदर होईल असे मनात तर येते. परंतू आरंभ केल्याशिवाय सरकारजवळ काय मागू?[५०] मराठी साहित्य संमेलनात गुरूजी भाषण करून थांबले नाहीत तर त्याच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न केला. सुरवातीला प्रांतभारती असणाऱ्या या संघटनेचे नाव

४८. राजा मंगळवेढेकर, साने गुरूजींची जीवनगाथा, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. ३६७.
४९. कित्ता.
५०. कित्ता.

गुरूजींनी आंतरभारती असे केले. मुंबईत जोगेश्वरीजवळ डॉ. वसंत अवसरे व काही मित्रांच्या मदतीने १४०० रूपये भाड्याने एक जागा खरेदी करण्याचे ठरले होते. मात्र गुरूजींच्या ह्यातील आंतरभारती संस्थेचे स्वप्न पूर्ण होऊ शकले नाही याबद्दल खंत वाटते.

रविंद्रनाथ टागोरांनी जगातील सर्व राष्ट्रामध्ये सामंजस्य, मेळ व शांततापूर्ण सहकार्य निर्माण व्हावे. म्हणून विश्वभारतीची स्थापना केली त्याच विचार धर्तीवर साने गुरूजीनी भारतातील विविध प्रातांत भाषा, वेष, प्रांतीय हेवेदावे यावरून अंतर्गत कलह निर्माण होऊ नये त्यांच्यात प्रेमपुर्वक सहकार्य निर्माण व्हावे. सर्वांनी समजुतीने राहून एकमेकांच्या भाषा, ज्ञान खाद्यपदार्थ, वेष, संस्कृती याची देवाण घेवाण व्हावी यासाठी प्रांतभारती (आंतरभारती) ची कल्पना मांडली.

भारतातील भाषा, वर्ण, प्रांत, यांच्यात कलह व संघर्ष न होता त्यांच्यात समन्वय, सुसंवाद, ऐक्य, परस्पर विश्वास मानाचे स्थान प्राप्त व्हावे अशी गुरूजींची तीव्र इच्छा होती. गुरूजी आपल्या कवितेत बोलतात – बलसागर भारत होवो । विश्वात शोभूनी राहो ।। यासाठी आंतरभारती प्रभावीपणे कार्य करील अशी साने गुरूजींची धारणा होती.

१४ मे १९४९ मध्ये पुण्यात एका मराठी साहित्य संमेलनात आंतरभारती (प्रांतभारती)ची कल्पना स्पष्ट करताना गुरूजी म्हणाले – प्रांतभारती संस्था स्थापण्याचे माझे केव्हा पासूनच स्वप्न आहे. संस्थेसाठी सुंदरशी जागा असावी ती सरकारजवळ मागावी किंवा कुण्या भल्या सज्जनाने दिली, तर ती कृतज्ञेने घ्यावी. तिथे त्या प्रांतीय भाषेतील तज्ञ असतील त्या त्या भाषेतील वाङःमय तिथं राहिल या सर्वांना हिंदी येत असावी. या संस्थेला विद्यालय, शेती हस्तोद्योग असावेत.[५१]

एकीकडे हाताने काम करत असताना दुसरीकडे भारतातील निरनिराळ्या भाषा कानावर पडतील साहित्याबरोबरच चित्रकला, संगीत, नृत्यकला यांचाही अभ्यास असावा. सहकारच शिक्षण दिल जाव प्रांतभारतातील मुलं सुट्टीमध्ये खेडोपाडी जातील. मेळे, संवाद करतील, श्रमदान करतील भिन्न भिन्न संस्कृतीतील देवाण घेवाण होईल.[५२]

आपण अखंड भारत असे म्हणत आलो. परंतू या देशाचे आपणास ज्ञान नाही. सारे

५१. कित्ता , पृष्ठ क्र. ३६८.
५२. कित्ता.

प्रातांच्या भाषा, संस्कृती खाद्यपदार्थ, वेष, रितीरिवाज जाणून घ्यावयाचे आपणास वाटत नाही. मुंबईत परदेशी भाषा शिकण्याची सोय आहे. मात्र स्वदेशी भाषा शिकण्याची सोय नाही. यासाठी एखादी संस्था असावी असे गुरूजींना वाटे.

जर ह्या वेगवेगळ्या भाषांचा अभ्यास झाला, चालीरितीचा परिचय झाला. तर या विविधतेतील ऐक्याचा प्रत्यय लोकांना येईल व भारताचे हृदय एक आहे हे सर्वांना समजेल भाषे–भाषेमधील वाद, संकुचितपणा आणि परस्पर परिचायाचा अभाव यामुळेच निर्माण होतात. जर भाषांच्या अभ्यासामुळे परस्पर परिचय वाढला तर द्वेष मत्सर शमतील. मग लोक परप्रांतीयांचा द्वेष करणार नाही एकमेकांवर प्रेम करतील.

केवळ भाषांचा अभ्यास व्हावा हाच या संस्थेचा उद्देश नव्हता तर येथे दुसऱ्याही अनेक चळवळी जोडाव्यात. कला, जीवन यांचा अभ्यास येथे व्हावा असे गुरूजींना वाटे.

वेगवेगळ्या प्रातांतील लोक आपल्या वेगवेगळ्या कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी एकत्र श्रमत आहे असे दृश्ये देशभर दिसू लागले पाहिजेत. भिन्न–भिन्न प्रांतातील लोक एकमेकांना प्रेमात भेटत आहेत. परस्परांच्या संस्था पाहत आहेत. एकमेकांना मदत देत आहेत. भारतीय संस्कृतीचे दर्शन व्हायला हवे. भारतीय आत्म्याचे ऐक्य संगीत अनुभवयाला मिळावे असे गुरूजींचे भव्य स्वप्न होते.

प्रातांनी भारती व्हावे व भारताचे अति भारती व्हावे. प्रत्येक प्रातांनी आपल्या सभोवतालचे कुंपण घालून बसू नये. व्याप वाढवाल तर वैभव वाढेल. संकुचितता सोडा, ऐकमेकांशी प्रेमाने वागा. भारताचे एक हृदय व्हावे. प्रातांचा परस्परांशी आणि भारताशी प्राणमय संबंध – याला आपण आंतरभारती ध्येय म्हणू.

४.३ राष्ट्रसेवादलामार्फत विधायक कार्य

देशात तरूणांना संघटित करण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ कार्य करित होता. संघाचा मूळ हेतू विधायक कार्य करण्याचा होता. पण काही ठिकाणी संघ हिंदू धर्मप्रसार करून जातीभेदाचे व संकुचितपणाचे विष समाजामध्ये पसरवण्याचे काम करत होते तर काही ठिकाणी संघाचे कार्यकर्ते महात्मा गांधी व प. नेहरू या राष्ट्रपुरूषांच्या बद्दल अप्रिती पसरवत होते. हे पाहून साने गुरूजींना

वाईट वाटले.

देशातील तरूण हा देशाचे भविष्य आहे. अशा तरूणांना योग्य दिशा व विचारांची गरज होती. त्यांच्या हातून विधायक कार्य व्हावे अशी अपेक्षा होती. त्यासाठी युवकांसाठी एक संघटना असावी अशी गुरूजीना वाटे. व तसे ते आग्रही होते. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात लढणारे तरूण हवेत या भावनेतून एस.एम.जोशी, नाना साहेब गोरे आणि शिरूभाऊ लिमये यांनी ४ जून १९४१ साली राष्ट्र सेवादलाची स्थापना केली. त्यावेळी राष्ट्रसेवादलाची प्रतिज्ञा पुढील प्रमाणे होती.

"मी अशी प्रतिज्ञा करतो की–
मी शांततेच्या व न्याय मार्गानी हिंदी राष्ट्राच्या
स्वतंत्र्याकरता यथाशक्ती यत्न करीन.
हिंदुस्थानात राहणाऱ्या सर्व जाती व धर्म–पंथांच्या
लोकांचा सामाजिक दर्जा समान आहे अशी माझी धारणा
असून त्यांच्यामध्ये बंधुभाव, प्रेम, व एकराष्ट्रीयत्वाची भावना
वाढावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.
स्वयंसेवक म्हणून काम करीत असताना मी नेहमी शांततेच्या
मार्गाने वागेन, मी राष्ट्र सेवा दलाच्या नियमाचे पालन
करीन व माझ्या अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार वर्तन करीन."[५३]

पहिले दलप्रमूख व संस्थापक एस.एम. जोशीनी या संघटनेचा उद्देश सांगितला की, "स्वातंत्र्यासाठी आणि स्वातंत्र्यानंतर समाजवादी समाजरचना निर्माण करण्यासाठी झुंजणारे समाजवादी शीलाचे सैनिक तयार करणे, तरूणांना एकत्रित करावं आणि त्यांना स्वातंत्र्याची प्रेरणा द्यावी."[५४] हा त्यांच्यामधला महत्वाचा हेतू होता. या संघटनेतून तयार झालेल्या मंडळीनी पुढे महाराष्ट्राचे नेतृत्व केले. त्यामध्ये बॅ. नाथ पै, मधु लिमये, मधु दंडवते, मृणालताई गोरे, माधवराव गायकवाड, कॉ. गोविंद पानसरे, डॉ. बापूसाहेब काळदाते ही सगळी मंडळी होती.[५५] 'छोडो भारत' या चळवळीमुळे राष्ट्रसेवादलाच्या कामाला खरी गती मिळाली.

राष्ट्रसेवादलाच्या गावोगावात शाखा निघाल्या ठिकठिकाणी सेवा दलाची शैक्षणिक शिबीरे

५३. डॉ. र.नी अंबके,राष्ट्रसेवादल इतिहास, मुद्रक ह.म.गद्रे, पुणे २८ ऑक्टो १९६५, प्रास्ताविक
५४. विनोद वाघ (संपा), राष्ट्रसेवादल पत्रिका(भाई वैद्य राष्ट्रसेवा दल विचारधारा व वाटचाल), पूवोक्त, पृष्ठ क्र. ५.
५५. कित्ता.

भरू लागले. साने गुरूजी अशा शिबिरातून उपस्थित राहून सेवादल सैनिकांना मार्गदर्शन करीत. साने गुरूजींचे राष्ट्रसेवादलाच्या उभारणीमध्ये अत्यंत मोलाचा वाटा होता "महाराष्ट्रात साने गुरूजी एक आधुनिक संत होऊन गेले असे म्हटले तरी चालेल या संताची फार मोठी पुण्याई सेवा दलाला लाभली."[५६] गुरूजी सेवा दलाच्या प्रचार प्रसार कार्यासाठी रात्रदिवस गावोगावी फिरून समाजासाठी विधायक कार्य करीत होते. "गुरूजींनी लहान मुलांसाठी गाणी रचली, अनेक कुटुंबातून त्यांनी जिव्हाळ्याचे संबंध जोडले..."[५७] "विद्यार्थी व शिक्षकांना स्वयंसेवक संघटनात भाग घेण्याची बंदी करणारे पत्रक ज्यावेळी सरकारने काढले त्यावेळी गुरूजींनी स्वतःचे प्राण सेवा दलावरून ओवाळून टाकण्याचा निर्धार केला तो क्षण खरा सेवा दलाच्या दृष्टीने मोलाचा होता."[५८]

राष्ट्रसेवादल कसे असावे ? त्यांनी कार्य कसे करावे ? याबाबत साने गुरूजी आपले विचार 'श्यामची पत्रे' या पुस्तकातून मांडतात. 'श्यामची पत्रे' या पुस्तकात साने गुरूजीनी वसंताला (आपल्या आवडत्या पुतण्याला) महाराष्ट्रातील सेवादलाच्या तरूणांच्या जागी कल्पून पत्रे लिहिली. या पत्रांनी इ.स. १९४२ च्या आंदोलनातील भूमिगत राहून काम करणाऱ्या राष्ट्रसेवा दलाच्या स्वयंसेवकांना मार्गदर्शन मिळाले तर तुरूंगातील देशभक्तांनी त्या पत्रांची नकला करून घेतल्या. 'श्यामची पत्रे' यामध्ये साने गुरूजींनी सेवादलातील समाजहित प्रवृत्तींना पाठींबा दिला तसा अपप्रवृत्तींना विरोध केला आहे. गुरूजी देवाकडे देशातील तरूणांसाठी प्रार्थना करतात. "या देशातील तरूणांस सद्‌बुध्दी दे. अखंड भारताचे सारे सच्चे उपासक होवोत. हिंदू –मुसलमान एक होवोत. क्षुद्र भेद नष्ट होवोत. तरूण लोक अनुदार व संकुचित वृत्तीचे न होवोत. माझ्या काँग्रेसला यश येवो. कारण तो सर्वांचे कल्याण करू पाहत आहे. तिच्या झेंड्याखाली नवभारत उभा राहू दे आणि जगाचे डोळे दिपू देत." [५९]

सेवा करणे हेच राष्ट्रसेवा दलाचे प्रमुख ब्रीद होते. रोज एकतरी सेवेचे काम केले जावे. असा सेवादलाचा दंडक होता. मैदानावरील कवायत आणि खेळ लेझीम यांच्या इतकेच अस्पृश्यता नष्ट करणे, जातीभेद गाडून टाकणे, चाळी संडास, मोऱ्या यांची स्वच्छता करणे. श्रमदान करणे या गोष्टीना सेवादलात महत्वाचे स्थान होते. साने गुरूजी सेवादलाचे संस्थापक नव्हते किंवा मंडळावर नव्हते. मात्र सेवादलाला आपला प्राण समजत.

---

५६. डॉ. र.नी. अंबिके, राष्ट्रसेवादल इतिहास, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. १८०

५७. किल्ता

५८. डॉ. र.नी. अंबिके, राष्ट्रसेवादल इतिहास, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. १८१

५९. साने गुरूजी, श्यामची पत्रे, रीया पब्लिकेशन, पुणे, आवृत्ती १५ ऑगस्ट २०११, पृष्ठ क्र. ६.

इ.स. १ मे १९५० ते १० मे १९५० सांगलीतील शिबिरात गुरूजींचे केलेले भाषण. "आज राष्ट्राला आपण तीस कोटी लोक सारे एक ही शिकवण देणारी संघटना हवी आहे. ही संघटना सेवादल हीच एक आहे. तुम्ही सारे हिंदु–मुसलमान, ब्राम्हण–ब्राम्हणेतर एक्य या नको स्पृश्य नको अस्पृश्य.... आपण भारत मातेची सारी लेकरे।..... जातिधर्मनिरपेक्ष अशी महान राष्ट्रीय भावना, तिचा प्रचार,... स्वच्छता, साक्षरता प्रचार, सहकार शिक्षण, अशा आजच्या निरनिराळ्या गरजा आहेत. सेवादलाने हे व्यापक शिक्षण, या गरजा भागवणारे शिक्षण स्वतः घेऊन राष्ट्राला द्यायला राहिले पाहिजे. कणभरही निर्मळ सेवा तारणारी आहे."[६०] अशाप्रकारे सेवा करणे हेच राष्ट्रसेवा दलाचे प्रमुख ब्रिद ठरले होते. रोज एक तरी सेवेचे कर्म केले जावे यासाठी गुरूजी आग्रही असत. सेवादलात एक दंडक होता. मैदानावरील कवायत, खेळ व लेझीम यांच्याइतकेच स्वच्छता करणे, श्रमदान करणे, वैरभाव–जातीभेद नष्ट करणे, पीडीतांना–दुखितांना सहाय्य करणे, साक्षरतेचे वर्ग चालवणे, शेती करणे, मळे भाज्या करणे, काही उद्योग करणे इ. सेवा कराव्यात हेच राष्ट्रसेवा दलाचे व्रत होते देशाला सेवेची गरज आहे तसा प्रसार गुरूजी गावोगावी जाऊन करत.

भाई वैद्य राष्ट्रसेवादलाविषयी आपल्या आठवणी सांगतात. "राष्ट्र सेवा दलाची जी शिबिरं होत असत पंधरा दिवसांची, महिन्याची, दीड महीन्याची, त्याच्यामध्ये नामवंत मंडळी येऊन भाषणे करीत. मला आठवतंय की, मी ज्या शिबीरामध्ये सहभागी झालो त्याच्यात आचार्य जावडेकर, आचार्य भागवत, साने गुरूजी, जयप्रकाश नारायण, डॉ. राममनोहर लोहिया, आचार्य नरेंद्र देव अशी त्याकाळातली देशभरातली जबरदस्त व्यक्तिमत्वे त्यावेळेला भाषणे करायची आणि समग्र स्वातंत्र्याची चळवळ, समाजवादी चळवळ याच्याबद्दल ज्या पध्दतीने आम्हाला माहिती घ्यायची ते मी स्वतः अनुभवलेलं आहे. त्यातून सेवादलाचे सैनिक तयार झाले. सातारचा मेळावा झाला. साताऱ्याच्या मेळाव्याला १२०० गणवेशधारी सैनिक उपस्थित होते आणि प्रमुख पाहुणे आझाद हिंद सेनेचे कॅप्टन शहानवाज खान होते. त्यांनी तोंड भरून राष्ट्र सेवा दलाची स्तुती केली."[६१]

स्वातंत्र्योत्तर काळातील सेवादलाचे ध्येय स्पष्ट करताना गुरूजी म्हणाले, समाजवाद यावा म्हणून अनुकूल वातावरण तयार करणे हे सेवादलाचे ध्येय. सेवादल म्हणजे सर्वांगीण जीवन विकासाचे शिक्षण देणारी संस्था, सहकार्य, जातीधर्मातील दृष्टी, सेवेची वृत्ती, निर्भयता, स्वतःची सर्जनशीलता वाढविणे, चारित्र्य सर्वात मिसळणे, सामुदायिक जीवनांची हौस या गोष्टीही असतात.

६०. यदुनाथ थत्ते, साने गुरूजी जीवन परीचय, प्रकाशक सुशिल धसकटे हर्मिस प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती २६ जाने. २०१२, पृष्ठ क्र. १४७.
६१. विनोद वाघ (संपा), राष्ट्रसेवादल पत्रिका (भाई वैद्य राष्ट्रसेवा दल विचारधारा व वाटचाल), पूवोक्त, पृष्ठ क्र. ६.

उद्याच्या हिंदूस्थानात सर्वांचा विकास व्हावा सर्वांना समान संधी मिळावी म्हणून झटा. प्रांतीयता विसरा अनेक भाषा शिकून एक राष्ट्रयत्व अनुभवा सर्वधर्मानी संस्कृती येथे फुलवण्याचा प्राचीन प्रयोग पुढे न्या. असे सेवादल सांगते. लोकशाही मार्गाने जायचे तर सहिष्णू बना. येथे द्वेष – मत्सरांची उपनिषदे नाहीत. प्रेम, सहानुभूती, मानवता इत्यादी गोष्टीवर येथे भर असतो राष्ट्रातून जातीयतेचे उच्चाटन करून आपण नवभारत निर्मुया हे भगीरथे काम आहे म्हणूनच करण्यासारखे आहे. हे सत्याचे प्रेमाचे मानवतेचे काम आहे. राष्ट्रसेवा दल म्हणजे या थोर दृष्टींचा आरंभ या नवीन दृष्टीचा गुरूजी प्रचार करत होते.

सुरवातीला राष्ट्रसेवादल संघटना काँग्रेस सेवा दल म्हणूनच ओळखली जात होती. मात्र पुढे काँग्रेसच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली काम न करता आपली स्वायंतता कायम ठेवून काम करायचे ठरविल्याने काँग्रेस सेवादलावर नाराज होता. यातील तरूणांच्यावर समाजवादी विचारांचा पगडा अधिक आहे हे लक्षात आल्यावर काँग्रेसमधील जेष्ठ नेत्यांना काळजी वाटू लागली. काँग्रेसच्या नेत्यांच्या मनात मात्र समाजवादी राष्ट्र सेवा दलाबद्दल काही शंका निर्माण झाल्या आणि शंकररावदेव म्हणाले की, "ही शिवशक्ती आहे की नाही हे पहावं लागेल."[६२] शेवटी महात्मा गांधीजींच्या हत्येचे निमित्त साधून काँग्रेसने राष्ट्रसेवादलावर बंदी आणली. या काँग्रेसी वृत्तीचा गुरूजींना राग आला. "जिथे अशा ध्येयवादी संस्था मातीत गाडल्या जातात. तिथ जगायच कशासाठी?"[६३] असे गुरूजींना वाटू लागले.

साने गुरूजी जीवनाच्या अखेरपर्यंत राष्ट्र सेवा दलातील तरूणांना मार्गदर्शन करत राहिले. इ.स. १९५० मध्ये राष्ट्रसेवा दलाच्या सांगली येथील शिबिरात तरूणांना संदेश देताना गुरूजी म्हणाले. "ज्या देशाला लोकशाही मार्गाने जायचे असेल त्याला सद्गुणांची जोपासना करण्यावाचून गत्यंतर नाही येथे संयमी, विवेकी, सत्यनिष्ठ, प्रमाणिक लोक असतील तेथे व्यक्ती स्वातंत्र्यही वाढू शकेल."[६४]

युवक संघटना चालवयाची तर संघटनेसाठी पूर्ण वेळ देणारे कार्यकर्ते हवेत. डॉ. हर्डीकरांनीच प्रथमतः अशा कार्यकर्त्यांची एक परंपरा सुरू केली. तथापि, सर्व तरूण पिढीला आकृष्ट करील असे स्वरूप तिला आले नाही. बालकुमार व तरूण या संस्कारक्षम वयातील मुलांवर

६२. कित्ता, पृष्ठ क्र. ५.
६३. डॉ. अनिल गोडबोले साने गुरूजी जीवन साहित्य आणि विचार, पूर्वोक्त, उन्मेष प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती २३ जून २००९, पृष्ठ क्र. ६३.
६४. कित्ता, पृष्ठ क्र. ६४.

राष्ट्रीयतेचे संस्कार व्हावेत या उद्देशाने हर्डीकरांनी तसा शिक्षणक्रमही आखला होता. त्यांनी व्हॉलेंटियर नावाचे इंग्रजी मासिकही त्यांनी सुरू केले होते.

सुरूवातीला हिंदुस्थानी सेवादल ही एक स्वायत्त संस्था होती. १९३१ साली कराची येथे भरलेल्या कॉग्रेसच्या अधिवेशनात हिंदुस्थानी सेवा दलाचे रूपांतर काँग्रेस दलात करण्यात आले. सेवादलाची स्वायत्तता उरली नाही.

इ.स. १९३० साली मिठाच्या सत्याग्रहात महाराष्ट्रात भाऊसाहेब रानडे यांच्या नेतृत्वाखाली प्रांतिक काँग्रेस सेवादलाची स्थापना झाली. ही संघटना अधिकृत काँग्रेसचीच झाल्यामुळे सरकार ज्या ज्या वेळी काँग्रेसवर बंदी घालीत असे त्या त्यावेळी कॉग्रेस सेवादलावरही बंदी येत असे. त्यामुळे काँग्रेस सेवादलाचे कामही सुरळीत चालले नाही.

इ.स.१९३६ साली जवाहरलाल नेहरू महाराष्ट्रात दौऱ्यावर आले होते. त्यावेळी त्यांचे कार्यक्रम व्यवस्थितपणे पार पाडण्यास काँग्रेसपाशी स्वयंसेवी संघटना उरलेली नव्हती. त्यासाठी राष्ट्रसेवादल या नावाने एक तात्पुरते स्वयंसेवक पथक स्थापन करण्यात आले होते. फैजपूर काँग्रेसच्या वेळीही रावसाहेब पटवर्धन यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रसेवादल याच नावाने स्वयंसेवक पथक उभारले होते. परंतु ते नैमित्तिक स्वरूपाचेच ठरले.

त्यानंतर वर उल्लेखिल्याप्रमाणे इ.स. १९४१ सालच्या जून महिन्यात राष्ट्र सेवादलाची पुर्नघटना करण्यात आली. एस.एम. जोशी यांना सेवादलाचे प्रमुख म्हणून नियुक्त करण्यात आले. त्यावेळी ते जरी छत्तीस वर्षाचे होते, तरी त्यांची तडफ आणि उत्साह विशितल्या तरूणांइतकाच ताजातवाना व टवटवीत होता. तो अखेरपर्यंत तसाच होता. एस. एम. जोशी यांना स्वतःला युवक–तरूण संघटनांच्याबद्दल विशेष आत्मियता होती. आणि युवक तरूणांविषयी अत्यंत मैत्रीच्या भावनेने संवाद साधण्याची विलक्षण हातोटीही त्यांना अवगत होती. त्यामुळे त्यांचे शारीरिक वय कितीही वाढले तर मनाचे तारूण्य ते कायमच राखू शकले. तरूणांनीही ते आपले आवडते नेते आहेत, असेच वाटत असे आणि म्हणूनच एस.एम. जोशी अण्णा यांच्याभोवती तरूणांचा गराडा सतत दिसत असे. हीच गोष्ट शिरूभाऊ लिमये यांनाही लागू होती.

एस.एम. जोशी आणि शिरूभाऊ लिमये यांच्या प्रयत्नाने महाराष्ट्रात, त्या काळात, राष्ट्र

सेवादलाची खूपच वाढ झाली. गावोगावी सेवादलाच्या शाखा निघाल्या या शाखांमधून ऑगस्ट क्रांतीच्यावेळी नव्या रक्ताचे, नव्या विचारांचे नवे नेतृत्व उदयास आले. राष्ट्रसेवादलाने आपल्या सैनिकांमध्ये समतेची व राष्ट्रीय भावनेची पेरणी केली. जातिधर्मनिरपेक्ष असे ब्रीदच सेवादलाने स्वीकारले होते. त्यामुळे भारतीयत्वाचे आणि त्याहून श्रेष्ठ अशा मानवतेचे बिजारोपण सेवादलाकडून झाले.

सन १९४२ च्या ऑगस्ट क्रांती लढ्यात महाराष्ट्रातून सेवादलाचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. या चले जाव च्या लढ्यात सेवादलाचा सैनिक तुरूंगात गेला तर काही सैनिक भूमिगत राहून काम करू लागला. जयप्रकाश डॉ. लोहिया, अच्युतराव पटवर्धन, अरूणा असफअली, साने गुरूजी, एस.एम. जोशी, नानासाहेब गोरे, शिरूभाऊ लिमये ही सगळी मंडळी भूमिगत झालेली होती. भूमिगत नेत्यांना मदत करणे. त्यांचा संदेश ने आण करणे व तरूणांना लढ्यात सहभाग घेण्यासाठी गावोगावी बुलेटीन वाटणे इ. कामे सेवादलाच्या सैनिकांनी केली. तरूणांना आवाहन करण्याकरिता साने गुरूजींचे 'आगे बढो' हे जे चोपड प्रसिध्द केले ते सर्वत्र पसरवणं ही कामे सेवादलाच्या सैनिकांनी फार मोठ्या प्रमाणात केली. [६५]

ऑगस्ट क्रांतीत महाराष्ट्रात राष्ट्र सेवा दलाने सिंहाचा वाटा उचललेला आहे. पुढे १९४७ मधील भारत स्वतंत्र प्राप्तीमध्ये ही राष्ट्रसेवादलाचा मोलाचा वाटा दिसून येतो. स्वातंत्र प्राप्तीनंतरही सेवा दलाचे अखंड कार्य चालूच राहीले. भारतीय स्वातंत्र्या प्राप्तीनंतरची राष्ट्रसेवा दलाची प्रतिज्ञा पुढील प्रमाणे .

"मी अशी प्रतिज्ञा करतो की –
भारतामध्ये लोकशाही समाजवादी राष्ट्र निर्माण
करण्यासाठी मी पराकाष्ठेचा प्रयत्न करीन.
भारतात राहणाऱ्या सर्व जातिजमातींचा सामाजिक
दर्जा समान आहे अशी माझी धारणा असून त्यांच्यामध्ये
बंधुभाव व प्रेम निर्माण व्हावे म्हणून मी सतत प्रयत्न करीन.
मी राष्ट्र सेवा दलाच्या नियमांचे पालन करीन.
अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार वागेन."[६६]

६५. विनोद वाघ (संपा), राष्ट्रसेवादल पत्रिका (भाई वैद्य, राष्ट्रसेवा दल विचारधारा व वाटचाल), पूर्वोक्त, पृष्ठ क्र. ५.
६६. डॉ. र.न. अंबिके, राष्ट्रसेवादल इतिहास, पूर्वोक्त, प्रास्ताविक

४.४ साक्षरतेची चळवळ

स्वातंत्र्य प्राप्तीचे अखेरचे पर्व चालू होते. लवकरच स्वराज्यात जगायला मिळणार होते. लोकशाहीत जगायला मिळणार होते त्यामुळे सर्वत्र आनंदी आनंद दिसत होता.

पारतंत्र्याच्या काळात इंग्रजांनी सर्वच भागात शासकीय मुलभूत सेवा दिल्या नव्हत्या. भोळ्याभाबड्या, अज्ञान, गरीब प्रजेवर अन्याय चालू होते.

भारतीय समाजातील अज्ञान, निरक्षरता व असमानता याच मुख्य कारणामुळे देश पारतंत्र्यात गेला. हे साने गुरूजीना चांगलेच उमगले होते व आता अशी पुन्हा वेळ येऊ नये यासाठी समाजात साक्षरता व समता प्रस्थापित करणं गरजेचे होते. यासाठी साने गुरूजींनी निरक्षर लोकांना साक्षर करण्यासाठी तसेच आपल्या अज्ञानी लोकांना सुज्ञान बनविण्यासाठी गावोगावी दौरे काढून साक्षरतेचे महत्व पटवून दिले.

साने गुरूजीनी आपल्या गोड वाणीने समाजातील सर्व थरातील निरक्षर लोकांना साक्षर बनविण्याचे कार्य केले. गावोगावी खेड्यापाड्यातील निरक्षर लोकांना जमा करून गुरूजीनी साक्षरतेचे महत्व सांगितले व जागृती केली व आपल्या राष्ट्रातील ज्या ज्या भागात कार्य करण्याचा मोका मिळाला त्या–त्या ठिकाणी साने गुरूजीनी निरक्षर पुरूष व स्त्री यांना साक्षर व सुजाण बनविण्यासाठी चळवळ केली.

सुजाण लोक हा लोकशाहीचा मुख्य आधार लोकांना सुजाण व सुज्ञान करण्याची जी वेगवेगळी साधने आहेत त्यात साक्षरतेला फार मोठे स्थान आहे. साक्षर मनुष्य ग्रंथाद्वारा साऱ्या जगाच्या विचारधनात वारसदारी मिळवीत असतो.

साक्षरतेची ही महती ओळखून नवसाक्षरांसाठी साने गुरूजींनी वाङःमय निर्माण केले. व समाजातील अज्ञान दूर करण्यासाठी साक्षरतेचा प्रसार गुरूजीनी आपल्या वाणीतून व लेखनीतून प्रचार व प्रसार केला. साने गुरूजी हाडाचे शिक्षक होते. विद्यार्थी आणि शिक्षक यात रमलेले गुरूजींचे मन स्वातंत्र्य आंदोलनाच्या धामधुमीतही शिक्षण पध्दती, शिक्षक व विद्यार्थी या विषयी निरंतर चिंतन करीत असे गुरूजींनी इ.स. १९४७ मध्ये बोर्डीला असताना आपल्या मनातील आदर्श शाळा विषयी निबंध लिहिला.

साने गुरूजीनी स्थापन केलेल्या सेवादलामार्फत गावोगावी शिक्षण प्रसार केला. गुरूजींच्या स्वप्नातील शाळा म्हणजे आंतरभारती देशाच्या एकात्मतेचे जे स्वरूप गुरूजीना अभिप्रेत होते त्याची पायभरणी त्यांनी संकल्पिलेल्या अशा शाळांमधून शक्य होती. खूप विचार करूनच गुरूजींनी हा आराखडा तयार केला असावा असे वाटते.

मात्र आता जरी शासनाच्या प्रयत्नाने शिक्षण गावागावात उपलब्ध झाले असले तरी शाळांची अनाकर्षक इमारती, पोटार्थी शिक्षक व बोजड अभ्यासक्रम यामुळे मुलांना शाळांविषयी फारसे आकर्षण वाटत नाही.

शिक्षणाचा प्रभाव व्यवस्थापन, पालक, शिक्षक व विद्यार्थी यांच्या सामाजिक परिश्रमांतून दृगोचर होतो याची पूर्ण जाणीव असल्यामुळे गुरूजींनी यातल्या प्रत्येक घटकां सबंधीचे स्पष्ट निर्देश आपल्या लेखात दिले आणि शाळा सर्वासाठी आकर्षणाचे व सेवेचे केंद्र कसे होईल याची काळजी वाहीली.

आज जे शिक्षण क्षेत्रात – क्षमता श्रेष्ठता शिक्षणाचा विचार होत आहे. १९४५ साली गुरूजीनी हीच कल्पना प्रत्यक्षात राबवित होते. प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये एक सुप्त गुण असतो गुरूजीनी ह्या सुप्त गुणांच्या श्रेष्ठतेवरून विद्यार्थ्याला पुरस्कार द्यायला हवे असा अभिनव विचार मांडला. बक्षिसे केवळ अभ्यासासाठी नव्हे तर परोपकारी विद्यार्थी, स्वच्छ विद्यार्थी, उंच विद्यार्थी, वजनाने अधिक विद्यार्थी अशा सर्व विद्यार्थ्यांना बक्षिस मिळावीत असे गुरूजींचे सुत्र होते.

साने गुरूजीनी माझ्या मनातील आदर्श शाळा या पत्रातून आदर्श शिक्षण पध्दतीवर जोर दिला आहे. सर्व मुलांना साक्षर करा चांगल्या प्रतीचे शिक्षण मिळायला पाहिजे. कारण तेच उद्या भारताचे भविष्य आहे. त्यांना शिक्षणासोबत चांगले संस्कार देणाऱ्या शाळा उभा रहायला पाहिजे. तसे शिक्षक निर्माण करायला पाहिजे तरच खरा लोकशाहीचा आनंद घेता येईल.

शिक्षण साक्षरतेचे महत्व जसे विद्यार्थी वर्गात आहे तसेच प्रौढ लोकांत सुध्दा आहे. लहान विद्यार्थी सोबत प्रौढांनी पण साक्षरतेचे धडे गिरवायला हवे. साक्षरतेमुळे शिक्षणामुळे मनुष्याचे जीवन विचार प्रगल्भ होतील. विचारधन वाढेल यासाठी गुरूजींनी कथेमार्फत लोकशिक्षणाचा साने गुरूजी शिक्षणाचे महत्व सांगत असताना आपल्या लेखणीमधून सुध्दा महत्व समाजापर्यंत

पोहचविण्याचे काम करीत होते. साने गुरूजी लिखित साक्षरतेच्या कथा या पुस्तकात छोट्या छोट्या कथेतून गुरूजी साक्षरतेचे महत्व व प्रचार केलेला दिसून येतो.

'साक्षरतेच्या कथा' या पुस्तकाच्या निवेदनात गुरूजी लिहितात हे पुस्तक बृहन्महाराष्ट्रात जेथे साक्षरतेचे, प्रौढ शिक्षणाचे वर्ग आहेत तेथे तेथे गेले आहे. कोणी त्यातील गोष्टीवर नाट्यप्रवेशही बसवले आहेत. या गोष्टी रोजच्या जीवनातील आहेत. प्रत्यक्ष पाहिलेल्या अनुभवल्या आहेत. लिहायला वाचायला शिकणे किती आवश्यक आहे ते या सत्य कथांवरून सर्वांना सहज पटेल लोकसत्ताक भारतात स्त्री व पुरूष कोणीही निरक्षर राहता कामा नये. साक्षर व्हायची करायची प्रेरणा हे पुस्तक देत आहे.[६७]

स्वराज्याचा लोकशाहीचा वापर करून जगायचे असल्यास प्रत्येक भारतीयाला लहान मुलांसोबत प्रौढांना पण साक्षरतेची गरज आहे. यासाठी साने गुरूजीनी जशी राष्ट्रीय सेवा दलामार्फत गावोगावी जावून साक्षरतेचा शिक्षणाचा प्रचार व प्रसार आपल्या भाषणातून लोकांपर्यंत पोहचविला तसा आपल्या लेखणीतून तो जागृत ठेवला.

साक्षरतेच्या कथा या पुस्तकामधील पैलगडची रमी या कथेमध्ये शिक्षण नसल्याकारणाने रमीला कसा त्रास सहन करावा लागला ? आपले हक्काचे पैसे घेता येत नव्हते कारण तिला सही येत नव्हती. शेवटी सेवादलाची मुलांना गावात जावून रात्रशाळा काढून गावकऱ्यांना कसे साक्षर केले याचे कथन आपल्याला वाचायला मिळाले. साक्षरता शिक्षणामुळे माणसाच्या मनातील भिती कशी दूर होते. याचे गोष्टीरूप शिकवण भिती पळवणारा मंत्र या कथेतून वाचायला मिळतो. शिक्षण असेल तर आपल्याला समाजात, नातेवाईकांमध्ये मान मिळतो ज्याला ज्ञान त्याला मान या कथेतून शिकायला मित्र माणूस होण्यासाठी शिका या कथेतून माणूस म्हणून जगण्यासाठी जशी अन्न, पाण्याची गरज आहे. तशीच शिक्षणाची गरज आहे. ज्ञान हा तिसरा डोळा आहे. हातात दिवा असून उपयोग नाही आपल्याला जीवनातील अंधार घालवायचा असेल तर आपल्या हाती ज्ञानचा दिवा हवा. ज्ञान हा खरा दिवा या कथेत सेवा दलाच्या मुलांनी दिलेला संदेश ज्ञान हा खरा दिवा. ज्ञान हा खरा प्रकाश, हातात कंदिल आहे परंतु पाटी वाचता येत नाहीतर रस्ता चुकायचा. भलतीकडे माणूस जायचा ज्ञान सर्वांना डोळस करते. म्हणून शिक्षा हि सर्वांना शिकवा. भारतात आता मुलाना अडाणी

६७. साने गुरूजी साक्षरतेच्या कथा, साधना प्रकाशन, पुणे आठवी आवृत्ती १९९८ , पृष्ठ क्र. ३.

ठेवू नका. सेवादलाची मुले आता गावोगावी संदेश देत ज्ञानाचे महत्व पटवून देत होते.

शेतकऱ्यांना श्रमासोबत शिक्षणांचाही गरज आहे. शिक्षणामुळे शेतकऱ्यांना कसा फायदा होईल याविषयी साने गुरूजी साक्षरतेच्या कथा या पुस्तकात माणूस होण्यासाठी शिका या कथेत सांगतात.

पाऊस धो धो पडत होता. हातातोंडाशी आलेले पीक मातीत मिळाले. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांच्या सभा होऊ लागल्या. खंड माफ करा, शेतसारा माफ करा, शेतकऱ्यांस तगाई द्या असे ठराव होऊ लागले. सरकार काय करणार, इकडे सर्वाचें डोळे होते. कलेक्टरांकडे शिष्टमंडळ गेले. विचार करतो, साहेब म्हणाले काही दिवसांनी गावोगावच्या चावडीत सरकारी जाहीरनामे लागले.

शेतकऱ्यांनी पिकवले किती, खर्च किती आला, तोटा किती आला, याचे जमाखर्च सादर करावे. ज्याचे नुकसान झाले आहे असे दिसेल, त्याला शेतसारा माफ करण्यात येईल.

शेतकऱ्यांना लिहिता वाचता येत नाही. ते कसा जमाखर्च ठेवणार? जे शिकलेले जमिनदार होते त्यांच्याजवळ जमाखर्च होते. त्यांना भराभरा सूट मिळत गेली आणि गरीब शेतकरी त्यांचीच दाद लागेना! त्या दिवशी गोविंदा त्या गावाला गेला होता. गोविंदा मोठा सेवेकरी. दादा आमचा शेतसारा नाही का कमी व्हायचा? सारा भूईमूग गेला. सरकार जमाखर्च दाखवा म्हणते.

आमचा उघडा हिशेब. सारा तोंडी सांगू. म्हणावं, आमची घरं बघा. गाडमीमडकी रिकामी आहेत. ती सांगतील की या घरात दाणे नाहीत. साहेबाला पांढऱ्यावरचं काळं समजतं. त्याला हिशेब हवा. काय करायच.? तुम्हांला सारी दुनिया नाडते तरी तुम्ही चार अक्षरं शिकणार नाही. शिका म्हटलं तर म्हणाल, आम्हांला का मामलेदार, मुन्सफ व्हायचं आहे? बाबा रे, माणसासारखं या जगात वागायचं असेल तर शिकलं पाहिजे. पदोपदी अडतं. पत्र लिहिता येत नाही. आलेल वाचता येत नाही. पत्र लिहिणाराला द्या पैसा. मनीऑर्डर लिहिणाराला द्या पैसा. आधीच गरीबी, त्यात ही आशा दक्षिणा वाटायची. कधी तुमचे डोळे उघडायचे ? शिका. उद्या स्वराज्य आलं तर ते कसं टिकायचं याची मला चिंता वाटते.

होय, दादा. उद्यापासून मी हातात पाटी घेतो. आम्ही अडाणी म्हणून तर जगाचे पोशिंदे असून उपाशी मरतो ! बरोबर बोललात. शिका, खरं स्वराज्य आणा.[६८]

६८. कित्ता, पृष्ठ क्र. १०.

अशाप्रकारे देशाला स्वातंत्र्य तर हवेच होते. मात्र ते उपभोगण्यासाठी व देश चालविण्यासाठी शिक्षणाचीही गरज होती. समाज साक्षर झाला तर तो आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरूध्द बंड करू शकतो व आपल्या न्याय हक्कासाठी भांडू शकतो, झगडू शकतो, हेच साने गुरूजींना अपेक्षित होते.

४.५ सामाजिक स्वातंत्र्याविषयी विचार :

साने गुरूजींनी समाजातील अस्पृश्यता नष्ट व्हावी, एकता निर्माण व्हावी व सर्वत्र समाजवादाची स्थापना व्हावी या हेतून ते सर्वत्र जनजागृती करत राहिले. दीन दलितांना सामाजिक स्वातंत्र्य मिळावे यासाठी गुरूजींनी आपल्या भाषणांतून, लेखणातून सतत आवाज उठविला. साने गुरूजींनी आपल्या काँग्रेस पत्रामधून अस्पृश्योसंबंधी विविध प्रकारे लिखाण केले. त्याचप्रमाणे साधना याही पत्रामधून लिखाण करून अस्पृश्योद्धारासंबंधित जनजागृती केली.

'मंदिर प्रवेशाची भाषणे' व इतर पुस्तकात साने गुरूजींची अस्पृश्यांना मंदिर प्रवेश मिळावा यासाठी केलेली भाषणे आहेत. १९४५ साली, हिंदूस्थानातील जनतेला विशेषतः प्रमुख नेत्यांना व पक्षांना सत्तातरांची अस्पष्ट चाहूल लागून वातावरण उल्हासित झाले होते. एक नवीन चैतन्य निर्माण झाले. स्वातंत्र्य लढ्यात तुरूंगात डांबलेल्या अनेक वीरपुरूषांच्या सुटका झाल्या त्याचबरोबर हिंदूस्थानच्या स्वातंत्र्य सुर्याच्या पहाटेची किरणे राजकीय क्षितिजावर दिसू लागली.

'मंदिर प्रवेशाची भाषणे' या पुस्तकात साने गुरूजींनी अस्पृश्यांना मंदिर प्रवेश मिळावा. यासाठी केलेल्या भाषणे व त्यातून जनमत निर्माण करण्यासाठी केलेली कार्य आपणास वाचायला मिळतात. साने गुरूजी आपल्या भाषणातून सांगतात, प्रत्येकाला वाटते आपला देश स्वातंत्र्य व्हावा. आपल्याला स्वराज्य मिळावे व तो सुदिन ही जवळ आलेला आहे. पण हे स्वराज्य जरी मिळाले तरी त्यामध्ये आमची स्थिती काय राहिल हे प्रत्येक जण विचारल्याशिवाय राहणार नाही. कारण स्वातंत्र्य मिळविण्यासाठी शेतकरी कामगार, दीनदलितांनी भाग घ्यावा यासाठी आपण सर्वांना सांगितले की हे स्वातंत्र्य तुमच्यासाठीच आणायचे आहे.

साने गुरूजी शेतकऱ्यांना व कामगारांना मेळाव्यांमधून, सभेमधून सांगत– स्वराज्य तुमच्यासाठीच आणायचे आहे शेतीची जमीन वाटून द्यायची आहे. प्रत्येकाच्या वाटणीला २०–२५

एकर जमीन येईल जमीन सर्वांच्या मालकीची होईल. गावची जमिन गावच्या मालकीची ज्याला ज्याला श्रम करायचे असतील त्याने त्या शेतात जाऊन श्रम करावे.[६९] ह्या सर्व गोष्टी स्वराज्य आले म्हणजे करायच्या आहेत. काँग्रेस यासाठीच तुम्हा श्रमणाऱ्यांकडे येत आहे व शेतकऱ्याचे स्वराज्य आणित आहे. स्वराज्यात शेतकऱ्याप्रमाणे कामगारही सुखी होईल. मोठे कारखाने भांडवलदारांच्या ताब्यातून घेऊन राष्ट्राच्या मालकीचे होतील कामगारांना पगारी रजा, विमा, भरपूर पगार, मुलांच्या शिक्षणाची सोय, रहायला सुरेख चाळी, आजारपणात दवा अशा सर्व सुविधा कामगारांना पुरविल्या जातील.

अशाप्रकारे शेतकरी व कामगार यांचे असे स्वराज्य आणायचे आहे. यासाठी शेतकरी व कामगारांनी लढ्यात भाग घ्यावा असे गुरूजी कळकळीने खेडोपाडी फिरून सांगत. साने गुरूजी हे सर्व करीत असताना आपल्या भाषणात सांगतात देशातील शेतकरी, कामकरी सुखी व्हावेत त्याचप्रमाणे अस्पृश्यही सुखी व्हायला पाहिजे.

इ.स. १९४२ मध्ये चले जाव लढा सुरू झाला होता. त्यावेळेस मुंबईत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण झाले होत. त्या भाषणात ते म्हणाले. काँग्रेसचे पुढारी ब्रिटिशांना युध्द हेतू विचारीत असतात. मी ही चलेजावच्या काँग्रेसच्या लढाईचे युध्द हेतू विचारीत आहे. जे स्वराज्य तुम्ही आणणार आहात त्यात पाच–सहा कोटी दलित जनता अशीच पारखी राहणार ना? कोणाचे स्वराज्य तुम्ही आणू पाहता?[७०] याचे उत्तर काय देणार? असे गुरूजीना वाटले. स्वातंत्र्य दोन प्रकारचे आहेत. एक आर्थिक स्वातंत्र्य व दुसरे सामाजिक स्वातंत्र्य.[७१]

आर्थिक स्वातंत्र्य सत्ता हाती आल्यावर उपभोगू शकतो. मात्र सामाजिक स्वातंत्र्य आपण ह्या घटकेला सर्वांना देऊ शकतो ते देण्यास ब्रिटिश आपल्याला आडवत नाहीत. मात्र हे सामाजिक स्वातंत्र्य आपणच अडवून ठेवले आहे. मनाचा मोठेपणा असता तर ते एका क्षणात आपण दिले असते मात्र आपण तसे करीत नाही.[७२]

आज–उद्या स्वातंत्र्य मिळेल शेतकऱ्यांना जमिन देऊ कामगारांना सुविधा देऊ मात्र सामाजिक स्वातंत्र्य आपण दलित समाजाला का देत नाही? याची गुरूजींना खंत होती. अस्पृश्यता जावी यासाठी यापूर्वी अनेक जणांनी प्रयत्न केले. महात्मा जोतिबा फुले, महात्मा गांधी, विनोबा

६९. साने गुरूजी मंदिर प्रवेशाची भाषणे व इतर, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. ८.
७०. कित्ता, पृष्ठ क्र. १०.
७१. कित्ता.
७२. कित्ता.

भावे इ. नेत्यांनी यासाठी प्रयत्न केले. महात्मा फुलेनी– पुण्यात हरिजनांना पाण्याचे हौद खुले केले. महात्मा गांधीनी उपोषण केले. कर्मवीर भाऊराव पाटीलांनी अनेक हरिजनांना उच्च शिक्षण दिले. प्राध्यापक माटेनी ही धडपड केली. संत महात्म्याने प्रयत्न केले. मात्र अस्पृश्यता जाईना. लाखो खेड्यात ती तशीच होती.

साने गुरूजी तर महात्मा गांधीना आपला आदर्श मानत. महात्मा गांधीचे अस्पृश्यता निवारणाचे अर्धवट कार्य पूर्ण करण्याचे राहून गेले. ते आपल्या हातून पूर्ण व्हावे यासाठी गुरूजी स्वकियाशी लढा देऊन जिंकले.

गुरूजी आापल्या भाषणात पुढे सांगतात– खानदेशचे एक थोर कार्यकर्ते श्री. सीताराम भाऊ चौधरी (वारकरी) पंढरपुरचे विठ्ठल मंदिर उघडावे म्हणून तेथे गेले. त्यांनी गुरूजींना लिहिले. तुम्ही आलात तर मला हिंमत चढेल, बळ चढेल, या.[७३] गुरूजी निघाले व गुरूजींनी आमरण उपोषण करायचे ठरविले. व गावोगावी सेनापती बापटांसोबत जनमत गोळा करू लागले. पंढरपुरचा विठोबा म्हणजे महाराष्ट्राचे दैवत व याचे दरवाजे हरिजनात उघडे व्हावेत. यासाठी साने गुरूजींनी लढा द्यायचे ठरविले. पंढरपुरचे विठोबाचे मंदिर बडव्याच्या ताब्यात होते. सहजासहजी ते बडवे ऐकणारे नव्हते. गुरूजी आपल्या भाषणात म्हणातत, माझ्याजवळ कोणत बळ ? मी का बडवे मंडळी जवळ शास्त्रार्थ करीत बसू ? देवाजवळ सारी लेकरे आले ही का चर्चेची वस्तू ? आपले प्राण हातात घेऊन उभे रहावे एवढेच आपले बळ.[७४] या निश्चयाने गुरूजी उपोषण केले. परंतू महर्षी सेनापती, भाई अच्युतराव, शिरूभाऊ लिमये, एस.एम. जोशी, मधु लिमये या सर्वांनी गुरूजींना सहा महिने थांबायला लावले गुरूजीना समजावले. शेवटी गुरूजीनी माघार घेतली. आपला उपवास मागे घेऊन घरी बसण्यापेक्षा गावागावात फिरून–अस्पृश्यता दूर करा सांगत. गुरूजी पुढे म्हणतात मी हिंडणार नव्हतो कोठेतरी राम नाम म्हणत बसणार होतो. परंतू शेवटी बाहेर पडलो परिणाम होवो, न होवो. तू संागत जा, असे मी मनात म्हटले.[७५]

पंढरपूरचे मंदिरा जवळचे दरवाजे हरिजनांना मोकळे व्हावे यासाठी गुरूजी अमरण उपोषण करून देहत्याग करायला तयार झाले. पंढरपूर म्हणजे महाराष्ट्राचे हृदय विठोबाचे मंदिर ही जीवनाची किल्ली पंढरपूरची कळ दाबली तर महाराष्ट्रभर प्रकाश पडेल असे गुरूजींच्या मनात

७३. कित्ता पृष्ठ क्र. १३.
७४. कित्ता.
७५. कित्ता.

झाले. पंढरपूरचे म्हणजे दक्षिणेची काशी तेथील पांडुरंगाचे मंदिर जवळ जवळ अडीच हजार वर्षाचे अति प्राचीन आहे. बडवे मंडळी कर्नाटकातून येऊन त्या मंदिरात पुजा अर्चा करीत होते. त्या मंदिर व्यवस्थापनावर बडवे लोकांचे वर्चस्व होते. असे हे प्राचीन पवित्र मंदिर देवाच्या सर्व लेकरांना मोकळे व्हावे म्हणून साने गुरूजींनी उपवास केला होता.

साने गुरूजी आपल्या भाषणात संताच्या कार्याची महती सांगताना लिहितात– वारकरी पंथ सुरू होण्यापूर्वी जवळ जवळ हजार वर्षे हे मंदिर प्रसिध्द होते. पुढे संताना महिता वाढविला. नामदेव, ज्ञानदेव उत्तरेची यात्रा करून आले. संताना वाटले असावे– सर्व इस्लाम धर्मीय लोक मशिदित एकत्र जमा होतात. मात्र हे हिंदू मंदिरात केव्हा होईल ? यासाठी त्यांनी किमान पंढरपूरच्या वाळवंटात तरी हिंदूनी भेदभाव न मानता एकत्र जमावे. साऱ्या महाराष्ट्रातून विठ्ठलनामाचा गजर करीत यावे. पंढरपूर वाळवंटात एकत्व अनुभवा येथे परस्परांना भेटा. तुकारामाच्या अभंगात वाळवंटाचा अपार महिमा आहे. [७६]

ऐकमेका लोटांगणी येती रे
कठोर हृदये मृदू नवनीते
पाषाणा पाझर फुटती रे [७७]

साने गुरूजी बंडखोर संत ह्या भाषणात सांगतात– संत बंडखोर होते.[७८] त्यांनी अन्यायाविरूध्द, अज्ञानाविरूध्द बंड केले. त्यांनी संस्कृत भाषेतील ज्ञान मराठीत आणून झोपडी–झोपडीत पोहचविण्याचे काम केले. मात्र समाजातील कर्मठ लोकांनी त्यांचा छळ केला. ज्ञानेश्वरांवर समाजाने बहिष्कार टाकला. कुंभारचे मडके ही मिळू दिले नाही. तुकाराम महाराजाचे अभंग इंद्रायणी नदीत फेकले व आता संत गेल्यावर त्यांच्या पालख्या आपण खांद्यावर उचलतो. जीवंत असताना संताचा छळ केला. परंतू न डगमगता आपले कार्य करीतच राहिले. त्यांनी केलेले कार्य पुढे चालवायला हवे आपण संतांचा मागोवा घेत पुढे जाण्याचा प्रयत्न केलाच नाही मात्र आता तसे न करता आपण एक पाऊल पुढे टाकून प्रयत्न करायला हवे.

४.६ साने गुरूजींचा स्त्री स्वातंत्र्यविचार : व्यक्ती स्वातं त्र्य लढा

साने गुरूजीनी ज्याप्रकारे शेतकरी व कामगारांच्या व अस्पृश्यांच्या प्रश्नांवर लढे उभारले

७६. कित्ता, पृष्ठ क्र. १४.
७७. कित्ता.
७८. कित्ता, पृष्ठ क्र. १५.

त्याप्रमाणे स्त्रियांच्या समस्यांवर लढे उभारले जरी नसले तरी स्त्रियांच्या जीवनातील वेदनेविषयी समाजाला जागरूक करून समाजात स्त्रियांना प्रतिष्ठा मिळवून देण्याची एक मोहिमच गुरूजीनी आपल्या साहित्यातून राबवली होती.

स्त्री जीवनविषयीची संवेदना साने गुरूजींमध्ये विकसित होण्यात त्यांच्या आईने मोलाची भूमिका बजावली. स्त्रियांची समजली गेलेली कामे हलक्या प्रतीची आणि पुरूषांची कामे मात्र श्रेष्ठ, हा प्रचलित समज चुकीचा आहे. ही जाण साने गुरूजींमध्ये आईने निर्माण केली. श्यामची आई मध्ये अळणी भाजी वडिलांनी विनातक्रार खाल्ली आणि मुलांनाही त्याविषयी चुप राहायला सांगितले असा प्रसंग आहे. या साध्या प्रसंगातून गृहिणीच्या कामांबद्लच्या कृतज्ञतेचा भाव आणि आदर साने गुरूजी व्यक्त करतात. चूलीच्या धूरात दिवसभर खटपट करून बनवलेल्या अन्नाला ताटावर आयतं बसून नावे ठेवू नयेत, हा या प्रसंगातला विचार साने गुरूजींच्या मनातील स्त्री जीवनाविषयीची संवेदनशीलता प्रकट करतो. स्त्रियांच्या जगण्यातील कष्टांचे आणि तिच्या सोशिकतेचे दर्शन जसजसे साने गुरूजींना होत गेले तसतसा स्त्रियांविषयीचा त्यांचा आदर वाढत गेला. त्यांच्याविषयी कृतज्ञतेची भावना वाढत गेली.

माणिकच्या रूपाने साने गुरूजींना सासुरवाशीणीच्या जगण्यातील वेदनेचा जिवंत अनुभव मिळाला. माहेरहून पैसे, दागिने आणण्यासाठी सासरच्या लोकांनी केलेल्या छळाच्या जोडीला नवऱ्याने दिलेला विकृत त्रास माणिकला सोसावा लागत होता. माणिकच्या रूपाने पंढरीला भारतीय स्त्रियांची कुचंबणा पुनश्च पाहायला मिळाली.

कालांतराने त्याविषयी साने गुरूजी लिहितात, माणिकवर अपरंपार प्रेम करणाऱ्या तिच्या आजोबांनी माणिकला सासरी का पाठवावे? नाही पाठवत त्या नकारत असे स्वच्छ व स्पष्ट शब्दांत त्यांनी का सांगितले नाही? लोकलज्जा, अब्रु या शब्दांना ते भीत असत. माणिकच्या प्राणापेक्षा रूढीची अब्रु त्यांना मोलाची होती. समाज बंडखोर झाल्याशिवाय ही अनंत आपत्ती दूर कशी होणार? हे बंड स्त्रियांनीच केले पाहिजे व आपले स्वत्व सिध्द केले पाहिजे. जीवनसंघर्षात टिकून राहण्यासाठी जी सोशिकता आणि जिद्द नितांत आवश्यक असते ती स्त्रीकडे मुबलक प्रमाणात असते.

साने गुरूजींचा स्त्रीविषयक दृष्टीकोन समजण्याच्या दृष्टीने भारतीय स्त्रियांच्या बदलत्या सामाजिक दर्जाचा आढावा घेणारी भारतीय नारी ही त्यांची पुस्तिका महत्वाची आहे. त्यांच्या मते ५००० वर्षापूर्वी आर्य आणि नाग संमिश्रणाच्या काळात स्त्रीला समाजात मान होता. स्वतःचे विचार, मते मांडण्याचा तिला अधिकार होता, कारण उत्पादन प्रक्रियेत तिचा सहभाग होता. त्या दळीत, कांडीत, विणीत. वयन्ती म्हणजे विणणारी हा शब्द वेदात येतो. [७९]

स्त्रियांवर घालण्यात आलेल्या बंधनांचे स्वरूप जातिनिहाय वेगवेगळे होते याचे भान साने गुरूजीना होते. ते लिहितात, प्रतिष्ठित वर्गात जरी विधवांवर बंधने घातली गेली असली तरी गरीब श्रमणाऱ्या जातीत मोकळेपणा असे. त्यांच्यात पुनर्विवाह असे, परंतु ज्या जाती स्वतःला श्रेष्ठ मानत त्यांच्यात स्त्रियांची कुचंबणा अधिक.[८०] स्त्रियांवरील बंधनात प्रांतवार फरक आहे याचीही जाणीव साने गुरूजींना होती. उत्तर भारतात प्रचलीत असलेली पडदा पध्दत महाराष्ट्रात किंवा दक्षिणेत नाही. उत्तरेत ही रीत इस्लामबरोबर आली की ती आधीपासून होती असा सवालही ते उपस्थित करतात. दक्षिण भारतात क्वचित भिन्नजातीय विवाहही होत. जे उत्तरेकडे आढळत नाहीत. [८१] दक्षिण भारतात आणि उत्तर भारतात असलेले हे चालीरीतींमधील फरक, स्त्रियांवरील बंधूमध्ये असलेली जातिनिहाय भिन्नता याविषयीच्या स्पष्टतेमुळे साने गुरूजींनी पुढे हिंदू कोड बिलातील घटस्फोटाच्या तरतुदींविषयी विवाहाच्या साऱ्या प्रकारांचा विचार केला आहे ना? असा प्रश्न उपस्थितीत केला होता.[८२] त्यावरून स्त्रियांच्या शोषणाचे जाणीव साने गुरूजींना होती हे पुन्हा एकदा दिसून येते.

स्त्रियांचे दुय्यमत्व आणि गुलामगिरी यांना प्रामुख्याने चालीरीती, रूढी–परंपरा जबाबदार असल्याचे साने गुरूजी मानतात. ते लिहितात स्मृती पुरूषांनी लिहिल्या. त्यांनी पुरूषांची सोय पाहिली. स्त्रियांनी लिहिल्या असत्या तर स्वतःच्या भावनांच्या अनुरूप लिहिल्या असत्या.[८३] रूढी–परंपरा जपण्याचे ऐवढे ओझे भारतीय मनावर आहे की त्यातील अमानवीय क्रूरतेचे भानही त्याला नाही. स्त्रिया त्यांचे माणूसपणच हरवून बसल्या आहेत. याची जाणीव साने गुरूजींना पदोपदी होत असे. त्याविषयी गुरूजी लिहितात. मी खानदेशातील खेड्यांमधून हिंडायचो. घरात कोण आहे ? मी विचारी, घरात माणसे नाहीत. मला सांगण्यात येई. बायका तर घरात असत. पुरूष म्हणजे

७९. साने गुरूजी, भारतीय नारी, रीया पब्लिकेशन, पुणे, प्रथमावृत्ती २०११, पृष्ठ क्र. ४.
८०. किल्ता, पृष्ठ क्र. ११.
८१. किल्ता, पृष्ठ क्र. १३.
८२. साने गुरूजी स्वप्न आणि सत्य, रीया पब्लिकेशन, पुणे, प्रथमावृत्ती २०११, पृष्ठ क्र. २१.
८३. किल्ता, पृष्ठ क्र. १७.

माणसे, बायकांना कोण माणूस म्हणतो ? बायकांमधली अभिजात मानवताही आम्ही विसरून गेलो. त्यांना स्वतंत्र अस्तित्व आहे. व्यक्तिमत्व आहे. आत्मा आहे, हृदय आहे, बुध्दी आहे, सुखदुःखे आहेत हे आम्ही विसरून गेलो... व्यक्तीला अभिजात स्वतंत्र महत्व आहे हे आम्ही विसरून गेलो... जोवर दुसऱ्याच्या आत्म्याची प्रतिष्ठा आपणास कळली नाही तोवर स्वातंत्र्याचा अर्थ आपणास कळला असे मी तरी म्हणणार नाही. [८४]

स्त्री शिक्षणाविषयी साने गुरूजी लिहितात, स्त्रियांनी का शिकावे ? कोण म्हणतील, लग्न व्हायला अडचण येऊ नये म्हणून, दुसरे म्हणतील हिशेब ठेवील. दुकानातून माल आणील, धोब्याला कपडे किती दिले वगैरे लिहून ठेवील आणखी कोणीही म्हणतील, पतीबरोबर वादविवाद करील, काव्यशास्त्रविनोद करतील, कलात्मक व साहित्यिक आनंद उपभोगायला पतीला बाहेर नको यायला. आपली बायको भुक्कड, नुसती चूल फुंकणारी, असे त्याला नको वाटायला. अशा नाना दृष्टी असतात. परंतु यातील एकही खरी नाही. स्त्रियांनी का शिकावे ? त्यांना आत्मा आहे म्हणून, त्या मानव आहेत म्हणून, शिक्षणाचा इतर काय उपयोग व्हायचा असेल तो होईल, परंतु स्वतःच्या विकासासाठी शिकायचे. देहाला भाकरी हवी तशी मनाला विचाराची भाकर हवी. स्त्रियांची मनोबुध्दी का उपाशी ठेवायची ? [८५]

आस्तिक ही कांदबरी समाजातील विविध घटना आणि सामाजिक प्रक्रिया याकडे पाहण्याचा स्त्रियांचा दृष्टीकोन हा पुरूषांच्या दृष्टीकोनापेक्षा भिन्न असू शकतो याचे भान साने गुरूजींना होते असे दिसून येते. वास्तविक साने गुरूजींच्या साहित्यात वारंवार काही गुणांचा स्त्रियांचे गुण म्हणून होणारा उल्लेख स्त्रीवादी दृष्टीकोनातून आक्षेपार्ह ठरू शकतो. स्त्रियांमध्ये लज्जा, सोशिकता, वात्सल्य, स्वच्छतेची आवड हे गुण अंगभूत असतात असे साने गुरूजी मानत. [८६] हे गुण पुरूषात असू शकत नाहीत अशीही त्यांची धारणा नाही. मात्र स्त्रीमध्ये काही गोष्टी स्वभाविक असतात. साने गुरूजींची नायिका संध्या ही संध्या या कादंबरीत सापडते. अर्थात संध्यामध्ये स्वतंत्र विचार करण्याची क्षमता असली तरी त्यानुसार जगण्याचे धारिष्ट्य नाही. तिचे मतभेद बाहेरच्या कोणाशी नाहीत तर प्रत्यक्ष नवऱ्याशीच आहेत. संध्या कल्याण या साम्यवादी कार्यकर्त्यांच्या प्रेमात पडून विवाहबध्द होते.

८४. कित्ता, पृष्ठ क्र. २०.
८५. साने गुरूजी, भारतीय संस्कृती, रीया पब्लिकेशन, पुणे, प्रथमावृत्ती २०११, पृष्ठ क्र. १५२.
८६. कित्ता, पृष्ठ क्र. १५४.

संध्या कल्याणमध्ये पूर्णपणे मिसळून जात नाही मात्र त्याच्यापासून वेगळ्या मार्गावरून चालण्याची हिंमतही दाखवू शकत नाही. इथे कल्याण, संध्येवर कोणताही शारीरिक अत्याचार करत नसतो हे खरे, मात्र एकदा विरोधाचा सूर लावल्यावर संध्या इतर कोणतीच बंडखोरी करत नाही. म्हणूनच साने गुरूजींच्या स्त्रीविषयक दृष्टीकोनातून काही मर्यादा असल्या तरी स्त्री जीवनाविषयी समाजात संवेदनशीलता निर्माण करण्यातील त्यांचे आणि त्यांच्या साहित्याचे योगदान महत्वाचे ठरते.

राजा मंगळवेढेकर आपल्या 'साने गुरूजीची जीवनगाथा' या पुस्तकात प्रसंग सांगतात.

"एकदा तरूणांच्या घोळक्यात अशाच गप्पा – गोष्टी चालल्या होत्या. बोलता बोलता गुरूजींच्या लग्नासंबंधी प्रश्न निघाला गुरूजी म्हणाले मला कोण मुलगी देणार? एक मित्र म्हणाले तुम्ही वधू पाहिजे अशी जाहिरात दिलीत की दारापुढे वधूंची रांगच्या रांग लागेल..... गुरूजी म्हणाले बरे पण मी एका अटीवर जाहिरात देईन तेव्हा सर्वांनी मोठ्या उत्सुकतेने विचारले, कोणती अट सांगा? गुरूजी म्हणाले, पतीने लुगडे धुतले असता जिला चालेल अशी वधू पाहिजे. अशी जाहिरात मी देईन! या जाहिरातीची तरूण मित्र थट्टा करून हसू लागले. पण गुरूजी एकदम गंभीर होऊन म्हणाले हसता काय ? आपल्या मातांनी, आपल्या भगिनींनी, पत्नीनी आपल्या घरी हमालासारखे राबावे, तुमचे कपडे धुवावेत, आणि पुरूषाने स्त्रीचे लुगडे धुण्याची कल्पनाही समाजाला सहन होऊ नये ही कसली समता? कसले स्त्री स्वातंत्र्य! घरातील घाण काढायची स्त्रीयांनीच, लहान मुल हगले तर ते लहान बहिणीने काढावे. मोठ्या भावाने मात्र हात लावू नये. हा काय न्याय आहे? या प्रसंगातून साने गुरूजींच्या मनातील स्त्रीविषयी आदर व कळवळा दिसून येतो."[८७]

साने गुरूजींना समाजातील उच्च नीच भेद नको होतो त्याचप्रमाणे स्त्रीयासुध्दा समाजामध्ये पुरूषांसारखेच समान हक्क पाहिजे असे अभिप्रेत होते. त्यासाठी गुरूजीनी स्त्री समतेचा प्रत्यक्ष जरी लढा दिला नसला तरी अशा प्रसंगातून व आपल्या साहित्यातून समाजाला जागृत करून स्त्री स्वातंत्र्याचे लढे दिले.

४.७ आदर्श शैक्षणिक विचार

आज भारत देशाला स्वातंत्र्य होऊन ७० वर्षे उलटून गेली तरी देशातील शिक्षणाची दुर्दशा

८७. राजा मंगळवेढेकर, साने गुरूजींची जीवनगाथा, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. ३०७.

संपलेली नाही. गावोगावी शाळा वाढल्या, मोठ मोठ्या शाळेच्या इमारती उभ्या राहिल्या, शिक्षकांची, विद्यार्थ्यांची आणि तुकड्यांची संख्या बेसुमार वाढली. विद्यार्थ्यांच्या पाठ्यपुस्तकांचे, वह्यांचे दप्तर वाढले, फी वाढली परंतू या सर्व गदारोळात हाडाचा शिक्षक व मूळ शिक्षणांचा पाया मात्र हरपला.

शासनाच्या प्रयत्नाने प्राथमिक शिक्षण व माध्यमिक शिक्षण खेडोपाडी पोहचले. मात्र शाळांच्या अनाकर्षक इमारती, पोटार्थी शिक्षक, शिक्षकाचे व्यावसायिकरण व बोजड अभ्यासक्रम यामुळे मुलांना शाळांविषयी फारसे आकर्षण वाटत नाही.

आज शिक्षण क्षेत्रात अत्याधुनिक पध्दती म्हणून क्षमताधिष्ठित शिक्षणाचा विचार होत आहे. विद्यार्थ्याच्या कलागुणांना वाव मिळावा व त्यांच्यातील क्षमता वाढीस लागावी या उद्देशाने आज मूल्यमापन परीक्षा घेतल्या जात आहेत. हीच संकल्पना साने गुरूजींनी इ.स. १९४५ मध्ये सुचली होती. व ती गुरूजीनी राबवण्याचा प्रयत्न केला. इ.स. १९४७ मध्ये साने गुरूजी बोर्डीला असताना आपल्या मनातील आदर्श शाळेसंबंधी एक छोटासा निबंध लिहिला साने गुरूजींच्या स्वप्नातील आदर्श शाळा म्हणजे त्यांना अतिप्रिय असलेल्या आंतरभारती संकल्पनेचाच मूळ गाभा होता. गुरूजींना अभिप्रेत असलेली देशाची एकात्मता ही आशा शाळामधूनच शक्य होती.

'विद्या विनियेते शोभते' यामधील विनय या शब्दाविषयी गुरूजी आपल्या माझ्या मनातील आदर्श शाळा या निबंधात लिहितात. पूर्वकाळी शिक्षण या शब्दाला विनय किंवा विनयन हा शब्द होता. विनि याचा अर्थ शिकविणे हा आहे. विनय याला हल्ली नम्रता हा अर्थ प्राप्त झाला असला तरी त्याचा मूळ अर्थ तो नाही. हल्लीचा अर्थ मागून आला. शिक्षणामुळे विनय उत्पन्न होतो. विनय हे कार्य आहे. विनय या शब्दाचा मूळ अर्थ शिक्षण. परंतू शिक्षणामुळे येणारी जी नम्रता तिलाच हा विनय शब्द लावण्यात येऊ लागला.[८८] गुरूजी पुढे लिहितात, शिक्षणास विनय हा शब्द योग्य आहे. विनी म्हणजे विशिष्ट पध्दतीने नेणे..... मुलाच्या मनाला–मुलाच्या मनात बीज रूपाने असणाऱ्या अनेक शक्तींना विशिष्ट तऱ्हेने वाढविणे, योग्य तऱ्हेने नेऊन वाढविणे हा विनय या शब्दाचा अर्थ आहे. गुरूजी शाळेच्या ठिकाणीविषयी लिहितात भिन्न भिन्न स्थितीतून येणाऱ्या मूलांच्या मतांचे विनिमय करण्याचे स्थान म्हणजे शाळा.[८९]

८८. साने गुरूजी क्रांतीच्या मार्गावर व इतर लेख, वर्धा प्रकाशन, पुणे, आवृत्ती २०११, पृष्ठ क्र. १२६.
८९. कित्ता.

शाळेची जागा सुंदर व रमणीय असावी व शहराच्या मध्यभागी दाटवस्तीत नसावी. याविषयी गुरूजी लिहितात, मुले शाळेत येतील त्यावेळेस तरी त्यांच्या मनावर रमनीय व सुखकर परिणाम होईल अशी परिस्थिती असावी. शाळेतील विशुध्दता व रम्य वातावरण, त्याप्रमाणे आपण नेहमी राहातो ती जागा या दोहोंचा फरक त्यांच्या मनावर नीट बिंबावा व त्यास स्वच्छतेची महती कळून यावी.[९०] शाळेतील शिक्षक तर त्यांच्या विषयात पारंगत असावेत. त्यांना आपल्या विषयाची सखोल माहिती असावी. विद्यार्थ्यांना शिकविताना मनोरंजक पध्दतीने शिकविता यावे वर्गातील लहान मुलांची माहिती जाणून घेण्याची क्षमता जास्त असते म्हणून ते शिक्षकांना वेगवेगळ्या प्रकारच्या शंका विचारू शकतात म्हणून त्यांच्या शंकेचे निरसन शिक्षकांना करता यावे. गुरूजी याविषयी लिहितात... मुलांचा शिक्षक सर्वज्ञ आहे हा समज असतो.. म्हणून सर्व विषयांची सोपपतिक नसली तरी मनोरंजक माहिती असावी. त्याला सायन्स येत नसेल परंतू शास्त्रज्ञांची चरित्रे, त्यांचे अनुभव, अडचणी हे त्यांस माहित असावे. गणित येत नसेल तर गणिती लोकांबद्दल माहिती असावी. त्याला संगीत येत नसेल परंतू संगीत तज्ञांची चरित्रे, त्यांच्या लहरीच्या गोष्टी हे त्यास माहित असावे....[९१]

सर्व शिक्षकांना आपल्या विषया व्यतिरिक्त इतरही विषयाची मुलभूत व मनोरंजक माहिती असावी असे गुरूजीना वाटते शिक्षक जरी वयाने वृध्द झाले तरी मनाने नेहमी तरूण असावे. आपल्या विषयात प्रविण असावेत आपल्या विषयात खोल ज्ञान जरूर असावे तसेच इतरही विषयाचे सामान्य ज्ञान जरूर असावे. शिक्षण हा देशाभिमानी असावा शिक्षकांना आपला देश, संस्कृती, इतिहास, पूर्वज यांचा अभिमान असावा जर शिक्षकच देशप्रेमी नसेल तर तो विद्यार्थ्यांच्या मनात देशप्रेम ओतू शकत नाही. याविषयी साने गुरूजी लिहितात.... आपल्याकडील शिक्षक तितके देशाभिमानी व परंपरेचे भक्त नसतात. ते मुलांच्या मनात देशाबद्दलचे विचार ओतू शकत नाहीत. मीच जर देशी पोशाखात नसेल तर मुलांनी का असावे? आपण स्वतः देशभक्त होऊन , देशाभिमानी होऊन मुलांच्या मनावर सारख्या देशाभिमानाचा संस्कार केला पाहिजे.[९२] पुढे गुरूजी शिक्षकाविषयी लिहितात माझ्या मनात असा एक शिक्षक शाळेत असावा, ज्याचे काम गोष्टीचे सांगणे असेल....[९३] रिकामा तास असला म्हणजे त्याने आपल्याकडील अनेक ग्रंथातील किंवा पाश्चात्य ग्रंथातील गोष्टी सांगाव्या.. निदान वस्तीगृहात तरी शिक्षक असावा, जो रोज खालच्या वर्गातील लहान मुलांस सायंकाळी भोजनोत्तर निरनिराळ्या गोष्टी सांगून त्यांचे मन रिझवील.

---

९०. कित्ता, पृष्ठ क्र. १२७.
९१. कित्ता, पृष्ठ क्र. १२८.
९२. कित्ता, पृष्ठ क्र. १३०.
९३. कित्ता, पृष्ठ क्र. १३१.

शाळेतील शिक्षक समन्वयी असावेत. शाळेतील मुलांसोबत मिळून–मिसळून राहणारे, त्यांच्यासोबत खेळणारे, गोष्टी सांगणारे शिक्षक हवेत. परंतू त्या शिक्षकांनी आपले स्थान सोडू नये. याविषयी गुरूजी लिहितात.... नम्र परंतू आदर पात्र हे तत्व त्याने डोळ्यासमोर ठेवावे. मुलांस त्याने डोक्यावर बसू देऊ नये. त्याचप्रमाणे मुलास तो कर्दनकाळही भासू नये.. मुलांना शिकविण्याचे काय असे कठीण आहे. तेथे आदळआपट चालायची नाही. सुंदर कामे आदळ आपटीने होत नसतात..[९४] अशाप्रकारे शिक्षक कसे असावेत त्यांनी मुलांशी कसे वागावे, कसे शिकवावे याचे मार्गदर्शन गुरूजी आपल्या निबंधांतून देतात.

शाळेतील विद्यार्थ्यांना इतर विषयाबरोबर भाषेचाही अभिमान असावा याविषयी गुरूजी काही उपदेश करतात, मराठी शिकविताना संस्कृत शब्दांकडे व्युत्पतीकडे वगैरे मुलांचे लक्ष उत्तरोत्तर जास्त वेधावे. सुंदर कविता त्यांच्याकडून पाठ करवून घ्याव्यात त्याकरीता अलंकार, छंद याची माहिती त्यांस व्हावी.[९५]

शाळेत मुलांच्या गुणांचा गौरव करावा. याविषयी साने गुरूजी लिहितात, माझ्या या शाळेत अभ्यासातच बक्षिसे न ठेवता कोणत्याही Excellence ला बक्षीस देण्यात येईल. हा मुलगा स्वच्छ आहे. द्या त्याला बक्षिस, हा खेळात प्रविण आहे हा वर्गनायकाचे काय चांगले करीतो, हा परोपकारी आहे. हा हुशार आहे हा हस्त कौशल्यात प्रवीण आहे. हा उंच आहे. हा वजनाने अधिक आहे. Every Sort of Excellence will be Reward[९६] इ.स. १९४५ मध्ये साने गुरूजीनी लिहिलेले हे विचार आजही शिक्षण क्षेत्रात लागू पडू लागले आहेत. आज परिक्षेतले यश हेच शिक्षकाचे मुख्य गमक मानले जाते. गुरूजीनी तर वार्षिक परीक्षासुध्दा नकोत असे मांडले. शिक्षकांने प्रामाणिकपणे केलेले विद्यार्थ्याचे मूल्यमापन म्हणजे त्यांची परीक्षा[९७] असे डॉ. मु.ब. शहा याने आपल्या प्रस्ताविकात लिहिले आहे. हेच गुरूजीचे विचार आजही शिक्षण क्षेत्रात मुल्यमापन परीक्षा स्वरूपात दिसून येतात. गुरूजींच्या स्वप्नातील शाळा म्हणजे त्यांना गती प्रिय असलेल्या आंतरभारती संकल्पनाचा मूळ गाभा होता. देशात एकात्मतेचे जे स्वरूप गुरूजींना अभिप्रेत होत त्याची पायाभरणी त्यांची संकल्पीलेल्या अशा शाळांमधूनच शक्य होती.

अशाप्रकारे साने गुरूजीचे आदर्श शाळेविषयीचे आदर्श विचार आजही शिक्षकांना, शाळेला

९४. कित्ता, पृष्ठ क्र. १३२.
९५. कित्ता, पृष्ठ क्र. १३५.
९६. कित्ता, पृष्ठ क्र. १४०.
९७. कित्ता, पृष्ठ क्र. १२४.

व समाजाला उपयोगी आहेत व त्यांचा अवलंबन केल्यास शिक्षण हे खऱ्या अर्थाने समाजातील तळागाळातील वर्गापर्यंत पोहचून सामाजिक व शैक्षणिक प्रगती होईल.

समारोप :

साने गुरूजींनी राष्ट्रीय लढ्यासोबत सामाजिक लढे एकसोबत दिले. राजकीय स्वातंत्र्यासोबत सामाजिक स्वातंत्र्याची तेवढीच गरज आहे हे गुरूजीनी जाणले होते. त्यासाठी त्यांना पंढरपूर चळवळ, साक्षरता चळवळ, श्रमिकांच्या मुलभूत हक्कासाठी चळवळ, स्त्री स्वातंत्र्य चळवळ इ. चळवळी केल्या व भारतीय समाजात जनजागृती करून समतेची जाणीव निर्माण केली.

* * * *

प्रकरण पाचवे

साने गुरूजींचे साहित्य व स्वातंत्र्य लढा

प्रस्तावना

५.१. साहित्यातून लढा

५.२. साप्ताहिक व दैनिक

५.३. काँग्रेस साप्ताहिक

५.४. कर्तव्य दैनिक

५.५. साधना साप्ताहिक

५.६. चरित्रः वाङःमय

५.७. अनुवादित साहित्य

५.८. श्रमिकांचे साहित्य

५.९. काव्य

५.१०. कथा आणि कांदबरी

५.११. साने गुरूजींचे लेखन वैशिष्ट्ये

समारोप

प्रस्तावना :

साने गुरूजी हे स्वातंत्र्यपूर्व काळातील मराठी व भारतीयांच्यावर आपल्या कार्यकर्तुत्वाचा ठसा उमटवणारे आदर्श साहित्यिक होते. साने गुरूजींनी आपल्या वाणी–लेखनाने व कृतीने व्यक्तीच्या मनात व समाज जीवनात चांगुलपणाचा, बंधुभावाचा, मांगल्याचा, सेवावृत्तीचा व करूणेचा परिपोष अखंडपणे केला. १९३० ते १९५०च्या दीर्घ काळात गुरूजीनी आपल्या लेखना–भाषणाद्वारे समाजात वीरवृत्तीचे जागरण सततच केले. त्यांच्या वाणीत व लेखनीत ओज–तेज भरपूर आढळले.

साने गुरूजींच्या साहित्यातून स्वातंत्र्य लढा अभ्यासताना गुरूजी ही व्यक्ती समजून घेतली पाहीजे. त्यांची जीवनपध्दती समजून घेतली पाहिजे. देश गुलामगिरीत होता. स्वातंत्र्यासाठी चळवळ चालू होती. त्या चळवळीत त्यांना स्वतःला झोकून दिले होते. अनेक वेळा त्यांना कारागृहवासही भोगावा लागला. समाजातील सर्व थरांतून ते हिंडले. शेतकऱ्यांची आणि कामगारांची दुःखे त्यांनी जवळून पाहिली. स्वातंत्र्यासाठी चळवळ करणाऱ्यांना त्यांनी आईच्या मायेची उब दिली. हे सर्व ते संवेदनशील मनाने पाहत होते. त्यांनी जे पाहिले, जे अनुभवले तेच त्यांनी लिहिले.[१]

साने गुरूजी हे आपल्या लेखनपणाचा मोठेपणा न दर्शविणारे अतिशय सरळमार्गी लेखक होते. त्यांच्या अंगी प्रखर राष्ट्रभक्ती व शोषितांविषयीची कळकळ होती. ती त्यांच्या साहित्यातून स्पष्ट दिसून येते.

५.१ साहित्यातून लढा :

साने गुरूजींनी अध्यापन कार्य, समाजसेवा कार्य, भारतीय स्वातंत्र्य लढा अशा बहुविध क्षेत्रांमध्ये आपल्या कार्यकर्तुत्वाचा ठसा उमटविला. भारतभूमीच्या सेवेसाठी नोकरीचा राजीनामा देऊन स्वातंत्र्य संग्रामात त्यांनी स्वतःला झोकून दिलेआणि शेवटच्या श्वासापर्यंत दीनदलितांच्या सुखासाठी झटत राहिले. देशातील परकीयांची गुलामगिरी संपवावी, समाजातील विषमता संपवावी, एकता निर्माण व्हावी, शेतकरी–कामकरी वर्गाचे दैन्य–दारिद्र्य दूर व्हावे व सर्वत्र समाजवादाची स्थापना व्हावी याच कळकळीने साने गुरूजी सर्वत्र जनजागृती करत राहिले. लहान मुले, विद्यार्थी, तरूण, दीनदलित, स्त्रिया, शेतकरी, कामकरी यांना स्वत्वाची जाणीव व्हावी, त्यांच्यात देशप्रेम,

१. संपादक भालचंद्र नेमाडे (संपा), साने गुरूजी पुर्नमूल्यांकन, (जनशताब्दी चर्चासभातील निबंध), साहित्य अकादमी, नवी दिल्ली, २००६–२०१४, पृष्ठ क्र. ६.

अन्यायाविरूध्द लढण्याची जागृती गुरूजींनी आपल्या साहित्यातून निर्माण केली. सानें गुरुजींनी लोकसाहित्यापासून विश्व साहित्यापर्यंत विशाल प्रभाव पसरविला अनेक वाङःमयप्रकार सर्जनशिलतेने वापरला. अनेक संस्कृती व धर्म यांच्या अभ्यासातून जीवन दृष्टी विकसित केली. साने गुरूजी हे सर्व शेतकरी–कामकरी शोषितांच्या कळवळा असणारे, भारतीय संस्कृतीची नव्याने व्याख्या करणारे व राष्ट्रीय स्वातंत्र्ये लढा व सामाजिक समतेचा लढा एकाचवेळी लढले पाहिजे यासाठी आग्रही असणारे व तसे आपल्या साहित्यातून जनजागृती करणारे – एक महाकवी होते. भारतीय स्वातंत्र्य लढ्याशी सर्वांगाने समरस झालेले संवेदनशील साहित्यकार आणि समाजवादी सुधारक म्हणून साने गुरूजींचा लौकीक आहे. साने गुरूजींच्या साहित्याने एका पिढीला अक्षरशः वेड लावले व अनेकांना प्रेरणा दिली. आणखी येत्या अनेक पिढ्यांवर वाङःमयीन संस्कृतीचे संस्कार साने गुरूजींचेच होत राहतील अस भविष्य कथनही बेधडक करता येतं. साने गुरूजीच्या जीवनात मांगल्याचा सुंगध भरून राहिला होता. लेखणी आणि वाणी या दोन्हीचा उपयोग त्यांनी जीवनात जे उत्तम–उदात, सुंदर आहे, त्याच्या प्रसारासाठी केला. आज जीवनाच्या सर्वच क्षेत्रात नैतिक मूल्यांचा झपाट्याने ऱ्हास होत आहे. यासाठी साने गुरूजींचे साहित्य आणि विचार आजही मार्गदर्शक ठरू शकतील.

५.२ साप्ताहिक व दैनिक :

साने गुरूजींची लिखाणाची सुरवात 'छात्रालय' या दैनिकापासून होते. साने गुरूजी खानदेश एज्युकेशन सोसायटीच्या हायस्कुलमध्ये शिक्षक असताना विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार व्हावेत व त्यांचा सर्वांगिण विकास व्हावा या उद्देशाने गुरूजीने या वृत्तदैनिकाला सुरवात केली.

टिळक युग संपून गांधीयुग चालू होते. देशात स्वातंत्र्य लढ्याचे वारे वाहत होते. देशात गांधी विचारांने चैतन्याचे वातावरण होते. यासाठी आपल्या विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासासोबत देशातील घडामोडी समजणं तितकचं महत्वाचे होते मुलांना जगाचे ज्ञान व्हावे. त्यांच्या मनात देशप्रेम निर्माण व्हावे या ध्येयाने पछाडलेल्या गुरूजींनी 'छात्रालय दैनिकपत्र' दि. १९ जुलै १९२७ ला काढले. हे पत्र छापील नसून हस्तलिखित होते. यात सर्वांगिण विषयाची चर्चा असे. इतिहास, धर्म, समाजजीवन, शिक्षण अशा वेगवेगळ्या विषयांची ह्या दैनिकात माहिती असे. विशेषतः आदर्श

स्त्रियांची माहिती व्हावी म्हणून झाशीची राणी, अहिल्याबाई होळकर यांचे चित्र त्यात रंगवले असे. भारताच्या प्राचीन परंपरेतील भगवान गौतम बुध्द, सम्राट अशोक, राम चरित्र, संत मीराबाई तसेच आधुनिक काळातील लो. टिळक, लोकहितवादी गोपाळराव देशमुख, आगरकर, म. गांधी इत्यादींच्या जीवन चरित्रे गुरूजी आपल्या लेखन शैलीतून छात्रालय दैनिकातून विद्यार्थ्यांसमोर मांडीत असत.

छात्रालय दैनिका मागची प्रेरणा शाळेतल्या व छात्रालयातील मुलांवर सुसंस्कार करण्याची, त्यांचे ज्ञान वाढविण्याची, त्यांचे उद्‌बोधन करण्याची व त्यांच्या ठायी देशभक्तीचा ध्येयवाद करण्याची होती. गुरूजी विलक्षण तळमळीने, पोटतिडिकेने लेखन करीत, त्यांचे लेखन बोध करणारे, प्रश्न करणारे, प्रसंगी फटकारणारे, कधी रसाळपणे गोष्टी सांगून उद्‌बोधन करणारे अशाप्रकारे विविध रूपे धारण करून उद्‌बोधन करणारे होते.

छात्रालय दैनिकाचा जन्मच मुळी विद्यार्थ्यांचे शीलसंवर्धन व उत्तम संस्कारासाठी झालेला होता. अशा या काळात राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय बाणा, स्वदेश भक्ती, स्वदेशी मालाचा प्रचार इ. विषयी विद्यार्थ्यांनी आपल्या अंगी राष्ट्रीय वृत्ती बाणावी व इतरांनी त्याचे अनुकरण करावे म्हणून गुरूजी आपल्या दैनिकातून त्याविषयी विवेचन करीत असत.

सन १९२७ ला महाड चवदार तळे सत्याग्रहाच्या बातम्या येत होत्या. साने गुरूजींनी ४ ऑगस्ट १९२८ च्या 'छात्रालय' दैनिकात सामाजिक समतेचा धर्म या अर्थाने खरा धर्म कोणता ? या नावाने कविता प्रसिध्द केली.[२] अशाप्रकारे कधी लेखातून तर कधी कवितेतून सामाजिक सुधारणेचा मंत्र व प्रबोधन छात्रालय दैनिकातून सतत ३ वर्षे केले. सन १९३० ला अर्थिक अडचणीमुळे छात्रालय दैनिक बंद केले.

श्री हरिभाऊ सोहनी यांनी छात्रालय दैनिकाचा प्रतिसाद पाहून आपल्याकडील २००० रू. बचत व विद्यार्थी वर्गणीतून विद्यार्थी मासिक छापायचे ठरले त्याचप्रमाणे तसा गोखले गुरूजी व साने गुरूजी यांच्या विचार विनिमयातून दि.९ नोव्हेंबर १९२८ पासून विद्यार्थी मासिक चालू झाले. छात्रालय दैनिक हस्तलिखित होते तर विद्यार्थी मासिक छापील होते पहिल्या अंकावर

---

२. आत्माराम वाळींजकर, साने गुरूजी आणि पंढरपूर मंदिर प्रवेश चळवळीचे अध्यात्म, डिंपल प्रकाशन, प्रथमावृत्ती, १ जून २००१, पृष्ठ क्र. १०९.

फोडले भांडार धन्याचा हा माल ।

मी तव हमाल । भारवाही ।।[३]

असे संत तुकारामचे चरण ब्रीदवाक्य म्हणून छापण्यात आले होते. विद्यार्थी या दैनिकातून साने गुरूजी भारतीय संस्कृती, परंपरेची ओळख करून देऊ लागले त्यात चरित्रकथा असत. लाला लजपतरायांनी सायमन कमिशनच्या विरोधात काढलेल्या मोर्चावर ब्रिटिश सैनिकांनी हल्ला केला होता. यातील जखमामुळेच थोड्या दिवसांत लाला लजपतराय यांचा मृत्यू झाला. विद्यार्थी मासिकात गुरूजींनी लाला लजपतरायवर कविता बनवून प्रसिध्द केली. त्या कवितेतील काही भाग

लाल हरवला । कंठ दाटला

झाला शोकालागी ठाव

लाभे अश्रूना हो वाव

काळ कोपला । ला ।।

जो पंजाबाचा प्राण

जो या भूमातेचे त्राण

देणारा रिपूला आव्हान

आजि लोपला । ला. ।।

बोले, देशा लागे आग

मजला श्रमणे आहे भाग

करावी यास्तव सर्वत्याग

फार शोभला । ला. ।।

ठेवा त्याची मूर्ती समोर

दावा विश्वाला कृती थोर

दावा अरिला आता जोर

सकळ आपुला । ला. ।। [४]

अशा प्रकारे साने गुरूजीनी विद्यार्थ्यांना राष्ट्रप्रेमाची शिकवण जास्तीत जास्त देण्याचे प्रयत्न केले.

---

३. कित्ता, पृष्ठ क्र. १११.

४. साने गुरूजी, साने गुरूजींचे अप्रकाशित साहित्य, (संपूर्ण साने गुरूजी, खंड ४५),वरदा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती जाने. २०११, पृष्ठ क्र. १५७, १५८, १५९.

५.३ काँग्रेस साप्ताहिक

साने गुरूजींवर म. गांधीजीच्या विचारांचा जसा प्रभाव होता. तशीच काँग्रेसवर श्रध्दा होती. काँग्रेसकडून गुरूजींना खूप अपेक्षा होत्या. काँग्रेसच स्वातंत्र्य मिळवून देऊ शकतो. देशातील, शेतकरी, कामकरी, दीन दलित, दु:खीत जनतेला काँग्रेसच तारू शकते. असा गुरूजींचा दृढ विश्वास होता. यासाठी काँग्रेस पक्षाचा प्रसार व त्यांच्या विचारांचा प्रचार व्हावा व काँग्रेस खेडोपाडी पोहचावा. यासाठी एखादे राष्ट्रीय साप्ताहिक असावे असे गुरूजीना वाटले व याच विचारातून दि.६ एप्रिल १९३८ ला काँग्रेस साप्ताहिक सुरू केले.

गुरूजींनी आपल्या पत्राचे नाव काँग्रेस ठेवले कारण सर्वत्र रामनामाप्रमाणे काँग्रेस ह्या शब्दाचा गजर व्हावा. जप व्हावा. अशी कल्पना ते नाव ठेवण्यामागची होती. पत्रके विकणारी मुले काँग्रेस... काँग्रेस हा पुकार करतील आणि घेणारे लोकही काँग्रेस... काँग्रेस म्हणून बोलावतील.[५]

काँग्रेस साप्ताहिकामधून खानदेशातील शेतकऱ्यांचे प्रश्न व समस्या गिरणी कामगारांचे संप तसेच सावकारशाही या ज्वलंत विषयाबरोबर अस्पृश्यांच्या समस्येला प्राधान्य देऊन टिकात्मतक लिखाण केले.

गरीब दुबळ्यांचा उमाळा, विधायक दृष्टी, अबालवृध्द सर्वांना वाचावासा वाटेल असा मजकूर आणि शैली या भांडवलदार हे साप्ताहिक सुरू झाले साने गुरूजीच्या ह्या साप्ताहीकाची जातकुळीच वेगळी होती. इतर पत्राप्रमाणे ते गल्लाभरू पत्र नव्हते. लोकशिक्षण हे त्याचे ब्रीद होते. हे पत्र खेडोपाडी जाऊन बाया – बापडे एकत्र बसून त्यांच्यापुढे वाचन होईल स्वातंत्र्य आणि न्याय याबद्दलच्या लोकांच्या जाणिवा प्रकट होतील आणि देशासाठी, जनतेसाठी काही करण्याची असोशी त्यांच्यात निर्माण होईल अशी आशा साने गुरूजींना होती.

काँग्रेस पत्र काँग्रेसच्या भक्तीने रंगलेले होते. काँग्रेस सरकारचे हात बळकट करून अधिकाधिक प्रगतीपर धोरण अवलंबावयास त्यांना भाग पाडायचे तर जनशक्ती जागृत व संघटीत केली पाहिजे.

काँग्रेस साप्ताहिक हा अंक राष्ट्रीय सप्ताहात प्रसिध्द झाला. गुरूजी आपल्या पहिल्या

---

५. राजा मंगळवेढेकर, साने गुरूजींची जीवनगाथा, साधना प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९९२, पृष्ठ क्र. ११९.

अंकात राष्ट्रीय सप्ताहाची महती गाणारे एक गद्य काव्य लिहिले आहे. ते लिहितात राष्ट्रीय सप्ताह म्हणजे पंजाबमधील जालियनवाला बागेतील शेकडो हुताम्यांचे स्मरण, राष्ट्रीय सप्ताह म्हणजे स्वातंत्र्याच्या सर्व साधनांची पुजा व प्रचार, ज्या–ज्या गोष्टीनी राष्ट्राचे बळ वाढेल त्या त्या गोष्टी करू पाहणे म्हणजे राष्ट्रीय सप्ताह, राष्ट्रीय सप्ताह म्हणजे खादी, राष्ट्रीय सप्ताह म्हणजे हिंदू–मुस्लिम ऐक्य, हरिजन सेवा, राष्ट्रीय सप्ताह म्हणजे दारूबंदी, विचार प्रचार, निर्भयता, जातीभेदाचा अंत, खेड्यांची सेवा, किसान कामागारांची सेवा, साक्षरतेचा प्रसार, स्वयंसेवक दल वाढविणे, वानरसेना वाढविणे, झेंडा गावोगाव फडकावणे, प्रभात फेऱ्या, पोवाडे, गाणी यांची मंगल दंगल ![६] अशाप्रकारे गुरूजीनी आपल्या पत्राचे धोरण स्पष्ट केले.

काँग्रेस साप्ताहिक अमळनेरहून दर सोमवारी अरविंद प्रेसमधून प्रसिध्द होत असे. साने गुरूजी पहिल्या अंकाच्या मनोगतात म्हणतात, मजवळ पैसा नाही, अडका नाही. दुसरा अंक कसा निघेल याची मला विवंचना आहे. अशी त्याकाळी गुरूजींची मनस्थिती होती. तरी सुध्दा त्यांना वाटे की या काँग्रेस साप्ताहिकाद्वारे सर्वसामान्याचे प्रबोधन व्हावे.[७] गुरूजी आपल्या मनोगतात पुढे म्हणतात मी माझे हे पत्र भिक्षेवर चालविणार आहे.... भिक्षेवर चालणारे हे पहिले पत्र आहे... हे पत्र जातिभेदाचे भूत गाडू पाहील, द्वेषाला शमवू पाहील, अहिंसा प्रचारील, सहधर्माच्या कल्पना फैलावील, रूढींना जाळील, दंभ दुरावील, जीवनात निर्मलपणा आणील, प्रेम आणील, कर्म आणील... काँग्रेसचे मला जे स्वरूप दिसते, जे आवडते तेच मी दाखविणार. काँग्रेसच्या ज्या स्वरूपाची मी पुजा करतो त्याच स्वरूपाची इतरांना करायला लावणार... काँग्रेस काँग्रेस असे सर्वत्र व्हावे अशी मला तहान आहे. ही तहान तृप्त करायचे लहान साधन म्हणून हे पण मी सुरू करीत आहे.[८]

साने गुरूजींच्या काँग्रेस साप्ताहिक ची लोक उत्सुकतेने वाट पाहत कारण अनेक अकल्पीत गोष्टी गुरूजी लोकांपुढे ठेवीत कॉग्रेस मातेचे परिभ्रमण हे सदर लोकांच्या हृदयाचा ठाव घेई. अन्याय वेशीवर टांगणारे पत्र असे लोकांना वाटे. गुरूजी स्वतः गावोगाव जात. लोकांना भेटत आणि त्यांचा वृत्तांत लिहित. त्यामुळे पत्रातील टवटवी व ताजेपणा सतत टिकून असे. साने गुरूजीनी कोणाची भीड बाळगली नाही. त्यामुळे काँग्रेस पत्र सर्वत्र प्रसिध्द पावले.

---

६. आत्माराम वाळींजकर, साने गुरूजी आणि पंढरपूर मंदिर प्रवेश चळवळीचे आध्यात्म, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. ११०.
७. कित्ता, पृष्ठ क्र. १११.
८. साने गुरूजी (संपा), काँग्रेस, अमळनेर दि. १०.०४.१९३९, पृष्ठ क्र. १.

काँग्रेस साप्ताहिकात गुरूजीची लिहिण्याची स्फोटक, रंजक आकर्षक शैली होती. काँग्रेस व समाजवादाच्या विरोधात जे जे असतील त्या सर्वांवर टिका करित. सावकारशाही, शोषण कराचा भार, शेतकऱ्याची दुरावस्था या विषयांवर लिहिल्यामुळे काँग्रेस श्रेष्ठी रागावले व तक्रार करण्यास सुरवात झाली अशा प्रकारे काँग्रेस साप्ताहिक दोन वर्ष चालले व दि.१८ मार्च १९४० साली बंद झाले.

५.४ कर्तव्य दैनिक

स्वातंत्र्य दृष्टीपथात आले पण प्रत्यक्षात व्यवहारात आणताना देशाची फाळणी झाली. जातीय वृत्तीना उधाण आले याच काळात गांधीजीची हत्या झाली. देशभर वातावरण तापलेले होते. अशातच जातीयतेला प्रती जातीयतेने उत्तर देण्याचा उद्योग काही मंडळीनी आरंभला.

साने गुरूजी म. गांधीजीच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यासाठी लढत होते. गुरूजींना काँग्रेसबद्दल प्रेम होतेच मात्र पुढे काँग्रेसमध्येकाही अपप्रवृत्ती निर्माण झाल्या. गुरूजींना वाटले आता काँग्रेस विचाराच्या चौकटीत राहून उराशी बाळगलेले स्वप्न पूर्ण होईलच अशी आशा राहिली नाही. यासाठी गुरूजीनी समाजवादी पक्षाशी जवळीक केली. या समाजवादी विचारसरणीच्या प्रचारासाठी कर्तव्य दैनिक दि.११ फेब्रुवारी १९४७ ला काढले.

कर्तव्य दैनिकामार्फत समाजवादी पक्षाचा प्रचार व प्रसार त्याचप्रमाणे जातीयते विरूध्द जनमत संघटीत करण्याचे काम केले. मात्र पुढे अर्थिक अडचणीमुळे कर्तव्य दैनिक चार महिन्यानी बंद करावे लागले.

५.५ साधना साप्ताहिक

दि.१५ ऑगस्ट १९४८ रोजी साधना चा पहिला अंक प्रसिध्द झाला या साप्ताहिकाचे ध्येय वैरभाव व सामाजिक विषमता नष्ट करण्याचे होते. त्यासाठी साने गुरूजींनी पहिल्याच अग्रलेखात– समाजातील वैरभाव व विषमता नष्ट करून समता प्रस्थापित व्हावी असे जाहीर केले. या अंकामधून प्रांतभारती समाजाचे अज्ञात आधार, साधनेच्या कथा, विनोबांची पावण वाणी, सुंदरपत्रे, विश्वभारती अशी एकाहून एक सुंदर सदरे प्रसिध्द होत होती.

साने गुरूजींचे 'साधना' हे स्वातंत्र्य प्राप्तीनंतरचे साप्ताहिक होते. ते साप्ताहिक प्रकाशित करण्यामागची भूमिका मांडताना साने गुरूजी लिहितात – आज १५ ऑगस्ट स्वातंत्र्याचे बाळ जन्मून एक वर्ष झाले. स्वातंत्र्य बाळाचा हा पहिला वाढदिवस किती आपत्तीतून हे बाळ वाढत आहे. या बाळासाठी महात्माजींचे प्राणही खर्ची पडले.[९]

आर्थर रोड (मुंबई) जेलच्या लाईनीत साधना प्रेस होती. साने गुरूजीनी अखेरच्या काळात अंतःशुध्दीसाठीच्या अखंड साधनेतून अखेरचे साधना, नियतकालिका सुरू केले साने गुरूजीनी आपल्या आयुष्यभर केलेले आत्मचिंतन व साधनेतून निर्माण झालेला विचार या नियतकालिकेत वाचायला मिळतात. गुरूजींच्या लिहिण्या–बोलण्या – वागण्याच्या आशयाबरोबरच कृतीतूनही एक आकारही प्राप्त होताना दिसून येतो. त्यांच्या मनातील आई बनून साऱ्या समाजाची वात्सल्यपूर्वक सेवा करावी. प्रेमधर्माची शिकवण द्यावी. वीर वृत्ती जागृत करून प्रेमाचे अधिराज्य निर्माण करावे. ही गुरूजींची जीवनसाधना होती. समाजवादी विचारप्रणाली आपलीशी करून त्यांचे गुणगाण केले व त्याच बरोबर गांधीवरील गुरूजींची निष्ठा व भक्ती अचल, स्थिर राहिली हेच गुरूजींच्या साधनेचे मर्म होते.

साधना साप्ताहिक प्रथम मुंबईला सुरू झाले गुरूजींना मिळालेले चौदा हजार रूपये त्यांनी साधनेसाठी खर्च केले. साधनेत ते लिहू लागले. प्रुफे तपासू लागले. अंकाच्या घड्या स्वतः घालू लागले या कामी सेवादलाचे तरूण गुरूजींना मदत करत पुढे साधना पुण्यात आले. गरीबांचा दबलेला आवाज मोकळा करणे हा साधनेचा ध्येय आहे.

साधनामध्ये प्रसिध्द झालेल्या लेखाची पुढे 'स्वप्न आणि सत्य', चंद्रभागेच्या वाळंवटी जीवनाचे शिल्पकार, हिमालयाची शिखरे अशा नावाने पुस्तकेही प्रसिध्द झाली.

५.६ चरित्रः वाडःमय

साने गुरूजींना सुरवातीपासूनच थोरामोठ्यांची चरित्रे वाचण्याची आवड होती. ह्या सर्व आवडीनेच त्यांच्यावर लहान पासून संस्कार झाले. ह्या चरित्र वाचताना साने गुरूजींच्या प्रत्यक्ष जीवनावर फार मोठा परिणाम दिसून येतो. स्वामी विवेकानंद, रविंद्रनाथ टांगोर, महात्मा गांधीजी, विनोबा भावे, लोकमान्य टिळक इत्यादी बद्दल गुरूजींच्या मनात आदरभाव होता.

९. साने गुरूजी, साने गुरूजींचे अप्रकाशित साहित्य, (संपूर्ण साने गुरूजी खंड ४५), पूर्वोक्त, पृष्ठ क्र. १५२.

गुरूजींच्या चरित्रे लिहिण्या मागचा उद्देश संशोधनाचा नव्हता. गुरूजींना वाटे जे जे चांगले, उत्तम, संपन्न पवित्र आहे. ते समाजासमोर वाणी व लेखणीच्या माध्यमातून मांडत राहायचे. हाच गुरूजींचा एकमेव ध्यास होता. थोरामोठ्यांच्या स्वभावांची, वैशिष्ट्यांची व कार्याची ओळख गुरूजीनी लिहिलेल्या चरित्र वाङःमयातून होते. त्यांमुळे वाचकाच्या मनात प्रेरणा जागृत होते.

साने गुरूजींनी थोर देशभक्त चित्तरंजनदास यांचे चरित्र लिहून त्यांच्या जीवनाची ओळख करून दिली. असहकार चळवळीच्या वेळी तर देशबंधू, त्यांच्या पत्नी, त्यांचा मुलगा, भगिनी असे सारेजण स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झाले होते. अशा ह्या थोर देशभक्ताच्या व्यक्तीमत्वाचे विविध पैलू गुरूजींनी लिहिलेल्या चरित्रातून वाचावयास मिळते. या चरित्र वाचनातून सद्गुणांचे वाढ व्हावी. याच दृष्टीनेच गुरूजींनी चरित्रे लिहिलीत. साने गुरूजींना देशभक्तांबद्दल आदर होता. देशभक्तांच्या कार्याची ओळख समाजाला व्हावी याच प्रयत्नाने ही चरित्रे लिहिली गेली.

साने गुरूजींना लहान मुले जास्त आवडत ते लहान मुलांच्या विश्वात जास्त रमत. 'जो करील मनोरंजन मुलांचे, जडील नाते प्रभूशी तयाचे' ह्या उक्ती प्रमाणे लहान मुलांचे मनोरंजन करून प्रभूशी नाते जोडायचे असे गुरूजींचे ध्येय होते. गुरूजी ज्या–ज्या ठिकाणी जात असत तेथे मूलांशी संवाद साधत व त्यांना म. गांधीजी, शिवाजी महाराज, भगवान श्रीकृष्ण, पं. नेहरू, लो. टिळक यासारखे देशभक्त व थोरांचे चरित्रकथा मुलांना सांगत. जेणेकरून मुलांना देशभक्तांच्या कथा, शुरांच्या कथा, मुलांना माहित व्हाव्यात व त्यांच्या मनात देशप्रेम, देशभक्ती निर्माण व्हावी व थोराबद्दल मनात आदर व आदर्श निर्माण व्हावा हाच गुरूजींचा प्रयत्न होता.

थोरांच्या कथा अनेक मुलांपर्यंत पोहोचता यावे म्हणून त्यांनी भगवान श्रीकृष्ण, श्री शिवराय, आपले पंडित नेहरू, लोकमान्य टिळक यांच्या छोट्या कथा लिहिल्या व पुढे त्या सात चरित्रे खंड २९ या नावाने प्रसिध्द केले. त्याशिवाय हिमालयाची शिखरे आणि जीवनाचे शिल्पकार या पुस्तकातून साने गुरूजींनी अनेक भारतीय व पाश्चात्य चरित्र नायकांचा परिचय करून दिला. पण या पुस्तकांमध्ये सर्वात जास्त खपले ते पुस्तक म्हणजे – बापूजींच्या गोड गोष्टीचे ६ भाग या पुस्तकाच्या १९८१ पर्यंत अकरा आवृत्या निघाल्या या पुस्तकाला जास्त मागणी झाली.

महात्मा गांधीजीच्या जीवनावर अनेक साहित्याकारांनी चरित्रे लिहिली असतील पण खास

मुलांसाठी सोप्या व गोष्टीरूप भाषेत लिहिलेले हे पहिलेच पुस्तक असेल असे वाटते. गुरूजींनी हे गोष्टीरूपात म. गांधीजीचे चरित्र लिहिले आहे. त्यात अनेक बोलके प्रसंग आहेत. सहा भागांत व १२२ प्रसंगात ह्या पुस्तकाची विभागणी केलेली आहे. ह्या पुस्तकातून साने गुरूजींनी महात्मा गांधीजींच्या व्यक्तीमत्वाचे अनेक पैलूंचे दर्शन घडविले आहे.

गोष्टीरूप गांधीजी आणि बापूजींच्या गोष्टी या पुस्तकात साने गुरूजी म. गांधीच्या अहिंसात्मक विचारविषयी लिहितात. परकीय सरकारविषयी द्वेष पसरविणे हा माझा धर्म आहे. परंतु ही अप्रीती, हा द्वेष व्यक्तीकडे वळतो. सरकारी अधिकाऱ्यांचे मग खून पडतात. मी द्वेषाला व्यक्तींकडून वस्तूंकडे वळवीत आहे. परकीय अधिकारी मारू नका. हे परकीय कापडे जाळा असे सांगून व्यक्तीवर घसरणारी हिंसा मी वस्तूंकडे वळवितो.[१०] अशाप्रकारे म. गांधीनी लोकांना परकीय मालांवर बहिष्कार करायला सांगितले.

अशाप्रकारे साने गुरूजींनी आपल्या चरित्र वाङःमयातून देशातील तरूणांना थोरांच्या विचारांचे दर्शन घडविले. थोर देशभक्तांच्या विचारांची व कार्याची समाजाला ओळख व्हावी व माहिती मिळावी. यासाठी अशा चरित्रांची अत्यंत गरज आहे हे ओळखूनच साने गुरूजीनी चरित्र कथेचे लेखन केले. ही चरित्रे वाचून विद्यार्थी व तरूण वर्गात देशप्रेम व थोरांविषयी आदर व आदर्श निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही.

५.७ अनुवादित साहित्य

साने गुरूजींना वाचनाची फार आवड होती. त्यांना मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांबरोबर तमिख, गुजराती, बंगाली इत्यादी भाषा अवगत होत्या. गुरूजीनी आपल्या साहित्याच्या आधारासाठी इतर भाषीय लेखकांच्या कलाकृतीचा वापर केला होता. हे गुरूजीनी त्या–त्या पुस्तकात सुरवातीलाच स्पष्टपणे नमुदही केलेले आपल्याला दिसून येते. उदा. मनुबाबा (जॉर्ज इलियटसिलास गार्नर) नदी शेवटी सागराला मिळते. (गटे फ्रॉस्ट) या कथा – कांदबरीतून दिसून येते. परंतू गुरूजीने इतक्या चांगल्या व सफाईदार पध्दतीने भाषांतर केले आहे की, या कथा स्वतंत्र निर्मितीच वाटतात. अशाप्रकारे गुरूजींच्या कथा कांदबऱ्या या पूर्णपणे स्वतंत्र नाहीत व तशा त्या पूर्णपणे अनुवादित सुध्दा नाहीत.

---

१०. साने गुरूजी, गोष्टीरूप गांधीजी आणि बापूजींच्या गोष्टी, (संपूर्ण साने गुरूजी, खंड २७), वरदा प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती जाने २०११, पृष्ठ क्र. २६.

साने गुरूजीनी अनुवादीत केलेले टॉलस्टॉय याचे कला म्हणजे काय? हे पुस्तक अनुवादित केले यात कला म्हणजे सौंदर्य सर्जन या परंपरागत समजुतीचे टॉलस्टॉयने पूर्णपणे खंडन केलेले आहे खरी कला म्हणजे मानवी व्यापार आहे. सद्भावनेच्या वृध्दीसाठी जीवनात केलेला महत्व आहे. मानवी मायाचे कल्याण हेच कलेचे सर्वाच्च स्थान आहे.

स्वामी विवेकानंद यांच्या शिष्या भगिनी निवेदिता यांच्याविषयी गुरूजीच्या मनात आदर होता. गुरूजीनी त्यांची दोन पुस्तके राष्ट्रीय हिंदू धर्म व समाजधर्म या नावाने पुस्तके अनुवादित केले.

साने गुरूजींचा अनुवादित पुस्तके करण्याचा उद्देश इतर भाषेतील ज्ञान, विचार, परंपरा, रितीरिवाज आपल्या मराठी भाषिकांना समजाव्यात व त्याचे ज्ञान वाढावे तसेच परभाषीय शब्दाचे अर्थ आपल्या मराठी साहित्यात येऊन आपले मराठी साहित्य समृध्द होईल. याच अपेक्षेने गुरूजींनी अनुवादीत साहित्याची निर्मिती केली.

५.८ श्रमिकांचे साहित्यः

शेतकरी व कामगारांच्या लढ्यांना साने गुरूजींचे मोलाचे योगदान आहे. गुरूजीनी राजकीय स्वातंत्र्याला जेवढे महत्व दिले. तेवढेच सावकारांशी जमिनदारांशी व मालकांशी लढा देऊन शेतकरी–कामगारांना त्यांचे मुलभूत हक्क मिळविण्यासाठीच्या लढ्यांना महत्व दिलेले आहे. त्यासाठी गुरूजीनी आपल्या साहित्यातून, भाषणांतून व कृतीतून लढे दिले.

साने गुरूजींना सुरूवातीपासूनच शेतकरी–कामगारांविषयी आस्था व प्रेम होते. जुलै १९२३ मध्ये तत्वज्ञानांच्या अभ्यासासाठी अमळनेरच्या तत्वज्ञान मंदिरात, आलेल्या तरूण साने गुरूजींनी जुलै १९२३ मध्ये अमळनेरच्या तत्वज्ञान मंदिर सोडले. यामागचे कारण गिरणी कामगार व मालकांमधील संबंध होय. तत्वज्ञान मंदिर हे गिरणी कामगारांच्या श्रमावर चालत होते. मात्र मालक प्रताप शेठनी कामगारांना मुलभूत हक्कापासून वंचित ठेवले होते.

याविषयी साने गुरूजीनी नवा प्रयोग या कांदबरीत लिहितात. सुंदरदास वेदान्ती म्हणून प्रसिध्द आहेत. ते दानशूरही आहेत. परंतू गिरणीतील कामगारांसाठी ते काही करणार नाहीत.

कामगारांच्या श्रमाने मिळणारा पैसा ते दुसऱ्या शेकडो संस्थाना देतील, परंतू कामगारांसाठी सुंदर चाळी नाही बांधणार. एवढे कशाला त्यांनी राममंदिर बांधले ना ? परंतू तेथे हरिजनांना अजून प्रवेश नाही। [११] याच कथेतील सखाराम नावाचा नायक शेटजींनी बांधलेले तत्वज्ञान मंदिर सोडून जातो. तो त्याविषयी आपल्या मित्राला म्हणतो, काय रे कामगारांच्या पगारातून त्या संस्थेला पैसे घेतले जातात, हे खरे का? मग मी या संस्थेत कशाला राहू? कामगारांसाठी आपण काही करत नाही. त्यांची रात्रीची शाळा चालवत, नाही संघटना करीत... मी येथे न राहणे बरे आता येथे राहणे म्हणजे पाप, असेच मन रात्रंदिवस पुकारत राहिल.[१२]

५.९ काव्य :

साने गुरूजींना कविता करण्याची प्रेरणा लहान वयातच त्यांच्या आई वडीलांपासून मिळाली. दापोलीच्या शाळेत असताना शिक्षक राधारमण यांच्यापासून स्फूर्ती घेऊन साने गुरूजींनी काही कविता केल्या होत्या. पुढे हा बालपणाचा छंदाने गुरूजींना मोठेपणी कवी केले. साने गुरूजींनी बऱ्याचशा कविता कारागृहात असताना लिहिल्यात. तेथे गुरूजींना चिंतनाला भरपूर वाव मिळाला. गुरूजींच्या कविता त्यांच्या कथा – कांदबऱ्यामधून निरनिराळ्या पात्राच्या तोंडी वापरलेल्या दिसून येतात. पण बऱ्याचशा कविता पत्री या काव्यसंग्रहात आलेल्या आहेत. पत्री या कविता संग्रहाची पहिली आवृत्ती १९३५ साली दोधू गंगाराम शिंपी (अध्यक्ष, तरूण सेवक संघ, खादी भांडार, अंमळनेर) हे यांनी प्रकाशित केली. हि आवृत्ती ४३८ पानांची असून १६३ कवितांची आहे. या संग्रहाची दुसरी आवृत्ती १९४६ ज्ञा.पा हलदुले (राजहंस प्रकाशन, पुणे) यांनी प्रकाशित केली. त्या आवृत्तीत केवळ ९९ कविता आहेत.

पत्री या कविता संग्रहातील बहुतांश कविता इ.स १९२५ ते इ.स. १९३५ कालखंडातील असून साने गुरूजीनी निरनिराळ्या तुरूंगात लिहिलेल्या आहेत या काळात भारतातल्या विविध प्रदेशात, आणि विविध स्तरांवर जन आंदोलने झाली. म. गांधीजीच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या स्वातंत्र्याच्या लढ्यात जनता मोठ्या संख्येने सहभागी होऊ लागली होती. इ.स १९२९, डिसेंबर मधील लाहोर येथील भरलेल्या काँग्रेस अधिवेशनामुळे असहकार व सत्याग्रहाच्या युध्दाला गती आली होती. यात इंग्रजाविरूध्द लढा द्यायचे आवाहन करण्यात आले. म. गांधीजीच्या दांडीयात्रेने

११. साने गुरूजी, नवा प्रयोग, (संपूर्ण साने गुरूजी खंड १४), वरदा प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. १३,१४.
१२. कित्ता, पृष्ठ क्र. १५.

संपूर्ण देशात जागृती तयार झाली. अनेक तरूणांनी कायदेभंग चळवळीत सहभाग घेऊन तुरूंगात जाऊ लागले, शेतकरी लोक करबंदी चळवळी करू लागले. व्यापाऱ्यांनी परदेशी मालावर बहिष्कार टाकला या आंदोलनात स्त्रिया आणि किशोरवयीन विद्यार्थ्यांही सहभागी झाले होते. जानेवारी १९३०– मार्च १९३३ या काळात जवळ जवळ एक लाख वीस हजार लोकांना पकडून तुरूंगात टाकण्यात आले. दिवसांदिवस इंग्रजाची दडपशाही वाढू लागली होती. इ.स. १९३४ साली म. गांधीनी सामुदायिक आणि वैयक्तिक सत्याग्रह बंद केला. १९३५ साली गव्हर्नमेंट ऑफ इंडिया हा कायदा अंमलात आल्यामुळे भारतीय राजकीय स्वातंत्र्य लढ्याला एक वेगळेच वळण मिळाले.

याच काळात इ.स. १९३० साली साने गुरूजी स्वातंत्र्यसंग्रमात सहभागी झाले होते. सत्याग्रहात भाग घेऊन तुरूंगात गेले आणि तुरूंगवास कविता लिहिल्या होत्या. त्या कविता पत्री संग्रहात आहेत.

पत्री या संग्रहातील कवितेवर गांधी विचारांचा व समकालीन वातावरणाचा ठसा दिसून येतो. साने गुरूजीनी या कविता संग्रहातील कवितांची विभागणी आत्मपर व देशभक्तीपर अशा दोन भागात केलेली आहे. पहिला भाग – "हृदयमदीय तव सिंहासन होवो" या कवितेपासून निरोप या कवितेपर्यंत आणि भारतामाता या कवितेपासून ते सत्याग्रही या खंड काव्यापर्यंत दुसरा भाग कल्पिला आहे. या कविता संग्रहच्या सुरूवातीस पत्री–समर्पण व शेवटास माझी पत्री ही समर्पणात्मक कविता आहे. पत्री समर्पण ते माझी पत्री यामध्ये १६२ कविता आहेत. या कवितांचे चार खंडात वर्गीकरण केलेले आहे. खंड पहिला – (म्हणजे हृदय मदीय तव सिंहासन होवो पासून फुलाची आत्मकथा पर्यंत) यातील बहुतेक कविता ईश्वराविषयक आहेत. खंड दुसरा – (म्हणजे मय सभा राहिली भरून पासून निरोप पर्यंत) यातील कविता संसार विषयक आहेत. खंड तिसरा – (म्हणजे भारतमाता पासून खरे सनातन पर्यंत) यातील कविता देशभक्तीपर आणि स्वातंत्र्यविषयक आहेत. खंड चौथा – सत्याग्रही नावाचे खंडकाव्य आहे. खंडकाव्यात देशभक्तीचाच मुख्य सूर असून संस्कृतीच्या विविध अंगाविषयी कविता आहेत.

साने गुरूजींचे स्वातंत्र्य संग्रामातील योगदानाविषयी अभ्यास करताना साने गुरूजी लिखित 'पत्री' काव्य संग्रहातील देशभक्तीपर या भागातील कवितांचा अभ्यास करणे महत्वाचे ठरेल. हा

भाग तिसऱ्या व चौथ्या खंडात येतो.

तिसऱ्या खंडात मातृभूमीचे प्रेमाची भावना दिसून येते. साने गुरूजींच्या मनावर स्त्रीचे मातृरूपाच्या परिणाम दिसून येतो. आचार्य भागवतानी लिहिलेल्या पत्री कविता संग्रहाच्या परिचयात म्हटले आहे. श्री साने यांच्या अंतकरणात स्त्रीचे मातृरूप इतके व्यापून राहिले आहे की, जन्मदात्री माता, अन्नाच्छादन देऊन वाढविणारी आणि भक्तीभावाचे वळण लावणारी भारतामाता आणि विश्वमंगलाच्या ध्येयाकडे बोलाविणारी जगन्माता या मातृत्रयीचे त्यांच्या काव्यात अखंड स्त्रोत्र गायन चाललेले असते .[१३]

साने गुरूजींनी जन्मदायी माता, भारतमाता व जगन्मातेला आपल्या जीवनात पुज्य स्थान दिले आहे. जन्ममातेचा गुरूजींचे वय सोळा वर्षे असताना मृत्यू झाला. त्यामुळे पुढे गुरूजींना आईची सेवा करता आली नाही. भारतमातेच्या सेवेसाठी आईने तयार केले असे गुरूजी म्हणतात. २६ जानेवारी १९३० रोजी भारतभर काँग्रेसच्या आदेशानुसार येथे लाहोर कॉग्रेस संपूर्ण स्वातंत्र्य प्राप्त करण्याची गंभीर प्रतिज्ञा घेतली गेली. शान ना इसकी जाने न पाये । चाहे जान भले ही जाये ।। असे आपल्या राष्ट्रीय ध्वजासाठी प्राणही द्यावयास आम्ही सर्व सज्ज आहोत. देशभर वारे पसरले या मंतरलेल्या काळात स्वातंत्र्याच्या भावनेने देश पेटला होता.

दि. १२ मार्च १९३० म. गांधीनी दांडीयात्रा सुरू केली. मिठाचा सत्याग्रह सुरू झाला. चलाव लाठी चलाव डंडा । रक्त हमारा नही है ठंडा ।। या घोषणांनी सारा देश दुमदुमला.

साने गुरूजी अस्वस्थ झाले. अखेर १९३० साली एप्रिल महिन्यात साने गुरूजींनी शिक्षकी नोकरी सोडून भारतमातेच्या सेवेसाठी सारे जीवन झोकून दिले म. गांधीजीना गुरूजींनी जीवनातील सुर्य मानले होते. म. गांधीजीच्या व काँग्रेसच्या या भारत नवनिर्माण लढ्यात गुरूजी सामिल झाले. खादीच्या व काँग्रेस प्रचारासाठी साने गुरूजींनी गावोगावी जाऊन व्याख्याने देऊन स्वातंत्र्याचे तरूण पाईक उभे केले. साने गुरूजीनी प्रभात फेऱ्यांमधून सामुहिकरीत्या म्हणण्यासाठी अनेक राष्ट्रभक्तीपर गीते लिहिली. कविता लिहिल्या.

'पत्री' या कविता संग्रहातील साने गुरूजीनी लिहिलेली.

---

१३. साने गुरूजी, पत्री, मंजुळ प्रकाशन पुणे, आवृत्ती १ मार्च २००६ (साने गुरूजी परीचय), पृष्ठ क्र. ३२.

मनमोहन मूर्ति तुझी माते
सकल जगाची माय माऊली
गोड असे किति नाते ।। मनमोहन....।।
कुरवाळीशी तू सकल जगाला
निवविशी अमृत – होते ।। मनमोहन ।।
स्नेहदयेचे मळे पिकविशी
देशी प्रेमरसाने ।। मनमोहन....।।
सकळ धर्म हे बाळ तुझे गे
संभाळिशी त्याने ।। मनमोहन...।।
भेदभाव तो तुजजवळ नसे
सुखविशी तू सकळांते ।। मनमोहन....।।
तव सेवा मम हातून होता
मरण सुधारस वाटे ।। मनमोहन... [१४]

या सुंदर कवितेत साने गुरूजी सांगतात भारतमातेचा महिमा वर्णिला आहे. या कवितेतून साने गुरूजी सांगतात–सकल जगाला प्रेमाने कुरवाळणारी, आपल्या अमृत स्पर्शाने शांत करणारी, जगातील सकल धर्मांना बालकांप्रमाणे स्नेहाने, प्रेमाने वाढविणारी भेदभाव न माननारी अशी भारतमूर्ती ध्यानी ठेवून तिच्या सेवेत मरणही सुधारस वाटतो. असे साने गुरूजीनी आपल्या 'भारतमातेचा महिमा' या कवितेत वर्णन केला आहे.

'माझी एकच इच्छा' या कवितेतील पुढील ओळीवरून साने गुरूजीचे आपल्या मातृभूमीवर असणारे प्रेम व भारतभूमी स्वातंत्र व्हावी यासाठीचे मनी हळहळ दिसून येते. गुरूजींना वाटे भारतातले दुःख, दारिद्र्य नाहीसे व्हावयाचे तर परकीसत्ता गेली पाहिजे स्वातंत्र्य आले पाहिजे.

एक मात्र चिंतन आता एकची विचार
भाग्यपूर्ण होईल कधी हिंदूभूमि थोर
दुःख दैन्य जाऊन विलया होऊ दे स्वतंत्र
जन्मभूमी माझी, ध्यानी मनी हाच मंत्र ।।

१४. कित्ता, पृष्ठ क्र. २५४.

देशसेवेसाठी सर्वही करीन
चित्त वित्त जीवन माझे सर्व हारवीन
प्राणपुष्प माझे माझ्या मातृभूमिकामी
जरी येई उपयोगाला कितिक होई नामी ।।
कदा तुला पाहिन आई ! वैभवी अपार
पारतंत्र्यपंकांतुन तु होशिल कधि पार
चैन ना मुळी मज पडते, घोर हाच माते
त्वदुध्दार कार्यी केव्हा कृति करीन हाते ।। [१५]

साने गुरूजींना दीनजनांचा कळवळा स्वस्थ बसू देईना भारतभूमीचे स्वातंत्र्य म्हणजे साऱ्या सृष्टीचे स्वातंत्र्य, यासाठी सर्वाने सहभाग घेऊन आपल्या मातृभूमीला स्वातंत्र्य करावे हे आवाहन केले.

उठा सकळ बंधूनो । या करूच मुक्त माय
रिपुभुजंग पाशांत तिचे ते पवित्र पाय
पक्षिराज गरूड बनू या मुक्त ही स्वमाता
झणी करू, न विलंबाची वेळ आज आता ।।
चला, उठा, मी तरी आता चाललो पुढारा
मातृलोचनींच्या मजला बघवती न धारा
तुझे अश्रु आई । माझ्या मी करी पुशीन
प्रतिज्ञेस करीतो तुजला मुक्त मी करीन ।। [१६]

'प्रभू भारतीचे वैभव कोठे गेले' ? या कवितेत गुरूजींनी भारतीय प्राचीन वैभव आणि आधुनिक विपन्नता यांचा विरोध हृदयस्पर्शी झाला आहे, जारे पुढे व्हा रे पुढे हा देश वैभवी न्यावा, भारतजननी सुखखनी साजो, भारत माता माझी लावण्याची, देशासाठी मरू, देशभक्ताची विनवणी, भारता उठा, भारतजननी तव शरणम् ! हा देश वैभवी न्यावा, तुफान झालो, खरा हुतात्मा इत्यादी कवितेतून साने गुरूजींचे वेगवेगळ्या प्रकारांनी देशभक्तीचेच विचार आले आहेत.

पारतंत्र्यात झालेले भारतभूमीचे दैन्य पाहून कवी साने गुरूजींचे मन व्याकुळ होते. ज्या

१५. कित्ता, पृष्ठ क्र. २५५.
१६. कित्ता, पृष्ठ क्र. २५६.

भूमीने उदात्त संस्कृतीला, संत ऋषीच्या पवित्र प्रदेशाला जन्म दिला व तिला आता आलेले दीनवाणे दिवस कविला पाहवत नाहीत. त्यासाठी आपण सर्वांनी हात लावून आपल्या भारतभूमीला पारतंत्र्यातून मुक्त करा असे आवाहन गुरूजी आपल्या कवितांतून करताना दिसतात. साने गुरूजींना वाटते आपण आपल्या मातेचे दास्यमोचन करावे. आपल्या कर्तव्य पालनाचे आपण स्वातंत्र्य पुन्हा आणू शकू. या आत्मविश्वासाने साने गुरूजी देशातील तरूणांस देशकार्यासाठी आवाहन करीत आहे. आपला संसारिक प्रंपच तूर्त बाजूला ठेवून राष्ट्र प्रपंचास सर्वांनी लागावे आपले प्राणपणाला लावून भारतभूमीला मुक्त करू या साने गुरुजी आपल्या 'आमचे कार्य' या कवितेतील काही ओळी...

आम्ही मांडू निर्भय ठाण । देऊ हो प्राण
स्वातंत्र्य – सुधेचे निजजननीला घडवू मंगलपान ।।
स्वार्थाची करूनी होळी
छातीवर झेलू गोळी
करू मृत्यूशी खेळीमेळी
मातृभूमिच्यासाठी मोदे करू सारे बलिदान ।।
ही मंगल भारतभूमी
करू स्वतंत्र निश्चित आम्ही
हा निश्चय अंतर्यामी
मातृमोचन करू जगी तिज अर्पू पहिले स्थान ।।[१७]

साने गुरूजींचे ध्येय राष्ट्रीय स्वातंत्र्य पुरतेच मर्यादित नव्हते तर गुरूजींना राष्ट्रीय स्वातंत्र्यासोबत सामाजिक स्वातंत्र्याचाही आग्रही होता राजकीय स्वातंत्र्या बरोबरच सामाजिक उध्दारही झाला पाहिजे. खरे स्वातंत्र्य एकांगी असू शकत नाही देशाचा खरा उध्दार हा सर्वागांनी एकदम होत असतो व याची जाणिव ठेवून गुरूजींनी स्वातंत्र्या बरोबरच समानतेची सद्धर्माचीही गाणी गायली आहेत. साने गुरूचींचा देशाभिमान हा व्यापक आहे. साने गुरूजी स्वातंत्र्य लढ्याकडे – राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि सामाजिक स्वातंत्र्य म्हणून पाहतात. देशातील अन्याय, गुलामगिरी नष्ट करायची असल्यास परकीयांशी लढा द्यावा लागेल. व सामाजिक विषमता संपवून समता प्रस्थापित

१७. कित्ता, पृष्ठ क्र. २६४.

करण्यासाठी सनातन रूढीशी लढा द्यावा लागेल.

स्वातंत्र्याचे आम्ही शिपाई । सुखवू प्रियतम भारतमायी ।।
देशभक्तीचा सुदिव्य सोम
पिऊन करू प्राणांचा होम
कष्ट हाल हे आमुचे भाई ।।
समानतेची स्वतंत्रेची
पताकेवरी चिन्हे साची
दिव्य पताका फडकत जाई ।।
परकी अथवा स्वकीय झाला
जुलूम आम्हा असह्य झाला
जुलूम जाळू ठायी ठायी ।।
जाच काच गरीबांना नुखू
झोपड्यांतूनी मोदा फुलवू
मकत तयांना करू लवलाही ।।
श्रेष्ठ कनिष्ठात्वाचे बंड
मोडू करून प्रयत्न चंड
अस्मेढ्गण या शपथे घेई ।।
देश आमुचा करू स्वतंत्र
मनो बुध्दीला करू स्वतंत्र
स्थापन करणार लोकशाही ।।[१८]

साने गुरूजी स्वातंत्र्य संग्राम प्रचारासाठी गावोगावी जाऊन व्याख्याने व प्रभात फेऱ्या काढून स्वातंत्र्याचे तरूण पाईक उभे केले. प्रभातफेऱ्यांपासून सामूहिकरित्या म्हणण्यासाठी गुरूजींनी काही गीते रचली. स्वातंत्र्याचे आम्ही शिपाई, हे भारत माते, मधुर गाईन, सतत नव गान, आम्ही मांडू निर्भय ठाण, देश आमुचा वैभवशाली वाली सकलही जगताचा, भारत माता माझी लावण्याची खाण, जगदीश दयाधन देवा हा देश वैभवी न्यावा यासारखी अनेक गीते तरूणांच्या मुखी सहजपणे खेळू लागलील. पण या सारख्या मुकुटमणी शोभेल असे गुरूजींचे गाजलेले गीत म्हणजे

१८. कित्ता, पृष्ठ क्र. २६२.

बलसागर भारत होवो
विश्वात शोभुनी राहो ।।
बल सागर....।।
हे कंकण करि बांधियले
जनसेवे जीवन दिले
देशार्थ प्राण हे उरले
मी सिध्द मरायला हो ।।
बलसागर....।।
वैभवी देश चढवीन
स्वातंत्र्य त्यासी अर्पीन
हा तिमिर घोर संहारिन
या बंधु सहाय्याला हो ।।
बलसागर....।।
हातात हात घेऊन
हृदयात हृदय जोडून
ऐक्याचा मंत्र जपून
या कार्य करायला हो ।।
बलसागर....।।
ही मुक्त माय होईल
वैभवे दिव्य शोभेल
जगतास शांती देईल
तो सोन्याचा दिन येवो ।।
बलसागर भारत होवो ।।[१९]

या गीतातील प्रत्येक ओळींमध्ये मरगळेल्या मनात चैतन्य आणि स्फूर्ती निर्माण करण्याचे सामर्थ्य आहेच. गुरूजींच्या अशा देशभक्तीपर गीतांनी सेवादलातील स्वयं सेवकांना नवसंजीवनी

१९. कित्ता, पृष्ठ क्र. २७५.

पुरवली. साने गुरूजींच्या कवितांच्या विचार त्यांच्या गाजलेल्या प्रार्थनेचा उल्लेख केल्याशिवाय पूर्ण होऊच शकत नाही साने गुरूजी कथामाला च्या माध्यमातून ही प्रार्थना महाराष्ट्रातील शाळां शाळांमधील मुलांपर्यंत पोहोचली आहे. जगात अनेक धर्म पंथ असतील पण प्रवृत्तींना, धर्मांना व पंथाना साधणारा समान दुवा कोणता ? या सर्व धर्माना जोडणारा खरा धर्म कोणता ? याविषयी साने गुरूजी लिहितात–

खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे ।।
जगी जे हीन अतिपतित
जगी जे दीन पददलित
तया जाऊन उठवावे, जगाला प्रेम अर्पावे ।।
जयांना कोणी ना जगती
सदा जे अंतरी रडती
तया जाऊन सुखवावे ।। जगाला प्रेम अर्पावे ।।
समस्ता धीर तो द्यावा
सुखाचा शब्द बोलावा
अनाथा साह्य ते द्यावे ।। जगाला प्रेम अर्पावे ।।
सदा जे आर्त अति विकळ
जयांना गाजिती सकळ
तया जाऊन हसवावे ।। जगाला प्रेम अर्पावे ।।
कुणा ना व्यर्थ शिणवावे
कुणा ना व्यर्थ हिणवावे
समस्ता बंधु मानावे ।। जगाला प्रेम अर्पावे ।।
प्रभूची लेकरे सारी
तयाला सर्वही प्यारी
कुणा ना तुच्छ लेखावे ।। जगाला प्रेम अर्पावे ।।
जिथे अंधार औदास्य
जिथे नैराश्य आलस्य

प्रकाशा तेथे नव न्यावे ।। जगाला प्रेम अर्पावे ।।

असे जे आपणापाशी

असे जे वित वा विद्या

सदा ते देतची जावे ।। जगाला प्रेम अर्पावे ।।

भरावा मोद विश्वात

असावे सौख्य जगतात

सदा हे ध्येय पुजावे ।। जगाला प्रेम अर्पावे ।।

जयाला धर्म तो प्यारा

जयाला देव तो प्यारा

तयाने प्रेममय व्हावे ।। जगाला प्रेम अर्पावे ।।

खरा तो एकची धर्म । जगाला प्रेम अर्पावे ।। [२०]

या प्रेमाच्या धर्माला जगात विरोध नसणार. समाजात एकात्मता येण्यासाठी, समाजातील लहान थोरांची मने सुसंस्कारित, भाव समृध्द व विशाल होण्यासाठी गुरूजींच्या कवितेतील भाव, त्यांतील विचार घराघरात पोहचायला हव्यात. या प्रेम धर्माच्या पालनामधून आपले लघुत्व व हिनत्व मिटणार आहे. एकमेकांवर प्रेम करून वागणे हीच ईश्वराच्या प्रार्थनेची खरी रीत होय. हा संबंध गुरूजींच्या मनात प्रस्थापित झाला. या कवितेत गुरूजींच्या जीवनाचे तत्वज्ञान आणि त्यांचे जीवनामध्ये परिपूर्ण स्वरूप प्रकट झालेले आहे.

साने गुरूजीना कर्मठ रितीरिवाजात अडकलेला धर्म अभिप्रेत नाही. तर आध्यात्मिक भावनेने ओतप्रोत भरलेला, सर्व मानवजातीला भेदभांवापासून दूर ठेवणारा व समता प्रस्थापित करणारा धर्म अभिप्रेत होता. गुरूजीना जो धर्म पददलित, गरीब, पिडीत समाजाला सुखविण्यासाठी व त्यांची सेवा करण्यास प्रवुत्त करणारा अत्याधुनिक मानव प्रेम धर्म अभिप्रेत आहे. अखिल मानव समाजातील विषमता नष्ट करून समता प्रस्थापित होण्यासाठी प्रेमाचा धर्म हवा. एकमेकांवर प्रेम करावे व प्रेमाने वागावे असे गुरूजी कळकळीचे आवाहन करीत आहेत साने गुरूजींना जसे राष्ट्रीय स्वातंत्र्य अपेक्षित होते. तसेच सामाजिक स्वातंत्र्य ही अपेक्षित होते. त्यासाठी गुरूजीनी आपल्या काव्यातून समाजाला संदेश देऊन प्रेरीत केले.

---

२०. कित्ता, पृष्ठ क्र. १८३

'पत्री' या कवितासंग्रहाच्या चौथ्या खंडात सत्याग्रही नावाचे खंडकाव्य आहे. हे साने गुरूजींनी १९३० मध्ये त्रिचनापल्लीच्या तुरूंगात लिहिले आहे. तुरूंगात असताना तेथील सत्यनारायण नावाचा १८ वर्षीय विवाहित तरूण सत्याग्रही बंदी अतिसाराने मरण पावला. वस्तुतः सत्यनारायण सत्याग्रही नव्हता. त्याला इतर सत्याग्रही स्वयंसेवकासोबत पकडून शिक्षा देण्यात आली होती. माफी मागून सुटावे म्हणून त्याच्या घरच्यांनी पुष्कळ प्रयत्न केले. मात्र स्वाभिमानी सत्यनारायणाने शेवटपर्यंत माफी मागितली नाही व आनंदाने मरण स्विकारले. या घटनेचा सर्वच भारतीय कैंद्याच्या मनावर परिणाम झाला. गुरूजींनी यावर काव्य रचले. साने गुरूजींनी सत्याग्रह विषयी सारेच तत्वज्ञान विचार त्यात गोवण्याच्या कल्पनेने मुळ घटनेत बराच विस्तार झाला. आणि त्यातूनच 'सत्याग्रही खंडकाव्य' तयार झाले. या खंडकाव्यात कथानक विशेषसे नाहीय. सत्याग्रहाचे तत्वज्ञान सांगण्याच्या उद्देशाने कथानक तयार झाले आहे. यातून गुरूजींना आपल्या समाजात काय–काय विचार यायला पाहिजेत. कोणत्या वृत्ती निर्माण झाल्या पहिजेत त्यात गुरूजींनी लोकांच्या मनोवृत्तीचे वर्णन करून उन्नतीसाठी केवळ भावसार उपयोगी पडत नाहीत तर भावनेसोबत विचार आणि कृती यांचीही गरज आहे असे गुरूजींना वाटते.

या खंडकाव्यात सुरूवातीच्या टिपेमध्ये साने गुरूजींनी या काव्याचा सारांश दिलेला आहे. श्रीमंत आई बापाचा एकुलता एक अठरा वर्षीय विवाहित मुलगा सत्याग्रहात भाग घेतो आणि तुंरूगातच तो मृत्यू पावतो. त्याच्या मृत्यूच्या वार्तेने आई बापास जबर धक्का बसतो. मृत पुत्र रात्रीच्या वेळी दिव्य वेष धारण करून आई बापाची समजूत घालण्यासाठी घरी येतो.

या काव्यात प्रथम आईचा शोक, पित्याची अवस्था, शेजाऱ्यांचे सात्वंन व रात्री मुलाचे दिव्य वेष धारण करून आई वडीलांची समजूत अशा प्रकारचे प्रसंग दिलेले आहेत.

आई बापाला मुलाच्या मृत्यूवार्तेने अत्यंत दुःख होते आईला शोक अनावर होतो. आई आपल्या बाळाला विचारते..

कैसा बाळ निघाला
न दया भगवंताला ।। कैसा...।।
'लडिवाळा' बाळा
बाळा वेल्हाळा

ये भेटायला ।।

तुजविण कोणी न मजला ।। कैसा...।।

येशिल माघारा

माझ्या पाखरा

राजस राजकुमारा

धीर असा रे धरिला ।। कैसा...

येशिल भेटाया

आशा ही सखया

होती मम हृदया

काळ कसा परि फिरला ।। कैसा...।।

बाळा काय करू

प्राणा केवि धरू

शोका केवि तरू

शोक सखा मम ठरला ।। कैसा....।।

शून्य दिसे सृष्टी

माता मी कष्टी

भरते ही दृष्टी

अंत न पार न दुःखाला ।। कैसा...।।

वत्सा विण गाय

मोकालिते धाय

तळमळते गाय

प्राण जावया समजा ।। कैसा....।।

हंबरडा फोडी

सुस्कार सोडी

बुडते ही होडी

करूणासागर भरला ।। कैसा....।।

डोळे डबडबले

मानस गजबजले

अंतर गहिवरले

माता पडली धरणीला ।। कैसा....।। [२१]

आई शोकाने खाली पडते. जवळच पिता असतो. पित्यालाही दुःख अनावर होते. पिताही शोकाकूल अवस्थेत बसतो.

पिता बैसलोह शोकमग्न खिन्न

पुशीत नयन वारंवार

कालवा कालव हृदयी होतसे

सर्व जणू डसे अंतरंगी

धीर धरी परी पुन्हा येई नीर

डोळ्या लागे धार अनिवार

आम्ही दोघे आता कोणाकडे पाहू

एकमेकां दाऊ दीन अश्रु

हाय काय झाले केवढा आकांत

केवढा आघात आम्हावरी

मनी हे विचार मनी हे उद्‌गार

मनावरी भार फार पडे

असह्य तो झाला वृक्ष उन्मळला

भार फार झाला पिता पडे

माय धरणीला पिता धरणीला

तेथ उचंबळला शोकसिंधू [२२]

माता पित्याला मुलाच्या आकस्मिक मृत्यूने दुःख अनावर झालेले आहे. ती दोघेही पार उन्मळून पडले आहेत त्यांचे सांत्वन करण्यासाठी शेजारी येतात

---

२१. कित्ता, पृष्ठ क्र. ३७३.

२२. कित्ता, पृष्ठ क्र. ३७४.

जमुनिया जन ते समजाविती
रडू नका रडणार तरी किती
जशी असेल तया प्रभूची मनी
मिळतसे सकळांस तशी गती
रडूनी काय, विवेक मनी धरा
उपजणे मरणे न चुके नरा
अजि स्वेदशहितार्थ मरे सुत
सुकृती तो करि वंश समुन्नत ।।
रडू नका मुळी अश्रू न ढाळणे
भरते – माय – मुले तुम्ही पाळणे
निजसुतानन तेथच पाहणे
मति धरून अशी जगी राहणे ।। [२३]

शेजारी माता–पित्याचे सांत्वन करून रात्र झाल्यावर घरी परत जातात. ते माता–पिता अंधारलेल्या घरात खिन्न बसतात. मने मात्र तडफडत असतात. दमलेले जग झोपी गेलेले असते. अशा त्या रात्री मृत मुलगा दिव्य रूप धारण करून आपल्या आई–बापाचे सांत्वन करण्यासाठी घरी येतो. तुळशी वृंदावनाजवळ उभा राहून तो आई.. बाबा.. अशी मंजुळ हाक मारतो. माता दचकून उठून बाहेर येते. आपला बाळ आला आहे असा भास होतो. मुलगा आई–वडीलांच्या भेटीला आला आहे त्याच्या मृत्यूने वडीलांना अतिशय दुःख झालेले आहे याची मुलाला कल्पना आहे. जन्मदात्या मातेच्या प्रेमाला कशाचीही तुलना नाही परत पुत्र मातेच्या ममतेचे पाश तोडून भारतमातेच्या मुक्तेसाठी गेला.

आई, माझ्यावरि जरी तुझे प्रेम आहे अपार
संसार या अमर असला देखला ना प्रकार
भूमातेच्या प्रिय जननी गे मोचना साठी आज
लाखो जावे मरूनी, जरि ती राहिलीसे लाज ।।
माता तू मत्प्रिय खरी परी आज सर्वाजणांची
ही भूमाता रडत बसली दास्य दारिद्र्य जाची

२३. कित्ता, पृष्ठ क्र. ३७६.

मातांची जी परम सद्या मंगला थोर माता
त्राता नाही तिजसि उरला झालि लोकी अनाथा ।।[२४]

म्हणून तो पुत्र सगळे संसारिक सुख त्यागून भारतमातेच्या मुक्तीसाठी मरणाला न घाबरता धावून गेला माता–पित्याने आपल्या मुलाकडे पुत्र म्हणून पाहणे आणि स्वतः मुलाने भारत मातेचा पुत्र म्हणून स्वतःकडे पाहणे असे दोन दृष्टीकोन या काव्यात व्यक्त झालेले आहेत. मुलगा मातेच्या गर्भकोषातून बाहेर पडून विस्तृत भारतमातेच्या कोषात प्रवेश करतो. तो जन्मदात्या मातेकडून तो अधिक व्यापक अशा भारतमातेकडे आलेला असतो.

या खंडाकाव्यातील सत्याग्रही तील पुत्र भारतमातेच्या पुत्रांचे वर्णन करतो या देशातील हलाखी, विषमता, शोषण, पारतंत्र्य या सर्वांनी देशातील पुत्रांची दशा कशी झाली आहे हे तो सांगतो.

आई नाही हृदय मम जाहले ग कणेर
आहे माते परि निशिदिनी अंतरी एक घोर
त्वत्प्रेमाची स्मृती विमल तो कैशि जाईल आई
पूज्या मूर्ती तव सतत ह्या अंतरंगात राही ।।
आई वाटे तुजसि करूणा फक्त त्वदबाळकाची
दुःखी सारी खितपत परी लेकरे भारताची
वाटे पुत्रे तव कितीतरी सोशिले हाल कारी
पाही डोळे उघडून परि बाळके दीन सारी ।।
ना खायला मिळत कणही ना करी पाव आणा
आपदग्रस्ता सकल जनता ना मिळे एक दाणा
राहायला घर न उरले वस्त्र ना नेसण्याला
आई नाही उरलि निती गे भारती आज हाला ।।[२५]

मुलांचे विचार ऐकून माता–पिता गंभीर होतात माता–पित्याला काय बोलावसे सुचत नाही. पिता मुलाला समजून सांगतो हे सर्व आज–उद्या सुरळीत होईल. देवाच्या कृपेने सर्व ठिक–ठाक

२४. कित्ता, पृष्ठ क्र. ३७८.
२५. कित्ता, पृष्ठ क्र. ३८४.

होईल. मात्र पित्याचा हा दैववाद पुत्राला मान्य होत नाही. मुलगा पित्याच्या पारंपारिक दैववादा विरूध्द बोलतो.

बाबा हे बोलता काय प्रयत्नदेव तो तरे
प्रयत्नास सदा आधी धरावे हृदयी नरे ।।[२६]

साने गुरूजी सांगतात – विचार, भावना आणि कृती यांचा मेळ असेल तरच उन्नती होत असते जगात काय चालले आहे याचा विचार आपल्या देशात होत नाही आपल्या येथे देश प्रेम दिसून येत नाही.

जगात काय चालले स्वभूत काय चालले
न हे कुणीही पाहती कशी घडेल उन्नती ।।
असावि एकतानता असावि भाव – तीव्रता
तरीच होतसे कृती कृतीविणे न उन्नती ।।
परंतू काय ही दशा बघून दुःख मानसा
न देशभक्ती ती दिसे खुशाल खातपीतसे ।।
बघून देशदुर्गती खुशाल खेळ खेळती
क्षुधार्त बंधु पाहुन सुचे तयांस भोजन ।।
खुशाल नाच चालती अनंत द्रव्य ओतिती
विचार येइ ना मनी दरिद्रता किती जनी ।।[२७]

मुलाला वाटते राष्ट्राची अशी दुर्गती झालेली असताना तरूणांनी आपल्या घरी, आईच्या कुशीत बसून राहू नये. राष्ट्रच्या कार्यात स्वतःला झोकून द्यावे. मातृभूमीच्या सेवेसाठी आपले जीवन अर्पण करावे. गुरूजी भारतीय तरुणांना मातृभूमी पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी स्वातंत्र्य संग्रामात स्वतःला झोकून देण्याचे आवाहन करताना दिसतात.

जेव्हा राष्ट्रमाधि निपजति उन्नत ध्येयवादी
त्यागी तेजोमय तरूण ते सुव्रती सत्यवादी
खेडोपाडी करितिल जरी ते विचार प्रसार
देशोद्वारा मग तुम्ही वदा काय लागे उशीर ।।

२६. कित्ता, पृष्ठ क्र. ३८८.
२७. कित्ता, पृष्ठ क्र. ३९१.

खेडोपाडी झणि उडवुनी कल्पनांचे फवारे
स्वातंत्र्याचे प्रबळ भरूनी भारती दिव्य वारे
कैसे तुम्ही मनुज असुनी राहता रे गुलाम
यांच्यापेक्षा मरण बरवे या म्हणू सर्व राम ।। [२८]

पुढे बाप म्हणतो आपणात भांडणे किती धर्महीं बुडत चालला. जातीभेद व धर्मभेदांच्या कल्पनांनी पिता कासावीस झालेला असतो त्यावर तो पुत्र उत्तर देतो.

बाबा होत किती मदीय हृदयी ती कालवा कालव
अस्पृश्यापरि मानितो तरि कसे ते आपुले बांधव
श्रेष्ठाश्रेष्ठ समस्त ढोंग, न असे अस्पृश्य हा मानव
नाही थोर विचार तात दिसतो लोकातरंगी लव ।। [२९]

बाबा, मुसलमानांस आपण सदा नावे ठेवतो परंतु ते सारेच वाईट नसतात. भलेबुरे साऱ्यांत आहेत. अशी विचारसरणी मुलगा मांडतो.

आम्हां संकुचितांतरांस गमते की तो मुसलमान अरी
दृष्टी नाही विशाल, तीन शतके मागे विहारा करी
पोवाडे अजुनी म्हणू गरजती कापा मुसलमान जे ।
राष्ट्राचे नव प्रश्न खोल बघण्या धी आमुची ना धजे ।। [३०]

पुत्राचे म्हणणे आहे जर एका घरात रामभक्त, गणेशभक्त आणि श्रीकृष्ण भक्त असू शकतात तर एकाच देशात ख्रिस्तिभक्त, पैंगरभक्त का असू शकत नाही हा प्रश्न विचारतो.

भारतात राष्ट्रीय स्वातंत्र्य, अर्थिक स्वातंत्र्य, राजकीय स्वातंत्र्य सामाजिक स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य, व्यक्ती स्वातंत्र्य सर्व प्रकारचे स्वातंत्र्य अभिप्रेत आहे यासाठी सत्ता मिळवून जनतेला गुलामीत लोटायचे नाही . ऐश्वर्यात मिरवायचे नाही, गरीबांना अन्नापासून दुर लोटायचे नाही.

स्वातंत्र्या मिळवून काय जगती सांगेल हा भारत ?
दास्यी लोटिल काय अन्य जनता होऊन सत्तारत्न?
ऐश्वर्या मिरवेल काय जगती मतोन्मदाघापरी

२८. कित्ता, पृष्ठ क्र. ३९६.
२९. कित्ता, पृष्ठ क्र. ३९९.
३०. कित्ता, पृष्ठ क्र. ३९९.

विश्वाला लुटूनी जगास करूनी दुर्मिळ ती भाकरी ।। [३१]

पुत्र पुढे आपल्या मातापित्याला सांगतो देशोदेशीचे तरूण कसे क्रांतीसंग्रमात भाग घेत आहेत. तुर्कस्थान, रशिया, चीन या देशातील तरूणांचा उल्लेख करतो. माझ्यासाठी शोक करू नका. देशासाठी केलेले आत्मार्पण ही दुःखाची गोष्ट नाही.

पुढे स्वातंत्र्य शाहिरांचे गाणे, प्रभात फेरीचे गाणे आहे. मुलगा बापाला विचारतो, बाबा तुम्ही भारतमातेसाठी नाही का मरणार, नाही का झिजणार? त्यावर बाप म्हणतो.

बाळ मी सर्व देईन सेवा हातून ह्या घडो
जनांची करिता सेवा मदीय देह हा पडो ।।
आम्ही दोघे जीवनाते उदात्तर रे करू
बाळा हे गुण–लावण्य संसार लिलया तरू।।
पुत्र तु आमुचा धन्य अंजना घालुनी अम्हा
दिधली दिव्य तू दृष्टी हरूनी मोहता तमा ।। [३२]

पुढच्या भागात भारताला स्वातंत्र्य मिळाल्याचे दृश्य तो मुलगा पाहतो. ग्रहण सुटले ग्रहण सुटले । माझ्या मातेचे पाश सारे सुटले ।[३३]

आपल्या मुलाच्या वियोगाने दुःखीत झालेल्या आई–बापाला आपल्या कर्तव्याचे भान येते, मुलाचे बोलणे ऐकूण आपले मनपरिवर्तन होते. त्यांच्या हृदयात पुत्र निधनाने झालेले दुःख कमी होऊन आपल्या पुत्राविषयी अभिमान वाटू लागतो.

'सत्याग्रही' हे खंडकाव्य त्या काळाची पार्श्वभूमीवर आधारित असून त्या काळातील घटना–प्रसंगावर केंद्रित झालेले असून त्या काळातील घटना प्रसंगावर केंद्रित झालेले नसून मानवी मुल्यांविषयीचे चिंतनपर एक दिर्घकाव्य आहे. त्या काळातील निर्माण झालेले प्रसंग, प्रश्न यांवर गुरूजींने केलेले चिंतन या काव्यातून दिसून येते. देशभरात चाललेला सत्याग्रह संग्रमाची परिस्थिती वअर्थपूर्णता या काव्यात गुरुजींनी संवाद स्वरूपात शब्दबध्द केला आहे. तो संवाद म्हणजे गुरूजीनी स्वतःशीच प्रतिप्रश्न विचारात केलेला संवाद आहे.

३१. कित्ता, पृष्ठ क्र. ४२६.
३२. कित्ता, पृष्ठ क्र. ४२७.
३३. कित्ता, पृष्ठ क्र. ४२९.

साने गुरूजींचा ह्या देशभक्तीपर कवितांमधून गुरूजींची स्वातंत्र्याविषयीची आस तीव्रतेने दिसून येते. साने गुरूजी माझी एकच इच्छा या कवितेतून गुरूजीनी आपली स्वातंत्र्याविषयी आस प्रकट केली आहे. भारतमातेचे आपण संतान असल्याचा अभिमान या कवितातून व्यक्त झाला आहे. आपली मातृभूमी स्वतंत्र कधी होईल ही एकच चिंता लागलेली आहे. आपला देश स्वतंत्र झाल्याचे पाहण्याचे भाग्य आपल्याला लाभेल का? की आपली प्राणज्योत आधी मालवेल ? असे गुरूजींना वाटते असे झाले तरी हरकत नाही, पुन्हा याच भूमीत आपण जन्म घेऊ.

जरी देह पडला माझा तरिही मी फिरून
इथे जन्म घेइन आई निश्चये करून
पुनः पुन्हा त्वत्सेवेचा सदानंद मेवा
मला मिळो, माते ! पुरवा हेतु देव–देवा ।। [३४]

असे साने गुरूजीनी म्हटले आहे साने गुरूजीच्या देशभक्तीपर अशा या कवितांमधून आत्म त्यागात्म अशी भाषा वारंवार उच्चारली जाते. त्यामागे भारतीयांच्या मृत्यूविचार दिसून येतो. कवीला वाटते आपल्या मातृभूमीला स्वतंत्र करण्यासाठी जीवाची पर्वा न करता झगडत राहा. साने गुरूजी नवयुवक, या कवितेतून युवकांना आवाहन करतात.

मृत्यू असे तो मित्र आमुचा । संकट तो तर सखा जिवाचा
हे प्रिय सगळे सखे सवंगडी । आम्हा वरी ते करितिल न कडी
जन्म सफल हा तरीच मानू । स्वतंत्रता भारतात आणू
आम्ही युव नवभारत – पुत्र । व्रती पवित्र ज्वलचरित्र [३५]

साने गुरूजींच्या देशभक्तीपर कवितांतून सतत स्वातंत्र्य आणि आत्मत्याग यांचा उच्चार झालेला आहे. सत्याग्रही या खंडकाव्यातून याच आत्मत्याग या तत्वाचा चिंतनात्मक अविष्कार आढळतो. साने गुरूजींच्या कविता देश व देशभक्तीवर आहेत. साने गुरूजीच्या देशभक्तीपर कवितांवर काही विद्वानांनी केलेले भाष्य खाली देत आहोत.

ना.गो. चापेकर लिहितात, वस्तुस्थितीनिरपेक्ष असे निकामी काव्य भरपूर निपजते. परंतू श्री. साने हे रिकामटेकडे म्हणून कुडाला तुंबड्या लावणारांपैकी नाहीत, ही संतोषाची गोष्ट होय. त्यांच्या काव्यात अंतकरणाची तळमळ व कळकळ पदोपदी व्यक्त होत असल्याने राष्ट्रजागृतीचे

३४. कित्ता, पृष्ठ क्र. २५७.
३५. कित्ता, पृष्ठ क्र. २३०,२३१.

कार्य ह्या ग्रंथातील बहुतेक कविता तुरूंगात रचल्या आहेत. हे विशेष आहे. गीता रहस्यापासून प्रारंभ होणाऱ्या तुरूंग वाडःमयाचा विचार केला तर तुरूंग हा प्रौढ वाडःमयाचा पोशिंदा आहे असे म्हणावेसे वाटते.[३६]

श्री. नी. चाफेकर लिहितात, 'पत्री' संग्रहातील बऱ्याचशा कवितांचा जन्म निरनिराळ्या ठिकाणच्या कारागृहवासाच्या अवधीत झाला आहे. पत्रीतील कवितांचे मुख्य विषय ईश्वर निष्ठा, ईश्वर प्रार्थना स्वतःची हीत व आगतिक स्थिती, स्वतःच्या जीवनकार्याचे चिंतन, राष्ट्राची सद्यस्थिती, प्रिय भारतभूमीचा उध्दार व तिची स्वातंत्र्यप्राप्ती हे आहेत.

स्वातंत्र्य राष्ट्राची सद्यःस्थिती व मातृभूमीच्या उध्दराविषयी तळमळ या संबंधाच्या कविता अलीकडच्या कित्येक पोशाखी व स्वसुखलोलूप कवीच्या कवितांप्रमाणे वरपांगी कळकळीच्या नाहीत किंवा ठरीव साच्याच्या, खोडसाळ व अतिशयोक्तीपूर्व नाहीत, तर ज्याचा वरील गोष्टींशी जीवन कार्याद्वारे प्रत्यक्ष जिव्हाळ्याच्या संबंध निगडीत झालेला आहे आणि तत्प्रीत्यर्थ ज्या व्यक्तीने स्वतः देहकष्टादीद्वारा खस्ता खाऊन आश्रमादी जनताशिक्षण कार्याला स्वतःला वाहून घेऊन आत्मार्पण करण्याचा सक्रीय उपक्रम चालविला आहे. अशा कवीच्या या राष्ट्रीय कविता असल्यामुळे खरे औचित्य व स्वारस्य त्यात आहे आणि म्हणूनच पत्रीतील अनेक राष्ट्रीय कवितांतून सात्विक राष्ट्र कार्ययोगाची स्फूर्ती देणारी तेजस्वी विचारसरणी व उदात्त ध्येयात्मक रम्य कल्पना व आशाचित्रे भरपूर सापडतात यात नवल नाही. [३७]

रामचंद्र कृष्ण लागू लिहितात, साने गुरूजींचे अंतकरण मृदू असले तरी त्यांच्यात कोणताही प्रकारचा दुबळेपणा नाही देशाची हीनदीन स्थिती पाहिली म्हणजे त्यांच्या प्रतिमेला स्फुरण चढते. त्यांचे अंतकरण भरून येते. त्यांच्या सात्विक त्वेषाला, उत्साहाला, आवेशाला सीमा राहत नाही. आपल्या सर्वस्वाचा होम झाला तरी हरकत नाही, परंतू आपण आपल्या मातृभूमीचे गतवैभव तिला प्राप्त करून देऊ अशी ते प्रतिज्ञा करतात. मार्दव, माधुर्य, लीनता या गुणांबरोबर कणखरपणा, जोम, ओज मेज इत्यादी गुणांचा त्यांच्या काव्यात उत्कर्ष झालेला दिसून येतो.

प्रस्तुत काव्यसंग्रहातील श्री. साने यांनी केलेला प्रभूचा धावा वाचीत असता अस्तिकय बुध्दी नसलेला वाचकसुध्दा त्यात तल्लीन होऊन जाईल. कवीची आपल्या विषयाशी झालेली

३६. कित्ता, ना.गो. चापेकर, पृष्ठ क्र. ४४८.
३७. कित्ता, श्री.नी. चाफेकर, पृष्ठ क्र. ४४५, ४४६.

तल्लीनता पाहून त्याला आनंद होईल आणि आता जे त्यांच्या भक्तीपर काव्यसंबंधी सांगितले ते त्यांच्या देशप्रेमविषयक कविता वाचत असता देशभक्तींचा गंध नसलेला वाचकसुध्दा श्री. साने यांची विषयांशी झालेली समरसता पाहून त्यांच्या काव्याचे कौतूक करील श्री. साने यांच्या या समरसतेमुळे काव्यात शब्दार्थाचा एकजीव झालेला दिसून येतो.[३८]

वामन भार्गव पाठक लिहितात, पत्रीतील दुसऱ्या विभागात स्वदेशभक्तीपर स्फुट कवने आली आहेत. आधी केले आणि मग सांगितले हा रामदासांचा दंडक त्यांच्या कवनांस लागू पडतो म्हणूनच त्यांची राष्ट्रीय कवने वैशिष्ट्यपूर्ण उतरली आहेत. दे.भ. सावकर, से. बापट किंवा गोविंद शाहीर त्यांनी लिहिलेल्या कवनांत जो आवेश व जी स्फृर्ती दृष्टीस पडते. तिचे प्रत्यंतर श्री. साने यांच्या जारे पुढे व्हा रे पुढे, नवयुवक तुफान झालो इत्यादी कवनांतून आपणांस मिळते. बलसागर भारत होवो, भारतास व स्वातंत्र्यानंदाचे गाणे ही गीतमयी प्रत्येक हिंदवासियाने मुखोद्‌गत करावी एवढा त्यामध्ये जिवंतपणा आहे. उत्कट राष्ट्रप्रेम, दुर्दम आशावाद आणि अंतःकरणाची खरी तळमळ ह्यांमुळे श्री. साने ह्यांची राष्ट्रीय गीते स्फूर्तिदायक व मनोवेधक झाली आहेत. यात शंका नाही.

सत्याग्रही हे खंडाकाव्यात कथानक फारसे नाहीत तरीपण सतीचे वाण धारण करणाऱ्या सत्याग्रही वीराने आपल्या देशाच्या सद्यस्थितीविषयी जे सडेतोड व भावनोत्कट विचार प्रकट केले आहेत ते प्रत्येकास आत्मसंशोधन करावयास लावतील इतके प्रभावी आहेत. [३९]

५.१० कथा आणि कादंबरी

साने गुरूजींनी आधीचे व त्यांच्या समकालीनांचे लेखन पुरेसे वाचलेले होते. हे त्यांच्या कथानात्मक गद्यातून व वैचारिक लेखनातूनही आपल्या लक्षात येते.

साने गुरूजींचे कांदबरी लेखन साधारणपणे १९३० ते १९५० या काळात झालेले आहे. गुरूजींच्या कांदबऱ्याचे अभ्यासाच्या सोयीसाठी साधारणपणे तीन गटात वर्गीकरण करता येते. पहिल्या गटात आत्मकथनपर कादंबरी यामध्ये १. श्यामची आई, २. श्याम, ३. धडपडणारा श्याम (जीवनकलह अर्थात श्याम खंड २ आणि ४) जीवन विकास अर्थात श्याम खंड. ३. या कांदबऱ्याचा समावेश होतो.

३८. कित्ता, रामचंद्र कृष्ण लागू, पृष्ठ क्र. ४३८.
३९. कित्ता, वामन भार्गव पाठक, पृष्ठ क्र. ४४१.

दुसऱ्या गटात साने गुरूजींचा सामाजिक व राजकीय ध्येयवाद व जीवन विषयक आदर्शवाद व्यक्त झालेल्या कांदबऱ्या यांचा समावेश होतो. यात धडपडणारी मुले (दोन खंड), क्रांती, आस्मिक, नवा प्रयोग, दिंगबरराव, सती, रामाचा शेला, गोड शेवट, संध्या पुनर्जन्म व चित्रकार रंगा आवडत्या गोष्टीतील आपण सारे भाऊ यांचा समावेश केला जातो. साने गुरूजींना अभिप्रेत असणारा सामाजिक व राजकीय आदर्शवाद या कांदबऱ्यांच्या आशयाच्या केंद्रस्थानी आहे.

तिसऱ्या गटामध्ये साने गुरूजींनी अनुवादीत व विदेशी साहित्यावर आधारित कांदबऱ्यांचा समावेश होतो. यामध्ये के.के. मेनन यांच्या चिल्ड्रेन ऑफ कालीची (कालिमातेची मुले) ही एकच अनुवादित कांदबरी आहे. या गटातील बाकीच्या कांदबऱ्या परकीय कांदबऱ्यांच्या आशयाच्या केंद्रस्थानी आहे.

आवडत्या गोष्टीमधील बहुतांश कांदबऱ्या पाश्चात्य कांदबऱ्यांची मराठीतील पुर्नकथने आहेत. टॉलस्टॉयची रिझरेक्शन ही कांदबरी गुरूजींनी नवजीवन या नावाने मराठीत आणली. हार्डीच्या मेयर ऑफ कॅस्टर ची दुर्देवी तर मेरी कॉरेलीच्या ट्रेझर ऑफ हेवन वर स्वर्गीय ठेवा, गोट्या ही मीक हेरिटेज या कांदबरीवर आधारलेली आहे. ह्या गटात परकीय साहित्यावर मराठीत केलेले पुर्नकथने पाहायला मिळते यात गुरूजींचे साहित्य वैशिष्ट्ये परकीय साहित्यावर आधारीत दिसून येतात. म्हणून गुरूजींच्या कांदबरी लेखनाचा विचार करताना प्रामुख्याने पहिल्या दोन गटातील कांदबऱ्याच्या आधारे करणेच आवश्यक ठरते.

साने गुरूजींनी इ.स. १९३० च्या काळात कांदबरी लेखनास प्रारंभ केला. तो काळ भारताच्या इतिहासात सामाजिक व राजकीय आकांक्षांच्या उत्थापनाचा काळ होता. म. गांधीच्या राजकीय नेतृत्वामुळे स्वातंत्र्याची चळवळ खेडोपाडी सामान्य माणसांपर्यत पोहचलेली होती महात्मा गांधीजीनी राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळी सोबत सामाजिक स्वातंत्र्य चळवळीला प्राधान्य दिले होते. म. गांधीजींना राष्ट्रीय स्वातंत्र्यासोबत सामाजिक स्वातंत्र्य सुध्दा अपेक्षित होते. महात्मा गांधीजीनी आपल्या नेतृत्वाखाली असहकार चळवळ, कायदेभंग चळवळ, स्वदेशी चळवळ व सत्याग्रह ह्या अभिनव आंदोलनाने व इस १९४२ च्या आंदोलनाने सारा समाज भारावून गेलेला होता. देशाचे स्वातंत्र्य आणि स्वातंत्र्यानंतरच्या सुखी भारताचे स्वप्न हाच त्या काळातला आदर्श होता. राष्ट्रीय व सामाजिक चळवळीला आपले जीवन अर्पण करणे व तसा आदर्श निर्माण करण्यासाठी धडपडणे

हेच आयुष्याचे खरेखुरे ध्येय व ध्यास असे अनेकांना वाटत होते व यात तरूण अग्रेसर होते. समाजाच्या विचार विश्वातही हाच ध्येयवाद केंद्रस्थानी होता या ध्येयावादाचे व आदर्शाचे प्रतिबिंब या काळातल्या साहित्यात उतरलेले दिसून येते. याला मराठी कांदबरीही अपवाद नव्हती याचा प्रभाव सामाजिक, राजकीय प्रश्नांचा व चळवळीचा उपयोग कांदबरीमध्ये पार्श्वभूमी म्हणून का होईना वापर केला जात होता. सामाजिक व राजकीय स्वातंत्र्य ध्येयवादाने भारावलेल्या समाज व तरूण गांधीवाद की मार्क्सवाद याविषयी चर्चा करणारे नायक त्याकाळी कांदबरीमधून रंगविले जात होते.

या काळामधला सामाजिक व राजकीय ध्येयवाद सानेगुरूजींच्या व्यक्तीमत्वाचाच एक भाग बनलेला होता. साने गुरूजी स्वातंत्र्याच्या संगरात सक्रीय सहभागी झालेले एक सेनानी होते. काँग्रेस पक्षाचे अधिकृत सदस्य म्हणून त्यांनी अनेक राष्ट्रीय आंदोलनात भाग घेतला होता. अनेकदा तुरूंगवास भोगला राजकीय स्वातंत्र्य व सामाजिक स्वातंत्र्य याविषयी त्यांची स्वतःची काही भूमिका होती. स्वतःचे काही ध्येय, कल्पना व आदर्श होते. हे सर्व त्यांनी आपल्या लेखनातून व्यक्त केले.

महात्मा गांधीजी हे गुरूजींचे आदर्श होते. आणि अशा महापुरूषांच्या विचारांचे अनुकरण साने गुरूजीनी आपल्या साहित्यातून केले. "गुरूजींच्या वाङःमयातही आपल्याला सर्वत्र गांधी विचारांचे दर्शन होते महाराष्ट्राला गांधीजीची खरी ओळख करून देण्याचे श्रेय ज्या थोड्या व्यक्तींना आहे त्यात गुरूजींचे स्थान फार वरचे आहे."[४०] म. गांधीनी मांडलेल्या सामाजिक–राजकीय आदर्शाचे व नैतिक कल्पनांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या व्यक्तीगत जीवनातून केला तसाच तो काही अंशी आपल्या कांदबऱ्यांतूनही केला. केवळ स्वातंत्र्य चळवळीचे चित्र रेखाटण्यापेक्षा स्वातंत्र्य कशा प्रकारचे असावे, स्वातंत्र्यानंतरचा भारतीय समाज कसा आदर्श असावा हे सांगणेही गुरूजींना महत्वाचे वाटते. स्वातंत्र्याबद्दलची त्यांची कल्पना अधिक व्यापक व उदार होती.

साने गुरूजींना राजकीय स्वातंत्र्यासोबत सामाजिक स्वातंत्र्य अपेक्षित होते. इंग्रजाच्या गुलामगिरीपेक्षा स्वकीयांनी स्वकीयांवर लादलेली गुलामगिरी गुरूजीना जास्त संतापदायक वाटत होती. परकीय गुलामगिरी सोबत स्वकीयांची – स्त्रियांची गुलामगिरी, हरिजनांची गुलामगिरी,

---

४०. साने गुरूजी, गोष्टीरूप गांधीजी आणि बापुजींच्या गोष्टी, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. ७

मजुरांची गुलामगिरी साने गुरूजींना नकोशी वाटू लागली होती. म्हणून साने गुरूजींना राजकीय स्वातंत्र्यासोबत सामाजिक स्वातंत्र्याला फार महत्वाचे स्थान होते. स्वातंत्र्यानंतर देशातील धार्मिक, सामाजिक, अर्थिक भेद नष्ट करून समाजाची रचना समतेच्या तत्वावर झाली पाहिजे. देशात सामान्यांचे, शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे राज्य आले पाहिजे असे गुरुजींना वाटत होते. देशाचे स्वातंत्र्य आणि त्यानंतरचा भारतीय समाज कसा असावा, याबद्लच्या कल्पना साने गुरूजी आपल्या साहित्यलेखनातून व्यक्त करताना दिसतात. त्यांच्या या राजकीय स्वातंत्र्य – सामाजिक स्वातंत्र्य आदर्शाचे प्रतिबिंब – धडपडणारी मुले (२ भाग), क्रांती, नवा प्रयोग, आस्मिता या कांदबऱ्यांमधून स्पष्टपणे दिसून येते.

जेव्हा साने गुरूजी स्वातंत्र्य संग्रामात सक्रिय झाले. त्या काळातील त्यांच्या अनुभवातून धडपडणारी मुले (२, खंड) ही कांदबरी निर्माण झालेली आहे. या कांदबरीमध्ये गुरूजींनी राष्ट्रकार्याच्या ध्येयवादाने भारावलेल्या स्वातंत्र्यपूर्व काळातील तरूण पिढीचे चित्रण केलेले आहे यासोबत साने गुरूजींना अभिप्रेत असणारी देशसेवेची , समाजसेवेची संकल्पना या कांदबरीतून व्यक्त होते.

राजकीय स्वातंत्र्य व सामाजिक स्वातंत्र्य प्राप्त करून नवभारताचे व नवसमाजरचनेचे ध्येय साध्य करायचे असेल तर त्यासाठी आधी तळागाळातील खेड्यापाड्यांतला सामान्य माणूस जागृत करून तो संघटीत केला पाहिजे. हे समाज जागृतीचे कार्य नव्या उमदीने, नव्या विचारांने भारावलेला तरूणच प्रामुख्याने करू शकतात. म्हणूनच प्रथम या तरूणांना नवभारताचे व नव समाजाचे स्वप्न दाखवून त्यांच्यात देशाभिमान व सेवाभाव निर्माण केला पाहिजे. असे सेवाभावी तरूणच नवभारताची व नवसमाजाची निर्मिती करू शकतील असे साने गुरूजींना विश्वास होता. हाच विश्वास व भुमिका साने गुरूजी आपल्या धडपडणारी मुले (२ खंड) मधून कथेरूपात चित्रण मांडतात. या कांदबरीमधील रघुनाथ, नामदेव, यशवंत, वेणू, ललिता, जानकू, भिका यांसारख्या धडपडणाऱ्या तरूण मुलांच्या कथेतून साने गुरूजींनी त्यांना अभिप्रेत असलेले विधायक देशसेवेचे व समाजसेवेचे चित्र साकार केलेले आहे. या कांदबरीतील मुख्य पात्र स्वामीजी या तरूणांचे वैचारीक प्रबोधन करून त्यांना राष्ट्रकार्याचे व समाजकार्याचे प्रेरणा देताना दिसतात. गुरूजींनी धडपडणारी मुले या कांदबरीत स्वामीजी व हे धडपडणारे तरूण यांच्या माध्यमांतून खानदेशात राष्ट्रीय चळवळ

कशी उभी राहिली याचा अनेक तपशिलावर दिलेला आहे. ग्रामसफाई, शिक्षण प्रसार, जन प्रबोधन खादीचा प्रसार, ग्रामोद्योग यासारख्या कार्यातून उभे राहणारे चळवळीच्या चित्रासोबत अनेक सामाजिक, राजकीय प्रश्नांविषयी येणाऱ्या विचार–चिंतनातून नवभारताचा व नवसमाजरचनेचा सगळा आदर्शवाद या कांदबरीतून प्रकट होतो.

साने गुरूजींच्या राजकीय व सामाजिक आशय प्रकट करणाऱ्या कांदबऱ्या कमी–अधिक फरकाने एकसारख्या दिसून येतात. त्यांच्यामधील पात्रांची नावे जरी बदलेली असली तरी त्यांच्यातील घटना, आशय यामध्ये फारसा फरक दिसून येत नाही. सामाजिक–राजकीय चळवळीचे चित्र रेखाटणाऱ्या क्रांती नवा प्रयोग यांसारख्या कांदबऱ्यातही एका अर्थाने धडपडणाऱ्या तरूणांच्या देशकार्याच्याच कथा आहेत. धडपडणारी मुले, मधील यशवंत, नामदेव, रघुनाथ, वेणू यांच्याप्रमाणेच क्रांतीमध्ये रामदास, दयाराम, मोहन, शांता आणि नवा प्रयोग, मध्ये सखाराम, मालती या तरूणांनी उभ्या केलेल्या चळवळीचे चित्रण आलेले आहे. साने गुरूजी आपल्या मनातील सामाजिक–राजकीय चळवळीला वैचारीक व कृतीशील नेतृत्व देणाऱ्या ध्येयवादी, स्वार्थत्यागी व्यक्तीची असणारी कल्पना – 'धडपडणारी मुले' मधील स्वामीजी, क्रांतीमधील मुंकुदराव व गोड शेवटमधील दयाराम भारती या पात्रांद्वारे प्रकट करताना दिसून येते. ही पात्रे गुरूजींच्या कल्पनेतील भूमिका करतात. साने गुरूजी हे एक ध्येयवेडे, राष्ट्रस्वाभिमानी धडपडणारी मुले मधील गोपाळराव, चित्रकारमधील रंगा, क्रांतीमधील मुकुंदराव यांच्या रूपाने शिक्षकी रूपात दिसून येतात.

साने गुरूजींनी 'धडपडणारी मुले' यामध्ये ग्रामसफाई, शिक्षण प्रसार, खादीचा प्रसार, ग्रामोद्योग, जनप्रबोधन यासारखे विधायक कार्याचे चित्रण केलेले आहे. मात्र या विधायक कार्याला जमीनदार, मालक, सावकार यासारख्या शोषिंताविरोधी संघर्षाची जोड दिल्याशिवाय आदर्श समाजाचे स्वप्न साकार होऊ शकणार नाही याची साने गुरूजींना जाणिव होती. म्हणून क्रांती, नवा प्रयोग या कांदबऱ्यामधून गुरूजींनी शेतकरी – कामगारांच्या लढ्याचे चित्र केलेले आहे. देशाला केवळ राजकीय स्वातंत्र्य मिळून पुरेस नाही तर त्यासोबत देशातील शेतकऱ्यांना, मजुरांना व कामगारांना मालकांच्या, जमिनदारांच्या शोषनातून मुक्ती मिळाल्याशिवाय स्वातंत्र्याला खरा अर्थ प्राप्त होणार नाही. हा विचार साने गुरूजी 'क्रांती' या कांदबरीमधून व्यक्त करतात. त्यामुळे

क्रांतीमधील मुंकुदरावांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने उभा केलेला शेतकरी – कामगारांचा लढा हाच त्या कांदबरीच्या लढ्याचे चित्रण केलेले आहे. चीन व रशियातील कम्युनिस्टांच्या धर्तीवर शेतकरी व कामगारांच्या सामुदायिक वसाहती आपल्या देशात असाव्यात असा विचार साने गुरूजीने या कांदबरीमधून व्यक्त केला आहे. समताधिष्ठीत मानवी समाजाचा आदर्श अविष्कार म्हणून साने गुरूजींनी अशा सामुदायिक वसाहतीचे चित्र आपल्या कांदबऱ्यातून रेखाटले आहे. नवा प्रयोगमध्ये मोहनगावच्या रूपाने तर आपणं सारे भाऊ या कादंबरीत स्वराज वाढीच्या रूपाने साकार झालेले आहे. समाज रचनेच्या ह्या नव्या प्रयोगाच्या या चित्रणातून साने गुरूजींनी भारताच्या भविष्यकाळा बद्दलचे स्वप्न जणू साकार केलेले आहे.

साने गुरूजींची सामाजिक–राजकीय आदर्शाची घडण जेवढी म. गांधीजीच्या विचार प्रभावातून झाली होती. तेवढीच ती समाजवादी प्रेरणेतूनही झालेली होती. म्हणूनच साने गुरूजी आपल्या कांदबऱ्यांतून शेतकरी–कामगारांच्या लढ्याचे, मालक मजुरांचे व समता प्रस्थापित सामूहिक वसाहतीचे चित्रण करून आपल्या मनातील सामाजिक विचारांची प्रेरणा स्पष्ट करताना दिसतात. त्याचप्रमाणे स्वतंत्र भारताला समाजवादाची आवश्यकता का आहे हे गुरूजींनी आपल्या कांदबरीमधून स्पष्ट केले आहे.

साने गुरूजींवर अहिंसा वादाचा प्रभाव असल्याकारणे त्यांनी समाजवादी क्रांती हिंसेऐवजी शोषकधनवान मालकाचे अहिंसामार्गाने मतपरिवर्तन करून समाजक्रांती व्हावी असे गुरूजींना अभिप्रेत होती. मालकांने संपत्तीचे मालक बनवण्याऐवजी विश्वस्त बनून आपल्या संपत्तीचा उपयोग दीन दलित कामगारांसाठी करावा, यासाठी गुरूजी आग्रही होते व हीच भूमिका डोळ्यासमोर ठेवून साने गुरूजी मत परिवर्तन झालेल्या व संपत्तीचा उपयोग समाजासाठी करणाऱ्या धनवान व्यक्तीची व्यक्तिचित्रे ही आपल्या कांदबरीतून करत आहेत. रामदास (क्रांती), यशवंत (धडपडणारी मुले), अमरनाथ (नवा प्रयोग)जगन्नाथ (गोडशेवट), कृष्णनाथ (आपण सारे भाऊ) यांच्याद्वारे अशा विश्वस्त वृत्तीच्या धनवान पात्रांचा वापर गुरूजींनी आपल्या कांदबऱ्यांतून व्यक्त केलेला आहे.

साने गुरूजी ज्या कादंबरींचा सामाजिक – राजकीय चळवळीशी संबंध नाही अशाही कांदबऱ्यांमधून चळवळीचे संदर्भ व्यक्त होतात. गोड शेवट ही कांदबरीत जगन्नाथ व गुणा यांच्या

उत्कट मित्रप्रेमाची कहाणी आहे. परंतू त्यामधील बराचसा भाग दयाराम भारतीची उभ्या केलेल्या चळवळीचे चित्रण आहे. पुर्नजन्म कांदबरीत स्त्रीच्या एकनिष्ठ व पवित्र प्रेमाची कथा आहे. परंतू त्यात मिठाचा सत्याग्रह, जंगल सत्याग्रह, कायदेभंग चळवळीचा संदर्भ येतात. आपण सारे भाऊ यामध्ये आवडत्या गोष्टीच्या शेवटी बेचाळीसच्या चळवळीचा संदर्भ येतो. चित्रकार रंगा यात रंगा चित्रकाराची जीवन कहाणी रेखाटली आहे. त्यासोबत कला ही देशासाठी समाजासाठी राबविली पाहिजे, कला व संस्कृती या गोष्टी मुठभर लोकांपुरत्याच मर्यादीत न राहता सर्व समाजापर्यंत पोहचायला हव्यात असा विचार यातून व्यक्त होतो. आस्तिक या कांदबरीत हिंदू–मुस्लिम ऐक्या बद्दलची भुमिका साने गुरूजींनी अत्यंत प्रभावीपणे मांडलेली आहे. गुरूजीनी हिंदू–मुस्लिम ऐक्याचा प्रश्न या कांदबरीत महाभारतातील सर्व सत्राच्या कथेतून रूपकात्मक पध्दतीने मांडलेला आहे.

साने गुरूजींनी आपल्या साहित्यात राजकीय तसेच सामाजिक विषयाचे चित्रण केलेले दिसून येते. स्त्रीचित्रण हा साने गुरूजींचा सामाजिक आशयाचा एक महत्वाचा भाग होता. साने गुरूजी आपल्या कांदबऱ्यातून स्त्रीच्या सामाजिक स्थितीबद्दल सहज भान व्यक्त करतात. गुरूजीनी व्यक्त केलेला स्त्रीविषयक दृष्टीकोन हा केवळ व्यक्तीवादी भुमिकेवर आधारलेला नाही "साने गुरूजींच्या दृष्टीने भारतीय स्त्रियांच्या बदलत्या सामाजिक दर्जाचा आढावा घेणारी भारतीय नारी यात गुरूजींच्या मते ५००० वर्षापूर्वी आर्य व नाग संमिश्रणाच्या काळात स्त्रीला समाजात मान होता. स्वतःचे विचार, मे मांडण्याचा तिला अधिकार होता. कारण उत्पादन प्रक्रियेत तिचा सहभाग होता. दलित, कांडीत, विणीत..."[४१] तर व्यापक मानवी सहानूभावातून तो तयार झाला आहे. त्यामुळे गुरूजीनी केलेले स्त्रीच्या सामाजिक स्थितीचे चित्रण केवळ परंपराविरोधी अशा स्वरूपाचे नाही. साने गुरूजी हिंदू स्त्रीचा सोशीकपणा, कष्टाळूपणा, सेवाभाव, प्रेमळता व त्यागी वृत्ती याकडे आदराने पाहतात व त्याचे कौतूक करतात. मात्र स्त्रीयांवर अत्याचार करणारे व गुलाम म्हणून राबविणाऱ्या पुरूषी वृत्तीवर गुरूजी टिका करतात पुरूषप्रधान समाजातील स्त्रीची कुंचबणा व अत्याचार याचे चित्र साने गुरूजी आपल्या कादंबऱ्यांतून रेखाटतात. स्त्रियांचे दुय्यमत्व आणि गुलामगिरी यांनी प्रामुख्याने चालीरीती, रूढी–परंपरा जबाबदार असल्याने साने गुरूजी मानतात. ते त्याविषयी लिहितात – स्मृती पुरूषांनी लिहिल्या. त्यांनी पुरूषांची सोय पाहिली.

४१. साने गुरूजी, भारतीय नारी, रिया पब्लिकेशन, प्रथमावृत्ती २०११, पृष्ठ क्र. ४

स्त्रियांनी लिहिल्या असत्या तर स्वतःच्या भावनांच्या अनुरूप लिहिल्या असत्या.[४२] श्यामची आई मध्ये हिंदू स्त्रीचे प्रेमळपण, त्याग, संस्कार अशा उदाते स्वरूपाचे दर्शन घडवित असताना हिंदू कुटुंबात स्त्रीच्या वाट्याला येणाऱ्या कष्टांचे व दुःखाचे चित्र साने गुरूजीनी उभे केलेले आहे. श्याम (खंड १) मधील माणकाताईच्या सासुरवासाचे वर्णन वाचायला मिळते. चित्रकार रंगा मधील संशयग्रस्त अमृतरावाच्या छळवादाला सामोरी जाणारी ताई या वर्णनांतून पतीच्या निर्दय जाचाला बळी पडणाऱ्या स्त्रियांचे दर्शन घडविले आहे. पांरपारिक हिंदू समाजव्यवस्थेत होणाऱ्या स्त्रीच्या शारीरिक व मानसिक कोंडमाऱ्यांचे अत्यंत प्रत्यकारी चित्र साने गुरूजींच्या सती या कादंबरीत वाचावयास मिळते. स्त्रीच्या दृष्टीने अन्यायकारक विवाहसंस्थेवर टिकात्मक भाष्य या कहानीतून पाहायला मिळते. मुलीची इच्छा व भावनांचा विचार न करता आपल्या स्वार्थासाठी कन्याविक्री करणारे धोंडूभडजी उतार वयात आपला पुरूषार्थ सिध्द करण्यासाठी पैशाच्या बळावर मुली विकत घेऊन विवाह करणारे बाळासाहेब जहागीरदार अशा पुरूषीवृत्ती व्यक्तीचे चित्रण पाहायला मिळते. मात्र स्वतः अतृप्त राहून हिंदू स्त्रीचे कर्तव्य म्हणून मैना बाळासाहेबांशी एकनिष्ठ राहून त्यांच्या मृत्यूनंतर सती जाते येथे साने गुरूजी हिंदू स्त्रीचा सोशीकपणा, त्याग, ममता, एकनिष्ठा या गुणांचे दर्शन घडवितात. साने गुरूजी सती प्रथेचे उदात्तीकरण करीत नाहीत तर स्त्रीला सती जाण्यास भाग पाडणाऱ्या समाजाचा निर्दयपणा उघड करतात. पुरूषाप्रमाणे स्त्रियांनासुध्दा समान हक्क व वागणूक मिळावी. स्त्री–पुरूष समानता असावी यासाठी समाजाच्या समग्र परिवर्तनाची गुरूजींची जी कल्पना आहे. त्यात स्त्रीच्या परिवर्तनालाही महत्वाचे स्थान आहे. स्वातंत्र्याचा प्रारंभ घरापासून झाला पाहिजे असे धडपडणारी मुले या कांदबरीत गुरूजीनी म्हटले आहे. रूढी–परंपरा जपण्याचे ऐवढे ओझे भारतीय मनावर आहे की, त्यातील अमानवीय क्रूरतेचे भानही त्याला नाही. स्त्रिया त्यांचे माणूसपन हरवून बसल्या आहेत त्याची जाणीव साने गुरूजींना पदोपदी होत असे. त्याविषयी गुरूजी लिहितात – मी खानदेशातील खेड्यांमधून हिंडायचो घरात कोण आहे? मी विचारी, घरात माणसे नाहीत. मला सांगण्यात येई. बायका तर घरात असत. पुरूष म्हणजे, बायकांना कोण माणूस म्हणतो? बायकांमधली अभिजात मानवताही आम्ही विसरून गेलो... जोवर दुसऱ्यांच्या आत्म्याची प्रतिष्ठा आपणास कळली नाही तोवर स्वतंत्र्याच्या अर्थ आपणास कळला असा मी तरी म्हणणार नाही.[४३] स्त्रीयांनी आपली स्थिती स्वतःच सुधारून जगात कृतिशील झाले पाहिजे. व नव्या

४२. कित्ता, पृष्ठ क्र. १७

४३. साने गुरूजी, स्वप्न आणि सत्य, रिया पब्लिकेशन, प्रथमावृत्ती २०११ पृष्ठ क्र. २१

सामाजिक ध्येयांचा पाठपुरावा केला पाहिजे. म्हणूनच साने गुरूजीनी आपल्या कांदबरीतून ध्येयवादी व कृतिशील स्त्रीपात्रे उभी केलेली आहेत. राजकीय व सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत सक्रिय भाग घेतलेल्या स्त्रीया साने गुरूजीनी आपल्या कांदबऱ्यातून रंगविलेल्या आहेत.

"अशाप्रकारे साने गुरूजींनी स्त्रीयाच्या व्यथा व कथा जाणण्यासाठी गावोगाव फिरून ग्रामीण स्त्रीयांकडून ओव्या संकलित केल्या. १९३४ साली त्यांनी स्त्रीयांच्या तोंडी परंपरेने चालत आलेल्या ४०० ओव्या लिहून घेतल्या. पुढे १९३९ साली त्यांच्या वहिनीनी बऱ्याच ओव्या सांगितल्या."[४४] त्या ओव्या आजही समाजाला प्रेरक ठरतील. आपण समाजाचे एक घटक आहोत. आपण समाजाचे देण लागतो. आपल्याला जे जे चांगले ठावे ते समाजाला द्यावे. आपली समाजाशी बांधिलकी आहे ही जाणीव साने गुरूजींच्या मनात तीव्रपणे होती. या बांधिलकीचा अविष्कार आपल्या व्यक्तिगत जीवनात प्रत्यक्ष कृतीतून जसा गुरूजीनी केला तसाच तो कांदबरी लिहूनही केला. गुरूजीनी आपले ध्येय, स्वप्ने, कल्पना आणि विचार, मानव, मानवीवर्तन, धर्म, संस्कृती याबद्दलचे आपले चिंतन गुरूजींनी कांदबरीच्या रूपाने मांडले. गुरूजीनी समग्र मानवी जीवनविषयी चिंतन करून ते आपल्या साहित्यात मांडले आहे.

साने गुरूजींचे लेखन वैशिष्ट्ये

साने गुरूजींचे जीवन, व्यक्तीमत्व व साहित्य आज पाहिले तर सर्व पिढ्यांना मार्गदर्शक व आदर्श ठरलेले आहे गेल्या अनेक वर्षात गुरूजींच्या साहित्याने सतत मराठी मनावर नैतिकतेचे संस्कार व मराठी मन सुसंस्कृत करण्याचे मोलाचे कार्य केलेले आहे. हे भाग्य फार थोड्याच प्रतिभावंत लेखकाच्या वाट्याला येते. त्यापैकी – एक साने गुरूजी होत.

कथा, कादंबरी, निबंध, नाटक, कविता, भाषांतरे, लोकवाडमयाचे संकलन, संस्कृती चिंतन, प्रचारकी लेख, चरित्रे भाषण – अशा अनेक प्रकारचा वाडमय प्रकारांमधून साने गुरूजींनी आपली असमान्य प्रतिभा उपयोजिली आहे. गुरूजींनी साहित्याच्या प्रांतात चाकोरीत राहून लिहले नाही. गुरूजींच्या साहित्याचे महत्व जाणताना गुरूजी ही व्यक्ती समजून घेतली पाहिजे त्यांची जीवनपध्दती समजून घेतली पाहिजे. देश गुलामगिरीत असताना स्वातंत्र्यासाठी चळवळ चालू होती. त्या चळवळीत गुरूजींनी स्वतःला झोकून दिले होते. त्यामध्ये त्यांना अनेक वेळा कारावासही

४४. दा.न. शिखरे, साने गुरूजींची जीवनधारा, पुणे, विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. ३३

भोगावा लागला. समाजातील सर्व थरांतून ते हिंडले. शेतकऱ्यांची आणि कामगारांची दुःखे त्यांनी जवळून पाहिली. समाजातील दिन दलित, देशातील गरीबी, अज्ञान हे सर्व त्यांनी विषमात, संवेदनशील मनाने पाहिले. गुरूजीनी जे पाहिले, जे अनुभवले तेच त्यांनी लिहिले. अशाप्रकारे गुरूजींच्या साहित्यात त्यांनी अनुभवलेल्या सुख दुखाचे, आशा–आकांक्षाचे आणि साफल्य–वैफल्य यांचे उत्कट दर्शन होते.

"आधुनिक मराठी वाडमयात जनतेला आपल्या हृदयाचा ठोका ज्यामधून (ऐकू) येत आहे, असे वाडमय फारच थोडे आढळून येत आहे. नवीन, शुध्दतर व उदार अशा जीवनाची साद ज्याप्रमाणे गांधीजीनी राष्ट्राला दिली त्याप्रमाणे तिच्याशी संवादी अशी साद साहित्यातून त्यांना ऐकू आली नाही.. आधुनिक महाराष्ट्राच्या वाडमयाचा इतिहास लिहिताना जनतेसाठी आपले अंतःकरण पिळून लिहणारा एकच एक सारस्वत म्हणून गुरूजींचे नाव लिहावे लागेल."[४५]

ना.ग गोरे

"ज्ञानेशाची ओवी, तुकारामाचा अभंग, मोरोपंताची आर्या, तसेच गुरूजींच्या गोष्टी मराठी साहित्यात अनंत काळापर्यंत टिकतील."[४६]

आचार्य अत्रे

अशा प्रकारे ना.ग. गोरे व आचार्य अत्रे ना गुरूजींच्या साहित्याविषयी गौरवउद्‌गार काढलेले आहेत.

साने गुरूजी हे आपल्या लेखकपणाचा दावा न करणारे अतिशय सरळमार्गी लेखक होते. प्रखर राष्ट्रभक्ती, सेवा आणि शोषितांविषयी कळकळ हि त्यांच्या व्यक्तीमत्वाची वैशिष्ट्ये होती. असे हे वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तीमत्व मराठी मनाला समजून घेणे गरेजेचे वाटले पाहिजे होते. परंतू तसे झाले नाही. त्यांचे साहित्य, त्यांचे व्यक्तिमत्व आणि त्यांच्या निष्ठा या मराठी समीक्षकांना कधीच फारशा कळल्या नाहीत. म्हणून वाचकांमध्ये लोकप्रिय परंतू मराठी समीक्षकांना मात्र अप्रिय असे लेखक म्हणजे साने गुरूजी होत असे म्हणावे लागते.[४७] या समीक्षकांमध्ये ना.सी. फडके तर याकामी टिकाग्रणी होते.

---

४५. राजा मंगळ वेढेकर, साने गुरूजी जीवनगाथा, पृष्ठ क्र.३७८

४६. कित्ता, पृष्ठ क्र. ३९२

४७. नागनाथ कोत्तापल्ले साहित्य समिक्षेची समिक्षा, सपांदक, भालचंद्र नेमाडे, साहित्य अकादमी २०१४, दिल्ली, पृष्ठ क्र. ४७

आपण कोणी मोठे साहित्यिक आहोत, असा साने गुरूजीनी कधी दावा केला नाही मुलांच्या मनोरंजनसाठी त्यांनी लिहिणे. त्यामागची त्यांची भूमिका स्पष्ट आहे. करी मनोरंजन जो मुलांचे जडेल नाते प्रभुशी तयाचे, ही ती भूमिका होती. छात्रालय दैनिक मागची प्रेरणा शाळेतल्या वा छात्रालयातील मुलांवर सुसंस्कार करण्याची, त्यांचे ज्ञान वाढविण्याची, त्यांचे उद्‌बोधन करण्याची व त्यांच्या ठायी ठायी देशभक्तीचा ध्येयवाद उत्पन्न करण्याची होती. याविषयी साने गुरूजी लिहितात, दैनिकाचा मुख्य उद्‌देश मनोभूमिका शुध्द व उदात्त करण्याचा आहे.[४८]

साने गुरूजीच्या साहित्याच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करण्यापूर्वी ज्या काळात गुरूजी लेखक म्हणून उदयाला आले तो काळ, व त्या काळातील निर्माण झालेले प्रश्न यांचा विचार केल्याशिवाय आपणांस त्यांच्या साहित्य वैशिष्ट्यांचे स्वरूप कळणार नाही. म्हणून तो काळ अभ्यासने गरजेचे आहे.

साने गुरूजींचा काळ हा खरे तर मराठी जगताच्या दृष्टीने विलक्षण धामधुमीचा आणि विचार संघर्षाचा काळ होता. म. गांधीजीच्या नेतृत्वाने व तत्वज्ञानाने भारतीय स्वातंत्र्य लढ्याला गती प्राप्त होऊपाहत होती. म. गांधीजींच्या विचार प्रभावाने प्रथमच दलित, शोषित, बहुजन समाज, शेतकरी, कामगार आणि स्त्रिया भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होऊ लागले होते. अशावेळी शहरी व ग्रामीण भारतीय जनता लढ्यात सहभागी होणं गरजेचे होते. त्यांना प्रोत्साहित करून स्वातंत्र्यलढ्याच्या प्रवाहात सहभागी घेण्यात साने गुरूजींच्या साहित्याने मोलाचे कार्य केलेले दिसून येते.

साने गुरूजींच्या लेखनात स्वतःच्या ठायी असलेल्या सहृदयतेने, वात्सल्याने वाचकाच्या हृदयाला स्पर्श करण्याचा फार मोठा गुण आहे. माणुसकी, चांगुलपणा, प्रेम, कणव ते वाचकाच्या मनात जागी करतात प्रचार, उपदेश या पलीकडे जाणाऱ्या या गोष्टी आहेत.

साने गुरूजींच्या साहित्यात मानवी जीवन उन्नत होण्यासाठी त्या जीवनाला ध्येयांची ओढ, पूर्णत्वाची, विशुध्दतेची, दिव्यत्वाची ओढ आहे. गुरूजींच्या पुस्तकांचे वाचन करताना एक नवे जग, अधिक माणुसकी संपन्न, प्रेमळ, सेवामय जग निर्माण करण्याचे ध्येय मनात रूजते. साने गुरूजी एक आदर्श व ध्येयवादी लेखक होते. गुरूजी भारतीय समाजाविषयी आदर्श स्वप्न पाहतात व स्वप्न व

---

४८. आचार्य भागवत, (संक) वाङःमय खंड २ रा, अच्युत्य केशव भागवत, महाराष्ट्र राज्य, साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई १९८७ या ग्रंथातील, साने गुरूजींची पत्री या लेखातून, पृष्ठ क्र. ११०

ध्येय आपल्या वाडमयातून समाजापर्यंत पोहचवतात.

साने गुरूजींचा लेखन काळ साधारणपणे इ.स. १९३० ते इ.स. १९५० या काळातील आहे. हा कालखंड ना.सी. फडके, वि.स. खांडेकर आणि ग.त्र्यं. माडखोलकरांचे युग म्हणून ओळखला जातो. ते या काळातील लोकप्रिय कांदबरीकार म्हणून मानले जात होते. या काळात या साने गुरूजी तिघांहून काही अंशी अधिक लोकप्रिय कांदबरीकार होते. केवळ शहरी पांढरपेशा वर्गातच नव्हे तर इतर सामाजिक स्तरातला वाचक वर्ग हा साने गुरूजींच्या साहित्याला लाभलेला होता. साने गुरूजी कांदबरीकार म्हणून फडके–खांडेकरांएवढी लोकप्रियता लाभलेली असूनही मराठी समिक्षकांनी व वाडमय इतिहासकारांनी साने गुरूजींना फडके–खांडेकरांच्या बरोबरीचे सुध्दा स्थान कधीच दिले नाही.[४९] सामाजिक जाणिवेतून लिहिणारे साने गुरूजी त्या काळात व पुढील काळातही उपेक्षित राहिले. त्याचे एक महत्वाचे कारण म्हणजे प्रस्थापित प्रवाहातल्या कांदबऱ्यांपासून असणारे साने गुरूजींच्या – कांदबऱ्यांचे वेगळेपण होय. मराठी कांदबरीच्या पहिल्या शतकाच्या समीक्षा करणाऱ्या–कुसुमावती देशपांडे यांनी वेगळ्या वाटेचे कांदबरीकार म्हणून साने गरुजींच्या वेगळेपणाची आवर्जुन दखल घेतलेली आहे.[५०]

साने गुरूजीनी आपल्या साहित्यनिर्मितीकडे करिअर, कलाविकास, सौंदर्यवस्तू या दृष्टीकोनात कधी पाहिले नाही. गुरूजी साहित्य निर्मितीकडे आपल्या जीवनकार्याचाच एक भाग म्हणून पाहत होते. गुरूजीनी देशकार्य आणि समाजकार्य हेच जीवनध्येय मानून त्या ध्येयाला पूरक ठरणारी कृती म्हणूनच ते आपल्या साहित्य निर्मितीकडे पाहत होते. प्रत्यक्ष कृतीपेक्षा लिहिणे ही दुय्यम कृती आहे. असेच गुरूजींचे मत होते. याविषयी धडपडणारी मुले, या पुस्तकात साने गुरूजी लिहितात. "देशात गोष्टी वेल्हाळ लोक फार भराभर लिहितात व खंडीभर बोलतील, परंतु प्रत्यक्ष कृतीच्या नावाने शुन्याकार. देशात बोलणाऱ्याचा व लिहिणाऱ्यांचा सुकाळ झालेला आहे. प्रेमाच्या कथा व प्रेमाच्या कविता.... जीवन हेच महाकाव्य आहे. परंतू लक्षात कोण घेतो?"[५१] या उताऱ्यावरून आपल्याला गुरूजींची भूमिका स्पष्ट होते. मात्र जेव्हा प्रत्यक्ष कृती करण शक्य नसते तेव्हा लेखन ही पर्यायी कृती होऊ शकते असेही गुरूजींना वाटते. म्हणून गुरूजी आपल्या साहित्याकडे, प्रत्यक्ष सृष्टीत अतृप्त राहिलेल्या शेकडो हृदयाच्या भुका शांत करण्याचा एक मार्ग

४९. भालचंद्र नेमाडे (संपा), साने गुरूजी पुर्नमुल्यांकन, जन्मशताब्दी चर्चा सत्रातील निबंध साहित्य अकादमी, पुर्नमुद्रण २००६–२०१४, पृष्ठ क्र. ११८

५०. कित्ता, पृष्ठ क्र. ११८

५१. साने गुरूजी धडपडणारी मुले, रिया पब्लिकेशन, प्रथमावृत्ती २०११ पृश्ठ क्र. ६३

म्हणून पाहतात. याविषयी गुरूजी धडपडणारी मुले या पुस्तकातील प्रास्ताविकात लिहितात, माझ्यासारख्या दुबळ्या कृतीच्या माणसाच्या मनात आशा आकांक्षा व उच्च ध्येय असतात. परंतु त्या सर्वांना कृतीत आणण्याचे ध्येर्य नसते. मग दौत, लेखणी, कागद घेऊन कल्पनांचे घोडे कागदावर नाचविले एवढाच पुरूषार्थ वाटतो व तोच मी तुरूंगात करीत बसे.[५२] साने गुरूजी साहित्याकडे अशी पर्यायी नैतिक कृती म्हणून पाहत होते.

इ.स. १९३५ च्या आसपास बोरकर, रेये, अनिल, कुसुमाग्रज इत्यादी नव्या कवींच्या कवितांच्या काळात साने गुरूजींचा पत्री हा कविता संग्रह अमळनेरच्या तरूण सेवक संघाच्या वतीने प्रकाशित झाला. पत्री या कविता संग्रहातील बहुतांशा कविता इ.स. १९२५ ते इ.स. १९३५ या कालखंडात आणि बहुतेक कविता निरनिराळ्या तुरूंगात लिहिली गेलेली आहे. पत्री या संग्रहातील कवितांची विभागणी आत्मपर आणि देशभक्तीपर अशा दोन भागात केलेली आहे. साने गुरूजी यांचे अंतःकरण स्त्रीच्या मातृरूपाने लावलेले दिसून येते. त्यामुळे त्यांच्या लेखनातून माता आणि तिच्या विविध प्रतिमा आढळतात. साने गुरूजींचा लेखन प्रवास जन्मदायी मातेपासून जगन्मातेपर्यंतचा होता. साने गुरूजींनी स्त्री–गीते गावोगावी हिंडून गोळा केलेली आहेत व ती स्त्री जीवन या नावाने प्रसिध्द केली. मात्र यात स्वतःची एक ही ओळ घातलेली नाही. त्यामुळे या स्त्री कविता संग्रहाचा साने गुरूजींच्या काव्य कर्तुत्वात समावेश करता येत नाही.

साने गुरूजीच्या जीवनावर जरी खूप लिहिले गेले असले तरी त्यांच्या साहित्याबद्दल मात्र फारसे लिहिले गेले नाही. वस्तुतः साने गुरूजींची भाषा तत्कालीन भाषेपेक्षा–वेगळी होती. त्यांच्या ललित कृतीतील आशय संपूर्णतः निराळा होता. त्यांच्या प्रेरणा निराळ्या होत्या. मात्र कुणालाही साने गुरूजींचे लेखणपण शोधावे असे फारसे वाटले नाही. आचार्य जावडेकरांनी गुरूजींच्या संगत्वाबद्दल गौरव केला आहे. "या संताचे राजकारण संताला शोभेसे आणि समाजक्रांतीला पूरक होते असे म्हटले आहे."[५३] परंतू त्यांच्या लेखनात साने गुरूजींच्या साहित्याचा मात्र फारसा उल्लेख नाही. बाळासाहेब भारदे यांनीही त्यांच्या साहित्याला पाचवा वेद असे विशेषण लावले आहे. परंतू हा पाचवा वेद कसा आहे ते मात्र सांगितले नाही.[५४]

राजा मंगळवेढेकर, ल.नी छापेकर, रामभाऊ जोशी, आचार्य विनोबा भावे, सेनापती

५२. भालचंद्र नेमाडे (संपा), साने गुरूजी पुर्नमुल्यांकन, पूर्वोक्त, पृष्ठ क्र.२
५३. कित्ता, पृष्ठ क्र. ५८
५४. कित्ता, पृष्ठ क्र. ५९

बापट, मधु लिमये, राजा पटवर्धन, यासारख्या व्यक्तींनी साने गुरूजींच्या व्यक्तीमत्वाची दखल घेतली होती. मात्र यापैकी कुणालाही साने गुरूजींची साहित्यसंपदा नीट समजून घ्यावे अशी वाटली नाही.[५५] तथापि ती पुष्कळशी मंडळी साने गुरूजींच्या जीवनामुळे इतकी भारावून गेली होती की साने गुरूजी आपल्या लेखक असण्याबद्दल कधी आग्रही नव्हते. मात्र प्र.के अत्रेनी साने गुरूजी साहित्याची नीट समिक्षा न होण्याचे कारण मात्र त्यांनी बरोबर सांगितले. जीवनासाठी वाडमय का कलेसाठी वाडमय? असा मराठी साहित्यात निरनिराळे नट पडलेले असावेत अशी कोणाची कल्पना होईल. पण खरे बोलायचे. कमी अधिक फरकाने बहुतेक मराठी साहित्यिक हे कलावादीच आहेत. सर्वस्वी जीवनवादी लेखक महाराष्ट्रात एकच होऊन गेला आणि तो म्हणजे साने गुरूजी. तेव्हा कलावादी लेखकांना जीवनवादी गुरूजींचा विसर पडला यात काही मोठे आश्चर्य नाही.[५६] अशा प्रकारे प्र.के. अत्रे यांनी गुरूजींबद्दल गौरोद्गार काढले आहे.

अशाप्रकारे साने गुरूजींच्या साहित्याचे बहुपैलू महत्व आहे.

समारोप

अशाप्रकारे साने गुरूजीनी आपल्या साहित्यातून राष्ट्रीय व सामाजिक लढ्यात सहभाग घेण्यासाठी शेतकरी, कामगार, स्त्री–पुरूष तरूणांना प्रेरीत केले. गुरूजींनी आपल्या, कथा, कांदबऱ्या, कविता, लेख व भाषणांतून दिलेले विचार आजही तरुणांना प्रेरणादायी ठरणारे आहेत.

* * * *

५५. कित्ता.

५६. आचार्य अत्रे, मृत्यूचे चुंबन घेणारा कवी, साधना प्रकाशन, पृश्ठ क्र. ७८

प्रकरण सहावे

उपसंहार

साने गुरूजींचा राष्ट्रीय स्वातंत्र्यविचार व सामाजिक स्वातंत्र्यविचार व त्यासाठी केलेले प्रयत्न हा भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील अत्यंत महत्वाचा आहे. कारण ते विचार हे भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा प्रचार व प्रसार करण्यासाठी अत्यंत महत्वाचे ठरलेले आहेत. साने गुरूजीचा राजकीय व सामाजिक स्वातंत्र्य लढा हा. म. गांधीच्या तत्वज्ञानावर आधारित आहे. सत्य, अहिंसा, सत्याग्रह ह्या तत्वावर गुरूजीनी भर देऊन लोकांना विशेषतः तरूण, शेतकरी, कामगारांना स्वातंत्र्य लढ्यात सहभाग होण्यास प्रवृत्त केलेले दिसून येते. म्हणून त्यांच्या कार्याचा व विचारांचा चिकित्सक अभ्यास करण्यासाठी उपलब्ध साधनांचा अधिका–अधिक वापर करून सखोल अभ्यास करण्याचा हा प्रयत्न आहे.

साने गुरूजींच्या राजकीय स्वातंत्र्य व सामाजिक स्वातंत्र्य व व्यक्ती स्वातंत्र्याचे विचार व त्यासाठी केलेले सत्याग्रह, उपोषणे, भाषणे, सभा, परकीयांवर व स्वकीयांवर केलेले परखड लिखाण इ. कार्याचे बहुविध पैलू आहेत येथे त्यांच्या काही ठळक वैशिष्ट्यांवर, विचारांवर व उपलब्ध साधनांवर प्रस्तुत शोधप्रबंधात सटिकात्मक चिकित्सक अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

आजच्या स्वातंत्र्यानंतर जन्मलेल्या तरूण पिढीला साने गुरूजी म्हणजे श्यामची आई कदाचित एवढेच माहित असेल मात्र अनेक जणांना त्यांचे राजकीय व सामाजिक विचारांविषयी माहितीही नसेल कारण त्यासाठीची साधने उपलब्धता असू शकते. मात्र काही उपलब्ध संशोधनामध्ये ठराविक स्वातंत्र्य वीराविषयी माहितीच दिसून येते. या सर्व कारणाने ज्ञान–अज्ञान स्वातंत्र्यावीरांचा अभ्यास करताना साने गुरूजीच्या स्वातंत्र्य कार्याविषयी विचार व त्यावर लक्ष वेधलेले दिसत नाही अशा काही ज्ञात–अज्ञात वीरांचे लढणे हेच सर्वस्व होते ज्यांचा अद्याप शोध लागलेला नाही किंवा त्यांच्या कार्याविषयी आज फारशी ऐतिहासिक कागदपत्रे वा साहित्य उपलब्ध नाहीत अशा सर्व वीरांचे कवी कुसुमाग्रज यांनी आदरपूर्वक स्मरण करून पुढील काव्यपंक्ती

लिहिल्या आहेत.

अनाम वीरा, कुठे जाहला, तुझा जीवनांत
स्तंभ जिथे ना कुणी बांधला, पेटली ना वात
जनभक्तीचे तुझ्यावर नच, उधाणाचे भाव
रियासतीवर नसे नोंदले, कुणी तुझे नाव
जरी हे गातील भाट डफावर, तुझे यशोगान
सफल जाहले परी तुझे हे, तुझेच बलीदान ।।

अशावेळी अज्ञात वीरांचा अभ्यास करताना साने गुरूजींच्या साहित्याबरोबरच त्यांचे राजकीय व सामाजिक कार्य लक्ष वेधून घेते. त्यामुळे त्यांच्या कार्यांचा इतिहासकारांसमोर हा प्रयत्न केलेला आहे. हा शोध प्रबंध सहा प्रकरणात विभागलेला आहे.

प्रकरण एक हे 'प्रास्ताविक' आहे त्यात प्रस्तुत प्रबंध, निवडीचे कारण, महत्व, संशोधनाचे उद्दीष्टे, संशोधन समस्या, संशोधनाची व्याप्ती, संशोधनाची मर्यादा व संशोधनाची गृहीतके या मुद्याचा वापर करून शोधप्रबंधावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

वरील मुद्यांचा अभ्यास करताना साने गुरूजींच्या ज्ञात साहित्यांचा व विचारांचा अभ्यास केला व त्यातून चिकित्सक प्रेरक माहिती व गुरूजींचे राजकीय व सामाजिक स्वातंत्र्यासाठीचे योगदान समोर येते. प्रस्तुत शोधप्रबंधाचा अभ्यास करताना साने गुरूजी विषयी उपलब्ध प्राथमिक व दुय्यम साधनांचा अभ्यास करून जास्तीत जास्त विषय प्रवेशामध्ये माहिती अभ्यासकांसमोर मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

साने गुरूजीनी आपल्या साहित्यातून व भाषणांतून तरूणांच्या मनात देशनिष्ठ व देशप्रेम निर्माण केले. गुरूजींचे साहित्य व विचार पुरोगामी समाजाला आणि तरूणांना प्रेरणादायी ठरेल व त्यांच्या मनात देशप्रेम व देशनिष्ठा निर्माण व्हावी हाच विषय निवडीचा उद्देश आहे. साने गुरूजींच्या वेगवेगळ्या कार्यांचा परिचय व प्रचार व्हावा या उद्देशाने सदर विषय संशोधनासाठी निवडलेला आहे. साने गुरूजींचे दुर्लक्षित राष्ट्रीय व सामाजिक कार्याचा समाजाला परिचय व्हावा हा उद्देश या संशोधनाने साध्य होतो.

प्रकरण दोन 'साने गुरूजींची जडणघडण व गांधीजींच्या विचारांचा प्रभाव' यात साने गुरूजींचा जीवनपरिचय व त्यांच्या जडणघडणीत आई–वडीलांचे संस्कार व विनोबा भावे, म. गांधी व इतर सहकाऱ्यांच्या विचारांचा झालेला प्रभाव व या विचार प्रभावातून गुरूजी कसे घडले याची माहिती या प्रकरणात दिलेली आहे.

सदर प्रकरणात साने गुरूजींचे बालपण, शिक्षण आई वडीलांचे संस्कार, शिक्षणासाठीची वणवण, मातृवियोग, पितृवियोग या सर्वांत तयार झालेले असुरक्षितता वाटणे स्वभाविक होते. मात्र त्यातूनच आपले शिक्षण पूर्ण केले. घरातील वडीलांची शिस्त, वक्तशीरपणा या सर्व गुणांचा झालेला लहानपणाचा संस्कार पुढे मोठेपणी कामी आलेला दिसून येतो. साने गुरूजीच्या जीवनात त्यांच्या आईचे मोठे योगदान दिसून येते. लहानपणीच गुरूजींच्या मनातून अस्पृश्यतेचे तण काढून टाकले व अस्पृश्य समाजाविषयी प्रेम निर्माण केले. याच सेवाभावी आस्थेने व प्रेमापोटी पुढे गुरूजीनी अस्पृश्यतेविरूध्द लढे देऊन वंचित समाजाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. गुरूजींना आईने झाडे, फुले, मनुष्य व सजीव प्राण्यांवर प्रेम करायला शिकविले. मनुष्याने आपल्या स्वार्थासाठी व वर्चस्वासाठी समाजामध्ये जातीय व्यवस्था निर्माण केलेली आहे. आपण सारे देवाची लेकरे आहोत. देवाला सारी प्रिय आहेत. याच शिकवणूकीतून गुरूजी लहानचे मोठे झाले. जगात धर्म, जाती, पंथ मनुष्याने पाडले आहेत. त्यामागील वर्चस्व प्रस्थापित करण्याचा समाजातील काही लोकांचा हेतू आहे. त्यामुळे समाजात विषमता निर्माण झाली आहे उच्च निच्च भेद निर्माण झालेले आहेत. हा भेदभाव नष्ट होऊन एकमेकांशी प्रेमाने वागले पाहिजे. हे गुरूजीनी आपल्या शिकवणीतून समाजापुढे मांडण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच ते म्हणतात – "खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे."

आई वडीलांच्या संस्कारातून लहानांचे मोठे झालेले साने गुरूजी मोठेपणी म. गांधी, विनोबा भावे व इतर सहकाऱ्यांच्या विचारात वाढले. मात्र त्यापैकी गुरूजीनी म. गांधीजींचे सत्य, अंहिसा, सत्याग्रह हे तत्वज्ञान आत्मसात करण्याचा प्रयत्न केला तो अंगिकारून वागण्याचा व समाजापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला. एकंदरीत साने गुरूजींवर आईवडीलांचे संस्कार व म. गांधीजीच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो. व तोच संस्कार व विचार पुढे त्यांनी कार्य करण्यास प्रवृत करतो. साने गुरूजीना स्वातंत्र्यलढ्यात सहभाग होण्यास मात्र संस्काराचा व विचारांचा पुढे उपयोग

झालेला दिसून येतो.

साने गुरूजींच्या वडीलांनी स्वदेशी चळवळीत १९११ मध्ये भाग घेतला होता. ते टिळक भक्त होते. त्यांच्यावर टिळकांचे विचार, देशभक्ती खोलवर रूजली होती. हिच देशभक्ती त्यांत सामावून घेण्याचा प्रयत्न केला असा विचार गुरूजींच्या अंगी लहानपणीच उतरला होता. स्वातंत्र्य लढ्याचा मंत्र गुरूजींना लहानपणीच वडीलांकडून मिळाला होता.

साने गुरूजींच्या मनाची खरी घडण त्यांच्या आईने केली. आई त्यांची खरी देवता. त्यांच्या मनाची मूर्तीकार तीच व त्यांच्या शिलाची शिल्पकार ही तीच येता–जाता, बसता–उठता, सहज बोलता आई गुरूजींना धर्माचे, नीतीचे, सेवेचे पाठ देई म्हणून गुरूजी आपल्या आईला गुरू मानतात. गुरूजींना आई वडीलांना सुखी ठेवता कदाचित आले नसेल मात्र जगातील तमाम कष्टकरी दीन–दलितांना सुखी ठेवण्यासाठी गुरूजी झिजले व झटले.

प्रकरण तीन 'साने गुरूजी व राजकीय स्वातंत्र्य लढा' या प्रकरणात साने गुरूजीने दिलेल्या राष्ट्रीय लढ्याविषयी विश्लेषण दिलेले आहे. म. गांधीजीच्या विचाराने व तत्वज्ञानाने प्रभावित होऊन गुरूजी इ.स. १९३० मध्ये भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झाले. देशाला ब्रिटिश सत्तेपासून स्वातंत्र्य हवे. यासाठी गुरूजीनी दौरे प्रचारसभा व आपल्या लेखनीद्वारे समाजामध्ये राष्ट्रप्रेम निर्माण केले. साने गुरूजींनी इ.स. १९३० मध्ये पहिल्या सविनय कायदेभंग चळवळीत सहभाग घेतला. त्यात त्यांना राष्ट्रद्रोहाच्या आरोपाखाली दि. १७ मे १९३० ला अटक केली. दि. २३ मार्च १९३१ ला तुरूंगातून सुटका केली. पुढे इ.स. १९३२ मध्ये दुसऱ्या सविनय कायदेभंग चळवळीत सहभाग घेतल्यामुळे दि. १७ जानेवारी १९३२ ला पकडून दोन वर्षाची सक्त मजुरीची सजा सुनावली. इ.स. १९३४ ला वैयक्तिक सत्याग्रहात भाग घेतला. प्रांतिक निवडणुकीत काँग्रेसचा प्रचार करून काँग्रेस उमेदवार निवडून आले. इ.स. १९४२ च्या ऑगस्ट क्रांती लढ्यात गुरूजींनी भूमिगत कार्य केले. फैजपूर काँग्रेस अधिवेशन यशस्वी करण्यामागे साने गुरूजींचा सिंहाचा वाटा होता. इ.स. १९३७ ते १९३९ ह्या काळात गुरूजींनी शेतकऱ्यांचे लढे, परिषदा, गिरणी कामगारांचे प्रश्न, संप, मोर्चे, फैजपूर काँग्रेस अधिवेशन यामध्ये सहभाग घेऊन यशस्वी केले.

भारत स्वातंत्र्य लढ्यात अनेक क्रांतीवीरांनी आपले सर्वस्व समर्पण केले व देश स्वातंत्र्य

होण्यासाठी परकीय सत्तेविरूध्द लढे दिले. मात्र साने गुरूजींनी परकीय सत्तेपासून देश व देशातील श्रमिक, अस्पृश्य जनताही स्वतंत्र व्हावी यासाठी लढे दिले. साने गुरूजीनी आपल्या भाषणांतून, कवितांतून व लेखांतून भारतीय जनतेला जागृत करून त्यांच्या मनात देशनिष्ठा निर्माण करून स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होण्यास प्रवृत्त केले. व याच प्रेरणेतून अनेक तरूणांनी लढ्यात सहभाग घेऊन तुरूंगवास भोगलेला आहे साने गुरूजीनी राष्ट्रीय लढ्यासोबत सामाजिक लढ्याला महत्व दिले व दोन्ही लढे सोबत लढण्यास भारतीय तरूणांना प्रेरीत केले.

अशाप्रकारे गुरूजींनी राष्ट्रीय लढ्यात सक्रिय भाग घेऊन प्रत्यक्ष वा आपल्या लेखणीद्वारे समाजामध्ये मुलभूत हक्काची जाणिव करून राष्ट्रप्रेम जागृत केले.

प्रकरण चौथे हे 'साने गुरूजी व सामाजिक समतेचा लढा' या प्रकरणत भारतीय समाजामध्ये समता निर्माण करण्यासाठी व त्यांना आपल्या मूलभूत हक्कांची जाणीव निर्माण करण्याचे मुख्य काम साने गुरूजीनी केले त्याविषयी विश्लेषण केलेले आहे. म. गांधीजीच्या विचारांचा व संस्कारांचा पगडा गुरूजींवर दिसून येतो. म. गांधीजीनी अंहिसा, सत्याग्रह, उपोषण, चळवळीतून इंग्रजांविरूध्द लढे दिले व तसे समाजालाही प्रवृत्त केले. म. गांधीजीना राष्ट्रीय लढे व सामाजिक लढे सोबतच लढले पाहिजे हे अपेक्षित होते. हे गांधी तत्वज्ञान साने गुरूजीनी मनोमनी अंगिकारले होते. याचाच पुढे वापर करून गुरूजींनी राष्ट्रीय लढ्यासोबत सामाजिक लढे एकसाधन दिलेले दिसून येतात. सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी इ.स. १९४७ मध्ये प्राणांतिक उपोषण करून पंढरपूर मंदिर अस्पृश्यांना खुले केले.

साने गुरूजींच्या राजकीय स्वातंत्र्य, सामाजिक स्वातंत्र्य व व्यक्ती स्वातंत्र्य विचार यासाठी केलेले सत्याग्रह, उपोषणे, भाषणे, सभा, परकियांवर व स्वकियांवर केलेले परखड लिखाण इत्यादी कार्याचे बहुविध पैलू दिसून येतात. साने गुरूजींची आंतरभारती संकल्पना, साक्षरता चळवळ, स्त्री स्वातंत्र्य विचार चळवळ, आदर्श शिक्षणाबद्दलचे विचार, स्वावलंबन प्रचार, पंढरपूर चळवळ या सर्व चळवळी समाजातील अर्थिक दुर्बल व अस्पृश्य लोकांना मुलभूत हक्क मिळविण्यासाठीच्या आहेत. अशाप्रकारे साने गुरूजीना राष्ट्रीय स्वातंत्र्यासोबत सामाजिक स्वातंत्र्य हवे होते त्यासाठी तसा प्रयत्न केलेला दिसून येतो.

साने गुरूजीनी राजकीय स्वातंत्र्यासोबत सामाजिक स्वातंत्र्यालाही महत्व दिलेले आहे. राजकीय स्वातंत्र्य मिळणे हे परकीयांच्या हातात होते मात्र सामाजिक स्वातंत्र्य हे स्वकीयांच्या हातात होते. यासाठी साने गुरूजींनी स्वकीयांशी लढा देऊन समाजामध्ये क्षमता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केला. त्यासाठी गुरूजीनी समाज जीवनाशी समरस होऊन सर्व लोकांना प्रेमाची शिकवण देऊन आपल्यावर होणाऱ्या अन्यायाला प्रतिकार करण्यास शिकविले. सर्व भारतीय समाजाने एकत्र येऊन एकमताने मनी एकात्मतेची भावना निर्माण करून राहिले पाहिजे. असा संदेश गुरूजींनी दिला आहे. गुरूजींनी देशातील अन्याय, गुलामगिरी संपविण्यासाठी परकीयांशी लढा दिला. तसेच देशातील श्रमिकांवरील अन्याय दूर करण्यासाठी भांडवलशाही सावकाराविरूध्द लढा दिला व भारतीय समाजातील अस्पृश्यता नष्ट करून समता प्रस्थापित करण्यासाठी सनातनी विचारांशी लढा दिला.

अशाप्रकारे साने गुरूजीनी सभा–भाषणे, उपोषणे, सत्याग्रह व आंदोलने मार्फत देशातील जनतेला परकीय अन्यायाविरूध्द लढण्यास प्रवृत्त केले. व सामाजिक समतेसाठी व अस्पृश्यता निवारण्यासाठी जनमत निर्माण करून सनातनी रूढीविरूध्द समतेचे लढे दिले.

प्रकरण पाचवे 'साने गुरूजी साहित्य व स्वातंत्र्याचा लढा' यात राजकीय स्वातंत्र्य व सामाजिक स्वातंत्र्य लढ्यासाठी गुरूजीच्या साहित्याचा उल्लेख केला आहे. साने गुरूजीनी अध्यापन कार्य, समाजसेवा कार्य, भारतीय स्वातंत्र्य लढा अशा बहुविध क्षेत्रांमध्ये आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला. त्याचप्रमाणे आपल्या साहित्यातून जनजागृती करून स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेण्यास सामान्यास प्रवृत्त केले कारण गुरूजीना स्वातंत्र्य हे शेतकरी–श्रमिक सामान्यांना लाभावे ह्या अपेक्षेने लढे दिले. गुरूजीनी यासाठी कविता, कथा, कांदबरी, दैनिक पत्रके, चरित्र वाडमय, भाषणे, पत्रे इ. साहित्य निर्मिती केली.

साने गुरूजीनी काही राजकीय व सामाजिक लढे प्रत्यक्ष दिले नसले तरी ते आपल्या साहित्यातून दिलेले दिसून येताता. गुरूजीनी आपल्या साहित्यातून भारतीय व विशेषतः तरूणांना राष्ट्रीय व सामाजिक लढ्यात सहभाग घेण्यासाठी प्रेरीत केले. साने गुरूजीनी आपल्या साहित्यात राजकीय तसेच सामाजिक विषयाचे चित्रण केलेले दिसून येते. गुरूजी लेख, कथा–कांदबऱ्या,

कविता, भाषणे इ. साहित्यातून राष्ट्रीय व सामाजिक समस्या मांडून यावर उपायही सुचवितात या राष्ट्रीय व सामाजिक अन्यायाविरूध्द लढे कसे द्यावेत याचे विश्लेषण गुरूजींच्या साहित्यातून पाहायला मिळते. अशाप्रकारे साने गुरूजीनी साहित्यातून भारतीय समाजामध्ये जनजागृती निर्माण करून राष्ट्रप्रेम व राष्ट्रनिष्ठा निर्माण केले व ते राष्ट्रप्रेम पुढे देश स्वातंत्र्य व्हायला उपयोगात आले.

प्रकरण सहावे 'उपसंहार' यात शोधप्रबंधातील पाच प्रकरणांचा घोषवारा देण्यात आलेला आहे. सदर शोधप्रबंधात पाच प्रकरणात विभागलेला असून त्यामध्ये प्रास्ताविक साने गुरूजींची जडणघडण व महात्मा गांधीचा विचारांचा प्रभाव, साने गुरूजी व राजकीय स्वतंत्र लढा, साने गुरूजी व सामाजिक समतेचा लढा व साने गुरूजींचे साहीत्य व स्वतंत्र लढा अशी प्रकरणे दिलेली आहेत.

साने गुरूजींना स्वातंत्र्य हे सर्वसामान्य कष्टकरी, शेतकरी, श्रमिक यांना मिळावे असे अपेक्षित होते. जर जनकल्याण साध्य करायचे असेल तर बहुसंख्य श्रमिकानांच हाताशी घेतल्याशिवाय साध्य होणे शक्य नव्हते. हे साने गुरूजींच्या मनावर चांगलेच बिंबलेले होते. त्यामुळे म. गांधीजींच्या सत्य अहिंसा तत्वांचा साने गुरूजींनी पुढील जीवन ध्येय साधण्यासाठी केलेला दिसून येतो व यासाठी साने गुरूजींनी राजकीय स्वातंत्र्यासोबतच सामाजिक स्वातंत्र्य मिळावे. यासाठी परकीयांविरूध्द व स्वकियांविरूध्द लढे दिले. जर राजकीय स्वातंत्र्याचा उपभोग घ्यायचा असेल तर सामाजिक स्वातंत्र्य सुध्दा हवे. समाजामध्ये समता हवी यासाठी गुरूजीनी आपले आयुष्य घालविले.

उपसहांर यामध्ये पहिल्या पाच प्रकरणांचा संक्षिप्त सारांश दिलेला असून त्याविषयी चिकित्सक माहिती दिलेली आहे. साने गुरूजींना आपल्या आई वडीलांच्या शिकवणीतून व संस्कारातून सामाजिक समता व राजकीय समतेची प्रेरणा मिळाली. पुढे म. गांधीजीच्या विचारांने प्रभावित होऊन सामाजिक व राजकीय लढ्यात सहभाग घेतला. साने गुरूजींचा लढा हा केवळ परकीय सत्तेविरूध्द नव्हता तर भारतीय समाजातील भांडवलशाही व सनातनी विचारांविरूध्दही होता. हेच गुरूजींच्या लढ्याचे एकमेव वैशिष्ट्ये होते. साने गुरूजींना राजकीय स्वातंत्र्याबरोबर सामाजिक स्वातंत्र्यही अपेक्षित होते व तसा त्यांनी प्रयत्न केला. हे सर्व विचार या शोधनिबंधात सामाविष्ठ केलेले आहेत. ते भारतीय समाजाला प्रेरणादायी ठरतील.

निष्कर्ष

सदर शोधप्रबंध ज्या गृहितकांवर लिहिलेला आहे. ते गृहितके पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

त्याकाळी भारतामध्ये अज्ञान, अंधश्रध्दा व मागासलेपणा होता. भारतातील लोकसंख्येपैकी मोठा समाज हा ग्रामीण व खेडूत भागात राहत होता. तसेच प्रसार माध्यमांचा अभाव होता. या सर्वांमुळे त्यांच्यात राष्ट्रीयत्वाची भावनेचा अभाव होता. या सर्वांमुळे त्यांच्यात एकता नव्हती व अंतर्गत दुही होती. त्यामुळे स्वातंत्र्य लढ्यात शहरातून सहभाग होत होता मात्र ग्रामीण भागातील जनता लढ्यापासून वंचित होती. साने गुरूजी गावोगावी फिरून प्रचार सभा घेत व प्रभात फेऱ्या काढत त्यामुळे ग्रामीण लोकांना देशभक्तीविषयी जाणिव निर्माण झाली. साने गुरूजींच्या आपल्या गोड वाणीने, कवितेने लोकांच्यात स्फुरण येई. स्वातंत्र्य लढ्यासाठी आपल्याकडील दागदागिने, मौल्यवान वस्तू व पैसा निधी गोळा करत. त्यामुळे स्वातंत्र्य लढ्यात शहरी लोकांसोबत ग्रामीण लोक सहभाग घेतल्यामुळे लढ्याला खऱ्या अर्थाने गती मिळाली. साने गुरूजी गावोगाव जावून खांद्यावर खादीचे गड्डे घेऊन खादी प्रचार करत व सुत काढण्याचे ग्रामीण लोकांना प्रशिक्षण देत त्यामुळे ग्रामीण लोकांना स्वंरोजगार मिळाला हाती पैसा आल्या कारणे शारिरीक व मानसिक स्वास्थ लाभले. साने गुरूजी शहरी भागातील तरूणांना हाताशी धरून ग्रामीण भागात जात त्यामुळे ग्रामीण भागातील तरूणही मोठ्या प्रमाणावर स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झाला.

साने गुरूजीनी परकीय सत्तेतून देश स्वातंत्र्य करणे, समाजामध्ये समता निर्माण करून अस्पृश्यता निवारण्यासाठी लढे देणे व श्रमिकांना आपले मूलभूत हक्क मिळविण्यासाठी सारे जीवन समर्पित केले. त्याचप्रमाणे स्त्रियांच्या समस्यांवर लढे उभारले जरी नसले तरी स्त्रियांच्या जीवनातील वेदनेविषयी समाजाला जागरूक करून समाजात स्त्रियांना प्रतिष्ठा मिळवून देण्याची एक मोहिमच गुरूजीनी आपल्या साहित्यातून राबवली होती. स्त्रियांचे दुय्यमत्व आणि गुलामगिरी यांना प्रामुख्याने चालीरीती, रूढी–परंपरा जबाबदार असल्याकारणाने गुरूजींनी आपल्या साहित्यातून गोष्टीरूप प्रसंगातून या कर्मठ चालीरीतीवर टिका केली. साने गुरूजीना स्त्रियांना सुध्दा मूलभूत हक्क मिळून स्वतंत्र्यात जगता यावे हे अभिप्रेत होते व तसा त्यांनी आपल्या साहित्यातून व प्रचारातून वारंवार प्रसार केलेला दिसून येतो. साने गुरूजीनी स्त्रियांनासुध्दा

आपल्यावरील होणाऱ्या अन्यायाविरूध्द लढ्याची प्रेरणा दिली.

साने गुरूजींचा राष्ट्रीय स्वातंत्र्यविचार व सामाजिक स्वातंत्र्यविचार व त्यासाठी केलेले प्रयत्न हा भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील अत्यंत महत्वाचा आहे. कारण ते विचार हे भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा प्रचार व प्रसार करण्यासाठी अत्यंत महत्वाचे ठरलेले आहेत. साने गुरूजीचा राजकीय व सामाजिक स्वातंत्र्य लढा हा. म. गांधीच्या तत्वज्ञानावर आधारित आहे. सत्य, अहिंसा, सत्याग्रह ह्या तत्वावर गुरूजीनी भर देऊन लोकांना विशेषतः तरूण, शेतकरी, कामगारांना स्वातंत्र्य लढ्यात सहभाग होण्यास प्रवृत्त केलेले दिसून येते. म्हणून त्यांच्या कार्याचा व विचारांचा चिकित्सक अभ्यास करण्यासाठी उपलब्ध साधनांचा अधिका–अधिक वापर करून सखोल अभ्यास करण्याचा हा प्रयत्न आहे.

साने गुरूजीचा लढा हा केवळ परकीय सत्तेविरूध्द नव्हता तर भारतीय समाजातील भांडवलशाही व सनातनी विचारांविरूध्दही होतो. भारतीय समाजातील अस्पृश्यता नष्ट होऊन दलित वर्गालाही आपले मूलभूत हक्क मिळून समतेचा हक्क मिळावा. यासाठी गुरूजीनी महाराष्ट्रभर समाज प्रबोधन केले. आज उद्या ब्रिटिश सत्ता संपुष्टात येईल, व देशाला स्वातंत्र्य मिळेल. मात्र देशातील बहुजन समाजाला आपल्या हक्कापासून वंचित ठेवून त्यांचे स्वातंत्र्य जोपर्यंत मिळत नाहीत तोपर्यत खऱ्या अर्थाने देश स्वातंत्र्य होत नाही. असा कळकळीचा व पोटतिडकेचा संदेश गुरूजी आपल्या भाषणातून देत. त्यामुळे भारतीय समाजात प्रबोधन होऊन गुरूजींच्या सामाजिक चळवळीला पाठींबा मिळाला व यातूनच समाजातील दलित वर्गाला आपल्या मूलभूत हक्काची जाणीव त्यांच्यात झाली व सनातनी रूढीविरूध्द लढण्याची क्षमता निर्माण झाली.

साने गुरूजींना आपल्या आई – वडीलांच्या शिकवणीतून, संस्कारातून सामाजिक समतेचे लढे व राष्ट्रीय स्वतंत्र्याचे लढे याची प्रेरणा मिळाली, पुढे म. गांधीजींच्या विचारांतून व साहित्य वाचनातून सामाजिक समतेचे लढे व राष्ट्रीय स्वातंत्र्याचे लढे एकाचवेळी लढ्याची प्रेरणा मिळाली. त्यामुळे म. गांधीनी चालवलेल्या लढ्याकडे साने गुरूजी स्वतंत्र्य व समतेसाठीचा संघर्ष म्हणून पाहू लागले.

साने गुरूजीनी म. गांधीजीचे तत्वज्ञान अंगीकारले होते म्हणून गुरूजींचे लढे हे सत्य,

अहिंसा, सत्याग्रह, उपोषण याच तत्यावर आधारलेले आहेत. म. गांधीना गुरूजी आपला राजकीय व सामाजिक गुरू मानत. साने गुरूजीनी आपल्या 'पत्री' कविता संग्रहातील 'खरे सनातनी' या कवितेतून म. गांधी हे आपले प्रेरणा च आदर्श आहेत याचे वर्णन केलेले आहे. त्याचप्रमाणे सत्याग्रही काव्यखंडात साने गुरूजीची म. गांधीविषयी श्रध्दा दिसून येते. या काव्यात गांधीच्या शांती व अहिंसा या तत्वाविषयी गुरूजींना आदर दिसून येतो.

साने गुरूजी म. गांधीना आपला आदर्श मानत गुरूजींना म. गांधीप्रमाणे भारतीय आत्म्याची एकरूपता अनुभवण्याची व विविधतेत एकता पाहण्याची तळमळ होती व याच तळमळीतून गुरूजीनी आंतरभारतीचे स्वप्न पाहिले. अशाप्रकारे साने गुरूजीच्या आचारातून, कार्यातून व साहित्यातून म. गांधीजींच्या विचाराचा प्रभाव दिसून येतो.

साने गुरूजींच्या राजकीय विचारांचे केंद्र सर्वसामान्य श्रमिक माणूस होता साने गुरूजींना श्रमिकांचे स्वराज्य अपेक्षित होते यासाठी गुरूजीनी खेडोपाडी प्रचार करून व श्रमिकांना लढ्यात सामावून घेतला. अशाप्रकारे गुरूजींच्या भाषणांनी प्रभावित होऊन कष्टकरी वर्ग स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झाला शेतकरी व कामगारांना प्रतिष्ठेने जगता येईल अशी व्यवस्था करणे गुरुजींचे ध्येय होते. त्यासाठी गुरूजी काँग्रेसमध्ये राहूनही काँग्रेसविरूध्द बोलायला घाबरले नाहीत. स्वकीयांशी केलेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी गुरूजींनी स्वकीयांवर टिका केली.

साने गुरूजीचा लढा हा केवळ परकीय सत्तेविरूध्द नव्हता तर भारतीय समाजातील भांडवलशाही व सनातनी विचारांविरूध्दही होतो. भारतीय समाजातील अस्पृश्यता नष्ट होऊन दलित वर्गालाही आपले मूलभूत हक्क मिळून समतेचा हक्क मिळावा. यासाठी गुरूजीनी महाराष्ट्रभर समाज प्रबोधन केले. आज उद्या ब्रिटिश सत्ता संपुष्टात येईल, व देशाला स्वातंत्र्य मिळेल. मात्र देशातील बहुजन समाजाला आपल्या हक्कापासून वंचित ठेवून त्यांचे स्वातंत्र्य जोपर्यंत मिळत नाहीत तोपर्यत खऱ्या अर्थाने देश स्वातंत्र्य होत नाही. असा कळकळीचा व पोटतिडकेचा संदेश गुरूजी आपल्या भाषणातून देत. त्यामुळे भारतीय समाजात प्रबोधन होऊन गुरूजींच्या सामाजिक चळवळीला पाठींबा मिळाला व यातूनच समाजातील दलित वर्गाला आपल्या मूलभूत हक्काची जाणीव त्यांच्यात झाली व सनातनी रूढीविरूध्द लढण्याची क्षमता निर्माण झाली.

साने गुरूजींचे राष्ट्रप्रेम त्यांच्या साहित्यातून दिसून येते. गुरूजी गावोगावी जाऊन सभा घेत प्रचारसभा व प्रभात फेऱ्या काढत त्यामुळे ग्रामीण तरूणांमध्ये नवचैतन्य देशप्रेम वाढीस लागले व त्यामुळे मोठ्या प्रमाणात युवक वर्ग स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होऊ लागला. पुढे राष्ट्रसेवा दलामार्फत प्रसार होऊ लागला. गुरूजींनी लेखन, कविता, मासिके इ. माध्यमातून तरूणांमध्ये राष्ट्रप्रेम जागृत ठेवून स्वातंत्र्य लढ्यात सहभाग होण्यास प्रवृत्त केले. गुरूजींना जीवनात झालेला विरोध, टिका, शिक्षा, उपहास, तुरूंगवास, आर्थिक चलचल अशा अनेक गोष्टींचा सामना करीत असताना गुरूजीनी आपली सुधारणावादी भूमिका आणि त्यासाठीची धडपड सोडली नाही.

साने गुरूजीचे कार्यक्षेत्र हे खानदेश जरी मानले तरी त्यांच्या कार्याचा व साहित्यांचा संपूर्ण देशभर प्रभाव दिसून येतो. साने गुरूजींच्या राजकीय स्वातंत्र्य, सामाजिक स्वातंत्र्य व व्यक्ती स्वातंत्र्य विचार यासाठी केलेले सत्याग्रह, उपोषणे, भाषणे, सभा, परकियांवर व स्वकियांवर केलेले परखड लिखाण इत्यादी कार्याचे बहुविध पैलू आहेत.

साने गुरूजींच्या कथा, कांदबऱ्या, कविता, भाषणे इ. साहित्यातून समाजप्रबोधनाचे कार्य झालेले दिसून येते. साने गुरूजींनी आपल्या साहित्यातून समाजातील श्रमिक वर्ग, शेतकरी वर्ग, स्त्रिया, अस्पृश्य समाज, इ. वर्गांना आपल्या मूलभूत हक्काची जाणिव करून दिली. व त्यांना आपल्यावरील होणाऱ्या अन्यायाविरूध्द लढण्याची प्रेरणा दिली. साक्षरतेच्या कथा, भारतीय संस्कृती, मंदिर प्रवेशाची भाषणे व इतर, भारतीय नारी क्रांतीच्या मार्गावर, पत्री, (कविता संग्रह) या साहित्यातून साने गुरूजींनी भारतीय समाजामध्ये शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक समता व मुलभूत हक्कांची जाणीव करून दिली व तसे समाजाला अन्यायाविरूध्द लढण्यास प्रवृत्त केले.

देशातील अन्याय, गुलामगिरी संपवायची असेल तर परकीयांशी लढा द्यावा लागेल, शेतकरी, कामगारांवरील अन्याय दु:ख संपवायची असेल तर भांडवलशाही सावकाराविरूध्द लढा द्यावा लागेल व समाजातील विषमता संपवून क्षमता प्रस्थापित करण्यासाठी सनातन विचारांशी लढा द्यावा लागेल हे गुरूजींना म. गांधीजीच्या विचारातूनच उमगले. त्यासाठी गुरूजीनी सभा, भाषणे, उपोषणे, धरणे, संप, सत्याग्रह व आंदोलने मार्फत देशातील जनतेला अन्यायाविरूध्द लढ्यास प्रवृत्त केले व सामाजिक समतेसाठी, अस्पृश्यता निवारण्यासाठी जनमत तयार करून समतेचे लढे दिले.

साने गुरूजीनी इ.स. १९३० ते १९३६ या काळात सविनय कायदेभंग चळवळीत सहभाग वैयक्तिक सत्याग्रह चळवळीत सहभाग घेऊन इंग्रजांविरूध्द लढे दिले. इ.स. १९३७ ते १९३९ या काळात गुरूजींचा शेतकऱ्यांसाठी लढे, परिषद, गिरणी कामगारांचे प्रश्न, संप, मोर्चे, फैजपूर काँग्रेस अधिवेशनात महत्वाचा सहभाग घेतला. पुढे इ.स. १९४२ च्या ऑगस्ट क्रांती लढ्यात गुरूजीनी भूमिगत कार्य केले. सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी इ.स. १९४७ मध्ये प्राणांतिक उपोषण करून पंढरपूर मंदिर अस्पृश्यांना खुले करून दिले.

अशाप्रकारे सदर शोधप्रबंध दिलेल्या गृहितकांच्या आधारे उपलब्ध प्राथमिक व दुय्यम साधने वापरून शोधप्रबंध पूर्ण केला. तसेच त्या सोबत मान्यवरांच्या मुलाखती, संदर्भ साहित्य, वर्तमान पत्रे, संबंधित स्थळांना प्रत्यक्ष भेटी देऊन जास्तीत जास्त गृहितके स्पष्ट केली आहेत.

* * * *

संदर्भ सूची

प्राथमिक साधने :–

(अ) अप्रकाशित साधने

१. साने गुरूजी यांचा पत्रव्यवहार

२. साने गुरूजी यांचे हस्तलिखित

३. धुळे कारागृह अहवाल

४. पंढरपूर चळवळीतील पत्र व्यवहार

(ब) प्रकाशित साधने

१. साने गुरूजी, कला म्हणजे काय, साधना प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती २००९

२. साने गुरूजी, क्रांतीचा मार्गावर व इतर लेख, वरदा प्रकाशन, पुणे , पहिली आवृत्ती जाने. २०११.

३. साने गुरूजी, संपूर्ण साने गुरूजी, खंड अकरा क्रांती, वरदा प्रकाशन, पुणे, आवृत्ती जाने २०११.

४. साने गुरूजी, धडपडणारी मुले, रिया पब्लिकेशन, प्रथमावृत्ती २०११.

५. साने गुरूजी, संपूर्ण साने गुरूजी खंड २४, गोष्टीरूप गांधीजी आणि बापूजींच्या गोष्टी, वरदा प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती जाने २०११.

६. साने गुरूजी, संपूर्ण साने गुरूजी, खंड तेवीस, त्रिवेणी आणि इतर कथा, वरदा प्रकाशन पुणे, आवृत्ती जाने. २०११.

७. साने गुरूजी, देवाघरच्या फुलांनो! , राही प्रकाशन, मुक्ताई, अमळनेर, प्रथमावृत्ती जून १९९४.

८. साने गुरूजी, दिल्ली डायरी, रिया पब्लिकेशन, कोल्हापूर, आवृत्ती १५ ऑगस्ट २०११.

९. साने गुरूजी, संपूर्ण साने गुरूजी, खंड १४, नवा प्रयोग, वरदा प्रकाशन, पुणे आवृत्ती २०११.

१०. साने गुरूजी, भारतीय नारी, रिया पब्लिकेशन प्रथमावृत्ती २०११.

११. साने गुरूजी, भारतीय संस्कृती, रिया पब्लिकेशन प्रथमावृत्ती २०११.

१२. साने गुरूजी, पत्री, मंजुल प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे, आवृत्ती १ मार्च २००६.

१३. साने गुरूजी, मंदिर प्रवेशाची भाषणे व इतर, रिया पब्लिकेशन, कोल्हापूर, आवृत्ती १५ ऑगस्ट २०११.

१४. साने गुरूजी, यज्ञ, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे, प्रकाशन दि. २६ जाने. २०१४.

१५. साने गुरूजी, श्यामची आई, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन पुणे, चौथी आवृत्ती २२ मे २००८.

१६. साने गुरूजी, श्यामचा जीवन विकास, संपूर्ण साने गुरूजी खंड दोन, वरदा प्रकाशन प्रा.लि. सेनापती बापट मार्ग पुणे, , पहिली आवृत्ती जाने. २०११.

१७. साने गुरूजी, संपूर्ण साने गुरूजी, खंड ३ श्यामचा जीवन विकास, वरदा प्रकाशन,पुणे, पहिली आवृत्ती जाने २०११०

१८. साने गुरूजी, श्यामची पत्रे रिया पब्लिकेशन, पुणे, आवृत्ती १९९८.

१९. साने गुरूजी, साने गुरूजी खंड ४५, साने गुरूजीचे अप्रकाशित साहित्य, वरदा प्रकाशन पुणे, पहिली आवृत्ती २०११.

२०. साने गुरूजी, साक्षरतेच्या कथा, साधना प्रकाशन, आठवी आवृत्ती १९९८.

२१. साने गुरूजी, सुंदरपत्रे, साधना प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे , बारावी आवृत्ती, २४ डिसेंबर २०००.

२२. साने गुरूजी, स्वप्न आणि सत्य, रिया पब्लिकेशन प्रथमावृत्ती २०११ वृत्तपत्रे (साने गुरूजी)

शासकीय गॅझेट (कागदपत्रे)

१. चौधरी डॉ. के.के. , जळगांव जिल्हा, कार्यकारी संपादक व सचिव महाराष्ट्र शासन, मुंबई, महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, १९६०.

२. महाराष्ट्र शासन, गॅझेटिअर ऑफ द बॉम्बे प्रेसिडन्सी – कुलाबा डिस्ट्रिक्ट, मुंबई, १८८३.

३. महाराष्ट्र सरकारच्या प्रसिध्दी खात्याचे प्रकाशन, महाराष्ट्र जिल्हे, जळगाव, प्रसिध्दी विभाग, महाराष्ट्र सरकार मुंबई १९६१.

४. म. गांधी, हरिजन २८.०१.३९ vol– ७४.

पत्रिका/मासिके/अंक

१. अत्रे. प्र.के, नवयुग मंदिर प्रवेश विशेषांक, पुणे, ४ मे १९४७.

२. नवयुग, मंदिर प्रवेश विशेषांक ४ मे १९४७.

३. बोडा सुधा (संकलन), प्यारेलाल पेपर्स, साने गुरूजींचा पंढरपूर मंदिर प्रवेश लढा, मुंबई.

४. रा.जि. शाळा पालगड,ता. दापोली, जि. रत्नागिरी प्राथमिक शाळेतील नोंद.

५. वाघ विनोद (संपा), राष्ट्रसेवादल पत्रिका, पुणे, ऑगस्ट २०१७.

६. साधना कार्यालयातील कागदपत्रे, पुणे.

७. साने गुरूजी,(संपा), काँग्रेस, अमळनेर २०.०३.१९३८.

८. साने गुरूजी, (संपा), काँग्रेस, अमळनेर २३.५.१९३८.

९. साने गुरूजी,(संपा), काँग्रेस, अमळनेर ३०.५.१९३८.

१०. साने गुरूजी, (संपा), काँग्रेस, अमळनेर ०३.०६.१९३८.

११. साने गुरूजी, (संपा),काँग्रेस, अमळनेर ३०.०१.१९३९.

वर्तमानपत्रे

१. केतकर गजानन विश्वनाथ, (संपा), केसरी, पुणे, ७ मे १९३०.

२. केळकर नरसिंह चिंतामण, केसरी, पुणे, ६ जून इ.स १९११ .

३. खांडीलकर निळकंठ , (संपा), नवाकाळ ३.४.३८.

४. गाडगीळ (संपा), लोकमान्य, पुणे ७ मे १९४७.

५. गाडगीळ (संपा), लोकमान्य पुणे, २२ मे १९४७.

६. गोखले दामोदर विश्वनाथ (संपा), केसरी, पुणे २ मे १९४७.

७. गोखले दामोदर विश्वनाथ (संपा), केसरी, पुणे, ६ मे १९४७.

८. गोखले दामोदर विश्वनाथ (संपा), केसरी, पुणे १३ मे १९४७.

९. बेहरे पी. आर (संपा), नवशक्ती, मुंबई, ०५/११/१९३९.

१०. बेहरे पी.आर. (संपा), नवशक्ती, मुंबई, ०७/०५/१९४६.

११. बेहरे पी.आर. (संपा), नवशक्ती, मुंबई, १५/०५/१९४६.

१२. बेहरे पी.आर. (संपा), नवशक्ती, मुंबई, १७/०५/१९४६.

१३. साने गुरूजी (संपा), प्रदीप, मुंबई.

१४. साने गुरूजी (संपा), छात्रालय दैनिक, अमळनेर, दि. ऑगस्ट १९२७.

१५. साने गुरूजी (संपा), विद्यार्थी मासिक, अमळनेर, डिसेंबर १९३१.

१६. साने गुरूजी (संपा), साधना, पुणे, १७ जून १९५०.

१७. साने गुरूजी (संपा), साधना, पुणे, १५ ऑगस्ट १९५०.

****

दुय्यम साधने :–

१. आचार्य अत्रे, मृत्यूचे चुंबन घेणारा महाकवी साने गुरूजी, साधना प्रकाशन.

२. आचार्य भागवत (संक) वांडःमय खंड २ रा अच्युत्य केशव भागवत, महाराष्ट्र राज्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई १९८७ चा ग्रंथातील साने गुरूजींची पत्री हा लेख.

३. आपटे गुरूजी, साने गुरूजी (एक ओझरते दर्शन), सुयोग प्रकाशन, पुणे, आवृत्ती १९९२.

४. अंबिके डॉ. र.नी. राष्ट्रसेवादल इतिहास, मुद्रक ह.म. गद्रे पुणे, २८ ऑक्टोबर १९६५.

५. गोडबोले डॉ. अनिल , साने गुरूजी–जीवन साहित्य आणि विचार, उन्मेष प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती २३ जून २००९.

६. गांधी मोहनदास करमचंद , मेरे सपनो का भारत, प्रकाशक – लक्ष्य पब्लिकेशन , लक्ष्मीनगर , दिल्ली, प्रथम संस्करण २०१३.

७. चौधरी डॉ. के.के. , क्रांतीपर्व महाराष्ट्राचे योगदान, प्रकाशक अरविंद रघुनाथ तेंडूलकर, वसंत बुक स्टॉल, दादर मुंबई, प्रथमावृत्ती १ जून २०१३.

८. जोशी डॉ.ग.ना., अमृताहुनी गोड, चेतश्री प्रकाशन, अमळनेर, आवृत्ती ११ जून १९९८.

९. थत्ते यदुनाथ, साने गुरूजी जीवन परिचय, प्रकाशक सुशिल धसकटे, हर्मिस प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती २६ जाने. २०१२.

१०. नेमाडे भालचंद्र (संपा), साने गुरूजी पूर्नमुल्यांकन, (जनशताब्दी चर्चा सभातील निबंध),

साहित्य अकादमी, नवी दिल्ली, पुर्नमुद्रण २००६–२०१४.

११. नेमाडे भालचंद्र (संपा), नागनाथ कोत्तापल्ले यांची साहित्य समिक्षेची समिक्षा साने गुरूजी पुर्नमुल्यांकन साहित्य अकादमी, नवी दिल्ली, २०१४.

१२. पाटील डॉ. भिमराव नारायण , खानदेशातील प्रबोधनाची चळवळ (१९०० – १९५०), मिलिंद ऑफसेट, जळगाव, प्रथमावृत्ती ११ जून २००५ पु. साने गुरूजी स्मृतीदिन.

१३. फडके य.दी. , विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड १, सागर पब्लिकेशन, द्वितीयावृत्ती, १९०१ – १९१४,

१४. मंगळवेढेकर राजा , कोकणचे गांधी, साधना प्रकाशन पुणे, पहिली आवृत्ती ५ मे १९७३.

१५. मंगळवेढेकर राजा,पंढरीस वाजे घंटा, साधना प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९२.

१६. मंगळवेढेकर राजा, साने गुरूजींची जीवनगाथा, साधना प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती ११ जून १९९२.

१७. शहा डॉ. मु.ब. राष्ट्रसेवादल इतिहास और कार्य, राष्ट्रसेवादल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १२ नंवबर २००२.

१८. शिरसाट विनोद (संपा), साधना साप्ताहिक प्रकाशन, हेमंत नाईक नवरे, पुणे अंक ऑक्टो. २०१४.

१९. शिरसाट विनोद (संपा), साधना साप्ताहिक प्रकाशन, हेमंत नाईक नवरे, पुणे अंक ऑक्टो. २०१५.

२०. लिमये मधु , आत्मकथा, अक्षर प्रकाशन, आवृत्ती १९९५.

२१. वाळींजकर आत्माराम, साने गुरूजी आणि पंढरपूर मंदिर प्रवेश चळवळीचे अध्यात्म, डिंपल

पब्लिकेशन कोल्हापूर, प्रथमावृत्ती २००९.

२२. शिखरे दा.न साने गुरूजींची जीवनधारा पुणे, विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती ९ नोव्हेंबर १९८२.

पत्रिका/मासिके/अंक

१. कार्यकारी संपादक, विनोद वाघ, राष्ट्रसेवा दल पत्रिका, ऑगस्ट २०१७, स्वातंत्र्य लढ्यातील खानदेश मोलाचा वाटा.

२. नारकर वैद्य , ज्योती लिमये (संपा), साने गुरूजी अप्रकाशित पत्रे, सदाशिवराव बागाईतदार स्मृतीमाला पुणे १९९५.

३. ब्रम्हे केदार मोरेश्वर (संपा), स्मरणिका, खा.शि. मंडळाचे प्रताप हायस्कुल, अमळनेर, जि. जळगांव, जनशताब्दी महोत्सव, १९०८–२००८.

४. भाई वैद्य, जेष्ठ समाजवादी विचारवंत, राष्ट्रसेवा दल पत्रिका, ऑगस्ट २०१७.

५. भाई वैद्य, राष्ट्रसेवादल विचारधारा व वाटचाल, मुद्रक प्रकाशक महामंत्री राष्ट्रसेवादल, साने गुरूजी स्मारक, पुणे राष्ट्रसेवादल अमृत महोत्सवी वर्ष ४/६/१९४१ – ४/६/२०१६.

६. वाघ विनोद (संपा), राष्ट्रसेवादल पत्रिका, पुणे, ऑगस्ट २०१७.

****

परिशिष्टे


परिशिष्ट क्रमांक	परिशिष्टांचे शीर्षक	संदर्भ	शोधप्रबंध संदर्भ प्रकरण क्रमांक
१	साने गुरूजींनी राष्ट्रसेवादलास पाठविलेले पत्रक	साधना कार्यालय, पुणे	प्रकरण चौथे
२	पूना युथ बुलेटिन दि. २.१०.१९३०	सुधाताई बोडा (संकलन), मुंबई	प्रकरण चौथे
३	साने गुरूजींचा सत्कार निधी पत्र साने गुरूजी सत्कार निधी (सत्कार समारंभ २४ डिसेंबर १९४५)	साने गुरूजी र ाष्ट्रीय स्मारक, वडघर ,ता. माणगांव, जि. रायगड	प्रकरण तिसरे
४	शिरोडा सत्याग्रह	साधना कार्यालय, पुणे	प्रकरण तिसरे
५	अप्पा पटवर्धनानी साने गुरूजींना रत्नागिरी येथे भरलेल्या काँग्रेस कार्यकर्ता शिबिराचे निमंत्रण पत्र	राष्ट्रसेवादल कार्यालय, पुणे	प्रकरण तिसरे
६	श्री. अप्पा पटवर्धनाने साने गुरूजींना पंढरपूर मंदिर प्रवेश लढ्यासाठी पाठविलेले समर्थन पत्र	सुधाताई बोडा (संकलित) कागदपत्रे मुंबई	प्रकरण चौथे
७	श्री. अप्पा पटवर्धनानी साने गुरूजींना कणकवली येथील हरिजन मुलींच्या छात्रालयाचे उद्घाटनाचे निमंत्रण पत्र	साने गुरूजी राष्ट्रीय स्मारक	प्रकरण तिसरे
८	साने गुरूजींच्या पंढरपूर मंदिर प्रवेश उपवास काळातील (हरिजन सेवा संघ, धुळे) यांचा इतिवृत्त	प्रताप हायस्कूल, अमळनेर जि. जळगाव	प्रकरण चौथे

परिशिष्ट क्रमांक	परिशिष्टांचे शीर्षक	संदर्भ	शोधप्रबंध संदर्भ प्रकरण क्रमांक
९	समता साप्ताहिक वृत्तांत	साने गुरूजी राष्ट्रीय स्मारक,वडघर , ता. माणगांव, जि. रायगड	प्रकरण चौथे
१०	समता साप्ताहिक वृत्तांत	साने गुरूजी राष्ट्रीय स्मारक,वडघर , ता. माणगांव, जि. रायगड	प्रकरण चौथे
११	समता साप्ताहिकातील वृत्त	सुधाताई बोडा (संकलित) कागदपत्रे मुंबई	प्रकरण चौथे
१२	साने गुरूजी (संपा), प्रदिप मासिकाचे मुखपत्र	साने गुरूजी राष्ट्रीय स्मारक,वडघर , ता. माणगांव, जि. रायगड	प्रकरण पाचवे
१३	छात्रालय दैनिकातील साने गुरूजींची कविता	साने गुरूजी राष्ट्रीय स्मारक,वडघर , ता. माणगांव, जि. रायगड	प्रकरण पाचवे
१४	अमळनेरच्या प्रताप हायस्कुलचे विद्यार्थी त्यांनी सांगितलेल्या साने गुरूजींविषयी आठवणी	प्रताप हायस्कूल अमळनेर, जि. जळगाव	प्रकरण तिसरे
१५	राष्ट्र सेवा दल पत्रिका ऑगस्ट २०१७	राष्ट्रसेवादल कार्यालय, पुणे	प्रकरण तिसरे
१६	नकाशा	–	प्रकरण चौथे
१७	साने गुरूजींचे साहित्य	–	प्रकरण पाचवे
१८	मुलाखतीचा नमुना	–	

परिशिष्टे

१

साने गुरूजींनी राष्ट्रसेवादलाला पाठविलेले पत्रक




सदर परिशिष्ठातून साने गुरूजीनी लो. टिळकाच्या कार्याविषयी प्रेरक माहिती सेवादल तरूणांना दिली.
साने गुरूजींचे लो. टिळकांविषयीचे हस्तलिखित विचार सुधाताई बोडा यांनी संकलित केलेले कागदपत्र दि.०४/०७/१९४१

परिशिष्टे

२

पूना युथ बुलेटिन दि. २.१०.१९३०



साने गुरूजी हस्तलिखित पुना युथ लीग बुलेटिन, दि. ०२/१०/१९३०

परिशिष्ठे

३

साने गुरूजींचा सत्कार निधी पत्र

साने गुरूजी सत्कार निधी

(सत्कार समारंभ २४ डिसेंबर १९४५)

कार्यवाह/ **खजिनदार**

१. रामभाऊ भोगे १. शंकर सिताराम शेट

२. सुभानराव पाटील

३. मधु लिमये

पूज्य विनोबाजी, गुरूजी व गुरूजी प्रेमी बंधू भगिनीनो, आजच्या या अभूतपूर्व सोहळ्याची जबाबदारी ज्या समितीनी आपल्या खांद्यावर घेऊन यथाशक्ती पार पाडली त्या साने गुरूजी सत्कार समितीचा एक कार्यवाह या नात्याने समितीच्या कार्याचा अहवाल आपणापुढे सादर करण्याची कामगिरी माझ्याकडे आली आहे.

महाराष्ट्रातील व खानदेशातील तरूणांचे आवडते पुढारी साने गुरूजी यांची तुरूंगातून मुक्तता झाल्यानंतर त्यांचा योग्य सत्कार कसा करावा असा विचार बरेच दिवसापासून खानदेशातील बऱ्याच कार्यकर्त्यांच्या मनात घोळत होता. अशाच काही कार्यकर्त्यांच्या प्रेरणेने गेल्या ऑक्टोबरच्या ३० तारखेस जळगाव येथे ६०–७५ कार्यकर्त्यांची एक सभा भरून गुरूजींचा ४६ वा वाढदिवशी गुरूजींवरील आपल्या निष्ठेचे प्रतिक म्हणून फुल फुलाची पाकळी या न्यायाने पूर्व खानदेशतर्फे गुरूजींना १०००० रू. ची थैली अर्पण करण्यात यावी. असा निर्णय एक मताने घेण्यात आला. देशसेवेचे व वैयक्तिक विकासाचे सर्वश्रेष्ठ क्षेत्र या नात्याने गुरूजींनी आजन्म काँग्रेसचेच कार्य केले असले तरी गुरूजींच्या विशाल जीवनाचे काँग्रेस बाहेरील जगातही सेवेचे व स्फूर्तीचे अनेक निर्झर निर्माण केले आहेत. व गुरूजींच्या चाहत्याचं काँग्रेस प्रमाणे इतरही असंख्य लोकांचा समावेश होता. म्हणून या सतकाराचे कार्य काँग्रेस किंवा तत्सम इतर कोणत्याही संस्थपुरते मर्यादित नाही.

परिशिष्ट
४

शिरोडा सत्याग्रह

१२ मार्च १९३० ला. म. गांधीनी मिठाचा अभिनव सत्याग्रह करण्याचा निश्चय केला. त्यांनी देशाला हाक मारली. या कायदेभंग चळवळी भारतभर उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

महाराष्ट्रातील रत्नागिरी हा सागर सान्निध्य असलेला, मीठ उत्पादन करणारा जिल्हा. कोकणातील अप्पा पटर्वधनानी (सीताराम पुरूषोत्तम पटवर्धन, कोकणचे गांधी) या सत्याग्रह संग्रमात उडी घेतली. ६/७ एप्रिल १९३० रत्नागिरीमधील शिरोड्याच्या मिठागर लुठण्याचा बेत पक्का झाला. सत्याग्रह छावण्या उघडण्यात आल्या. रत्नागिरी ते शिरोडा अशी अप्पांनी व त्यांच्या सहकार्यांनी पदयात्रा काढली. ७ एप्रिल रोजी पंधरा सत्याग्रहींची तुकडी निघाली. वाटेतले मुक्काम, तिथली व्यवस्था, प्रचारसभा इ. अनेक कामांत अप्पा गुंतुन गेले. व सत्याग्रह यशस्वी केला. कोकणातील शिरोडा सत्याग्रह खूप गाजला कारण त्यात कोकणसह महाराष्ट्रातील वेगवेगळ्या प्रातांतून सत्याग्रही सहभागी झाले होते. खानदेशातून ५४ पथके खेडा किनाऱ्यावर जमा झाली होती.


या सत्याग्रहात साने गुरूजी सहभागी झाले. मात्र त्यांना त्यांत खानदेशकडील एक सत्याग्रहाची तुकडी मिळाली. ना.म. गोखले त्यांनी सांगितले गुरूजी येथे थांबू नका तुम्ही खानदेशात जा, प्रचार करा आणि सभा व सत्याग्रहींना मदतनिधी गोळा करून पाठवा ही जबाबदारी गुरूर्जीनी यशस्वीरीत्या पार केली.


****

परिशिष्ट

५

आप्पा पटवर्धनानी साने गुरूजींना रत्नागिरी येथे भरलेल्या काँग्रेस कार्यकर्ता शिबिराचे निमंत्रण पत्र







श्री. अप्पा पटवर्धनानी साने गुरूजींना ३०/०४/१९४६ रोजी भरणाऱ्या रत्नागिरी येथील काँग्रेस कार्यकर्ता शिबिराचे निमंत्रण पत्र

परिशिष्ट

६

श्री. अप्पा पटवर्धनाने साने गुरूजींना पंढरपूर मंदिर प्रवेश लढ्यासाठी पाठविलेले समर्थन पत्र







श्री. अप्पा पटवर्धनाने साने गुरूजींना पाठविले पत्र(पंढरपूर मंदिर प्रवेश – अस्पृश्यता निवारण बाबत गुरूजींच्या भुमिकेला समर्थन) दि. ३०.११.१९४६

परिशिष्ट

७

श्री. अप्पा पटवर्धनानी साने गुरूजींना कणकवली येथील हरिजन मुलींच्या छात्रालयाचे उद्‌घाटनाचे निमंत्रण पत्र





श्री. अप्पा पटवर्धनानी साने गुरूजींना पाठविलेले पत्र


(अस्पृश्यता निवारण पंढरपूर मंदिर प्रवेश लढा यशस्वी झाल्याबद्‌दल आभार व कणकवळीत हरिजन मुलींसाठी छात्रालयाचे उद्‌घाटनाला आमंत्रण)

दि. १४.०६.१९४७

परिशिष्ट

८

साने गुरूजींच्या पंढरपूर मंदिर प्रवेश उपवास काळातील (हरिजन सेवा संघ, धुळे) यांचा इतिवृत्त



विनायक नरहर वर्वे
अध्यक्ष म.प्रा.ह.से.संघ
धुळे प. खानदेश

जा. नं. १०१३


धुळे ता. ४/९/३३

प. साने गुरुजी यांसी –


सप्रेम नमस्कार वि. वे.


आपले ता. २५/८/३३ चे पत्र पोंचले. ता. ५ ला पासून ता. २३ अखेर मी नंदनवासांत होतो. त्यामुळे पत्र लिहून काल्चे ते पोस्टांत घालावयास वेळ झाला. त्यावरून आपले पत्र पडेल असे. ता. २३ चे पत्रांत काही गोष्टींचा खुलासा मी केलाच आहे.


निरनिराळ्या ठिकाणी स्वयंसेवक पाठविण्या बद्दल तुमचे पत्र काही मी जबाबदारी नाही. ही वृत्ती कार्यात बुचाडी करणारी. प्रवृत्ती फार वाढली आहे. खुलाशाचा जो तेरीज निरनिराळ्या ठिकाणी मी पाठविली त्याबद्दलचे डी. आर. डे. तहसिल यांचे पत्र मागे पडल्याने ते येथे आले होते. त्यांची नक्कल आपले माहितीसाठी यासोबत पाठविली आहे. तसेच पत्रांत लिहिल्या प्रमाणे ता. १६-८-३३ चे आंकडे मागे खुलाशाबद्दल पाठविले आहे व आपल्या आंकडेवारीसंबंधी खुलासा प्रसिद्ध होईल असे मला वाटते. आपला खुलासा वेळेअभावी प्रसिद्ध झालेच आहे. खुलाशाला लेखी आधार असल्यामुळे हे पत्र पुढे चालू



3







श्री. विनायक नरहर बर्वे (अध्यक्ष म. प्रा. ह.से. संघ धुळे व खानदेश) हे साने गुरूजींच्या पंढरपूर उपवासा काळात सोबत होते. त्याविषयीचा वृत्तांत या पत्रात दिलेला आहे. दि. २६.०६.१९४७

परिशिष्ट

९

समता साप्ताहिक वृत्तांत



ता. १६ डिसेंबर १९४९ समता साप्ताहिक ३

पूज्य साने गुरुजींचा उपवास व राष्ट्रसेवा-दलाचें कर्तव्य

[ता. ४-१२-४९ रोजी कांदिवली येथे जमलेल्या मुंबईतील सर्व शाखेच्या १००० सैनिकांच्या मेळाव्यासमोर सैनिकांना उद्देशून "पू. साने गुरुजींचे उपोषण व राष्ट्र-सेवादलाचे कर्तव्य" या विषयावर सुमारे २ तास साथी एस. एम. जोशी यांनी जे बौद्धिक दिले त्याचा थोडक्यांत सारांश पांडुरंग नानाजी ढाकणकर या दलसैनिकाने सुदाम 'समते'साठी पाठविला आहे. तो याचकांसाठी खाली देत आहोत.]

—संपादक

दल सैनिक बंधुभगिनींनो—

ध्यापरिस्थितीत गुरुजींच्या उपोषणात राष्ट्र-सेवादलाने काय करावे! या मुख्यतेचे उद्दामपणे. तत्पूर्वी गुरुजी सेवादलाबद्दल जे लिहिले ते सर्व खरे काय ! सेवादलासाठी त्यांनी त्या प्राण पणास लावावा सेवादलाजवळ काही आहे आकरिता सरकारचा निषेध करणे कर्तव्य आहे का! तसेच गुरुजींनी पण करणे योग्य आहे कार्य साचा र करणे बरूर आहे.

सेवादलाचे वैशिष्ट्य सेवादलच्या यांवर अवलंबून आहे. सरकारने घातक इच्छा केला आहे असला तरी रिता गुरुजींनी प्राण देऊ नये असे नींना सांगणे आपणास भाग पडेल. रच्या या हुकूमाने आम्ही निर्बल ार नाही म्हणून आपणांस त्यांना त्याचे या खुलक कारणासाठी सत्ती घाव्ह असे सांगावे लागेल. यावाबतीत पती बापट्यांच्या कल्पना सेवादलाकडून होतील अशी मला काही आशा त नाही. आकरिता जेथे निर्जीव ण दिले जाते, त्याशाळा, ती कॉलेजे, ड पाडली पाहिजेत. सरकारच्या निर्बंधूनहि आपण कार्य करून दाखविले हिजे. इतकी ताकद आपल्या जनत है का ! कॉन्ग्रेससरकारला सरळ ल्यावर आणण्याकरिती गुरुजींचे पण हा मार्ग काही ठीक नाही. जींनी प्राण दिले तर आम्हीही आयुतील १ वर्ष देऊन शाळा कॉलेजे थू असे विद्यार्थी सैनिकांनी ठरविले हिजे. असे जर करतो वेत नसेल तर नींना आपणांस उपोषण मागे घ्या असे गता येणार नाही. सरकारी हुकूमामुळे है आपले विधायक कार्य बंद पडणार ेच ते पुढे चालविण्या करिता जी १६ गैवरिष्ठ मोठी मुले आहेत त्यांनी सेवा-ाच्या विधायक कामाकरिता एक वर्ष गावे.गुरुजींचे प्राण वाचवावेत.तसेच गुरुजींच्या स धनेचे कमीतकमी १०००वर्गणीदार गुरुजींच्या जन्मदिवशी वाढविणे हाहि दुसरा मार्ग आहे. वर्गणीदार वाढल्याने त्याचा आवाज अनेकांच्या अंतःकरणांत प्रवेश करिल. हा मार्ग नेताने पुढें चालविणे आपले कर्तव्य आहे. सेवादलाचा प्रपंच नीट चालावा म्हणून आपण निधी गोळा करतो व त्यातून कार्यकर्त्यांचा खर्च चालवतो. त्याकरितां कॅलेंडरे वगैरे विकून पैसे मिळवितो. या वर्षीहि कॅलेंडरे काढली आहेत तीही मनापासून विकावी. परन्तु हा प्रयत्नच मुळी होत नाही. सरकारी निर्बंध कायदा, लाठी, बेबीम वगैरेवर आहेत. पण आपण एकाचाहि निर्बंध नसतांना जास्त उपयोग करीत नव्हता. उलट आपली खेळण्याकडे जास्त प्रवृत्ती होती. आपली या निर्बंधामुळें शक्ती कमी झाली असे म्हणता येणार नाही. त्याचे कारण मनांत शे धू. या पूर्वीचा आमचा उत्साह, आमची चेतना, आज की कमी झाली आहे !

देशातील तरुण पिढीत एक राष्ट्रीयत्वाची भावना वाढावी म्हणूनच सेवादलाची निर्मिती झाली. एक राष्ट्रीयत्वाच्या तत्वावर आपण स्वातंत्र्य चळवळीत उत्साहाने प्रगति करीत होतो व त्यांत आपणांस सापल्य दिसत होते. आपले मनोगत पुर करण्याचे कॉग्रेसने टाळून राष्ट्राची फाळणी करवाने आपल्या संघटनेवर घाला झाला. व अखंड भारत स्वतंत्र करूं या ध्येयाने प्रेरित होऊन आपण कार्य करीत होतो त्यास खो होऊ लागली राष्ट्राच्या फाळणीने सेवादलाचे काम न वाढता दुसऱ्या संघटना वळावल्या. वातीय वादाचा अग्नी शांत होण्यास गांधीजींचे मरण उपयोगी पडले. पण त्याचा आपण हवा तसा फायदा करून घेतला नाही. आपल्या विरोधी संघटना आपण आकसल्या पाहिजेत. सामाजिक क्रांति घडवून आणून आपल्या जीवनांत स्वातंत्र्य मिळण्याकरितां आपण स्वातंत्र्य चाहन होतो. जुन्या कल्पना अजूनहि रूढ आहेत. त्या दूर करण्यास विरोधी जातीयवादी संघटनांना आपण तोंड दिले पाहिजे. राष्ट्रीय स्वातंत्र्य जरी असले तरी सामाजिक आर्थिक विषमता दूर करून क्रांति घडविली पाहिजे. त्याकाठी परिस्थिती लक्षात घेऊन बनता राज्याकरिता सामाजिक, आर्थिक विषमता दूर करण्या करिता त्या क्रांतिकारक शक्ती आहेत. त्याला सेवादलाचा दुवा जोडला पाहिजे. कॉन्ग्रेसबरोबर राहून ही गोष्ट साध्य होत नाही म्हणून आपण प्रगतीच्या प्रवाहाबरोबर, सामाजिक शक्तिबरोबर, आंदोलना बरोबर आपण त्याचे घटक आहोत असे समजून व त्यावर जोर देऊन उत्साहाने कार्याला लागले पाहिजे.

सामाजिक क्रांतिमध्ये संस्कृती संरक्षण संवर्धक शक्तिकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. पुस्तकी-संस्कृति-संरक्षण सध्या नको आहे. कारण त्यांत सर्व सुन्या गोष्टी आहेत त्यांत त्यांना बदल करावयाचा नाही. संस्कृति-संरक्षक लोकच समाजाच्या उत्कर्षाच्या आड येवून सामाजिक क्रांति रोखतात. त्यांना विचारात्मक विरोध करून त्यांना नको असलेली सामाजिक, आर्थिक समता संघटितपणे तोंड देवून घडवून आणली पाहिजेत. राजकारण हा धंदा नाही. आपण निष्ठा ठेवून एक कार्य करतो, त्याचे पडसाद आपणावर झाले पाहिजेत. पालकांनी सरकारच्या या शिक्षक व विद्यार्थी यांच्यावरील अविश्वासात्मक घोरणाचा विचार करून सरकारच्या वैचारिक दरकारीकरणास स्पष्ट जबाब दिला पाहिजे. सामाजिक क्रांति करून आम्ही कोणती गैर गोष्ट करतो ! ही गोष्ट जर गैर नसेल तर सरकारी सर्क्युलर चुकीचे आहे. जोपर्यंत शासनसंस्था आहेत तोपर्यंत राजकारण हे असलेच पाहिजे म्हणून विधायक कर्तृत्व वाढीला लावून सेवादल उत्कर्षाप्रत न्यावे व त्या दृष्टीने गुरुजींचा उपवास योग्य असून त्यास आपण आपल्या कर्तृत्वाने पाठिंबा दिलाच पाहिजे.

१ आठवड्यांत ३१३ प्रकरणें

बृहन्मुंबई पोलिसांनी १७ नोव्हेंबरपर्यंत एका आठवड्यांत बेकायदा दारूबाबतची ३१३ प्रकरणे पकडली, १६४ इसमांना अटक केली आणि २५७ गॅलन बेकायदा दारू, ७४७९ गॅलन काकवी, १४ गॅलन परदेशी दारू व दोन गॅलन स्पिरिट जप्त केले.

बृहन्मुंबईसारख्या महानगरी विभागांत एका आठवड्यांत बेकायदा दारूची ३०० पेक्षा जास्त प्रकरणे सापडतात [न सांपडलेल्यांची कल्पनाच केलेली बरी.] याचा अर्थ काय ! सबब या प्रश्नाचा विचार सरकारने व जनतेने पुनःएकदार स्वतंत्र दृष्टिकोनांतून अवश्य केला पाहिजे. —आयुर्वेदाचार्य

जैन मोटार वर्क्स
गोळे कॉलनी, नाशिक.
आमचेकडे मोटार रिवेअरिंग, बॉडी बिल्डिंग व इतर सर्व प्रकारची कामे करून मिळतात.

स्वतः घर बांधून स्थाईक होणें हेंच आपले ध्येय असणार ?
मग घर बांधण्यापूर्वी आमचाच सल्ला घ्या
... आमचा पत्ता ...
पांडुरंग धोंडिबा करंजकर
गव्हर्नमेंट बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टर
ॲण्ड फर्निचर सप्लायर
घ. नं. ४०८ सर्कल प्रेस
भगूर आग्रारोड, नाशिक


खरजेवर रामबाण उपाय
सुभाष मलम
C. D. L. 493
—: मिळण्याचे ठिकाण :—
केशव मेडिकल स्टोअर्स
चांदवडकर गल्ली, नाशिक

दि.१६ डिसेंबर १९४९ च्या समता साप्ताहिकातील साने गुरूजींचा उपवास व राष्ट्रसेवादलाचे कर्तव्य या विषयांचा वृत्तांत

परिशिष्ट

१०

समता साप्ताहिक वृत्तांत



पू. साने गुरुजींचे प्राण वांचवा !

फॅसिझमचा प्रतिकार करा !

सरकारचा काळा कायदा हाणून पाडा !

समता

संपादक : ने. ग. अंबे

कुरमुऱ्याच्या परमिटमध्ये भावळांगी

उद्या ता. २४ रोजी महाराष्ट्रातील आधुनिक संत—सेनापति बापट तर त्यांना गेल्या शतकातील ज्ञानेश्वरच म्हणतात—पू० साने गुरुजी प्राणांतिक उपोषण सुरू करणार आहेत.

साने गुरुजींनी यापूर्वीहि अनेकवार प्रायोपवेशनें केली होतीं. महाराष्ट्रांत काँग्रेसचे एक लाख सभासद व्हावेत म्हणून त्यांनी उपोषण आरंभिलें होतें. पंढरपूरच्या विठोबाच्या मंदिरांत हरिजनांना प्रवेश मिळावा म्हणूनहि त्यांनी आपल्या प्राणांची बाजी केली होती. महात्मा गांधींचा खून एका नतद्रष्ट महाराष्ट्रियाच्या हातून झाला आणि महाराष्ट्राच्या तोंडाला कायमचें काळें फासलें गेलें, त्याचें प्रायश्चित्त घ्यासाठीं म्हणून गुरुजी एकवीस दिवस आपली काया कणाकणानें झिजवीत होते, आणि उद्या पुन्हा स्वतःच्या जन्मदिवशीं तें आमरण उपोषण सुरूं करीत आहेत.

गुरुजी हे महान कर्मयोगी आहेत. त्यांना स्वतःच्या प्राणाची पर्वा कधींच वाटली नाही. सेनापती काय, किंवा गुरुजी काय, उदात्त कार्यासाठीं आपले प्राण खर्चणें हाच जणूं त्यांचा जीवनधर्म ! परन्तु त्यांचा त्याग, त्यांचे आत्मक्लेश हे साध्यांत तपश्चर्या करणाऱ्या साधूप्रमाणें केवळ स्वतः मुक्त होण्यासाठीं नसतात. मार्गे जनतेचें मार्गदर्शन करण्याची, तिला कार्यप्रवण करण्याची, एक नवा मार्ग दाखविण्याची प्रेरणा असते.

उद्या सुरूं होणारे गुरुजींचें उपोषण कशासाठीं आहे ? सरकारनें कांहीं दिवसांपूर्वी एक काळे फर्मान काढून विद्यार्थी व शिक्षक यांच्यावर जे निर्बंध लादले आहेत, राष्ट्रविकासाचा, समाजाला नवी मूल्यें देण्याचा प्रयत्न करणाऱ्या राष्ट्रसेवादलाच्या परक्या नवसमाज निर्मितीचें महान व्रत घेतलेल्या संस्थेच्या गळ्याला नख लावण्याचा जो डाव रचला आहे त्याचा निषेध करून देशाचे भावी नागरिक आणि त्यांना घडवणारे शिक्षक यांच्या मोवतीं आवळले गेलेले हे दडपशाहीचे पाश तोडून टाकण्यासाठीं म्हणून गुरुजींनीं हा आत्मयज्ञ आरंभिलेला आहे.

हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यानंतर येथे लोकशाहीचा उदय होईल, सर्वांना समान संधी मिळेल, सर्वांचे हक्क अबाधित राहतील, सत्तेचा दुरुपयोग करून कोणाची मुस्कटदाबी केली जाणार नाहीं अशी स्वप्नें हिंदी जनता रंगवीत होती. आणि हीं स्वप्नें जनतेपुढें मांडण्याचें कामीं गुरुजींनीं केवढा तरी वाटा उचलला होता. परंतु स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तीं स्वप्नें साकार होण्याऐवजी जनतेच्या आशा आकांक्षांचे मनोरे एकामागोमाग एक दासळूं लागले. सत्ताधारी काँग्रेस सरकार लोकशाही मार्ग डावलून हळूहळू फॅसिझमच्या वळणावर जावूं लागलें. शिक्षक व विद्यार्थी यांची गळचेपी करणारा सरकारचा तो हुकूम म्हणजे परिसीमाच झाली. गुरुजींना तें कसें सहन होणार ? त्यांच्या मनाला असह्य यातना झाल्या. नागरिक हक्कांची सरकारनें चालविलेली ही विटंबना पाहून त्यांच्या डोळ्यांनें पहाणें गुरुजींना अशक्य झालें. त्यांनीं आपला निर्धार जाहीर केला कीं ' एक सरकारचा हा काळा कायदा तरी नष्ट होईल, नाही तर माझे प्राण तरी घेऊन जातील. '

गुरुजींचे हें आत्मदिव्य वैयक्तिक स्वार्थासाठीं सुरूं झालेलें नाहीं. त्यामागें नागरिकांचे आणि लोकशाही यांच्या रक्षणाची ज्वलंत तळमळ आहे. विद्यार्थी आणि शिक्षक म्हणजेच पर्यायानें सामान्य जनतेवर लादलेली गुलामगिरीची ही नवी बेडी तोडून टाकण्यासाठी उपोषणाचा हा मार्ग गुरुजींनी पत्करला आहे. या दिव्यांत गुरुजींचा बळी पडणार काय ? गुरुजींची लाखो लोकांच्या भावना हलवून सोडणारी वाणी, सुविचारांची पेरणी करून नवयुगाचा संदेश घरोघरीं पोहोंचविणारी गुरुजींची लेखणी या पुढें बंद पडणार काय ! गुरुजींचे लाख मोलाचे प्राण खरोखरीच नष्ट होणार काय ! विद्यार्थी, शिक्षक, कामगार, शेतकरी, खऱ्या संस्कृतीचे उपासक गुरुजींचे प्राण हरपूं देणार काय ! काँग्रेस सरकारच्या प्रत्येक कृत्याला निर्बुद्धपणानें मान डुकविणाऱ्यांव्यतिरिक्त भारत वर्षांत असा एक तरी करंटा निपजला असेल कां कीं जो ' गुरुजी खुशाल मरोत ' असे म्हणेल !

मग गुरुजींचे प्राण वांचविण्यासाठीं तुम्ही आम्ही काय करणार ! नुसते अश्रू गाळून आणि बोटें मोडून गुरुजींचे प्राण परत येणार नाहीत. त्यासाठीं एकजुटीनें प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे. सरकारचा हुकूम परत घ्यावयास लावण्यासाठी विराट आंदोलन केलें पाहिजे. सरकारला दाखवून दिले पाहिजे कीं, मेल्या मढ्याप्रमाणें सरकारची हवी ती बंधनें यापुढें आम्हीं मानणार नाहीं. हजारो लाखो सह्यांचे अर्ज पाठवून या हुकमाबद्दलची तीव्र नापसंती आपण सरकारच्या कानावर घातली पाहिजे.

चालू साली सरकारनें नासिक जिल्ह्यांत पोहे आणि कुरमुरे तयार करण्यासाठीं कांहीं निवडक लोकांना परवाने दिले असून त्यांचे मासिक "कोटे" ठरवून दिले आहेत. परन्तु हे परवाने देतांना अनेक भानगडी झाल्या असाव्यात असें स्पष्ट दिसते. ज्या लोकांना परवाने मिळाले आहेत त्यापैकी अनेकांचा या धंद्याशीं आजपर्यंत कसलाहि संबंध नव्हता. परन्तु या धंद्यांत भरमसाट नफा होतो व हवा तसा काळा बाजार करतां येतो म्हणूनच त्यांनी हे परवाने हर प्रयत्नानें हस्तगत केले असले पाहिजेत.

खालील माहितीवरून या धंद्यांत भरमसाट नफा कसा मिळविता येतो याची कल्पना येवूं शकेल. परवाना असणारांना दर बंगाली मणाचे एका पोत्यास रु. २४ या दराने सरकारी गुदामांत भात मिळते. एक पोते भाताचे कुरमुरे करण्यास सुमारे १० ते १२ रुपये खर्च येतो. आणि एक पोते भाताचे सव्वितीन ते चार पोती कुरमुरे तयार होतात. कुरमुऱ्याचा आजचा बाजार भाव २५ रु. पोते आहे. म्हणजे दर पोत्यामागे या व्यापाऱ्यांना अगदी सरळ मार्गाने रु. ५० ते ६० इतका नफा होतो.

त्याशिवाय अधिक नफा मिळविण्याचे व्यापाऱ्यांचे "राजमान्य" मार्ग या परवानेवाल्यांपाशीहि आहेतच. आपल्या जवळच्या साठ्याची नोंद ठेवण्याचें अथवा माल तयार किती झाला व तो कोणाला, किती व काय भावाने विकला तें सरकारी अधिकाऱ्यांना कळविण्याचें कसलेंहि बंधन त्यांच्यावर नसल्यामुळें साहजिकच काळ्या बाजारास हवी तेवढी मुभा मिळते. हे व्यापारी शेतकऱ्यांकडून खास भावाने भात खरेदी करून त्याचे कुरमुरे बनवतात व स्वतःचे खिसे गरम करतात. पाण्यांत कष्ट करून भात पिकविणाऱ्या शेतकऱ्याला सरकारकडून पोत्या अवघे रु. २२॥ मिळतात. पण तेच व्यापाऱ्यांच्या पदरांत घालून खुशाल त्यांना ५०–६० रु. घरबसल्या मिळवूं देतें.

व्यापाऱ्यांना ज्या वेळीं हे परवाने देण्यांत आले त्यावेळेपासूनच घोरआसपासच्या शेतकऱ्यांनी या विरुद्ध सरकारी अधिकारी, काँग्रेस कमेटी व मंत्री यांच्याकडे तक्रारी करून हा अन्याय त्यांचे नजरेस आणून दिलेला आहे. अद्यापपर्यंत कोणाकडूनहि समाधानकारक उत्तर मिळालेलें नाहीं. अथवा या अन्यायाला आळाहि बसलेला नाहीं.

आपला देश आज धान्य आयातीच्या बाबतींत आहे. धान्याचा प्रश्न सोडविण्यासाठीं व्यापारी पिकांवर निर्बंध घालण्याची जात आहेत. ठराविक क्षेत्रफळांत ऊस, शेंगा, कापूस इ. पिकांना शेतकऱ्यांस मनाई आहे. परन्तु या पिकांतून पिकलेल्या धान्याचा उपयोग अन्नासाठी वेगळ्या मार्गानें करून घेत आहेत. या व्यापाऱ्यांवर कडक निर्बंध लादण्याबद्दल मंत्रिमंडळाकडे त्यांना कुरमुरे करूं न देणे व त्या धंद्यांत काळाबाजार थांबविण्यासाठी व्यापाऱ्यांचे आपले साठे व कोणाला किती विकला तें कळविण्याची सक्ति करणे आवश्यक आहे.

सरकारी धान्य आयातीची यशस्विता ण्यासाठीं केलेली ही विधायक सूचना आहे. याचा योग्य तो परिणाम होईल अशी आशा करूं या !

प्रचंड सभा मिरवणुकांची निदर्शनें करून सरकारच्या निषेधाचा आवाज पोहोचविला पाहिजे. गुरुजी विद्यार्थ्यांस्तव एवढें दिव्य करीत असतांना त्यांनी क्षुद्र भीतीच्या आहारी जावून कसें चालेल ? सरकारचा हुकूम पायदळी तुडविण्याची तयारी त्यांनी दाखविली पाहिजे. ता. २४ ला जर सुट्या नसतील तर विद्यार्थ्यांनीं कसल्याहि दडपणाला बळी न पडतां शाळा कॉलेजें ओस पाडून सरकारी हुकमाचा सक्रीय निषेध केला पाहिजे.

गुरुजींच्या बद्दल मनांत कांहीं पूज्य भाव वसत असेल, त्यांचें मार्गदर्शन लाभावें, त्यांचा वाढदिवस उत्साहानें साजरा करावा असें वाटत असेल तर हा काळा कायदा जमीनदोस्त करण्यासाठीं प्रत्येकानें प्रयत्नांची शिकस्त केली

समता साप्ताहिकातील साने गुरूजींच्या पंढरपूर मंदिर प्रवेश लढ्याचा व गुरूजींचे प्राण वाचविण्याचे विनंती पत्र दि. २४ डिसेंबर १९४९

परिशिष्ट

११

समता साप्ताहिकातील वृत्तांत



गुरुजींना, महाराष्ट्राच्या मानकऱ्यांचा मुजरा

गुरुजींच्या तपश्चर्येला पंढरीचा विठोबा पावणार

मंदिर खुलें होण्याच्या मार्गावर

गांधीजींची तार : बडवे लेखी पत्रक काढ[illegible]

मुंबईत जयप्रकाश


समता साप्ताहिकातून पंढरपूर प्रवेश मंदिर लढा यशस्वी झाल्याबद्दल

साने गुरूजींना महाराष्ट्राचा मानाचा मुजरा दि. ८ डिसेंबर १९४९

परिशिष्ट

१२

साने गुरूजी (संपा), प्रदिप मासिकाचे मुखपत्र



प्रदीप

तरुण महाराष्ट्राचें ध्येयवादी मासिक

संपादकः–साने गुरुजी

सहसंपादकः–शशिशेखर वेदक, राम जोशी

व्यवस्थापकः–र. ना. गिरप, श्री-प्रभाकर पोतकर

जाहिरात व्यवस्थापकः–रा. ज. जोशी

जा. नं. १७, विजयनगर, दादर.

ता. १९४

This is a facsimile of a page from the "Vegetarian" a London Journal to which M. G. contributed several articles during his student days in England. These articles are the earliest published writings of G & their topic was not known to many people. An interesting memorial volume reproducing these articles in the form in which they originally appeared was recently got together by the London Vegetarian Society. A copy was presented to P. J. N. at a special function during his recent visit there. The fly-leaf of the memorial volume bears this inscription.


These first articles written by M. G were published in 1891 in "The Vegetarian" the weekly magazine of the London V. Society of which he was a member

June 13 1891 The vegetarian 323

Our workers.

Of the many who know something of India there are few who have any true conception of the habits & customs, the ways & aspirations, the religions in theory & in practice of the peoples of India. Mr Gandhi has however been active in the [illegible] paper is doing something worthy that [illegible]

There is no [illegible] connection with



in England which is not generally Known persistent force of character which has been them overcome the enormous difficulties which way of their coming here.

To enable Englishmen to appreciate those difficulties & so to respect every Hindu who lands upon those shores, & how they will find the Vegetarian Friends in England, we have asked Mr Gandhi briefly, tersely, a few questions.

Mr Gandhi was first asked what was the reason which first induced him to think of coming over to England & adopting the legal profession. "In a word Ambition. I matriculated at the Bombay University in the year 1887. Then I joined Samaldas College for unless you graduate at Bombay nowadays you get no status in society. If you want any employment before that, you can not secure unless of course you have a very good influence to back you up, a respectable post giving you a handsome salary. But I found that I would have to spend three years at the least before I could graduate. Moreover I suffered from constant headache & nose-bleeding, & this was supposed to be due to the climate. And after all I could not even after graduating expect any very great income. While I was constantly brooding over these things an old friend of my father's came & advised me to go to England & take the Bar. He as it were fanned the fire that was burning within me. I thought to myself, "If I go to England not only shall I become a Barrister (of whom I used to think a great deal) but I shall be able to see England, the land of philosophers & poets, the very centre of civilization." This gentleman had great influence with my elders, & so he succeeded in persuading them to send me to England.

This is a very brief statement of my views on the coming to England but they by no means represent my present views


साने गुरूजी (संपा) प्रदीप, महाराष्ट्राचे ध्येयवादी मासिक, लेटर हेड प्रत

(संकलन – साने गुरूजी राष्ट्रीय स्मारक वडघर, माणगांव)

परिशिष्ट

१३

छात्रालय दैनिकातील साने गुरूजींची कविता



"देशभक्ताची विनवणी"

कविता (संपादकीय)

सामिऱ्यांनो, दुनियेतल्यांनो परिसानी मदिरा, मधाची
परिसानी मदिरा ॥

गारगोटिच्या परी न व्हाने, व्हावें सुंदर हिरा ॥
धनलाभें निजयशः सुरभें विश्व सकल सुंदर, सदोदित
विश्व सकल सुंदर ॥

मुकुंद मूजनि निजांतरंगीं करा मना दुर्धरि ॥

मनास मश प्रभु देई
अद्वेष मश प्रभु देई
आशीष फल प्रभु देई

कर्तव्याचें कंकण बांधुनि करी, न डरेंभर, जनानें
कोनच डरेंभर ॥

महत्वाकांक्षा, अतिप्रेमांधता, संपादा सत्वर ॥ १॥

ज्ञान नको, अटक नको, शक्ति तें नको, नको तें धन, मनोहरा
नको नको तें धन ॥

निरस्त्र निःक्रम दुर्बल होऊनि ऐसें रडती जन ॥
क्षत्रान-निरती ही न साजते, व्हरे तपस्वी बना, बंधुनो
व्हरे तपस्वी बना ॥

कुणे न हें धरि प्रमाद करणी मिलना दौलत धना ॥

आकाश जणीं मिरवाने
वैभवीं भूस चढवाने
कीर्तिनें विश्व नेघावें

स्वाभिमानधन संतत अंतरीं संचवूनियां जगीं, सदभावांनो
संचवूनियां जगीं ॥

स्वर्गसुरवातें संपादाने शक्ती या जगीं ॥ २॥

प्रेमेश्वरी ना पडा आपुले, मरण व्याहुनी बरें, अनेरवर
मरण व्याहुनी बरें ॥

मेल्या परि हें जीवन कंचून कोण जगीं या तरे ॥

कोरंडाची कांब व्यापरी देह करा कणभर, अशोदर
देह करा कणभर ॥

देहाहुनि निजमन उत्साही करा सदें गांभीर ॥

आकाश कोसळो वरी
पदतलीं भूमि हो दुरी
मज फिकीर ना हो परी

ध्येयोन्मुख मी सदैव जाईन पतंग रीपावरी, जसा तो
पतंग रीपावरी

ऐसा निश्चय करा, भलत हो, जाउं न मागे तरी ॥ ३॥

जातिधर्मा या सर्वांहिचें जीवातमा रंगना, बंधुनो
जीवातमा रंगना ॥

पारतंत्र्य-दुर्दशेचा कडाकडा बजलेलें भंगवा ॥
निजांतरंगीं अनंत आशादीप पाजळो नियां, दूर हो
दीप पाजळो नियां ॥
वैराग्याची निशा नाशकर न्याची सत्वर कथा ॥

तर उठा झडकरी अतां
व्हाना न मुकिं विलंबता
या धीर दुर्बलां हतां

विजयाचा जयनाद घोषना दुमदुमोन अंबर, जाउं दे
दुमदुमोन अंबर ॥

म्हणे गातिल मुक्तमहिमा मग नारद तुंबर ॥ ४॥

——— समाप्त ———

(संकलन (इंग्रजी)

साने गुरूजी (संपा), छात्रालय दैनिक, अमळनेर, दि. ऑगस्ट १९२७, पृष्ठ क्र. ५,६
(देशभक्ताची विनवणी कविता) (संकलन – साने गुरूजी राष्ट्रीय स्मारक वडघर, माणगांव)

परिशिष्ट
१४

अमळनेरच्या प्रताप हायस्कुलचे विद्यार्थी त्यांनी सांगितलेल्या साने गुरूजींविषयी आठवणी

डी.बी कुलकर्णी

(मामासाहेब कुलकर्णी, मुंबई)

आम्ही अमळनेरच्या प्रताप हायस्कूलच्या छात्रालयात राहत होतो. आमच्या शेजारच्या खोलीत साने गुरूजी असत.

स्वातंत्र्य लढ्यात महात्माजींच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन साने गुरूजींनी शिक्षकाची नोकरी सोडून स्वातंत्र्य लढ्यात स्वतःला झोकून दिले ते सदैव दोन्ही खानदेशातील गावोगावी जाऊन नागरिकांना स्वातंत्र्यलढ्याची माहिती व महात्माजींचा संदेश समजावून सांगत असत. ते कधी स्वस्थ बसले नाहीत. त्या अव्याहत परिश्रमामुळे योग्य संदेश जनतेपर्यंत पोहचला व जागृती झाली. याचवेळी महात्माजींनी खेड्यात चला अशी काँग्रेसच्या अखिल भारतीय अधिवेशनासाठी खानदेशातील रावेर तालुक्यातील फैजपूर या खेड्याची निवड निश्चित झाली. त्याचप्रमाणे सर्व वरिष्ठ कार्यकर्ते कामाला लागले. काँग्रेस यशस्वी होण्यात साने गुरूजींचा सहभाग फार मोठा कारण त्यांनी अहोरात्र पायी वणवण करून स्वातंत्र्याचा संदेश घरोघरी पोहचला होता.

(केदार मोरेश्वर ब्रम्हो (संपा) स्मरणिका खा.शि. मंडळाचे प्रताप हायस्कुल, अमळनेर, जि. जळगाव जनशताब्दी १९०८ ते २००८) पृ.क्र. ५६,५७

परिशिष्टे

१५

राष्ट्र सेवा दल पत्रिका ऑगस्ट २०१७

इ.स. १९४२ च्या चलेजाव लढ्यामुळे मी राष्ट्रसेवा दलाकडे खेचला गेलो. १९४३ साली सेवा दलात सामील झालो. स्वातंत्र्य चळवळीसाठी सैनिक तयार करणे व समाजवादी चळवळीसाठी सैनिक तयार करणे हा राष्ट्रसेवा दलाची स्थापना करण्यामागचा स्पष्ट उद्देश आहे. तरूणांना देशभक्तीचे महत्व पटावे, स्वातंत्र्य चळवळीत तरूण सहभागी व्हावेत म्हणून सेवादलाची स्थापना करण्यात आली. ८ ऑगस्ट १९४२ ला गांधीजीनी चले जाव ची घोषणा केली..... सेवादलाचे तीन संस्थापक एस.एम. जोशी, नानासाहेब गोरे व शिरूभाऊ लिमये.... स्वातंत्र्याच्या वाटाघाटी सुरू झाल्या होत्या... सेवादलाच्या सैनिकांनी महाराष्ट्रभर विध्वंस पथकांमध्ये काम करण्यासोबतच सायक्लोस्टाईल पत्रकेही वाटली.

साने गुरूजी त्यावेळी मुंबई राहत होते. ते ही भूमिगत झाले त्यांना मदतीसाठी सेवा दलाचे सैनिक होते.... राष्ट्रसेवा दल हा माझा प्राण आहे असे साने गुरूजी म्हणत. दरम्यानच्या काळात साने गुरूजींनी क्रांती सैनिकांना आवाहन असे एक चोपडं (पत्रक) प्रसिध्द केले. ते सायक्लोस्टाईल केलेले होते. ते माझ्याकडे ही आले होते ते सर्वत्र कसे पसरेल हे आम्ही पाहत होतो.

(पान ६,७,८
राष्ट्रसेवादल पत्रिका)
ऑगस्ट २०१७

– भाई वैद्य
जेष्ठ समाजवादी विचारवंत

परिशिष्टे

१६ अ

नकाशा



स्वातंत्र्य पुर्वीचा भारत नकाशा

१६ ब



स्वातंत्र्यानंतरचा भारत नकाशा

परिशिष्टे

१७

साने गुरूजींचे साहित्य

चरित्र

१. नामदार गोखले चरित्र

२. ईश्वरचंद्र विद्यासागर

३. इतिहासचार्य राजवाडे

४. शिशिरकुमार घोष

५. रविंद्रनाथ टागोर

६. बेंजामिन फ्रँकलिन

७. जीवन प्रकाश

८. गोष्टीरूप गांधीजी

९. गोष्टीरूप विनोबाजी (विनोबा भावे)

१०. देशबंधु दास

११. श्री शिवराय

१२. महात्मा गौतम बुध्द

१३. बापुजींच्या गोड गोष्टी (भाग १ ते ६)

१४. आपले नेहरू

१५. लोकमान्य टिळक

१६. भगवान श्रीकृष्ण

१७. म. गांधी दर्शन (जावडेकरांची व्याख्याने)

१८. अमळनेर सखाराम महाराजांचे चरित्र

१९. चंद्रभागेच्या वाळवंटी (संत चरित्रे)

कविता

१. खानदेश स्त्रोत

२. पत्री

नाटक

१. ते आपले घर

२. निळा पक्षी

३. अस्पृश्योद्धार

४. मंगल प्रभात

आत्मकथपनर कांदबरी

१. श्यामची आई

२. श्याम

३. जीवनकलह अर्थात श्याम – खंड २
(धडपडणारा श्याम)

४. जीवनकलह अर्थात श्याम – खंड ३

पत्रे

१. सुंदर पत्रे (भाग १ ते ३)

२. श्यामची पत्रे

कादंबरी

१. धडपडणारी मुले – खंड १ व २

२. पुनर्जन्म

३. सती

४. आस्तिक

५. क्रांती

६. गोड शेवट

७. रामाचा शेला

८. नवा प्रयोग

९. संध्या

१०. चित्रकार रंगा

११. तीन मुले

१२. कालीमातेची मुले

१३. दीनबंधू

१४. दीगंबराय

कथा

१. विश्राम

२. सोनसाखळी

३. मुलांसाठी फुले

४. अमोल गोष्टी

५. दारूबंदीच्या कथा

६. साक्षरतेच्या कथा

७. सुंदर कथा

८. श्रमणारी लक्ष्मी

९. त्रिवेणी (शबरी)

१०. कावळे

११. जनी

१२. मोरी गाय

१३. जयंता

१४. शुक्ती

१५. कलिंगडाच्या साली

१६. ज्याचा भाव त्याचा देव

१७. गुराख्याचा खजिना

१८. ढकास महाठक

१९. बंधूप्रेम

२०. स्त्री

२१. खरा मित्र

२२. मानवजातीचे बाल्य

२३. बलसागर भारत होवो

२४. स्वर्गातील माळ

२५. पहिले दर्शन

२६. व्यक्ती आणि विश्व

२७. यज्ञ

२८. बासरीवाला

२९. नवा प्रयोग

३०. त्यागातील वैभव

३१. घामाची फुले

३२. बहुला गॉय

३३. सोन्याची साखळी

३४. अनमोल संस्कार कथा

३५. साने गुरूजींच्या बोधपर कथा

वैचारिक लेख, निबंध इत्यादी

१. भारतीय संस्कृती

२. सोन्या मारूती

३. गोड निबंध भाग १ ते ३

४. कर्तव्याची हाक

५. स्वातंत्र्याचा अर्थ

६. समाजवाद हा एकच मार्ग

७. भारतीय नारी

८. माझी दैवत

९. गीता–हृदय

१०. कुमारांपुढील कार्य

११. मंदिर–प्रवेश

१२. जीवनाचे शिल्पकार

१३. इस्लामी संस्कृती (महंमद पैगंबराचे चरित्र)

१४. हिमालयाची शिखरे

गोड गोष्टी मालेतील १० पुस्तके

१. विविध गोष्टी – १

२. विविध गोष्टी – २

३. मनूबाबा

४. फुलांचा प्रयोग व नदी शेवटी सागराला मिळते.

५. दुःखी

६. सौराव नि रूस्तम

७. बेबी सरोजा

८. करूणादेवी

९. यती की पती?

१०. चित्रा नि चारू

आवडत्या गोष्टी मालेतील ६ भाग

१. आपण सारे भाऊ

२. गोप्या

३. दुर्देवी

४. मिरी

५. स्वर्गीय ठेवा

६. नवजीवन वैचारिक लेख

७. स्वप्न आणि सत्य

८. गुरूजींचे उपदेश

९. उमाळा

१०. विश्वभारती

अनुवादित

१. खेड्यात जाऊन काय कराल?

२. राष्ट्रधर्म

३. स्वदेशी समाज

४. कला म्हणजे काय?

५. समाज धर्म

६. कला आणि इतर निबंध

७. कल्की अथवा संस्कृतीचे भवितव्य

८. राष्ट्रीय हिंदू धर्म

९. अमिलची चिंतनिका

१०. कुरल

११. मानवजातीची कथा

१२. दिल्ली डायरी

१३. ना खंत ना खेद

१४. साधना

१५. भारताचा शोध

१६. पाश्चमात्य तत्वज्ञानाची कहाणी

गुरूजींचे संपादित साहित्य

१. कमल फुले गोष्ट

२. मेंग चियांग आणि इतर कथा

३. गुरूजींच्या गोष्टी

४. स्वप्न आणि सत्य

५. गुरूजींचे उपदेश

६. स्त्री–जीवन भाग – १

७. स्त्री–जीवन भाग – २

****

छायाचित्र



साने गुरूजी



साने गुरूजी यांचे जुने घर



साने गुरूजी यांचे नवीन घर



साने गुरूजींसोबत त्यांची बहीण चंद्री (लक्ष्मी दत्तात्रेय उर्फ अक्का भिडे) आणि त्यांच्या डाव्या बाजुस गुरूजींचे धाकटे बंधु पुरूषोत्तम सदाशिव साने. त्यांच्या पुढ्यात बसलेला गुरूजींचा पुतण्या वसंत गजानन साने व गुरूजींची भाची मनुताई जगन्नाथ थत्ते.



साने गुरूजी यांचे मोठे बंधू गजानन सदाशिव साने, वहिनी लक्ष्मी गजानन साने, पुतण्या वसंता, पुतणी सुधा साने (बोडा) व कुंटुबातील मुलांसमवेत.



साने गुरूजींची धाकटी वहिणी
सुशिला पुरूषोत्तम साने



साने गुरूजींची मावशी
सखुबाई आपटे



प्राथमिक शाळा पालगड



ऑल्फ्रेड गॅडने हायस्कूल दापोली



श्रीयमाई विद्यालय औंध



औंध शाळेच्या रजिस्टर मधील नाव



तत्वज्ञान मंदिर, अमळनेर



प्रताप हायस्कूल, अमळनेर



प्रताप मिल, अमळनेर



साने गुरूजी शेतकरी मेळाव्यात भाषण करताना
(धुळे दि. ४ व ५ ऑक्टोबर १९३७)



साने गुरूजी श्रमिक मेळाव्यात भाषण करताना



साने गुरूजी जाहीर सभेत भाषण करताना









धुळे कारागृह जुने व नवीन






साने गुरूजींचा कारावास स्थान

(सन १९३२,१९४० व १९४२)



साने गुरूजींच्या अटकेच्या निषेधार्थ सभा, ऑक्टोबर १९४५, चाळीसगाव (जळगाव)



Confidential.

No. 1834 of 1941.

From

Lt-Col. M.G.Bhandari, I.M.S.,
Inspector General of Prisons,
Province of Bombay.

To

The Secretary to Government,
Home Department (Political)
Bombay.

Inspector General of Prisons' Office
Poona, 19th December 1941.

Sir,


In continuation of this office Confi-
-dential No.1830, dated 18th December 1941,
have the honour to forward herewith nominal
roll of a non-C.D.O. prisoner still undergo-
imprisonment in the Dhulia District Prison.

I have the honour to be
Sir,
Your most obedient servant

Lt-Col. I.M.S.
Inspector General of Prisons,
Province of Bombay.

Sane's case is under con-
-sideration separately.

साने गुरूजींनी आक्षेपार्ह भाषण केल्याचा आरोप ठेवून त्यांच्यावर खटला दाखल झाला. त्या आरोपासाठी २ जानेवारी, १९४१ रोजी दोन वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली. ४ जानेवारी रोजी त्यांची धुळे कारागृहात रवानगी झाली.



East Khandesh, June 8.

~~Pvt., Bombay Presidency, Poona, June 15~~

At a meeting held at Amalner, East Khandesh District, on May 31 under the presidentship of Pandurang Sadashiv Sane, Ramchandra Dhondu Bhoge and Durgabai Joshi spoke on the subject of "Should ladies take part in Congress activities. They impressed upon the audience that it was the duty of all women to take an interest in Congress affairs.

विशेष गृहविभाग (गुप्त वार्ता) अहवाल : ८ जून १९३५ साने गुरूजींच्या अध्यक्षतेखाली दि. ३१ मे, १९३५ रोजी आमळनेर येथे झालेल्या सभेचे वृत्त.



साने गुरूजी व स.ज. भागवत



साने गुरूजी व विनोबा भावे



दादासाहेब मावळंकर, पुरूषोत्तम मावळकर,
साने गुरूजी व एस.एम. जोशी



साने गुरूजींची विद्यार्थ्यांना भेट,
बेळगांव (ठळकवाडी), बालिकादर्श विद्यालय



पंढरपूरच्या वाटेवर सानेगुरुजी
पांडुरंगचरणी मरण अधिक पसंत

पुणें, ता. ३०—श्री. सानेगुरुजी हे संकल्पित उपवास उद्यापासून पंढरपूर येथें सुरू करण्यासाठी आज दुपारी १२ वाजतांच्या गाडीनें पंढरपुरास रवाना झाले. उपवासापासून आपल्यास परावृत्त करण्याच्या प्रयत्नांना यश येणार नाहीं, अशें सुचित करतांना आज श्री. साने पुढारीनीं त्यांच्या सन्मानप्रसंगीं सांगितलें कीं, केव्हा तरी जगांतून जायचेंच आहे तेव्हां मी पंढरपुरास उपवास सुरू करणार आहे; यायचें असलें तर पांडुरंगाच्या चरणीं मरण येईल. आचार्य विनोबा भावे ह्यांनीं उपवास करूं नका असा संदेश पाठविला होता, पण त्यांना सुद्धां आपण 'क्षमा करा' असें उत्तर धाडलें आहे असें श्री. साने गुरुजी म्हणाले.

भारताच्या उदात्त नि नम्र सुपुत्राचें
प्राण वांचवा

साने गुरुजींसाठी जयप्रकाशजींची विनंती

मुंबई, शुक्रवार—महाराष्ट्रीय जनतेनें आमरणांत पंढरपूर येथें करण्यांत येणाऱ्या उपोषणाच्या संकल्पाबद्दल जे सौहार्दपूर्ण उद्गार काढले आहेत त्यांचा सारांश देण्याचा प्रयत्न करणें अशक्य आहे.

ते सूत्रमयजीवन यापुढें या कार्यासाठीं खर्च करावें असा विनोबा व इतरांचा आग्रह असल्यामुळें ते पंढरपूरला उपोषणास बसण्याचा निर्धार करीत आहेत. त्यांच्या या निर्धाराबद्दल सर्व महाराष्ट्रांतून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. ...

आशियांतील कामगार संस्थांची संयुक्त परिषद

(की टेलि ब्युरो इंडिया)

मुंबई, ता. १—आशियातील देश मुंबई-स्थानीं संयुक्त परिषद उपयोजक भारत व चायना यांसारख्या चाळीसहीन देशांचे कामगार संघ या परिषदेला उपस्थित राहतील. ...



आपल्या तारेनें अपार दुःख झालें
महात्माजींना गुरुजींचें उत्तर

हिंदू समेच्या चिरणिमंची वरदयांना विनंती

पंढरीचा विठूराया मुक्त झाला
सनातनी श्रद्धेला गुरुजींच्या
मानवतेचा दिव्य स्पर्श

पंढरपूर, ता. १०—साने गुरुजींची, तपश्चर्या आज पंढरीच्या विठोबाचें मंदिर हरिजनांना खुलें होऊन अखेर फळाला आली आहे. बडवे मंडळींनी एकमतानें मंदिर खुलें करण्याचा निर्णय घेतला असून, तदनुसार १९३८ च्या ११ व्या मंदिर प्रवेश कायद्यान्वयें जरूर ती कायदेशीर व्यवस्था करण्यांत यावयाची आहे.

कोटोपंडे बडव्यांनी आपला निर्णय जाहीर केला तेव्हां म. विधिमंडळाचे अध्यक्ष श्री. दादासाहेब मावळणकर, अप्पासाहेब पंत, श्री. एस. एम. जोशी व डॉ. भडकमकर हे हजर होते.


बडव्यांनी केलेल्या विनंतीनुसार गुरुजींनीही उपोषण सोडलें आहे. अलीकडे प्रकृति हरवत चालली मोक्ष्याचा रस घेतला व अशा तऱ्हेनें १० दिवसांचें आपलें व्रत ...

नवशक्ती : १ मे १९४७ साने गुरूजींचा उपोषणास बसण्यासाठीचा निर्धार


नवशक्ती : १० मे १९४७ जयप्रकाश नारायण यांचे महाराष्ट्रीय जनतेस आवाहन

नवशक्ती : ९ मे १९४७ महात्माजींच्या तारेस साने गुरूजींचे उत्तर

वृत्तपत्रामधील बातमी










साने गुरूजी संपादीत दैनिक व साप्ताहिक

फैजपूर काँग्रेस अधिवेशन ठिकाणाचा आराखडा नकाशा



हरिजनांना मंदिरात प्रवेश मिळावा यासाठी साने गुरूजींबरोबर दौऱ्यावर असताना सेनापती बापट, कर्मवीर भाऊराव पाटील आणि क्रांतीसिंह नाना पाटील, शाहीर साबळे यांच्या परसणी गावी आले होते. त्यावेळी भैरवनाथ मंदिरात सर्वप्रथम हरिजनांना प्रवेश मिळाला.





गुरूजींचे पंढरपूर दौऱ्यातील साथी

वरची ओळ (उभे) : राजाभाऊ मंगळवेढेकर, लीलाधर हेगडे, भाल वायाल, काका कोणी, गाडीचा क्लिनरमधली ओळ (बसलेले): रामभाऊ तेलंग, राघुअण्णा लिमये, कुतुबखालची ओळ (बसलेले) : ड्रायव्हर, भालचंद्र माडगुळकर, अण्णा बर्वे, नवाथे मास्तर



पंढरपूर, हरिजन विठ्ठल मंदिर प्रवेश प्रचार दौरा– खानदेश दौरा भुसावळ स्टेशन रेल्वेमार्गावर

डावीकडून सहावे साने गुरूजी त्यांच्या उव्या बाजूस सेनापती बापट, शेजारी राम तेलंग. डाव्या बाजूस श्री. अण्णासाहेब दास्ताने व भुसावळचे इतर कार्यकर्ते



मोसंबीचा रस घेऊन उपोषण सोडताना साने गुरूजी






त्रिचनापल्ली तुरुंगातून सुटका झाल्यानंतर बेळगाव रेल्वेस्टेशनवरील क्षण



श्रमदान करताना राष्ट्र सेवा दलाच्या सैनिकां सोबत साने गुरूजी



सेवादलाच्या एका शिबिरात झेंडावंदनाला उपस्थित साने गुरूजी व एस. एम. जोशी





प्रभाकर पाध्ये (संपादक), नवशक्ती, मुंबई
सोमवार ता. १२ माहे, जून १९५०



रावसाहेब पटवर्धन, अच्युतराव पटवर्धन, एस.एम. जोशी आणि अशोक मेहता यांनी साने गुरूजींना वाहलेली अखेरची अदरांजली



समता

संपादक : न. ग. ओक

(२ रे) शुक्रवार ता. १६ जून १९५० (अंक ४४ वा

पू. साने गुरुजींनीं अखेरचें झोपी जाण्यापूर्वी लिहिलेल्या पत्रांत खालील संदेश आहे

" खान्देशला व महाराष्ट्राला अखेरचा भक्तिप्रेमाचा व कृतज्ञतेचा संदेश कीं, लोकशाही समाजवादी पक्षांत या. अजातीय व अहिंसक, लोकशाही व सत्याग्रही दृष्टी घ्या. मारवांत रक्तपात न होतां समाजवाद येवो. व्यक्ति-स्वातंत्र्याबद्दल समाजवाद फुलो. पू. विनोबांचें स्मरण. "

—साने गुरुजी

न.ग. ओक (संपा) समता साप्ताहिक,दि. १६ जून, १९५०




साप्ताहिक समता

ती ध्येयज्योत विझूं देवूं नका !

' नदी शेवटीं सागराला मिळते

न.ग. ओक (संपा) समता साप्ताहिक, दि. १६ जून, १९५० मान्यवरांची साने गुरूजींना आदरांजली



आम्हाला आई गेल्याचे दु:ख झाले!
- एस.एम.जोशी

साने गुरुजींच्या काँग्रेस-सेवेला खरोखर तोड नाही!
- भाऊसाहेब हिरे

महाराष्ट्राला बसलेला मोठा धक्का...
- ईश्वरलाल छोटूभाई

संतप्रवृत्तीने युवकांना जिंकणारा देशभक्त...
- दादासाहेब मावळंकर

अनेक शतकांतून अशी एखादी विभूती जन्मास येते.
- आचार्य अत्रे

त्यांचे चरित्र व चारित्र्य म्हणजे महाराष्ट्राचा अमोल ठेवा आहे.
- सेनापती बापट


त्यांनी पेटवलेली प्रेमाची ज्योत आम्ही कधीही विझू देणार नाही.
- आचार्य भागवत

महाराष्ट्रातील सर्वांत तरुण पिढी त्यांनी आपल्या विचाराने भारून टाकली. 'अमृतस्य पुत्र:' ही त्यांची वास्तविक पदवी आहे.
- विनोबा भावे


'साधना'तील सर्व कामगार वर्गाला आपली प्रेमळ माताच नाहीशी झाल्याचं दु:ख झालं.
- श्रीकांत बेरेकर, संपादक : साधना

महाराष्ट्रातील कुठल्याही राजकीय नेत्यापेक्षा, संतापेक्षा किंवा साहित्यिकापेक्षा गुरुजींना जनतेचे अधिक प्रेम मिळाले.
- रावसाहेब पटवर्धन

मान्यवरांनी साने गुरूजींना वाहलेली आदरांजली



चित्रपट सृष्टीतील राष्ट्रीय पुरस्कार विजेता




रमेश देव प्रदर्शित सेनानी साने गुरूजी चित्रपट (१९९५)




साने गुरूजी लिखित श्यामची आई पुस्तकावर आधारीत चित्रपटाला राष्ट्रपती पुरस्कार, निर्माता, प्र.के. अत्रे (चित्रपट- श्यामची आई)



प्रभादेवी उद्यान वबृ.मु.म.पा. साने गुरूजींचे नाव दिले



साने गुरूजींची इतर भाषांमध्ये अनुवादीत पुस्तके



टपाल डाक तिकीट